सत्यमेव जयते

# राज्य निवडणूक आयोग

## रौप्यमहोत्सवी वाटचाल



राज्य निवडणूक आयोग
महाराष्ट्र

# राज्य निवडणूक आयोग

## रौप्यमहोत्सवी वाटचाल

राज्य निवडणूक आयोग

**राज्य निवडणूक आयोग :**
**रौप्यमहोत्सवी वाटचाल**

संकल्पना आणि प्रेरणा
**श्री. ज. स. सहारिया**
राज्य निवडणूक आयुक्त, महाराष्ट्र

मार्गदर्शक
**श्री. किरण कुरुंदकर,**
सचिव, राज्य निवडणूक आयोग

**श्री. शेखर चन्ने**
माजी सचिव, राज्य निवडणूक आयोग तथा
परिवहन आयुक्त, महाराष्ट्र

संपादक
**श्री. जगदीश मोरे**
जनसंपर्क अधिकारी,
राज्य निवडणूक आयोग

**श्री. सुनील चव्हाण,**
वरिष्ठ पत्रकार,
पुणे

© राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र
SEC/P.N.45/2019-8/Raupyamahotsavi Vatchal

प्रकाशन
**२६ एप्रिल २०१९**
(राज्य निवडणूक आयोगाचा २५वा वर्धापनदिन)

मुखपृष्ठ
**सौ. सुखदा कुलकर्णी,** पुणे

सहकार्य
**श्री. विनोद चव्हाण, श्री. समीर राणे**

मांडणी
**फ्रेंड्स ऑफ फार्मर्स,**
शिवकृपा, ११८९, शुक्रवार पेठ, सुभाषनगर,
लेन क्र. ३, पुणे – ४११००२.
भ्रमणध्वनी : ९८८१०९८१८०, ९४०३८५५३४५
ई–मेल : farmfriendspune@gmail.com

छायाचित्रे
माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन

मुद्रक
**शिवानी प्रिंटर्स,** कसबा पेठ, पुणे – ४११०११

प्रकाशक
**राज्य निवडणूक आयोग,**
पहिला मजला, नवीन प्रशासकीय भवन,
हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग,
मुंबई – ४०००३२
दूरध्वनी – ०२२–२२०४६९०९
ई–मेल : sec.mh@gov.in

---

'राज्य निवडणूक आयोग: रौप्यमहोत्सवी वाटचाल' या ग्रंथात २५ वर्षांच्या वाटचालीचा धावता आढावा घेतला आहे. हा ग्रंथ परिपूर्ण करण्याचा प्रयत्न केला असला तरी काही माहिती अथवा संदर्भ अनवधानाने राहून गेल्याची शक्यता नाकारता येत नाही. शिवाय या ग्रंथात वापरलेली छायाचित्रे प्रातिनिधिक स्वरूपाची आहेत. सखोल माहितीसाठी संबंधित मूळ नियम, कायदा, आदेश अथवा परिपत्रक पाहावे.

**Ch. Vidyasagar Rao**
GOVERNOR OF MAHARASHTRA

सत्यमेव जयते

**RAJ BHAVAN**
**Malbar Hill**
**Mumbai 400 035**
Tel : 022-2363 2660
Fax : 022-2368 0505



१६ ऑक्टोबर २०१८

# शुभेच्छा

राज्य निवडणूक आयोगाला २५ वर्षे पूर्ण होत असल्याच्या पार्श्वभूमीवर आयोगाच्या वाटचालीचा एकत्रित आढावा घेणारा 'राज्य निवडणूक आयोग : रौप्यमहोत्सवी वाटचाल' हा ग्रंथ प्रकाशित करण्यात येत असल्याचे समजून आनंद झाला.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या दृष्टीने भारतीय संविधानात सन १९९२ मध्ये क्रांतिकारक ७३ आणि ७४वी दुरुस्ती करण्यात आली. त्यानंतर प्रत्येक राज्यात स्थापन झालेल्या स्वतंत्र राज्य निवडणूक आयोगामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका अधिक निर्भय, मुक्त, पारदर्शकपणे व वेळेवर पार पडू लागल्या. म्हणूनच ७३ आणि ७४ वी घटनादुरुस्ती महत्त्वाची ठरली आहे.

भारत निवडणूक आयोगाप्रमाणेच दर्जा व अधिकार असलेला राज्य निवडणूक आयोग संविधानिक संस्था म्हणून आता नावारूपास आला आहे. राज्य निवडणूक आयोगाचे स्वतंत्र स्थान आणि स्वायत्ततेचा सर्वांनी व्यापक दृष्टीने स्वीकार करण्याची आवश्यकता आहे.

राज्य निवडणूक आयोगाच्या गेल्या चार वर्षांच्या वाटचालीचा मी प्रत्यक्ष साक्षीदार आहे. या कालावधीत राज्य निवडणूक आयुक्त श्री. ज. स. सहारिया यांच्या नेतृत्वाखाली राबविण्यात आलेले नावीन्यपूर्ण उपक्रम देशभरातील निवडणुकांच्या दृष्टीने पथदर्शक आहेत. आयोगाच्या संपूर्ण वाटचालीचा या ग्रंथात घेतलेल्या आढाव्यामुळे एक उत्तम ऐतिहासिक दस्तऐवज तयार झाला आहे. संदर्भमूल्य म्हणून तो प्रत्येक मतदार, उमेदवार, राजकीय पक्ष, अभ्यासक, पत्रकार यांना निश्चित उपयुक्त ठरेल, असा मला विश्वास वाटतो.

रौप्य महोत्सवी वाटचालीबद्दल मी राज्य निवडणूक आयोगाचे अभिनंदन करतो, तसेच या ग्रंथ प्रकाशनास मनःपूर्वक शुभेच्छा देतो!

**(चे. विद्यासागर राव)**
महाराष्ट्राचे राज्यपाल

# प्रस्तावना



भारतीय संसदीय लोकशाही प्रणालीत त्रिस्तरीय व्यवस्था आहे. केंद्र, राज्य आणि स्थानिक या तीन स्तरांवरून लोकशाही मूल्यांचे संवर्धन केले जात आहे. केंद्र आणि राज्यस्तरीय म्हणजे लोकसभा आणि विधानसभेच्या निवडणुकांची जबाबदारी भारत निवडणूक आयोगावर आहे. हा आयोग २५ जानेवारी १९५० पासून कार्यरत आहे. ग्रामपंचायती, पंचायत समित्या, जिल्हा परिषदा, नगरपंचायती, नगरपरिषदा आणि महानगरपालिका या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची संविधानिक जबाबदारी राज्य निवडणूक आयोगावर आहे.

भारतीय संविधानात ७३ व ७४वी दुरुस्ती १९९२मध्ये करण्यात आली. त्यानंतर प्रत्येक राज्यात स्वतंत्र राज्य निवडणूक आयोगाची स्थापना करण्यात आली. महाराष्ट्रामध्ये २६ एप्रिल १९९४ रोजी राज्य निवडणूक आयोग कार्यरत झाला. राज्य निवडणूक आयोगाच्या सुमारे २५ वर्षांच्या वाटचालीचा एकत्रित आढावा 'राज्य निवडणूक आयोग : रौप्यमहोत्सवी वाटचाल' या ग्रंथात घेण्याचा प्रयत्न केला आहे.

भारतीय संविधानातील ७३ व ७४व्या घटनादुरुस्तीच्या २५ वर्षांनिमित्त राज्य निवडणूक आयोगातर्फे विविध उपक्रम राबविण्यात आले. लोकशाही आणि निवडणुका याअनुषंगाने मुंबई विद्यापीठात नोव्हेंबर २०१७मध्ये दोन दिवसीय राष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले. विभागीय परिषदाही घेण्यात आल्या. विविध राजकीय पक्षांची मे २०१८मध्ये कार्यशाळा घेण्यात आली. निवडणूकविषयक तज्ज्ञांची जुलै २०१८मध्ये एकदिवसीय परिषद आयोजित केली होती. ऑक्टोबर २०१८मध्ये मुंबईत आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले. या माध्यमातून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका अधिकाधिक निर्भय, मुक्त व पारदर्शक वातावरणात पार पाडण्याच्या दृष्टीने व्यापक विचारमंथन झाले.

राज्य निवडणूक आयोगाने शहरी व ग्रामीण अशा दोन्ही स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची संविधानिक जबाबदारी आतापर्यंतच्या राज्य निवडणूक

आयुक्तांच्या नेतृत्वाखाली यशस्वीरीत्या पार पाडली आहे. आयोगाच्या विविध टप्प्यांवर वेगवेगळ्या निवडणूक सुधारणा झाल्या. विविध उपक्रम राबविले गेले. हे बदल स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका अधिकाधिक निर्भय, मुक्त व पारदर्शक वातावरणात पार पाडण्यासाठी निश्चितच हितकारक ठरले. खरे तर निवडणूक सुधारणा ही निरंतर चालणारी प्रक्रिया आहे. बदलत्या काळानुसार निवडणूक यंत्रणेसमोरील आव्हानेही बदलत असतात, नवीन प्रश्न उपस्थित होतात. त्या सर्वांची उकल करून पुढे जाणे क्रमप्राप्त ठरते. त्याचा परामर्श या ग्रंथात घेण्याचा प्रयत्न केला आहे.

राज्य निवडणूक आयुक्त म्हणून मी पदभार घेतल्यानंतर सर्वप्रथम स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूक प्रक्रियेसमोरील आव्हानांचा मागोवा आणि वेध घेण्याचा प्रयत्न केला. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका; तसेच राज्य निवडणूक आयोगासंदर्भात शासकीय यंत्रणा आणि काही घटकांमध्ये गांभीर्याचा अभाव जाणवला. शहरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांत असलेले मतदानाचे कमी प्रमाण हा विषय अधिक चिंतनाचा होता. लहानलहान मतदारसंघ (वॉर्ड) आणि मोठ्या प्रमाणात उमेदवारांची संख्या ही या निवडणुकांची वैशिष्ट्ये प्रकर्षाने लक्षात घेतली. अव्वल कारकून/मंडल अधिकारी व उपजिल्हाधिकाऱ्यांपर्यंतच्या अधिकारी–कर्मचाऱ्यांवर या निवडणुकांमध्ये 'निवडणूक निर्णय अधिकारी' म्हणून जबाबदारी सोपवली जाते. हे सर्व मुद्दे विचारात घेणे आवश्यक असते. त्याअनुषंगाने मी कामकाज करण्याचा प्रयत्न केल्याचे मागे वळून पाहताना लक्षात येते.

विविध प्रकारची आव्हाने लक्षात घेऊन मी काही उपाययोजना करण्याचे निश्चित केले. संशोधनाच्या माध्यमातून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची गतिशीलता आणि विविध आयाम समजून घेतले. त्यासाठी राज्यातील विद्यापीठांना प्रोत्साहित केले. निवडणुकीशी संबंधित शासकीय अधिकारी, कर्मचाऱ्यांमध्ये उत्साह निर्माण करून त्यांचा आत्मविश्वास उंचावण्याचा प्रयत्न केला. भारत निवडणूक

आयोग आणि राज्य निवडणूक आयोग दोन्ही स्वतंत्र संविधानिक संस्था आहेत. कुणीही दुय्यम नाही, याचे गांभीर्य लक्षात घेणे आवश्यक आहे. राज्य निवडणूक आयोगाची स्वायत्तता कायम राखणे, ही राज्य शासनाची महत्त्वाची जबाबदारी आहे. कारण त्याशिवाय पारदर्शक निवडणूक शक्य नाही. गेल्या काही वर्षांत या संदर्भात उपाययोजना करण्यात आल्या. लोकसहभाग आणि लोकांकडे असलेले लोकशाहीचे स्वामित्व यावर व्यापक विचारमंथन केले. तंत्रज्ञानाचा वापर करून निवडणूक प्रक्रिया अधिक सुलभ, मुक्त, निर्भय व पारदर्शक करण्यावर भर दिला. त्याचे दृश्य स्वरूपातील परिणाम गेल्या चार-साडेचार वर्षांत दिसून आले; परंतु या ग्रंथात केवळ या साडेचार वर्षांचाच ऊहापोह न करता, गेल्या २५ वर्षांच्या वाटचालीचा मागोवा घेण्याचा प्रयत्न आम्ही केला आहे.

नामनिर्देशनपत्रांसाठी संगणक प्रणालीची सुविधा चार-साडेचार वर्षांपूर्वी प्रथमच उपलब्ध करून दिली. अशी अनेक उदाहरणे सांगता येतील. मतदान केंद्रांबाहेर उमेदवारांच्या शैक्षणिक व गुन्हेगारीविषयक पार्श्वभूमीसंदर्भातील माहितीचे फलक लावण्यात येऊ लागले. आवश्यक कागदपत्रांची पूर्तता न करणाऱ्या २२० राजकीय पक्षांची नोंदणी रद्द करण्यात आली. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत 'नोटा'ला सर्वाधिक मते मिळाल्यास फेरनिवडणुकीची तरतूद करण्यात आली आहे. आंतरराष्ट्रीय पातळीवर नवनवीन संकल्पनांची देवाणघेवाण करण्यासाठी 'राष्ट्रकुल स्थानिक स्वराज्य संस्था मंच'सोबत (सीएलजीएफ) सामंजस्य करार केला. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसंदर्भात संशोधनाला चालना देण्यात आली. उमेदवारांना शपथपत्रात उत्पन्नाचे स्रोत जाहीर करणे बंधनकारक करण्यात आले. आधीच्या निवडणुकीत जाहीर केलेल्या मालमत्तेचा तपशील सारांश स्वरूपात शपथपत्रात नमूद करणेदेखील बंधनकारक केले. आश्वासनपूर्ती अहवाल प्रसिद्ध करणेही बंधनकारक केले. लोकशाहीच्या बळकटीकरणासाठी केवळ याच उपाययोजनांवर थांबून चालणार नाही; आणखी काही पावले उचलावी लागणार आहेत.

निवडणुकांच्या काळात मतदार जागृती मोहीम हाती घेतली जाते; परंतु ही प्रक्रिया सातत्याने सुरू राहिली पाहिजे, अशी अनेक मान्यवराची सूचना होती. ही बाब विचारात घेऊन २६ जानेवारी ते १० फेब्रुवारी या कालवधीत दर वर्षी 'लोकशाही पंधरवडा' साजरा करण्याचा निर्णय आयोगाने घेतला. २०१८मध्ये पहिला पंधरवडा साजरा करण्यात आला.

निवडणुकांसंदर्भात व्यापक विचारमंथन, प्रशिक्षण आणि क्षमतावृद्धी यासाठी सुप्रशासनाकरिता लोकशाही व निवडणूक संस्थेची (इन्स्टिटट्यूट ऑफ डेमोक्रसी ॲण्ड इलेक्शन फॉर गुड गव्हर्नन्स) स्थापना करण्यात आली. मतदार जागृती मोहिमेला लोकचळवळीचे स्वरूप देण्याचा प्रयत्न केला. याचाच एक भाग म्हणून जानेवारी २०१७मध्ये मुंबई येथील प्रजासत्ताक दिनाच्या संचलनात प्रथमच आयोगाच्या चित्ररथाचा समावेश करण्यात आला. मतदार जागृती अभियानाचे लोकचळवळीत रूपांतर करण्याचा आम्ही प्रयत्न केला. त्याला चांगले यशही लाभले. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या फेब्रुवारी २०१७मध्ये झालेल्या निवडणुकांमध्ये मतदानाच्या टक्केवारीत झालेली वाढ ही या उपक्रमांची फलश्रुती म्हणावी लागेल.

'राज्य निवडणूक आयोगः रौप्यमहोत्सवी वाटचाल' या ग्रंथातील काही संदर्भ बरेच जुने आहेत. काही संदर्भ भारत निवडणूक आयोग किंवा लोकसभा, विधानसभा निवडणुकांशी संबंधित आहेत. कारण भारत निवडणूक आयोग १९५० पासून कार्यरत आहे. राज्य निवडणूक आयोग आणि भारत निवडणूक आयोग दोन्ही स्वतंत्र असले, तरी दोघांचे अधिकार आपापल्या कार्यक्षेत्रात समान आहेत. शिवाय, सर्वच निवडणुकांची प्रक्रिया बऱ्याच अंशी सारखीच असते. साहजिकच, बहुतांश विषयप्रवेशाप्रसंगी भारत निवडणूक आयोगाचे संदर्भ आले आहेत. एकूणच, सर्व संदर्भांबाबत अनवधानाने राहिलेल्या उणिवा किंवा त्रुटी निदर्शनास आणून दिल्यास स्वागतच असेल.

आयोगाचे सचिव श्री. किरण कुरुंदकर आणि माजी सचिव श्री. शेखर चन्ने या

दोघांचा 'निवडणूक' या विषयातील प्रदीर्घ अनुभव निश्चितच उपयुक्त ठरला आहे. आयोगाचे माजी उपसचिव ध. मा. कानेड आणि माजी अवर सचिव नि. ज. वागळे यांचेही सहकार्य लाभले, तसेच आयोगातील सर्व अधिकारी कर्मचारी यांचा या ग्रंथाच्या निर्मितीत प्रत्यक्ष–अप्रत्यक्ष मोलाचा सहभाग आहे. जनसंपर्क अधिकारी श्री. जगदीश मोरे आणि वरिष्ठ पत्रकार श्री. सुनील चव्हाण यांनी केलेल्या लिखाण व संपादनामुळे ग्रंथाला सुयोग्य आकार प्राप्त होऊ शकला.

'राज्य निवडणूक आयोगः रौप्यमहोत्सवी वाटचाल' हा ग्रंथ प्रकाशित करताना मला विशेष आनंद होत आहे. बहुमोल संदर्भमूल्य त्यात सामावले आहे. आपणा सर्वांना तो निश्चितच उपयुक्त ठरेल, असा मला विश्वास आहे.

**ज. स. सहारिया**
राज्य निवडणूक आयुक्त

# अनुक्रमणिका


| | |
|---|---|
| १) लोकशाही आणि निवडणुका | १२ |
| २) ७३वी घटनादुरुस्ती | १७ |
| ३) ७४वी घटनादुरुस्ती | २५ |
| ४) राज्य निवडणूक आयोग | ३१ |
| ५) राज्य निवडणूक आयुक्त | ४१ |
| ६) निवडणूक प्रक्रिया | ४५ |
| ७) आदर्श आचारसंहिता | ५७ |
| ८) निवडणूक सुधारणा आणि उपक्रम | ७८ |
| ९) इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रे (ईव्हीएम) | ८६ |
| १०) तंत्रज्ञानाचा वापर | ९७ |
| ११) मतदार जागृती | १०४ |
| १२) राजकीय पक्षांची नोंदणी | १३२ |
| १३) संशोधन आणि विश्लेषण | १४१ |
| १४) ७३ व ७४व्या घटनादुरुस्तीचा रौप्यमहोत्सव | १४९ |
| १५) लोकशाही पंधरवडा | १६९ |
| १६) आंतरराष्ट्रीय परिषद | १७८ |
| १७) निवडणुका आणि प्रसारमाध्यमे | १८९ |

# लोकशाही आणि निवडणुका

भारतासारख्या खंडप्राय देशात मोजक्या व निश्चित कालावधीत निवडणूक प्रक्रिया पार पाडणे, हे साधे काम मुळीच नाही; पण भारत निवडणूक आयोगाने आतापर्यंत आपल्या उच्चतम कार्यक्षमतेची कमाल दाखवून लोकसभा आणि विधानसभांच्या निवडणुका पार पाडल्या आहेत. १९९२नंतर अस्तित्वात आलेल्या प्रत्येक राज्यातील राज्य निवडणूक आयोगांनीदेखील याच कार्यक्षमतेने लोकसभा व विधानसभा निवडणुकांच्या तुलनेत अधिक मतदारसंघ (प्रभाग) आणि उमेदवारांची संख्या असलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका मुदत संपण्यापूर्वी न चुकता यशस्वीरीत्या पार पाडल्या आहेत.




'लोकशाही म्हणजे लोकांचे, लोकांनी, लोकांसाठी निवडलेले सरकार' अशी लोकशाहीची व्याख्या अमेरिकेचे सोळावे अध्यक्ष अब्राहम लिंकन यांनी केली आणि तीच पुढे जगन्मान्य झाली. काही अपवाद वगळता जगातील बहुतेक देशांनी लोकशाहीच्या संकल्पनेचा खुल्या दिलाने स्वीकार केला आहे. लोकशाही म्हणजे नेमके काय? तर लोकशाही म्हणजे, प्रौढ मताधिकाराच्या आधारे, खुल्या व निःपक्षपाती निवडणुकांद्वारा लोकांनी निवडून दिलेल्या प्रतिनिधींद्वारे चालणारे सरकार. लोकशाहीचे प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष लोकशाही, असे दोन प्रमुख प्रकार सामान्यतः मानले जातात.

प्रातिनिधिक लोकशाहीचे संसदीय व अध्यक्षीय, असे प्रचलित दोन प्रमुख प्रकार आढळतात. संसदीय लोकशाहीमध्ये मंत्रिमंडळ आणि संसद परस्परांवर अवलंबून असतात आणि मंत्रिमंडळ हे संसदेला जबाबदार असते. बहुमतातील पक्षाचा नेता हा पंतप्रधान असतो. भारतासह ग्रेट ब्रिटन, कॅनडा, ऑस्ट्रेलिया येथे ही पद्धत रूढ आहे. अध्यक्षीय शासनपद्धतीत मंत्रिमंडळ संसदेपासून अलिप्त



असते आणि अध्यक्षाची जनतेकडून सरळ निवड होते. ही पद्धत प्रामुख्याने अमेरिकेत आढळते.

जगातील सर्वांत मोठा लोकशाही देश म्हणून भारताची ख्याती आहे. लोकशाहीतील निवडणुकांचे अनन्यसाधारण महत्त्व कुणालाही नाकारता येणार नाही. जनमताचे स्वच्छ असे प्रतिबिंब राज्यकारभारावर उमटवण्याची ती एक प्रभावी प्रक्रिया असते. नागरिकांच्या आशाआकांक्षा फलद्रूप होण्याचे ते खात्रीचे माध्यम असते. भारतासारख्या महाकाय देशात निवडणुका, त्याही निर्दोष पद्धतीने घेणे हे एक मोठे आव्हान असले तरी आजवर निवडणूक यंत्रणांनी निवडणुका योग्य रीतीने पार पाडल्या आहेत.

ब्रिटिशांपासून आपला देश १५ ऑगस्ट १९४७ रोजी स्वतंत्र झाला. भारत सोडून जाताना ब्रिटिशांनी पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या नेतृत्वाखाली हंगामी सरकारची स्थापना केली. नेहरूंनी १५ ऑगस्ट १९४७ रोजी पंतप्रधानपदाची शपथ घेतली. २५ जानेवारी १९५० रोजी निवडणूक आयोग नावाच्या संपूर्णपणे स्वायत्त यंत्रणेची (भारत निवडणूक आयोग) स्थापना झाली आणि त्यानंतरच्या काळात म्हणजे १९५२ सालच्या पहिल्या सार्वत्रिक निवडणुकीपासून आजवर झालेल्या लोकसभेच्या सर्वच सार्वत्रिक निवडणुका सुरळीतपणे पार पडतील, याची जबाबदारी भारत निवडणूक आयोग कार्यक्षमतेने पार पाडताना दिसत आहे. पहिल्या लोकसभा निवडणुकीसाठी बराच कालावधी लागला. देशातील २५ राज्यांतील ४८९ जागांवर मतदानाची प्रक्रिया पार पडली. जवळजवळ चार महिने चाललेल्या या निवडणुकीत ४५.७ टक्के मतदान झाले. नेहरूंच्या नेतृत्वाखाली काँग्रेसने बहुतेक राज्यांमध्ये सत्ता मिळवली. लोकसभेच्या ४८९ पैकी ३६४ जागा जिंकून पहिल्या निवडणुकीत काँग्रेसने स्पष्ट विजय मिळवला. भारतीय कम्युनिस्ट पक्षाने दुसऱ्या क्रमांकाच्या म्हणजे १६ जागा जिंकल्या. हिमाचल प्रदेशामधील मंडी–




महासू (आताचा मंडी) लोकसभा मतदारसंघातील मतदान केंद्रावर लोकसभेच्या पहिल्या मताची नोंद २५ ऑक्टोबर १९५१ रोजी झाली. श्यामसरन नेगी हे स्वतंत्र भारताचे पहिले मतदार ठरले. १९१७ मध्ये जन्मलेले श्री. नेगी यांनी १९ मे २०१९ रोजी १७व्या लोकसभेसाठी विक्रमी वेळा मतदान केले आहे. आतापर्यंत देशात पार पडलेल्या सर्व १७ लोकसभा निवडणुकांत त्यांनी मतदान करून श्री नेगी यांनी अनोखा विक्रम केला आहे.

जगातील सर्वांत मोठी लोकशाही ठरलेल्या भारतातील या पहिल्या लोकसभा निवडणुकीत ४०१ मतदारसंघांतून ४८९ खासदारांची निवड करण्यात आली होती. यांपैकी ३१४ मतदारसंघांतून एक खासदार, ८६ मतदारसंघांतून दोन खासदार निवडले गेले. एक जागा सर्वसाधारण उमेदवारासाठी तर दुसरी जागा राखीव, अशी विभागणी या मतदारसंघांमध्ये होती. एका मतदारसंघातून तीन खासदार लोकसभेवर गेले होते. आजवर देशात १६ वेळा लोकसभा निवडणुका झाल्या. सध्याची लोकसभा ही सोळावी आहे. या लोकसभेसाठी ८२ कोटींहून अधिक मतदारांनी आपला मतदानाचा हक्क बजावला.

भारतासारख्या खंडप्राय देशात मोजक्या कालावधीत संपूर्ण देशाला सरकार देणारी निवडणूक प्रक्रिया अमलात आणणे, हे साधे काम मुळीच नाही; पण भारत निवडणूक आयोगाने आपल्या उच्चतम कार्यक्षमतेची कमाल दाखवून लोकसभा आणि विधानसभांच्या निवडणुका पार पाडल्या आहेत. १९९२नंतर अस्तित्वात आलेल्या प्रत्येक राज्यातील निवडणूक आयोगांनी याच कार्यक्षमतेने लोकसभा, विधानसभा निवडणुकांपेक्षा अधिक मतदारसंघ आणि उमेदवारांची संख्या असलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका मुदत संपण्यापूर्वी न चुकता पार पाडल्या आहेत.

२६ जानेवारी १९५० रोजी भारतीय राज्यघटना अस्तित्वात आली. घटनेतील तरतुदींच्या अनुषंगाने

१९५६मध्ये भाषावार प्रांतरचनेनुसार द्वैभाषिक मुंबई राज्य, तर १ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची स्थापना होऊन राज्यात विधानसभा व विधान परिषद निर्माण करण्यात आली. १९६२ साली पहिल्या विधानसभेसाठी निवडणूक झाली. सध्या विधानसभेमध्ये सार्वत्रिक मतदानाद्वारे थेट निवडून येणारे २८८ व घटनेतील तरतुदीनुसार एक अँग्लो इंडियन प्रतिनिधी अशी एकूण २८९ सदस्यसंख्या आहे. विधानपरिषदेच्या सदस्यांची संख्या ७८ इतकी आहे.

महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीनंतर सुरुवातीच्या काही वर्षांतच महाराष्ट्राने देशभरात आपले एक वेगळे स्थान निर्माण केले होते. त्याला अनेक गोष्टी कारणीभूत होत्या. लोकशाही विकेंद्रीकरणाच्या बाबतीतही महाराष्ट्राने देशात नाव कमावले. जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्यांची निर्मिती, त्यांना देण्यात आलेले विकासाच्या कामाचे अधिकार, मदतीसाठी देण्यात आलेले 'आयएएस' अधिकारी आणि मुख्य म्हणजे त्यात निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींना देण्यात आलेले राजकीय पाठबळ यामुळे महाराष्ट्र राज्याची प्रतिमा सतत उंचावलेली आहे.

राज्यघटनेच्या सर्व तरतुदींचा एकत्रित विचार करता प्रत्येक नागरिकाला सुशासन मिळावे, हे अध्याहृतच आहे. माजी गृहसचिव माधव गोडबोले व त्यांचे प्रशासनातील पूर्वाश्रमीचे सहकारी डॉ. सर्मा यांनी सर्वोच्च न्यायालयात २००२ साली एक सार्वजनिक जनहित याचिका सादर करून सुशासन हा प्रत्येक नागरिकाचा मूलभूत अधिकार असल्याचे जाहीर करावे, अशी मागणी केली होती. खरे तर मुक्त, निर्भय व पारदर्शक निवडणुका आणि योग्य उमेदवारांची निवड यातून सुशासनाचा मार्ग प्रशस्त होतो. लोकशाही मूल्यांच्या जतन व संवर्धनात हा घटक महत्त्वाचा असतो. निवडणुका लोकसभेच्या असोत की ग्रामपंचायतींच्या, त्यात लोकशाही हा एक समान धागा असतो, म्हणून लोकशाहीत निवडणुका हा एकमेव घटक नसला तरी तो सर्वांत महत्त्वाचा घटक आहे. या निवडणुका मुक्त, निर्भय व पारदर्शक वातावरणात पार पाडण्याची जबाबदारी निवडणूक यंत्रणेवर असते.

# ७३वी घटनादुरुस्ती

पंचायतराज व्यवस्थेला बळकट करण्यासाठी वेळोवेळी वेगवेगळी पावले उचलण्यात आली आहेत. सन १९९२मध्ये पंचायत राज संस्थांना संविधानिक दर्जा देणारी ७३वी घटनादुरुस्ती मंजूर करण्यात आली. जनतेच्या हाती सत्ता देऊन सत्तेचे विकेंद्रीकरण करणे, हा घटनादुरुस्तीचा मूळ उद्देश होता. घटनादुरुस्तीच्या माध्यमातून स्थानिक स्वराज्य संस्थांना व्यापक अधिकार देण्यात आले.

देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर पहिल्या दशकात ग्रामीण जनतेच्या जीवनात बदल घडवून जनतेचे जीवनमान उंचावण्यासाठी सरकारने अनेक कार्यक्रम राबविले. या कार्यक्रमांचा पुनर्विचार करण्यासाठी केंद्र सरकारने १९५७ साली बलवंतराय मेहता समिती नेमली. या समितीने लोकशाही विकेंद्रीकरणाची संकल्पना मांडली आणि त्यासोबतच विविध शिफारशी केल्या. भारत सरकारने या शिफारशी १९५८ साली स्वीकारल्या. राजस्थानने लोकशाही विकेंद्रीकरणाची संकल्पना सर्वप्रथम प्रत्यक्षात आणली. पंतप्रधान पं. जवाहरलाल नेहरू यांनी २ ऑक्टोबर, १९५९ रोजी प्रत्यक्ष उद्‌घाटन करताना या प्रशासनाचे 'पंचायतराज' असे नामकरण केले.

## पंचायतराज

महाराष्ट्र राज्याची स्थापना १ मे १९६० रोजी झाली. यशवंतराव चव्हाण राज्याचे पहिले मुख्यमंत्री बनले. सामाजिक तसेच आर्थिक विकास करायचा असेल, तर लोकांच्या हाती सत्ता जाणे गरजेचे आहे, हे त्यांना ठाऊक होते. राज्य सरकारच्या हाती एकवटलेल्या सत्तेचे लोकशाही पद्धतीने विकेंद्रीकरण करण्याचा निर्णय त्यांनी घेतला. बलवंतराय मेहता समितीच्या शिफारशींचा अभ्यास करण्यासाठी तत्कालीन महसूलमंत्री वसंतराव नाईक यांच्या अध्यक्षतेखाली एक उच्चस्तरीय समिती स्थापन करण्यात आली. नाईक समितीने राज्यातील सर्व संबंधितांशी सर्वंकष विचारविनिमय करून जिल्हा पातळीवर 'जिल्हा परिषद' ही अशी एक सशक्त सर्वोच्च पंचायतराज संस्था प्रस्तावित केली, मध्यम स्तरावर पंचायत समिती आणि गाव पातळीवर ग्रामपंचायत प्रस्तावित केली. नाईक समितीने इतरही शिफारशी केल्या होत्या. राज्य शासनाने त्याअनुषंगाने महाराष्ट्र जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्या अधिनियम आणि महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमांमध्ये सुधारणा केल्या. नाईक समितीच्या अहवालानुसार १९६१ साली जिल्हा परिषद आणि पंचायत समिती कायदा संमत करण्यात आला. या कायद्याप्रमाणे जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुका होऊ लागल्या. अशा रीतीने लोकशाही पद्धतीने स्थानिक लोकांच्या हातात कारभार सुपूर्त करण्यात आला आणि त्रिस्तरीय पंचायतराज व्यवस्था अस्तित्वात आली. सध्या त्यानुसार जिल्हा स्तरावर जिल्हा परिषद, तालुका स्तरावर पंचायत समिती व ग्रामस्तरावर ग्रामपंचायत या स्थानिक स्वराज्य संस्था कार्यरत आहेत.

जिल्हा परिषदांचे कामकाज चांगल्या पद्धतीने चालावे म्हणून प्रत्येक जिल्हा परिषदेसाठी भारतीय प्रशासकीय सेवेतील (भा.प्र.से.) अधिकारी जिल्हा परिषदेचा मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून नेमण्यात येऊ लागले. अधिकारी आणि पदाधिकाऱ्यांच्या समन्वयातून पंचायत राज व्यवस्थेच्या बळकटीस हातभार लागला. त्याचे दृश्य परिणाम दिसून आले आणि अनेक जिल्हा परिषदांतील कामांना लक्षणीय वेग व हुरूप आला. 'जिल्हा परिषदा राज्याचे नवे नेतृत्व निर्माण करणाऱ्या कार्यशाळा व्हाव्यात,' हे यशवंतराव चव्हाण यांचे स्वप्न होते. अनेकदा सभा-संमेलनांतूनही त्यांनी ते जाहीरपणे बोलून दाखविले होते. 'जिल्हा परिषदेचे अध्यक्ष हे आता तुमच्या जिल्ह्याचे मुख्यमंत्री आहेत, तेव्हा जर काही अडचणी, प्रश्न असतील

तर ते त्यांच्याकडे घेऊन जा; माझ्याकडे मुंबईला येण्याची गरज नाही,' असा सल्ला ते देत असत.

ग्रामीण विकास आणि सुधारणांच्या अंमलबजावणीची गती वाढविण्यासाठी; तसेच पंचायतराज संस्था बळकट करण्यासाठी प्रचलित व्यवस्थेचा आढावा घेणे आवश्यक होते. त्याकरिता विविध मूल्यमापन समित्याही नंतरच्या काळात स्थापन करण्यात आल्या. सत्तेच्या विकेंद्रीकरणाचे फायदे/परिणाम जाणून घेण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र सरकारने एप्रिल १९७०मध्ये ल. ना. बोंगिरवार समिती व जून १९८४मध्ये पी. बी. पाटील पंचायतराज मूल्यमापन समिती नेमली. बोंगिरवार समितीने आपला अहवाल सन १९७१मध्ये सादर केला. पी. बी. पाटील समितीनेही आपल्या शिफारशी जून १९८६मध्ये सादर केल्या. समितीने सुचवलेल्या काही बहुमूल्य शिफारशी शासनाने स्वीकारल्या व त्यांची अंमलबजावणीही केली. केंद्र सरकारच्या योजनांची अंमलबजावणी करण्यासाठी 'जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा' नावाची यंत्रणा सन १९८२मध्ये अस्तित्वात आली.

विशेष म्हणजे, त्यानंतर झालेल्या ७३व्या घटनादुरुस्तीमध्येदेखील या शिफारशींना अनुसरून काही बाबी समाविष्ट केल्याचे दिसून येते. जिल्हा नियोजन आणि विकास परिषद (डीपीडीसी) स्थापन करणे, राज्य सरकारच्या अखत्यारीतील विशिष्ट करांची आकारणी आणि वसुली पंचायतराज संस्थांमार्फत करणे, पंचायतराज व्यवस्थेच्या तिन्ही स्तरांवर महिलांसाठी ३० टक्के आरक्षण, पंचायतराज संस्थांकडे विषय हस्तांतर आदी शिफारशी घटनेच्या अकराव्या अनुसूचीमध्ये समाविष्ट करण्यात आल्या.

## पंचायतराज बळकटीकरण

गावाचा विकास करण्यासाठी ग्रामपंचायती स्थापन करून त्या बळकट करण्यात याव्यात, असे राज्यघटनेतील ४०व्या कलमात निर्देशित केले आहे. घटनेने ही जबाबदारी राज्य शासनावर टाकली होती; परंतु अपेक्षित ध्येय साध्य होत नव्हते म्हणून केंद्र शासनाने पंचायतराज व्यवस्थेला बळकट करण्यासाठी घटनादुरुस्ती करण्याचा निर्णय घेतला.

सन १९९२मध्ये पंचायत राज संस्थांना संविधानिक दर्जा देणारी ७३वी घटनादुरुस्ती मंजूर करण्यात आली. जनतेच्या हाती सत्ता देऊन सत्तेचे विकेंद्रीकरण करणे हा घटनादुरुस्तीचा मूळ उद्देश होता. पंचायतराज पद्धती बळकट करण्याचे हे पहिले पाऊल होते.

दरम्यानच्या काळात महिलांसाठी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये ३३ टक्के आरक्षण देण्याचा निर्णय झाला. राज्यांना हे आरक्षण ५० टक्क्यांपर्यंत वाढविता येणे शक्य होते. महाराष्ट्रात सन २०१०-११ मध्ये महिलांचे आरक्षण ५० टक्क्यांवर नेण्यात आले. लोकसंख्येच्या प्रमाणात अनुसूचित जाती-जमातींसाठी, तसेच नागरिकांचा मागास प्रवर्गासाठी २७ टक्के जागा राखीव ठेवण्यात आल्या. ग्रामपंचायत सरपंच ते महापौर पदांसाठीही आरक्षण देण्यात आले.

सर्वांत महत्त्वाचे म्हणजे मुक्त व पारदर्शक पद्धतीने निवडणुका घेण्यासाठी ७३व्या घटनादुरुस्तीतील तरतुदीनुसार प्रत्येक राज्यात स्वतंत्र राज्य निवडणूक आयोगाची स्थापना करण्यात आली.

स्थानिक स्वराज्य संस्थांना साहय्य उपलब्ध व्हावे, यासाठी प्रत्येक राज्याने 'राज्य वित्त आयोग' स्थापन केला. ७३व्या घटनादुरुस्तीच्या माध्यमातून देशातील स्थानिक स्वराज्य संस्थांना व्यापक अधिकार देण्यात आले. यामुळे देशात राष्ट्र राज्य व स्थानिक स्तरावर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या रूपाने शासनाची त्रिस्तरीय पद्धती निर्माण होऊन विकासाच्या योजना अधिक वेगाने जनतेपर्यंत पोचण्यास मदत झाली.

## ७३व्या घटनादुरुस्तीची अंमलबजावणी

- महाराष्ट्रात ३४ जिल्हा परिषदा, ३५१ पंचायत समित्या आणि सुमारे २८ हजार ग्रामपंचायती आहेत. ७३व्या घटनादुरुस्तीस अनुसरून, महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ आणि महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमांमध्ये आवश्यक त्या सुधारणा करण्यात आल्या आहेत.
- जिल्हास्तर, गटस्तर व ग्राम पातळीवरील पंचायतींवर संविधानाच्या भाग ९ मध्ये नमूद केल्यानुसार स्थानिक स्वराज्य संस्था म्हणून प्रभावीपणे व कार्यक्षमतेने कार्य पार पाडण्याच्या अनुषंगाने अतिरिक्त कर्तव्ये आणि जबाबदाऱ्या सोपविण्यात आल्या आहेत. यामुळे राज्य शासनाला कार्य, कार्यवाही करण्यासाठी मनुष्यबळ व निधी पंचायतराज संस्थांकडे हस्तांतरित करणे शक्य झाले.
- ७३व्या घटनादुरुस्तीमधील ११व्या अनुसूचीनुसार पंचायतराज संस्थांकडे हस्तांतरित करावयाच्या २९ विषयांपैकी, इतर विभागाच्या ग्रामीण भागातील विकासाच्या संदर्भातील सद्यःस्थितीत एकूण १४ विभागांकडील योजना हस्तांतरित करण्यात आल्या आहेत.



*प्रातिनिधिक छायाचित्र : सातारा जिल्हा परिषद*




*प्रातिनिधिक छायाचित्र : ग्रामपंचायत, अवनखेड*

## जिल्हा परिषदेकडे विविध विभागांकडून हस्तांतरित करण्यात आलेले विषय, योजना व कर्मचारी संख्या

| अ.क्र. | विभागाचे नाव | जिल्हा परिषदेकडे हस्तांतरित करण्यात आलेले विषय | हस्तांतरित करण्यात आलेल्या एकंदरीत योजना | हस्तांतरित झालेला एकंदरीत कर्मचारी वर्ग |
|---|---|---|---|---|
| १ | शालेय शिक्षण विभाग | प्रौढ शिक्षण व अनौपचारिक शिक्षण | ४ | १५०३ |
| २ | सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग | सांस्कृतिक कार्य | ३ | -- |
| ३ | महिला व बाल कल्याण विभाग | महिला व बाल कल्याण | १० | -- |
| ४ | सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभाग | अपंग व मानसिक वाढ खुंटलेल्यांच्या कल्याणासह समाजकल्याण | ४० | २३७१ |
| ५ | ऊर्जा विभाग | अपारंपरिक ऊर्जा | १४ | १४ |
| ६ | कृषी व पदुम विभाग | पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय व कुक्कुटपालन | ११ | १३२० |
| ७ | पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग | पिण्याचे पाणी | ३ | १२६२ |
| ८ | सार्वजनिक आरोग्य विभाग | रुग्णालये, प्राथमिक आरोग्य केंद्र व दवाखाने यासह आरोग्य व स्वच्छता | ६ | ९०१० |
| ९ | जलसंधारण विभाग | लहान पाटबंधारे, पाण्याचे व्यवस्थापन, पाणलोट क्षेत्र विकास | ८ | -- |

| अ.क्र. | विभागाचे नाव | जिल्हा परिषदेकडे हस्तांतरित करण्यात आलेले विषय | हस्तांतरित करण्यात आलेल्या एकंदरीत योजना | हस्तांतरित झालेला एकंदरीत कर्मचारी वर्ग |
|---|---|---|---|---|
| १० | उच्च व तंत्र शिक्षण विभाग | ग्रंथालये | १ | -- |
| ११ | गृहनिर्माण विभाग | ग्रामीण गृहनिर्माण | २ | -- |
| १२ | अन्न व नागरी पुरवठा विभाग | सार्वजनिक वितरण पद्धती | १ | -- |
| १३ | सार्वजनिक बांधकाम विभाग | रस्ते, नाले, पूल, जलमार्ग व दळणवळणाची अन्य साधने | १ | -- |
| १४ | ग्रामविकास व जलसंधारण विभाग | गरिबी हटाव कार्यक्रम | १ | -- |
| | | | **१०५** | **१५४८०** |

विविध योजना व कार्यक्रम पंचायतराज संस्थांकडे हस्तांतरित करण्याबरोबरच त्यासाठी आवश्यक कर्मचाऱ्यांची भरती, नियंत्रण आणि त्यांच्याशी संबंधित इतर प्रशासकीय व वित्तीय बाबींचे (जसे प्राथमिक शिक्षक, अंगणवाडी सेविका, आरोग्य कर्मचारी, पाणीपुरवठा, सामाजिक न्याय इ.) अधिकार पंचायतराज संस्थांकडे सोपविण्यात आले आहेत. या कर्मचाऱ्यांचे १०० टक्के वेतन आणि इतर खर्च राज्य शासनामार्फत केले जातात. मात्र, विषय हे पंचायतराज संस्थांमार्फत हाताळले जातात.

महाराष्ट्र शासनाने पंचायतराज संस्थांकडे हस्तांतरित केलेल्या विषयाला अनुसरून केंद्रीय पंचायतराज मंत्रालयामार्फत दर वर्षी करण्यात येणाऱ्या मूल्यमापनामध्ये राज्याने दोन वेळा प्रथम क्रमांक मिळविला आहे.

जिल्ह्यांना आता जिल्हा नियोजन मंडळांमार्फत पंचायतराज संस्थांनी तयार केलेल्या जिल्हा आराखड्यानुसार निधीचे वाटप करण्यात येते. विशेषतः ग्रामपंचायती सहभागी प्रक्रियेद्वारे त्यांच्या विकास योजना तयार करीत आहेत. ७३व्या घटनादुरुस्तीमधील अनिवार्य तरतुदीस अनुसरून राज्य शासनाने आत्तापर्यंत पाच राज्य वित्त आयोग (स्टेट फायनान्स कमिशन) स्थापन केले आहेत.

ग्रामपंचायती सक्षम व बळकट करण्याच्या दृष्टीने ग्रामपंचायतींना महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमातील तरतुदींनुसार कर बसविणे व वसूल करण्याचे अधिकार

## पंचायतराज मंत्रालयाच्या मूल्यमापनानुसार वर्षनिहाय महाराष्ट्राची क्रमवारी

| अ.क्र. | वर्ष | क्रमांक |
|---|---|---|
| १ | २००९-१० | ५ |
| २ | २०१०-११ | ६ |
| ३ | २०११-१२ | ३ |
| ४ | २०१२-१३ | १ |
| ५ | २०१३-१४ | १ |
| ६ | २०१४-१५ | ४ |
| ७ | २०१५-१६ | २ |

प्रदान करण्यात आले आहेत. थकबाकीदारांविरुद्ध प्रसंगी कडक कारवाई करण्याचेही अधिकार महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमांद्वारे देण्यात आले आहेत.

पंचायतराज संस्थांना तंत्रज्ञानाच्या या युगात व्यवसायाभिमुख ज्ञान आणि व्यवस्थापकीय कौशल्य उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. पंचायतराज संस्थांच्या निर्वाचन पदांकरिता तिन्ही स्तरांवर असलेले ५० टक्के महिला आरक्षण; तसेच अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व इतर मागासवर्गीयांना असलेले आरक्षण विचारात घेता त्यांना सक्षम व समृद्ध करणे अत्यंत आवश्यक आहे. त्यासाठी राज्य ग्रामीण विकास संस्था (एसआयआरडी) आणि पुणे येथील यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी (यशदा) राज्यातील पंचायतराज संस्थांचे

### ७३व्या घटनादुरुस्तीची वैशिष्ट्ये

- पंचायतराज संस्थांना घटनात्मक दर्जा
- राज्य निवडणूक आयोगाची स्थापना
- जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायत याप्रमाणे त्रिस्तरीय पद्धत
- ग्रामसभा बंधनकारक (ग्रामसभेस घटनात्मक दर्जा)
- महिला सदस्यांसाठी किमान एकतृतीयांश (३३.३३ टक्के) जागांचे आरक्षण (महाराष्ट्रात ७३वी घटनादुरुस्ती लागू होण्यापूर्वी महिलांसाठी ३० टक्के आरक्षणाची तरतूद होती. नवीन धोरणानुसार राज्यात आता ५० टक्के आरक्षणाची तरतूद आहे)
- अनुसूचित जाती-जमातींसाठी लोकसंख्येच्या प्रमाणात आरक्षण
- राज्य वित्त आयोगाची स्थापना
- पंचायतींची मुदत पाच वर्षे
- निवडणुकीला उभे राहण्याकरिता वयाची २१ वर्षे पूर्ण असणे अनिवार्य
- दर पाच वर्षांनी निवडणुका घेणे बंधनकारक
- सरपंच, पंचायत समिती सभापती व जिल्हा परिषद अध्यक्ष या पदांनाही आरक्षण लागू

प्रशिक्षण व क्षमता बांधणी करण्याकरिता ‘नोडल एजन्सी’ म्हणून काम करीत आहे. या संस्थेमार्फत पंचायतींच्या निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींना व अधिकाऱ्यांना वेळोवेळी गुणवत्तेचे प्रशिक्षण देण्यात येते.

पंचायतींमध्ये ग्रामस्थांना गावामध्येच विविध सेवा ऑनलाइन मिळाव्यात, याकरिता आयटी सक्षम ई–गव्हर्नन्ससाठी पंचायत राज पोर्टल प्रकल्प सुरू करण्यात आला आहे. हा प्रकल्प माहितीचे संकलन, अहवाल तयार करणे आणि पंचायतराज संस्थांच्या सर्व स्तरांची ऑनलाइन माहिती मिळविण्यासाठी उपयुक्त ठरत आहे. राज्यातील सर्व ग्रामपंचायतींमध्ये समर्पित मनुष्यबळ आणि आवश्यक सर्व हार्डवेअर आणि सॉफ्टवेअर उपलब्ध करून देण्यात आले आहे.

ग्रामीण भागातील प्राथमिक आरोग्य केंद्रांचे व्यवस्थापन करण्यासाठी जिल्हा परिषदांना अधिकार देण्यात आले आहेत. त्यासाठी आवश्यक तो निधीही उपलब्ध करून देण्यात आला आहे. यात वैद्यकीय सेवा आणि औषधांच्या पुरवठ्याचा समावेश आहे.

प्राथमिक शिक्षण हा विषय जिल्हा परिषदेकडे सोपविण्यात आला आहे. यामध्ये शिक्षकांची भरती आणि नियुक्ती व शालेय इमारतींच्या देखभालीचा समावेश आहे. शिक्षकांच्या बदल्यांबाबतच्या प्रक्रियेमध्ये माहिती तंत्रज्ञानाचा सुव्यवस्थित वापर करण्यात आला आहे. ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांचे बळकटीकरण आणि सक्षमीकरण करण्यावर वेळोवेळी भर देण्यात आला आहे. कारण सर्वसमावेशक विकासासाठी गावांनीदेखील स्वतःहून प्रयत्न करणे आवश्यक असून त्यासाठी विविध पातळ्यांवर सातत्याने प्रयत्न सुरू आहेत.

महाराष्ट्रात ७३व्या घटनादुरुस्तीला अनुसरून पंचायतराज संस्थांमधील निवडणुका घेणे व त्यांचे संनियंत्रण करण्याकरिता २६ एप्रिल १९९४ रोजी राज्य निवडणूक आयोगाची स्थापना करण्यात आली. तेव्हापासून पंचायतराज संस्थांच्या सार्वत्रिक निवडणुका नियमित पार पडत आहेत.



*प्रातिनिधिक छायाचित्र : पंचायत समिती, जळगाव*



*प्रातिनिधिक छायाचित्र : पंचायत समिती, नाशिक*

# ७४वी घटनादुरुस्ती

राज्यघटनेतील ७३वी दुरुस्ती ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांशी; तर ७४वी घटनादुरुस्ती नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांशी संबंधित आहे. ७४व्या दुरुस्तीला राष्ट्रपतींनी २० एप्रिल १९९३ रोजी मान्यता दिली. हा दिवस देशभर 'नगर विकास दिवस' म्हणून साजरा केला जातो. ७४व्या घटनादुरुस्तीच्या अनुषंगाने राज्यात नगरपंचायती, नगरपरिषदा व महानगरपालिका या तीन प्रकारच्या नागरी स्थानिक स्वराज्य संस्था स्थापन करण्यात आल्या आहेत.

महानगरपालिका, नगरपरिषदा आणि नगरपंचायतींच्या जबाबदाऱ्यांमध्ये सतत वाढ होत आहे. रस्ते, पाणी, स्वच्छता इत्यादी अनेक प्राथमिक, परंतु महत्त्वाच्या असलेल्या सुविधा या स्थानिक स्वराज्य संस्थांमार्फत उपलब्ध करून दिल्या जातात. त्यांच्याशी संबंधित ७४व्या घटनादुरुस्तीला राष्ट्रपतींनी २० एप्रिल १९९३ रोजी मान्यता दिली. हा दिवस देशभर 'नगर विकास दिवस' म्हणून साजरा केला जातो. या दिनानिमित्त राज्यभर विविध नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये मोठ्या प्रमाणावर वेगवेगळे उपक्रम राबविले जातात.

**७४व्या घटनादुरुस्तीच्या अनुषंगाने प्रामुख्याने पुढील बाबींसंदर्भात कार्यवाही अभिप्रेत आहे.**

- नागरी स्थानिक संस्थांमध्ये अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीच्या सदस्यांना लोकसंख्येच्या प्रमाणात प्रतिनिधित्व.
- नागरी स्थानिक संस्थांमध्ये महिलांना आरक्षण.
- ७४व्या घटनादुरुस्तीनुसार अंतर्भूत करण्यात आलेल्या अनुसूची १२ मधील १८ विषय नागरी स्थानिक संस्थांकडे सुपूर्त करणे.
- नागरी स्थानिक संस्थांचा कार्यकाळ पाच वर्षांचा करणे.
- क्षेत्र समित्या स्थापन करणे.

**७४व्या घटनादुरुस्तीच्या अनुषंगाने राज्यात स्थापित तीन प्रकारच्या नागरी स्थानिक संस्थांचे स्वरूप पुढीलप्रमाणे आहे.**

- ग्रामीण भागातून नागरी भागात संक्रमण होणारे संक्रमणात्मक क्षेत्र म्हणजेच नगरपंचायत.
- लहान नागरी क्षेत्रासाठी नगरपरिषद.
- मोठ्या नागरी क्षेत्रासाठी महानगरपालिका.

**राज्यातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांचे कामकाज पुढील अधिनियमातील तरतुदीनुसार चालते.**

| अ.क्र. | नागरी स्थानिक संस्था | संबंधित अधिनियम |
|---|---|---|
| १) | बृहन्मुंबई महानगरपालिका | मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ |
| २) | बृहन्मुंबईव्यतिरिक्त राज्यातील उर्वरित सर्व महानगरपालिका | महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ |
| ३) | नगरपंचायती व नगरपरिषदा | महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ |

## नागरी स्थानिक स्वराज्य संस्था

| नागरी स्थानिक संस्था | संख्या |
|---|---|
| महानगरपालिका | २७ |
| नगरपंचायती | १२६ |
| नगरपरिषदा | २४१ |
| **एकूण** | **३९४** |

## नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या स्थापेनसंदर्भातील लोकसंख्येचे निकष

| अ.क्र. | नागरी स्थानिक संस्था | लोकसंख्या |
|---|---|---|
| १) | महानगरपालिका | ३ लाखांपेक्षा अधिक लोकसंख्या |
| २) | 'अ' वर्ग नगरपरिषद | १ लाखापेक्षा अधिक लोकसंख्या |
| ३) | 'ब' वर्ग नगरपरिषद | ४० हजारांपेक्षा जास्त व १ लाखापेक्षा अधिक नसलेली लोकसंख्या |
| ४) | 'क' वर्ग नगरपरिषद | २५ हजारांपेक्षा जास्त व ४० हजार किंवा त्यापेक्षा कमी लोकसंख्या |
| ५) | नगरपंचायती | १० हजारांपेक्षा कमी नाही व २५ हजारांपेक्षा पेक्षा अधिक नसलेली लोकसंख्या |

नागरी स्थानिक स्वराज्य संस्था स्थापन करण्यासाठी लोकसंख्येबाबत विशिष्ट निकष असले, तरी तालुका व जिल्हा मुख्यालयाच्या ठिकाणी राज्य शासनाला नगरपंचायत स्थापन करता येते. राज्यातील नागरी क्षेत्राचा नियोजनबद्ध विकास व्हावा, या दृष्टिकोनातून राज्य शासनाने बहुसंख्य तालुका मुख्यालयाच्या ठिकाणी नगरपरिषदा/नगरपंचायती स्थापन केल्या आहेत. त्यांच्या निवडणुकाही पार पडल्या आहेत.

## नगरपरिषदा व नगरपंचायतींच्या सदस्यसंख्येबाबत निकष

| अ.क्र. | नगरपरिषद वर्गवारी | सदस्यसंख्या |
|---|---|---|
| १) | 'अ' वर्ग नगरपरिषद | किमान सदस्यसंख्या ३८<br>१ लाखावरील प्रत्येक ८,००० लोकसंख्येसाठी १ सदस्य याप्रमाणे कमाल सदस्यसंख्या ६५ |
| २) | 'ब' वर्ग नगरपरिषद | किमान सदस्य संख्या २३<br>४० हजारांवरील प्रत्येक ५,००० लोकसंख्येसाठी १ सदस्य याप्रमाणे कमाल सदस्यसंख्या ३७ |

| | | |
|---|---|---|
| ३) | ‘क’ वर्ग नगरपरिषद | किमान सदस्यसंख्या १७<br>२५ हजारांवरील प्रत्येक ३,००० लोकसंख्येसाठी १ सदस्य याप्रमाणे कमाल सदस्यसंख्या २३ |
| ४) | नगरपंचायत | सदस्यसंख्या १७ |

महानगरपालिकांची संदस्य संख्या लोकसंख्येच्या प्रमाणात निश्चित केली जाते. बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सदस्यसंख्येचा मात्र याला अपवाद आहे. मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ नुसार बृहन्मुंबई महानगरपालिकेची सदस्यसंख्या २२७ इतकी निश्चित करण्यात आली आहे. त्यात बदल करण्यासाठी या अधिनियमात सुधारणा करावी लागते. त्याशिवाय सदस्यसंख्येत बदल होऊ शकत नाही.

## बृहन्मुंबईव्यतिरिक्त उर्वरित महानगरपालिकांच्या सदस्यसंख्येबाबतचे निकष

| अ.क्र. | लोकसंख्या | निवडून द्यावयाची सदस्यसंख्या |
|---|---|---|
| १) | ३ लाखांपेक्षा जास्त व ६ लाखांपर्यंतच्या लोकसंख्येसाठी | किमान सदस्यसंख्या ६५<br>३ लाखांवरील प्रत्येक १५ हजार लोकसंख्येसाठी १ सदस्य याप्रमाणे कमाल सदस्यसंख्या ८५ |
| २) | ६ लाखांपेक्षा अधिक व १२ लाखांपर्यंतच्या लोकसंख्येसाठी | किमान सदस्यसंख्या ८५<br>६ लाखांवरील प्रत्येक २० हजार लोकसंख्येसाठी १ सदस्य याप्रमाणे कमाल सदस्यसंख्या ११५ |
| ३) | १२ लाखांपेक्षा अधिक व २४ लाखांपर्यंतच्या लोकसंख्येसाठी | किमान सदस्यसंख्या ११५.<br>१२ लाखांवरील प्रत्येक ४० हजार लोकसंख्येसाठी १ सदस्य याप्रमाणे कमाल सदस्यसंख्या १५१ |
| ४) | २४ लाखांपेक्षा अधिक ३० लाखांपर्यंतच्या लोकसंख्येसाठी | किमान सदस्यसंख्या १५१.<br>२४ लाखांपेक्षा अधिक लोकसंख्येसाठी प्रत्येक ५० हजार लोकसंख्येसाठी १ सदस्य याप्रमाणे कमाल सदस्यसंख्या १६१ |

| अ.क्र. | लोकसंख्या | निवडून द्यावयाची सदस्यसंख्या |
|---|---|---|
| ५) | ३० लाखांपेक्षा अधिक लोकसंख्येसाठी | किमान सदस्यसंख्या १६१.<br>३० लाखांवरील प्रत्येक १ लाख लोकसंख्येसाठी<br>१ सदस्य याप्रमाणे कमाल सदस्यसंख्या १७५ |

**७४व्या घटनादुरुस्तीच्या अनुषंगाने घटनेच्या अनुसूची १२ मधील खालील १८ विषयांपैकी बहुतांश विषय नागरी स्थानिक संस्थांकडे सुपूर्त करण्यात आले आहेत.**

१) शहर नियोजनासह नागरी नियोजन
२) जमिनी वापराचे नियमन व इमारतींची बांधकामे
३) सामाजिक व आर्थिक विकासाचे नियोजन
४) रस्ते व पूल
५) घरगुती, औद्योगिक व व्यापारी वापरासाठी पाणीपुरवठा
६) सार्वजनिक आरोग्य, स्वच्छता आणि घनकचरा व्यवस्थापन
७) अग्निशमन सेवा
८) नागरी वनीकरण, परिस्थितिकी संरक्षण व पर्यावरणीय घटकांना चालना
९) समाजातील अपंग व मतिमंद घटकांसहित आर्थिकदृष्ट्या कमकुवत घटकांच्या हक्काचे संरक्षण
१०)गलिच्छ वस्ती विकास व सुधारणा
११)शहरी गरिबी निर्मूलन
१२)उद्याने, क्रीडांगणे, बगिचे यासारख्या नागरी सोयीसुविधा उपलब्ध करणे.
१३)सांस्कृतिक, शैक्षणिक व चांगल्या घटकांचा प्रसार करणे.
१४)दफनभूमी, दहनभूमी व विद्युत दाहिनी यांची व्यवस्था करणे.
१५)जनावरांसाठी कोंडवाडे उभारणे व प्राण्यांवरील अत्याचारास प्रतिबंध करणे.
१६)जन्म-मृत्यू इत्यादी महत्त्वाच्या सांख्यिकी माहिती जतन करणे.
१७)रस्त्यावरील दिवाबत्ती, वाहनतळ, बसस्थानके व सार्वजनिक उपयोगाच्या सुविधा पुरविणे.
१८)कत्तलखान्यांचे व चर्मसंस्करणाचे नियमन करणे.



*प्रातिनिधिक छायाचित्र : मुंबई महानगरपालिका*

# राज्य निवडणूक आयोग

महाराष्ट्रात २६ एप्रिल १९९४ रोजी राज्य निवडणूक आयोगाची स्थापना करण्यात आली. ही एक स्वतंत्र व संविधानिक संस्था आहे. राज्य निवडणूक आयोगातर्फे महानगरपालिका, नगरपरिषदा, नगरपंचायती, जिल्हा परिषदा, पंचायत समित्या व ग्रामपंचायती या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेतल्या जातात. या निवडणुका मुक्त, निर्भय आणि पारदर्शक वातावरणात पार पाडण्याची घटनात्मक जबाबदारी राज्य निवडणूक आयोगावर आहे. राज्य निवडणूक आयुक्त राज्य निवडणूक आयोगाचे प्रमुख असतात. भारत निवडणूक आयोग व राज्य निवडणूक आयोग या दोन्ही संस्था स्वतंत्र असून आपापल्या क्षेत्रातील त्यांचा दर्जा व अधिकार समान आहेत.

भारत एक सार्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष, लोकशाही प्रजासत्ताक आणि जगातील सर्वांत मोठा लोकशाही देश आहे. १५ ऑगस्ट १९४७ रोजी आधुनिक स्वतंत्र भारत देश अस्तित्वात आला. तेव्हापासून संविधान आणि संबंधित कायद्यात नमूद केलेल्या तत्त्वांनुसार ठराविक कालावधीनंतर देशात मुक्त आणि निष्पक्ष पद्धतीने निवडणुका घेण्यात येत आहेत.

देशाच्या संसदेला 'इम्पिरियल लेजिस्लेटिव्ह कौन्सिल हाउस' म्हटले जात असे. राज्यसभेला 'कौन्सिल ऑफ स्टेस्ट्स' (अप्पर हाउस) तर लोकसभेला 'सेंट्रल लेजिस्लेटिव्ह कौन्सिल' (लोअर हाउस) असे म्हटले जात असे. सेंट्रल लेजिस्लेटिव्ह कौन्सिलकरिता १९२०मध्ये देशाची पहिली सार्वत्रिक निवडणूक घेण्यात आली; परंतु ही निवडणूक ब्रिटिश राजवटीत झाली होती.




*पुणे येथे 'यशदा'मध्ये ९ ऑगस्ट २०११ रोजी तत्कालीन राज्यपाल मा. श्री. के. शंकरनारायणन यांच्या हस्ते राज्य निवडणूक आयोगाच्या बोधचिन्हाचे अनावरण करण्यात आले. या वेळी तत्कालीन राज्य निवडणूक आयुक्त श्रीमती नीला सत्यनारायण, आयोगाचे तत्कालीन अपर मुख्य सचिव चाँद गोयल, पुणे विभागीय महसूल आयुक्त श्री. दिलीप बंड व 'यशदा'चे महासंचालक श्री. संजय चहांदे उपस्थित होते.*

भारताने २६ जानेवारी १९५० रोजी संविधानाचा स्वीकार केल्यानंतर स्वतंत्र भारताची पहिली सार्वत्रिक निवडणूक घेण्याचा मार्ग मोकळा झाला. लोकशाहीच्या दृष्टीने पहिल्या निवडणुकीबरोबरच इतर सर्व निवडणुकाही सरकारच्या प्रभावाशिवाय पार पाडण्याचे मोठे आव्हान होते. लोकसभा व विधानसभेच्या निवडणुकांबाबत भारत निवडणूक आयोगाने हे आव्हान यशस्वीपणे पेलले.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांबाबत मात्र स्वतंत्र यंत्रणा अस्तित्वात नव्हती. संबंधित राज्य सरकारांमार्फत या निवडणुका घेतल्या जात असत.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या बळकटीकरणासाठी १९९२ साली घटनेत ७३वी आणि ७४वी घटनादुरुस्ती करण्यात आली. त्याबाबतचा 'भारतीय संविधान (७३ व ७४वी दुरुस्ती) अधिनियम, १९९२' हा २० एप्रिल १९९३ रोजी प्रसिद्ध करण्यात आला. या घटनादुरुस्तीअन्वये संविधानात 'भाग-९' आणि 'भाग-९ क' नव्याने समाविष्ट करण्यात आले. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका राज्य निवडणूक आयोगाच्या पर्यवेक्षण, अधीक्षण आणि नियंत्रणाखाली पार पाडण्याची तरतूद संविधानात करण्यात आली.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका मुदतीत घेण्यासाठी प्रत्येक राज्यात राज्य निवडणूक आयोगाची स्थापना करण्याची तरतूदही करण्यात आली. घटनेच्या अनुच्छेद २४३ के आणि २४३ झेडए अन्वये राज्य निवडणूक आयोग स्थापन करण्यात आले. महाराष्ट्रात या संदर्भातील अधिसूचना २३ एप्रिल १९९४ रोजी राजपत्रात प्रसिद्ध झाली. २६ एप्रिल १९९४ रोजी राज्य निवडणूक आयोगाची स्थापना करण्यात आली. पहिले राज्य निवडणूक आयुक्त म्हणून श्री. दे. ना. चौधरी यांनी २६ एप्रिल १९९४ रोजी पदभार स्वीकारला.

भारत निवडणूक आयोग आणि राज्य निवडणूक आयोग या दोन्ही स्वतंत्र व संविधानिक संस्था आहेत. भारत निवडणूक आयोगाची स्थापना भारतीय राज्यघटनेच्या कलम ३२४(१) अन्वये २५ जानेवारी १९५० रोजी करण्यात आली. राष्ट्रपती, उपराष्ट्रपती, लोकसभा, राज्यसभा, विधानसभा आणि विधान परिषदेच्या निवडणुका भारत निवडणूक आयोगातर्फे घेण्यात येतात. राज्य निवडणूक आयोगातर्फे महानगरपालिका, नगरपरिषदा, नगरपंचायती, जिल्हा परिषदा, पंचायत समित्या व ग्रामपंचायती या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेतल्या जातात. भारत निवडणूक आयोगाचे कामकाज मुख्य निवडणूक आयुक्तांसह अन्य दोन म्हणजे एकूण तीन आयुक्तांच्या मार्गदर्शनाखाली चालते. तिघांचे अधिकार सारखेच असतात. राज्य निवडणूक आयुक्त राज्य निवडणूक आयोगाचे प्रमुख असतात. या दोन्ही संस्था स्वतंत्र असल्या तरी आपापल्या क्षेत्रात त्यांचा दर्जा व अधिकार समान आहेत.

'संविधानाद्वारे सोपविण्यात आलेली जबाबदारी पार पाडण्यासाठी राज्य निवडणूक आयोगाला आवश्यक तो कर्मचारी वर्ग राज्यपालांनी उपलब्ध करून द्यावा; तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांशी संबंधित सर्व बाबींसंदर्भात संविधानाच्या तरतुदींना अधीन राहून राज्य विधिमंडळाने पूर्तता करावी,' असे संविधानाच्या अनुच्छेद २४३ ट च्या खंड ३ व ४ मध्ये नमूद करण्यात आले आहे.

## अधिकार, दर्जा व शक्ती

लोकसभा, विधानसभा निवडणुकांप्रमाणेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकादेखील मुक्त, निर्भय आणि पारदर्शक वातावरणात पार पाडण्याची घटनात्मक जबाबदारी राज्य निवडणूक आयोगावर आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची प्रक्रियादेखील थोड्याफार फरकाने लोकसभा व विधानसभा निवडणुकांप्रमाणेच असते. सर्वोच्च न्यायालयाने मोहिंदरसिंग गिल विरुद्ध मुख्य निवडणूक आयुक्त या प्रकरणातही महत्त्वपूर्ण निकाल दिला आहे. त्यात निवडणूक आयोगाला प्रशासकीय, कायदेविषयक आणि न्यायिक स्वरूपाचे अधिकार असल्याचे स्पष्ट केले आहे. राज्य निवडणूक आयोगाचा दर्जा, शक्ती व अधिकारासंदर्भात सर्वोच्च न्यायालयाने १९ ऑक्टोबर २००६ रोजी किशनसिंग तोमर विरुद्ध अहमदाबाद शहर महानगरपालिका आणि इतर या प्रकरणात एक महत्त्वपूर्ण निकाल दिला आहे. या निकालातील महत्त्वाच्या बाबी पुढीलप्रमाणे आहेत.

- राज्य निवडणूक आयोग शासनापेक्षा स्वतंत्र आहे.
- राज्य निवडणूक आयुक्तांचा दर्जा भारत निवडणूक आयोगाच्या मुख्य निवडणूक आयुक्तांच्या दर्जाशी समतुल्य आहे.
- राज्य निवडणूक आयुक्तांना आपली जबाबदारी पार पाडण्यासाठी आवश्यक ती सर्व साधनसामग्री व मनुष्यबळ राज्य शासनाने उपलब्ध करून देणे बंधनकारक आहे.
- आवश्यकता भासल्यास राज्य निवडणूक आयोग राज्य शासनाच्या विरोधात 'रिट ऑफ मँडमस'नुसार न्यायालयात दाद मागू शकतो.

महाराष्ट्रात राज्य निवडणूक आयोगाची सुरुवात सात पूर्णवेळ कर्मचाऱ्यांच्या बळावर झाली. त्यानंतर ३७ पदे निर्माण करण्यात आली. त्यात पुन्हा वाढ करून ७२ अधिकारी/ कर्मचाऱ्यांची पदे निर्माण केली गेली. राज्य निवडणूक आयोगाच्या स्थापनेनंतर लगेचच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सार्वत्रिक निवडणुकांच्या पहिल्याच वेळी म्हणजे १९९६-९७मध्ये आयोगाच्या मंजूर पदांची संख्या ९५ पर्यंत वाढविण्यात आली; परंतु प्रशासकीय बाबींवरील खर्च कमी करण्याच्या प्रयत्नांचा भाग म्हणून कालांतराने आयोगातील पदसंख्या ६५ करण्यात आली. नंतर ती वाढवून पुन्हा ८३ करण्यात आली. राज्य निवडणूक आयोगाच्या १२ एप्रिल २०१९ रोजीच्या सुधारित आकृतिबंधानुसार आता पदसंख्या ७९ इतकी करण्यात आली आहे.

आयोगाचे एकमेव कार्यालय व मुख्यालय मुंबईत आहे. महानगरपालिका वगळता इतर सर्व निवडणुकांची प्रक्रिया राबविण्याची क्षेत्रीय स्तरावरील जबाबदारी जिल्हाधिकारी यांना प्रदान केलेली आहे. महानगरपालिकेच्या निवडणुकीची क्षेत्रीय स्तरावरील जबाबदारी संबंधित महानगरपालिका आयुक्तांवर सोपविण्यात आली. या सर्व निवडणुकांसाठी क्षेत्रीय स्तरावरील विविध विभागांच्या अधिकारी/ कर्मचाऱ्यांची विविध कामांसाठी नियुक्ती केली जाते.

भारत निवडणूक आयोगाचे निवडणूक निर्णय अधिकारी हे जिल्हाधिकारी, उपजिल्हाधिकारी आणि समकक्ष दर्जाचे असतात. राज्य निवडणूक आयोगाकडे अव्वल कारकून/मंडल अधिकारी ते उपजिल्हाधिकारी



*मुख्यमंत्री मा. श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते २४ सप्टेंबर २०१५ रोजी राज्य निवडणूक आयोगाच्या नूतनीकृत कार्यालयाचे उद्घाटन झाले. शेजारी राज्य निवडणूक आयुक्त श्री. ज. स. सहारिया, तत्कालीन सचिव डॉ. प्रदीप व्यास आदी.*




*राज्य निवडणूक आयोगाचे सन २०१५ साली नूतनीकरण केलेले कार्यालय.*

दर्जाचे निवडणूक निर्णय अधिकारी असतात. ग्रामपंचायत निवडणुकांमध्ये वरिष्ठ लिपिकदेखील निवडणूक निर्णय अधिकारी असतात.

लोकसभा व विधानसभा निवडणुकांसाठी असलेला लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५१च्या धर्तीवर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी स्वतंत्र कायदा अस्तित्वात नव्हता. आजही नाही. विविध पाच कायद्यांतील वेगवेगळ्या तरतुदींच्या आधारे निवडणुका घेतल्या जातात. राज्य निवडणूक आयोगाला प्रारंभीच्या टप्प्यात निवडणूक प्रक्रिया राबविताना विविध अडचणी येत होत्या. त्या वेळी राज्य निवडणूक आयोगाने संविधानाद्वारे प्राप्त अधिकारांचा वापर करून कायद्यात तरतूद नसलेल्या बाबींसंदर्भात वेळोवेळी आदेश, परिपत्रके आणि सूचना निर्गमित केल्या. त्यांच्या एकत्रित संकलनाचे पाच खंड एप्रिल १९९८मध्ये

प्रसिद्ध करण्यात आले.

राज्य निवडणूक आयोगाच्या स्थापनेपूर्वी ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका ग्रामविकास; तर शहरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका नगरविकास विभागाकडून घेतल्या जात होत्या. राज्य निवडणूक आयोग अस्तित्वात आल्यानंतर त्या या आयोगाकडून घेण्यात येऊ लागल्या.

महाराष्ट्रात लोकसभेच्या ४८ आणि विधानसभेच्या २८८ जागांच्या निवडणुका भारत निवडणूक आयोगाच्या वतीने घेण्यात येतात. महाराष्ट्रात सध्या २७ महानगरपालिका, २४१ नगरपरिषदा, १२८ नगरपंचायती, ३४ जिल्हा परिषदा, ३५१ पंचायत समित्या व सुमारे २७ हजार ७८१ हजार ग्रामपंचायती आहेत. या सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांकरिता पाच वर्षांतून सुमारे ३ लाख लोकप्रतिनिधी निवडणुकीच्या माध्यमातून निवडले जातात.

लोकसभा आणि विधानसभा मतदारसंघांची फेररचना दर ३० वर्षांनी केली जाते. स्थानिक स्वराज्य संस्थांबाबत प्रत्येक निवडणुकीच्या वेळी म्हणजेच प्रत्येक पाच वर्षांनंतर प्रभागांची (वॉर्ड) फेररचना केली जाते. याबाबतचे पहिले आदेश राज्य निवडणूक आयोगाने ४ एप्रिल १९९५ रोजी जारी केले होते.

भारत निवडणूक आयोगाच्या वतीने विधानसभा मतदारसंघनिहाय मतदारयाद्या तयार करण्यात येतात. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी स्वतंत्र मतदार यादी तयार करण्याऐवजी विधानसभेचीच मतदार यादी वापरण्याची तरतूद २९ जानेवारी १९९६ रोजी करण्यात आली. राज्य निवडणूक आयोगाने निश्चित केलेल्या दिनांकास अस्तित्वात असलेली भारत निवडणूक आयोगाची विधानसभा मतदारसंघनिहाय यादी जशीच्या तशी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी घेतली जाते. नंतर तिचे प्रभागनिहाय विभाजन राज्य निवडणूक आयोगाकडून केले जाते.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका अधिकाधिक निर्भय, मुक्त आणि पारदर्शक वातावरणात पार पाडण्यासाठी राज्य निवडणूक आयोगातर्फे वेळोवेळी विविध उपाययोजना करण्यात आल्या आहेत. राज्य निवडणूक आयोगाने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या आचारसंहितेबाबत ७ फेब्रुवारी १९९५ रोजी सर्वप्रथम आदेश निर्गमित केले होते. उमेदवारी अर्जासोबत गुन्हेगारी पार्श्वभूमीसंदर्भातील प्रतिज्ञापत्र सादर करण्याचे आदेश २१ ऑक्टोबर १९९७ रोजी जारी केले होते. इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रांच्या (ईव्हीएम) वापरास २८ नोव्हेंबर २००४पासून सुरुवात करण्यात आली. राजकीय पक्षांच्या नोंदणीस २० नोव्हेंबर २००४पासून सुरुवात करण्यात आली. ग्रामपंचायतींच्या नवनिर्वाचित महिला सदस्यांच्या प्रशिक्षणासाठी ८ जानेवारी २०१० रोजी क्रांतिज्योती प्रकल्पाचा प्रारंभ झाला. मतदाराच्या बोटावर शाईऐवजी मार्कर पेनने खूण करण्यास सुरुवात करण्यात आली. मतदारांना १२ नोव्हेंबर २०१३पासून ‘नोटा’ची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली.

कल्याण-डोंबिवली, नवी मुंबई आणि औरंगाबाद महानगरपालिकेच्या माध्यमातून राज्य निवडणूक आयोगाने सर्वप्रथम सर्वांत मोठ्या सार्वत्रिक निवडणुका १९९५मध्ये यशस्वीरीत्या पार पाडल्या. खऱ्या अर्थाने राज्य निवडणूक आयोगाची ही सुरवात होती.

## पुरस्कार

राज्य निवडणूक आयोगाला माहिती तंत्रज्ञानाच्या अधिकाधिक वापरासाठी 'एज २०१२' (एंटरप्रायजेस ड्रायव्हिंग ग्रोथ अँड एक्सलन्स थ्रू आयटी) हा पुरस्कार मिळाला. मराठी विकास संस्था आणि सी-डॅकतर्फे आयोजित मराठी संकेतस्थळाच्या खुल्या स्पर्धेत राज्य निवडणूक आयोगाच्या संकेतस्थळाला शासकीय संकेतस्थळाच्या गटात २०१३मध्ये तृतीय पुरस्कार मिळाला. ई-गव्हर्नन्स महाराष्ट्रातर्फेदेखील राज्य निवडणूक आयोगाला मे २०१३ मध्ये गौरविण्यात आले. राज्य निवडणूक आयोगाने २६ जानेवारी २०१७ रोजी सादर केलेल्या चित्ररथास द्वितीय पारितोषिक प्राप्त झाले आहे.

### आयोगाचा अधिकार व दर्जा

- स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुकांची प्रक्रियादेखील थोड्याफार फरकाने लोकसभा व विधानसभा निवडणुकांप्रमाणेच असते. म्हणूनच राज्य निवडणूक आयोगालाही भारत निवडणूक आयोगाप्रमाणे समान अधिकार आहेत.
- सर्वोच्च न्यायालयाने मोहिंदरसिंग गिल विरुद्ध मुख्य निवडणूक आयुक्त या प्रकरणातही महत्त्वपूर्ण निकाल दिला आहे. त्यात आयोगाला आवश्यक तेथे प्रशासकीय, कायेदविषयक आणि न्यायिक स्वरूपाचे अधिकार असल्याचे स्पष्ट केले आहे.



- राज्य निवडणूक आयोगाचा दर्जा, शक्ती व अधिकारांसंदर्भात सर्वोच्च न्यायालयाने १९ ऑक्टोबर २००६ रोजी किशनसिंग तोमर विरुद्ध अहमदाबाद शहर महानगरपालिका आणि इतर या प्रकरणात एक महत्त्वपूर्ण निकाल दिला आहे.

### सर्वोच्च न्यायालयाचा निकाल

- राज्य निवडणूक आयोग शासनापेक्षा स्वतंत्र आहे.
- राज्य निवडणूक आयोगाचा दर्जा भारत निवडणूक आयोगाच्या दर्जाशी समतुल्य आहे.
- राज्य निवडणूक आयोगाला आपली जबाबदारी पार पाडण्यासाठी आवश्यक ती सर्व साधनसामग्री व मनुष्यबळ राज्य शासनाने उपलब्ध करून देणे बंधनकारक आहे.
- आयोगाचे निर्देश पाळणे शासनास बंधनकारक आहे.
- आवश्यकता भासल्यास राज्य निवडणूक आयोग राज्य शासनाच्या विरोधात 'रिट ऑफ मँडमस'द्वारे न्यायालयात दाद मागू शकतो.

## महत्त्वाचा घटनाक्रम




- **२६ एप्रिल १९९४ :** राज्य निवडणूक आयोगाची स्थापना
- **७ फेब्रुवारी १९९५ :** आदर्श आचारसंहितेसंदर्भातील पहिला आदेश निर्गमित
- **२९ जानेवारी १९९६ :** विधानसभेच्या मतदारयादीचा स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीत वापर
- **२९ जानेवारी १९९७ :** आदर्श आचारसंहितेबाबत तपशीलवार आदेश निर्गमित
- **२१ ऑक्टोबर १९९७ :** नामनिर्देशनपत्रासोबत गुन्हेगारी पार्श्वभूमीबाबतचे प्रतिज्ञापत्र बंधनकारक
- **२८ नोव्हेंबर २००४ :** इलेक्ट्रॉनिक व्होटिंग मशिनद्वारे मतदान
- **१५ मार्च २००५ :** राजकीय पक्षांच्या नोंदणीला सुरवात
- **०८ जानेवारी २०१० :** क्रांतिज्योती प्रकल्पाचा प्रारंभ
- **२७ मार्च २०१० :** शाईऐवजी मार्कर पेनचा वापर
- **०९ ऑगस्ट २०११ :** राज्य निवडणूक आयोगाच्या बोधचिन्हाचे पुण्यात अनावरण
- **१२ नोव्हेंबर २०१३ :** मतदारांसाठी 'नोटा'ची (NOTA) सुविधा
- **२३ डिसेंबर २०१४ :** नामनिर्देशनपत्रे भरण्यासाठी संकेतस्थळ सुरू
- **०२ फेब्रुवारी २०१५ :** संगणक प्रणालीद्वारे प्रभागरचनेचा प्रयोग
- **०१ जुलै २०१५ :** वारंवार विचारल्या जाणाऱ्या प्रश्नांच्या (एफएक्यू) पुस्तकांचे प्रकाशन
- **०४ जून २०१५ :** कागदपत्रांची पूर्तता न करणाऱ्या पक्षांना नोटिसा
- **२४ सप्टेंबर २०१५ :** राज्य निवडणूक आयोगाच्या नूतनीकृत कार्यालयाचे उद्‌घाटन
- **२५ एप्रिल २०१६ :** 'निवडणूक वार्ता'च्या पहिल्या अंकाचे प्रकाशन
- **२२ सप्टेंबर २०१६ :** राज्य निवडणूक आयोगाच्या पुढाकारातून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीबाबत पहिला संशोधन अहवाल

- **२७ नोव्हेंबर २०१६ :** ट्रू व्होटर मोबाईल ॲपचा वापर
- **१४ डिसेंबर २०१६ :** उमेदवारांच्या शपथपत्रांच्या गोषवाऱ्याला प्रसिद्धी
- **१९ जानेवारी २०१७ :** 'चॅटबॉट' तंत्रज्ञानाच्या वापरास प्ररंभ
- **१९ जानेवारी २०१७ :** 'कॉप' मोबाईल ॲपची मा. राज्यपाल महोदयांच्या हस्ते सुरवात
- **२६ जानेवारी २०१७ :** मुंबई येथील प्रजासत्ताक दिनाच्या संचलनात प्रथमच आयोगाचा चित्ररथ
- **११ ऑक्टोबर २०१७ :** नांदेड-वाघाळा महानगरपालिकेच्या एका प्रभागात प्रायोगिक तत्त्वावर 'व्हीव्हीपॅट'चा वापर
- **२ व ३ नोव्हेंबर २०१७ :** संविधानातील ७३ व ७४ व्या घटनादुरुस्तीच्या २५ वर्षांनिमित्त राष्ट्रीय परिषद
- **६ जानेवारी २०१८ :** दरवर्षी लोकशाही पंधरवडा (२६ जानेवारी ते १० फेब्रुवारी) साजरा करण्याचा निर्णय
- **५ ते २२ जानेवारी २०१८ :** राष्ट्रीय परिषदेच्या धर्तीवर राज्यभरात सहा ठिकाणी विभागीय परिषदा
- **९ फेब्रुवारी २०१८ :** 'गव्हर्नर कॉनक्लेव्ह'द्वारे पहिल्या लोकशाही पंधरवड्याचा समारोप
- **७ मे २०१८ :** राज्य निवडणूक आयोगातर्फे राजकीय पक्षांची राज्यस्तरीय कार्यशाळा.
- **६ जुलै २०१८ :** मुंबई विद्यापीठाच्या सहकार्याने निवडणूकविषयक तज्ज्ञांची कार्यशाळा
- **२६ जुलै २०१८ :** राजकीय पक्षांना पाच वर्षांतून किमान एका जागेवर निवडणूक लढविणे बंधनकारक
- **१३ ऑगस्ट २०१८ :** उमेदवारांना शपथपत्रात उत्पन्नाचा स्रोत नमूद करणे बंधनकारक
- **२६ सप्टेंबर २०१८ :** राष्ट्रकुल स्थानिक स्वराज्य संस्था मंचसोबत (सीएलजीएफ) सामंजस्य करार.
- **सप्टेंबर व ऑक्टोबर २०१८** : विभागीय स्तरावर निवडणूकविषयक तज्ज्ञांच्या सहा कार्यशाळा
- **सप्टेंबर २०१८** : विभागीय स्तरावर राजकीय पक्षांच्या तीन कार्यशाळा
- **२५ व २६ ऑक्टोबर २०१८ :** 'सुदृढ लोकशाहीसाठी निकोप निवडणुका' या विषयावर आंतरराष्ट्रीय परिषद
- **६ नोव्हेंबर २०१८:** 'इन्स्टिट्यूट ऑफ डेमोक्रसी ॲण्ड इलेक्शन्स फॉर गुड गव्हर्नन्स'ची स्थापना

# राज्य निवडणूक आयुक्त

शासनाचे प्रधान सचिव किंवा त्यापेक्षा अधिक दर्जाचे पद धारण केलेल्या व्यक्तीची पाच वर्षांसाठी राज्य निवडणूक आयुक्तपदी राज्यपालांकडून नियुक्ती केली जाते. राज्य निवडणूक आयुक्तांचा कार्यकाळ पाच वर्षांचा असतो. श्री. दे. ना. चौधरी महाराष्ट्राचे पहिले राज्य निवडणूक आयुक्त होते. श्री. य. ल. राजवाडे दुसरे, श्री. नंदलाल तिसरे, श्रीमती नीला सत्यनारायण चौथ्या राज्य निवडणूक आयुक्त होत्या. श्री. ज. स. सहारिया ५ सप्टेंबर २०१४ पासून पाचवे राज्य निवडणूक आयुक्त म्हणून कार्यरत आहेत.

राज्य निवडणूक आयुक्तांच्या नेतृत्वाखाली राज्य निवडणूक आयोगाचे कामकाज चालते. शासनाचे प्रधान सचिव किंवा त्यापेक्षा अधिक दर्जाचे पद धारण केलेल्या व्यक्तीची राज्य निवडणूक आयुक्तपदी राज्यपालांकडून नियुक्ती केली जाते. ही नियुक्ती भारतीय संविधानाच्या अनुच्छेद '२४३ ट' अन्वये केली जाते. संविधानाने राज्य निवडणूक आयुक्तांच्या नियुक्तीसंदर्भातील अन्य बाबींबाबत कायदा करण्याची मुभा विधिमंडळाला दिली आहे. या संदर्भात महाराष्ट्र विधिमंडळाने 'राज्य निवडणूक आयुक्त (अर्हता व नियुक्ती) अधिनियम, १९९४' मंजूर केला आहे. त्यात राज्य निवडणूक आयुक्तांची नियुक्ती, अर्हता, वेतन, पदाचा कालावधी, रजा व सेवेच्या इतर शर्ती नमूद करण्यात आल्या आहेत.

राज्य निवडणूक आयुक्तपदी नियुक्त करण्यात येणारी व्यक्ती संसद, विधिमंडळ अथवा स्थानिक स्वराज्य संस्थेची सदस्य नसावी, अथवा असल्यास राजीनामा देणे आवश्यक असते. ही व्यक्ती लाभाचे पद धारण करत असल्यास त्याचा राजीनामा द्यावा लागतो. अशा व्यक्तीला कोणत्याही राजकीय पक्षांशी संबंध ठेवता येत नाही. कोणताही व्यवसाय करता येत नाही किंवा उद्योग-व्यवसायाच्या संचालनासंदर्भात व्यवस्थापनाशी असलेले संबंध सोडून द्यावे लागतात.

राज्य निवडणूक आयुक्तांचा कार्यकाळ पाच वर्षांचा असतो. पद ग्रहणाच्या दिनांकापासून पाच वर्षे पूर्ण झाल्यास कार्यकाळ संपुष्टात येतो. राज्य निवडणूक आयुक्त पुनर्नियुक्तीस पात्र नसतात. राज्यपालांना उद्देशून पत्र लिहून राज्य निवडणूक आयुक्त आपल्या पदाचा राजीनामा देऊ शकतात. उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्तींना पदावरून दूर करण्याची जी पद्धत आहे, तीच पद्धत राज्य निवडणूक आयुक्तांना पदावरून दूर करण्यासाठी लागू आहे.

## श्री. दे. ना. चौधरी



महाराष्ट्राचे पहिले राज्य निवडणूक आयुक्त म्हणून श्री. दे. ना. चौधरी यांची नियुक्ती झाली होती. त्यांनी २६ एप्रिल १९९४ रोजी पदभार स्वीकारला होता. तत्पूर्वी त्यांनी विधी व न्याय विभागाचे प्रधान सचिव म्हणून काम पाहिले होते. श्री. चौधरी यांनी पदभार स्वीकारल्यानंतर राज्य निवडणूक आयोग अस्तित्वात आला. आयोगासाठी मनुष्यबळ, क्षेत्रीय यंत्रणा, कायद्यात तरतुदी नसलेल्या बाबी इत्यादींसंदर्भात प्रारंभीच्या काळी बऱ्याच अडचणी होत्या. त्यावर श्री. चौधरी यांनी यशस्वीरीत्या मात केली. श्री. चौधरी यांचा कार्यकाळ २५ एप्रिल १९९९ रोजी संपुष्टात आला.

## श्री. य. ल. राजवाडे



श्री. य. ल. राजवाडे यांनी १५ जून १९९९ रोजी दुसरे आयुक्त म्हणून कार्यभार स्वीकारला. ते प्रधान सचिव म्हणून निवृत्त झाले होते. त्यांनी पदभार स्वीकारला तोपर्यंत राज्य

निवडणूक आयोगाची घडी बसू लागली होती. त्याचदरम्यान राज्य शासनाने २००१मध्ये महानगरपालिका, नगरपरिषदा आणि नगरपंचायतींच्या निवडणुकांसाठी बहुसदस्य पद्धतीची तरतूद केली; तसेच नगराध्यक्षपदासाठी थेट निवडणूक घेण्याचीही तरतूद केली. या निवडणुकांची प्रक्रिया यशस्वीरीत्या पार पडली. श्री. राजवाडे यांचा कार्यकाळ १४ जून २००४ रोजी समाप्त झाला.

## श्री. नंदलाल



श्री. नंदलाल यांनी १५ जून २००४ रोजी तिसरे राज्य निवडणूक आयुक्त म्हणून पदभार स्वीकारला. तत्पूर्वी ते राज्य शासनात प्रधान सचिव म्हणून कार्यरत होते. श्री. नंदलाल यांच्या कालावधीतच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रे वापरण्यास सुरुवात झाली. राज्य निवडणूक आयोगात राजकीय पक्षांच्या नोंदणीसही सुरुवात झाली. प्रभागनिहाय मतदार यादीवर हरकती व सूचना मागविण्यास सुरुवात करण्यात आली. जातीय दंगलीच्या पार्श्वभूमीवर धुळे महानगरपालिकेची निवडणूक अत्यंत निर्भय व मुक्त वातावरणात पार पाडण्यात श्री. नंदलाल यशस्वी ठरले. त्यांचा कार्यकाळ १४ जून २००९ रोजी समाप्त झाला.

## श्रीमती नीला सत्यनारायण

श्रीमती नीला सत्यनारायण यांनी ६ जुलै २००९ रोजी



चौथ्या राज्य निवडणूक आयुक्त म्हणून पदभार स्वीकारला व त्या पहिल्या महिला आयुक्त ठरल्या. तत्पूर्वी त्या राज्याच्या अपर मुख्य सचिव म्हणून कार्यरत होत्या. त्यांच्या कारकिर्दीत निवडणूक प्रक्रियेसाठी माहिती तंत्रज्ञानाचा वापर करण्यास सुरुवात झाली. त्यांनी आयोगाचे संकेतस्थळ प्रथम विकसित केले. ग्रामपंचायतींच्या महिला सदस्यांच्या प्रशिक्षणासाठी क्रांतिज्योती प्रकल्प सुरू केला. मतदारांसाठी 'नोटा'ची सुविधा उपलब्ध करून दिली. महिला उमेदवारांच्या मागणीची दखल घेऊन त्यांनी केळी, गाजर, खाट, कुकर आदींसारखी मुक्त निवडणूक चिन्हे गोठविली. सत्यनारायण यांचा कार्यकाळ ५ जुलै २०१४ रोजी संपुष्टात आला.

## श्री. ज. स. सहारिया



श्री. ज. स. सहारिया यांनी ५ सप्टेंबर २०१४ रोजी पाचवे राज्य निवडणूक आयुक्त म्हणून कार्यभार स्वीकारला. तत्पूर्वी त्यांनी राज्याचे मुख्य सचिव म्हणून धुरा सांभाळली होती. श्री. सहारिया यांनी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूक प्रक्रियेच्या अत्याधुनिकीकरणावर भर दिला. संगणक प्रणालीद्वारे मतदार याद्यांचे विभाजन आणि प्रभागरचना; तसेच नामनिर्देशनपत्रांसाठी संकेतस्थळाची सुविधा या महत्त्वपूर्ण बाबी त्यांनी सुरू केल्या. मतदार जागृती

मोहिमेला लोकचळवळीचे स्वरूप देण्यास ते यशस्वी ठरले. परिणामी, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या मतदान टक्केवारीत वाढ होऊ शकली. राज्यघटनेतील ७३ व ७४ व्या दुरुस्तीचा रौप्यमहोत्सवही विविध उपक्रमांद्वारे साजरा करण्यावर त्यांनी भर दिला. त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका, लोकशाही व सुशासन या विषयावर व्यापक विचारमंथन झाले. श्री. सहारिया यांचा कार्यकाळ ०४ सप्टेंबर २०१९पर्यंत आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका अधिकाधिक मुक्त, निर्भय व पारदर्शक वातावरणात पार पाडण्यासाठी सर्वच राज्य निवडणूक आयुक्तांनी आपापल्या परीने महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. त्यामुळे एक संविधानिक संस्था म्हणून राज्य निवडणूक आयोग नावारूपास येण्यास हातभार लाभला आहे. त्यात अर्थातच सर्व मतदार, राजकीय पक्ष, निवडणूक यंत्रणा इत्यादींचादेखील मोलाचा वाटा आहे.

## राज्य निवडणूक आयुक्त व त्यांचा कार्यकाळ

**श्री. दे. ना. चौधरी**
२६ एप्रिल १९९४ ते २५ एप्रिल १९९९

**श्री. य. ल. राजवाडे**
१५ जून १९९९ ते १४ जून २००४

**श्री. नंदलाल**
१५ जून २००४ ते १४ जून २००९

**श्रीमती नीला सत्यनारायण**
६ जुलै २००९ ते ५ जुलै २०१४

**श्री. ज. स. सहारिया**
५ सप्टेंबर २०१४ पासून



# निवडणूक प्रक्रिया

घटनात्मकदृष्ट्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका मुदत संपण्यापूर्वी घेणे क्रमप्राप्त असते. प्रत्येक संस्थेची मुदत वेगवेगळ्या वेळी संपत असते; परिणामी राज्यात नेहमीच कुठे ना कुठे स्थानिक स्वराज्य संस्थांची निवडणूक प्रक्रिया सुरू असते. राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका विविध पाच कायद्यांच्या आधारे घेतल्या जातात. ही निवडणूक प्रक्रिया किमान सहा महिने अगोदर सुरू होते. राज्यघटनेतील कलम २४३ के आणि २४३ झेडए अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करून राज्य निवडणूक आयोगातर्फे ही प्रक्रिया पार पाडली जाते.

केंद्र शासन, राज्य शासन व स्थानिक स्वराज्य संस्था ही व्यवस्था म्हणजेच लोकशाहीची त्रिस्तरीय रचना म्हणावी लागेल. यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका राज्य निवडणूक आयोगातर्फे घेतल्या जातात. राज्यात एकूण २८ हजार ५६० स्थानिक स्वराज्य संस्था आहेत. त्यात २७ महानगरपालिका, २४१ नगरपरिषदा, १२८ नगरपंचायती, ३४ जिल्हा परिषदा, ३५१ पंचायत समित्या व सुमारे २७ हजार ७८१ ग्रामपंचायतींचा समावेश आहे.

## स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसंदर्भातील कायदे

- मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८
- महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९
- महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५
- महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समिती अधिनियम, १९६१
- महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५८





*मतदान केंद्राच्या परिसरातील पोलीस बंदोबस्त आणि मतदार याद्यांतील आपले नाव शोधताना मतदार.*

लोकसभा व विधानसभेच्या निवडणुका लोकप्रतिनिधित्व अधिनियम १९५१नुसार घेतल्या जातात. लोकप्रतिनिधित्व अधिनियम १९५०नुसार करण्यात येणाऱ्या विधानसभा मतदारसंघांच्या मतदारयादीचा आधार त्यासाठी असतो. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका प्रारंभी मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९, नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम १९४८, महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५, महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम १९६१ आणि मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ या सहा कायद्यांतील विविध तरतुदींच्या आधारे घेतल्या जात होत्या; परंतु मध्यंतरी नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, १९४८ रद्दबातल ठरविण्यात आला; तसेच मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९चे नाव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ असे करण्यात आले. त्यामुळे या निवडणुका आता पाच कायद्यांच्या आधारे घेतल्या जातात. त्याचबरोबर निवडणुकांचे अधीक्षण आणि




*मतदान केंद्रावर मतदानासाठी लागलेली रांग.*

संचालन सुरळीतपणे व्हावे, यासाठी राज्यघटनेतील कलम २४३ के आणि २४३ झेडए अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करून राज्य निवडणूक आयोगातर्फे वेळोवेळी आदेश, परिपत्रके आणि सूचना निर्गमित केल्या जातात.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका मुदत संपण्यापूर्वी घेणे क्रमप्राप्त असते. प्रत्येक संस्थेची मुदत वेगवेगळ्या वेळी संपत असते; परिणामी राज्यात नेहमीच कुठे ना कुठे स्थानिक स्वराज्य संस्थांची निवडणूक प्रक्रिया सुरू असते. यामुळेच राज्य निवडणूक आयोगाच्या स्तरावर सातत्याने निवडणुकांची तयारी सुरू असते. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे प्रामुख्याने प्रभागरचना व आरक्षण निश्चिती, मतदारयाद्यांचे प्रभागनिहाय विभाजन आणि प्रत्यक्ष निवडणूक (नामनिर्देशनपत्रे दाखल करण्यापासून ते निकाल) असे तीन टप्पे आहेत. याशिवाय इतर अनेक आनुषंगिक बाबी असतात.

स्थानिक स्वराज्य संस्थांची निवडणूक प्रक्रिया किमान सहा महिने अगोदर सुरू होते. लोकसभा आणि विधानसभा निवडणुकांसाठी दर ३० वर्षांनी मतदारसंघांची पुनर्रचना केली जाते. त्यासाठी स्वतंत्र मतदारसंघ पुनर्रचना आयोग गठित केला जातो. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या

प्रभागाचे क्षेत्र व हद्द प्रत्येक सार्वत्रिक निवडणुकीच्या वेळी राज्य निवडणूक आयोगामार्फत निश्चित करण्यात येते. आयोगाच्या वतीने प्रभागरचनेच्या कार्यवाहीची मुख्य जबाबदारी महानगरपालिकेसाठी संबंधित महानगरपालिका आयुक्त व इतर स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी (नगरपरिषद/ नगरपंचायत, जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायत) संबंधित जिल्हाधिकाऱ्यांवर असते. त्यासाठी राज्य निवडणूक आयोगाकडून प्रभागरचना व आरक्षण निश्चितीचा कार्यक्रम दिला जातो.

## प्रत्यक्ष प्रभागरचना व आरक्षण

- लगतच्या जनगणनेनुसार एकूण लोकसंख्या; तसेच अनुसूचित जाती व अनुसूचित जमातींच्या लोकसंख्येचा विचार.



*इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राच्या सुसज्ज पेट्या.*



*मतदार याद्या.*

- प्रगणक गटांच्या नकाशाचा आधार.
- संबंधित क्षेत्राच्या गुगल अर्थ अथवा तत्सम नकाशांचा वापर.
- महानगरपालिकेच्या बाबतीत नकाशावर के.एम.एल. अथवा के.एम.झेड. फाईल प्रकारात प्रगणक गटांच्या हद्दी दर्शविणे.
- नकाशावर मोठे, मध्यम व इतर महत्त्वाचे रस्ते, रेल्वे, नद्या, नाले, डोंगर, तलाव तसेच दळणवळणामधील अडथळे अथवा ते पार करण्याकरिता असलेले पूल इ. बाबी दर्शविण्यात येतात.
- मागील निवडणुकीचे आरक्षण लक्षात घेता, आरक्षण चक्रानुक्रमे फिरविणे आवश्यक असते.
- एकदा प्रभागरचनेची कार्यवाही सुरू झाल्यानंतर संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेच्या हद्दीमध्ये बदल करता येत नाहीत.




*मतदान केंद्रावर लागलेली मतदारांची रांग.*

- महानगरपालिकेच्या बाबतीत शक्यतो गुगल मॅप अथवा एमआरसॅक (MRSAC) नकाशावर प्रगणक गटाची मांडणी केली जाते.
- राज्य निवडणूक आयोगाच्या आदेशाप्रमाणे प्रभागरचना उत्तरेपासून सुरू करून झिकझॅक पद्धतीने पूर्ण केली जाते. ग्रामपंचायतीची प्रभागरचना दक्षिणेपासून सुरू केली जाते.
- लोकसंख्येप्रमाणे अनुसूचित जाती व अनुसूचित जमातींचे आरक्षण दाखविले जाते. नागरिकांच्या मागास प्रवर्गासाठी २७ टक्के आरक्षण असते.
- महानगरपालिकेच्या बाबतीत प्रारूप प्रभागरचनेचा प्रस्ताव आयोगास सादर करण्यापूर्वी त्यास विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी व महानगरपालिका आयुक्त यांच्या समितीची मान्यता घ्यावी लागते.
- नगरपरिषदा, नगरपंचायती, जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांच्या बाबतीत प्रारूप प्रभागरचनेस विभागीय आयुक्तांची मान्यता घ्यावी लागते.
- महानगरपालिकेच्या बाबतीत राज्य निवडणूक आयोगाच्या मान्यतेनंतर नागरिकांचा मागास प्रवर्ग व सर्व प्रवर्गांतील महिलांसाठी राखीव जागांकरिता सोडत

काढली जाते.

- वरील पद्धतीने प्रक्रिया पार पाडल्यानंतर प्रारूप प्रभागरचनेला व्यापक प्रसिद्धी दिली जाते आणि त्यावर हरकती व सूचना मागविल्या जातात.
- प्रारूप प्रभागरचनेवर प्राप्त झालेल्या हरकती व सूचनांवर राज्य निवडणूक आयुक्त किंवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्यामार्फत सुनावणी घेतली जाते.
- सुनावणीनंतर आवश्यकतेप्रमाणे प्रभागरचनेमध्ये योग्य ते बदल करून प्रभागरचनेला अंतिम रूप दिले जाते.
- महानगरपालिकेच्या बाबतीत प्रभागरचना व आरक्षण निश्चितीस राज्य निवडणूक आयोगाकडून अंतिम मान्यता दिली जाते.
- नगरपरिषदा, नगरपंचायती, जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांच्या प्रभागरचनेस अंतिम मान्यता विभागीय महसूल आयुक्त देतात.
- ग्रामपंचायतींच्या प्रभागरचनेस जिल्हाधिकारी अंतिम मान्यता देतात.

## मतदार याद्यांचे प्रभागनिहाय विभाजन

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी



*मतमोजणीसाठी सज्ज असलेले मतमोजणी केंद्र.*

स्वतंत्र मतदार यादी तयार केली जात नाही. भारतीय लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५० नुसार तयार करण्यात आलेली विधानसभा मतदारसंघांची मतदार यादी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी वापरली जाते. त्यासाठी राज्य निवडणूक आयोगाने घोषित केलेल्या अधिसूचित तारखेस (Cut-off Date) अस्तित्वात असलेली विधानसभा मतदारसंघाची यादी संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीसाठी प्रभागनिहाय विभागली जाते. मतदार यादीचे प्रभागनिहाय विभाजन करताना मूळ विधानसभेच्या मतदार यादीत बदल करण्याचा अथवा नव्याने नावे समाविष्ट किंवा वगळण्याची बाब राज्य निवडणूक आयोगाच्या कार्यकक्षेत येत नाही. प्रभागनिहाय मतदार याद्या तयार करण्याचे स्वतंत्र कार्यक्रम राज्य निवडणूक आयोगाकडून देण्यात येतात.

- अधिसूचित दिनांकास अस्तित्वात असलेल्या विधानसभेच्या मतदार यादीचा 'डेटा बेस' मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाकडून प्राप्त करून तो राज्य निवडणूक आयोगामार्फत संगणक प्रणालीमध्ये उपलब्ध करून देण्यात येतो. संगणक प्रणालीच्या साहाय्याने मतदार यादीचे विभाजन केले जाते. त्यासाठी अधिकारी/कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण दिले जाते. महानगरपालिकेच्या मतदार यादीच्या विभाजनासाठी 'ट्रू व्होटर ॲप'चादेखील वापर केला जातो.
- भारत निवडणूक आयोगाची मतदार यादी व प्रभागनिहाय विभाजित झालेल्या मतदार यादीमध्ये फरक असता कामा नये. प्रभागनिहाय विभाजित मतदार यादीत मूळ विधानसभेच्या मतदार यादीतील नावे कमी होता कामा नयेत किंवा ही नावे जास्तही नसावीत.
- मतदार यादीचे विभाजन झाल्यानंतर संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीपूर्वी प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध केली जाते. प्रारूप मतदार यादीवर हरकती व सूचना मागविल्या जातात. हरकती व सूचना दखलपात्र व राज्य निवडणूक आयोगाच्या कार्यकक्षेत असल्यास त्या दुरुस्त केल्या जातात.
- मतदार यादीचे प्रभागनिहाय विभाजन करताना मूळ मतदार यादीतील नाव वगळले गेले असल्यास, चुकून एका प्रभागातून दुसऱ्या प्रभागात गेले असल्यास किंवा नावात लेखनिकांच्या काही चुका झाल्या असल्यास त्या दुरुस्त केल्या जातात. हरकती व सूचनांची प्रक्रिया पार पडल्यानंतर अंतिमरीत्या प्रसिद्ध झालेल्या मतदार यादीच्या आधारे मतदान प्रक्रिया पार पाडली जाते.
- मतदान केंद्रनिहाय विभाजित झालेली मतदार यादी निवडणुकीशी संबंधित अधिकारी, मतदान केंद्राध्यक्ष, राजकीय पक्ष, सर्व उमेदवार आदींना उपलब्ध करून देण्यात येते.

## प्रत्यक्ष निवडणूक कार्यक्रम

राज्य निवडणूक आयोगाने स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीसाठी प्रत्यक्ष कार्यक्रम जाहीर केल्यापासून आचारसंहिता लागू होते. निवडणुकीच्या तीन टप्प्यांपैकी हा मुख्य टप्पा असतो. कारण प्रत्यक्ष निवडणूक कार्यक्रम जाहीर झाल्यानंतर सर्वांचे निवडणुकीकडे लक्ष वेधले जाते. राज्य निवडणूक आयोगाकडून तत्पूर्वी संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेच्या अधिकारी/ कर्मचाऱ्यांसाठी

निवडणूक पूर्वतयारीबाबत तपशीलवार मार्गदर्शक सूचनादेखील दिल्या जातात.

## निवडणूक कार्यक्रमातील ठळक बाबी

- स्थानिक स्तरावर निवडणूक कार्यक्रमाच्या अधिसूचनेच्या प्रसिद्धीचा दिनांक.
- नामनिर्देशनपत्रे (उमेदवारी अर्ज) दाखल करण्याचा कालावधी.
- नामनिर्देशनपत्रांच्या छाननीचा दिनांक.
- उमेदवारी मागे घेण्याचा कालावधी.
- निवडणूक रिंगणातील उमेदवारांना चिन्हवाटपाचा दिनांक.
- निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांच्या यादीच्या प्रसिद्धीचा दिनांक.
- मतदानाचा दिनांक व वेळ.
- मतमोजणी व निकाल जाहीर करण्याचा दिनांक.
- महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात निकाल प्रसिद्ध करण्याची मुदत.

## मतदान यंत्रांबाबत दक्षता

प्रत्यक्ष निवडणूक कार्यक्रमापूर्वी इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रांच्या उपलब्धतेची तयारी केली जाते. त्यासाठी मतदान यंत्रांचे 'एफएलसी' (फर्स्ट लेव्हल चेकिंग) केले जाते. मतदान यंत्रांची कॅन्डिडेट (उमेदवार) सेटिंग करण्यापूर्वी चाचणी घेणे, कॅन्डिडेट सेटिंग करणे, सीलबंद करणे, मतदान केंद्रावर प्रत्यक्ष मतदानापूर्वी मॉक पोल (चाचणी मतदान) घेणे, मतदानानंतर यंत्रे सीलबंद करणे, स्ट्राँगरूममध्ये ठेवणे, स्ट्राँगरूम सील करणे, मतमोजणीसाठी स्ट्राँगरूम उघडणे, प्रत्यक्ष मतमोजणीच्या वेळी मतदान यंत्रांचे सील उघडणे आदी सर्व प्रकारची कार्यवाही उमेदवार किंवा त्यांच्या प्रतिनिधींच्या उपस्थितीत केली जाते.

## अधिकारी/कर्मचाऱ्यांची नियुक्ती

राज्य निवडणूक आयोगाने प्रत्यक्ष निवडणूक कार्यक्रम जाहीर केल्यानंतर क्षेत्रीय स्तरावरील संबंधित सर्व यंत्रणेची लगबग सुरू होते. निवडणूक अधिकारी/ कर्मचाऱ्यांची नियुक्ती, त्यांचे प्रशिक्षण, वाहनांची व्यवस्था, पोलिस बंदोबस्त, साधनसामग्रीची जुळवाजुळव आदी महत्त्वाची कामे असतात. अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या नियुक्ती प्रक्रियेत निवडणूक निर्णय अधिकारी, सहायक निवडणूक निर्णय अधिकारी, मतदान केंद्राध्यक्ष, मतदान अधिकारी इत्यादींची नियुक्ती केली जाते. त्यांना संगणकाच्या मदतीने नामनिर्देशनपत्रे व प्रतिज्ञापत्रे तयार करणे, ट्रू व्होटर ॲप, 'कॉप' हे ॲप तसेच मतदान यंत्र आदींचे प्रशिक्षण दिले जाते. मतदान केंद्रांच्या व्यवस्थेबरोबरच मतमोजणीच्या ठिकाणाचीदेखील व्यवस्था करावी लागते.

## प्रतिबंधात्मक उपाययोजना

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका निर्भय, मुक्त व पारदर्शक वातावरणात होण्यासाठी सर्व प्रतिबंधात्मक उपाययोजना प्रत्यक्ष निवडणुकीऐवजी प्रभागरचनेच्या कार्यवाहीपासूनच राबविल्या जातील; तसेच निवडणुका प्रक्रिया कर्तव्यदक्ष व निष्पक्ष अधिकाऱ्यांकडूनच हाताळण्यात येतील, असे आदेश ३१ जुलै २०१८ रोजी



*मुंबई येथील सह्यादी अतिथिगृहात २६ ऑक्टोबर २०१६ रोजी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या तयारीसाठी राज्यभरातील वरिष्ठ अधिकाऱ्यांची कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती.*

निर्गमित करण्यात आले आहेत. सर्वोच्च न्यायालयाच्या एका निकालानुसार सर्व प्रतिबंधात्मक उपाययोजना प्रत्यक्ष निवडणुकीऐवजी प्रभागरचनेची कार्यवाही सुरू झाल्यापासूनच राबविणे आवश्यक आहे. आत्तापर्यंत सर्व प्रतिबंधात्मक उपाययोजना प्रत्यक्ष निवडणूक जाहीर झाल्यापासूनच राबविल्या जात होत्या. त्यात हा नवा बदल करण्यात आला असून त्याबाबत स्वतंत्र आदेश निर्गमित करण्यात आला आहे.

## प्रतिबंधात्मक उपाययोजनेतील ठळक बाबी

- स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची संपूर्ण प्रक्रिया कर्तव्यदक्ष, निष्पक्ष व सचोटी असणाऱ्या अधिकारी-कर्मचाऱ्यांमार्फतच राबवावी.
- स्थानिक स्वराज्य संस्थांची मुदत संपण्याच्या दिनांकास सध्याच्या पदावर तीन वर्षे पूर्ण होत असलेल्या अधिकाऱ्यास निवडणुकीची कामे देण्यात येऊ नयेत.
- निवडणुकीची कामे हाताळणाऱ्या अधिकाऱ्याची

निवडणूक प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर दोन महिन्यांपर्यंत सध्याच्या पदावरून बदली करू नये अथवा त्याला कार्यमुक्त करू नये.

- निवडणूक होत असलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थेचा संबंधित अधिकारी जिल्ह्याचा रहिवासी असू नये; परंतु हा निकष जिल्हा संवर्गातील कर्मचाऱ्यांच्या बाबतीत बंधनकारक राहणार नाही.
- प्रभागरचनेची कार्यवाही सुरू झाल्यापासून पोलिस, उत्पादनशुल्क व इतर संबंधित विभागांनी आवश्यक त्या सर्व प्रतिबंधात्मक उपाययोजना राबवाव्यात.
- जिल्हा व तालुका पातळीवर स्थापन करण्यात आलेल्या संनियंत्रण समित्यांनी सर्व बँका, पतपेढ्या इत्यादींशी समन्वय साधून मोठ्या आर्थिक व्यवहारांवर लक्ष ठेवावे.
- विमानतळ, रेल्वे, उत्पादनशुल्क, वन विभाग, तटरक्षक दल इत्यादी विभागांशी समन्वय साधून पैशांची व मद्याची अवैध मार्गाने होणारी वाहतूक आणि संशयास्पद हालचालीवर लक्ष ठेवावे.

## मतदान केंद्र निश्चिती

मतदार यादीच्या एका भागासाठी एक मतदान केंद्र किंवा आवश्यकतेप्रमाणे पूरक मतदान केंद्राची व्यवस्था केली जाते. मतदान केंद्रावरील मतदारांची संख्या स्थानिक स्वराज्य संस्थानिहाय वेगवेगळी असते. लोकसभा व विधानसभा निवडणुकीचे मतदान केंद्र असलेल्या ठिकाणीच शक्यतो स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचे मतदान केंद्र असते.

सांगली–मिरज–कुपवाड व जळगाव या महानगरपालिकांच्या १ ऑगस्ट २०१८ रोजी झालेल्या सार्वत्रिक निवडणुकीप्रसंगी मतदान केंद्रे आदर्श आहेत किंवा नाहीत, याबाबत त्रयस्थ संस्थेतर्फे पाहणी करण्यात आली होती. अशा प्रकारच्या पाहणीचा उपक्रम प्रथमच राबविला गेला.

## मतदान केंद्रासाठीचे निकष

- प्रभागरचना अंतिम झाल्याबरोबर मतदान केंद्रांची संख्या व स्थळ यांचा अंदाज घेण्यास सुरवात केली जाते.
- सर्व मतदान केंद्रे आदर्श असतील, या दृष्टीने त्याची निवड केली जाते. मागील निवडणुकीमधील मतदान केंद्रे जशीच्या तशी न ठेवता मतदारांच्या सोयीच्या दृष्टीनेदेखील विचार करणे आवश्यक असते.
- केंद्रावर पिण्याचे पाणी, शौचालय, पुरेशा प्रमाणात प्रकाशाची व्यवस्था, उन्हाळ्यात सावलीची; तर पावसाळ्यात छपराची व्यवस्था करणे आवश्यक असते.
- दिव्यांगांच्या दृष्टीने सर्व मतदान केंद्रे शक्यतो तळमजल्यावर असली पाहिजेत. प्रत्येक ठिकाणी आवश्यकतेप्रमाणे रॅम्प आणि कठडे असावेत. दिव्यांग व्यक्ती आणि ज्येष्ठ नागरिकांसाठी आवश्यकतेप्रमाणे मध्यवर्ती ठिकाणी 'व्हील चेअर'ची सुविधा असावी. मतदान केंद्र पहिल्या मजल्यावर असल्यास दिव्यांग व ज्येष्ठ नागरिकांसाठी लिफ्ट अथवा डोलीची व्यवस्था असावी.
- मतदारांच्या सोयीच्या दृष्टीने प्रथमोपचारांची सुविधा व रुग्णवाहिकेची व्यवस्था करण्यात यावी.
- दिव्यांग, ज्येष्ठ नागरिक व गरोदर मातांना रांगेत उभे

राहण्याऐवजी मतदानासाठी प्राधान्य दिले जाते. मतदान केंद्राची आतील व बाहेरील व्यवस्था करण्याची सर्व जबाबदारी संबंधित महानगरपालिका आयुक्त व जिल्हाधिकारी यांची असते.

## सुलभता आणि पारदर्शकतेसाठी

निवडणूक प्रक्रिया राबविताना काही प्रमुख उपाययोजना आवश्यक असतात. निवडणूक प्रक्रिया सुलभ रीतीने पार पडण्यासाठी या उपाययोजना अत्यंत आवश्यक असतात. राज्य निवडणूक आयोगाने सतत पाठपुरावा करून खालील उपाययोजना काटेकोरपणे राबविण्यासाठी सतत प्रयत्न केला व आग्रह धरला. त्याचे चांगले परिणाम दिसून आले.

- आचारसंहितेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी आवश्यक ती दक्षता घेणे.
- विविध विभाग आणि अधिकाऱ्यांचा समावेश असलेली संनियंत्रण समिती गठित करणे.
- 'पेड न्यूज'संदर्भात आणि इलेक्ट्रॉनिक मीडियावरही जाहिरातींसाठी समिती स्थापन करणे.
- व्हिडीओ सर्व्हेलन्स टीम, फ्लाइंग स्कॉड व स्टॅटिक सर्व्हेलन्स टीम नियुक्त करणे.
- प्राप्तिकर आणि विक्रीकर अधिकाऱ्यांची निवडणूक खर्च निरीक्षक म्हणून नियुक्ती
- तक्रार निवारण कक्षाची स्थापना करणे.
- निवडणूक निरीक्षकांच्या नियुक्त्या करणे.
- मतदारांसाठी घरोघरी मतदार चिठ्ठी वाटप करणे.

मतदानाची प्रक्रिया पार पडल्यानंतर निवडणूक आयोगाने निश्चित केलेल्या दिनांकास मतमोजणी केली जाते. मतदान झाल्यानंतर सीलबंद केलेली मतदान यंत्रे सुरक्षा कक्षात (स्ट्राँगरूममध्ये) ठेवण्यात येतात. मतमोजणी केंद्राची व्यवस्था पक्क्या इमारतीत करावी लागते. मतमोजणीसाठी मतदान केंद्रांची संख्या विचारात घेऊन प्रत्येक प्रभागासाठी स्वतंत्र टेबल लावले जातात. मतमोजणीचे टेबल शक्यतो इंग्रजी 'U' आकारात लावले जाते. या टेबलांसमोर बॅरिकेडिंगसह बारीक जाळी लावली जाते. मतमोजणी टेबलासमोर मतमोजणी प्रतिनिधींची बसण्याची व्यवस्था असते. मतमोजणी केंद्राच्या परिसरात स्वतंत्र मीडिया सेंटर स्थापन केले जाते. निकाल घोषित झाल्यानंतर आचारसंहिता संपुष्टात येते. महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात निकाल प्रसिद्ध झाल्यानंतर राज्य निवडणूक आयोगाच्या स्तरावरील निवडणूक प्रक्रिया संपते.

# आदर्श आचारसंहिता

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकादेखील निर्भय, मुक्त व पारदर्शक वातावरणात पार पाडणे आवश्यक असते. त्यासाठीच राज्य निवडणूक आयोगानेदेखील लोकसभा व विधानसभा निवडणुकांप्रमाणे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठीसुद्धा आचारसंहिता स्वीकारली आहे. आचारसंहितेची काटेकोर अंमलबजावणी करण्यासाठी आयोगाला पोलिस व अन्य यंत्रणेची मदत लागते. ही मदत देणे संबंधितांवर बंधनकारक असते.

भारत निवडणूक आयोगाने १९६०च्या केरळ विधानसभा निवडणुकीच्या वेळी 'काय करावे?' आणि 'काय करू नये?' या संदर्भातील मार्गदर्शक तत्त्वे जारी केली होती. आचारसंहितेचे ते एक प्रकारचे लघुरूप किंवा प्रारंभ होता. त्यात प्रचारसभा, मिरवणुका, भाषणे, घोषवाक्ये, प्रचारफलक आदींबाबत सूचना होत्या. १९६२च्या लोकसभा निवडणुकीच्या वेळी आयोगाने ही मार्गदर्शक तत्त्वे सर्व मान्यताप्राप्त राजकीय पक्ष आणि राज्य सरकारांना पाठवली होती. सत्ताधारी पक्षाकडून निवडणुकीत होणारा सत्तेचा गैरवापर टाळण्यासाठी निवडणूक आयोगाने १९७९मध्ये विविध राजकीय पक्षांशी सल्लामसलत करून काही उपाय योजले होते; परंतु श्री. टी. एन. शेषन यांनी १९९१मध्ये भारत निवडणूक आयोगाचे मुख्य निवडणूक आयुक्त असताना आचारसंहिता कठोरपणे राबविल्याने अधिक परिचयाची झाली.

आचारसंहिता लोकसभा किंवा विधानसभेने पारित केलेला अधिनियम नाही. ती राजकीय पक्षांनी स्वतःहून निश्चित केलेली मार्गदर्शक तत्त्वे आहेत. (MCC is a set of norms for ideal conduct and behavior during elections, set of behavioral guidance for political parties and candidates. it is not statute.) आदर्श आचारसंहिता राजकीय पक्षांनी स्वतःहून निश्चित केलेला मापदंड असला, तरी त्याची प्रभावी अंमलबजावणी निवडणूक आयोगाकडून करण्यात येते. त्यासाठी भारत निवडणूक आयोगाकडून संविधानाच्या अनुच्छेद ३२४; तर राज्य निवडणूक आयोगाकडून अनुच्छेद २४३ के आणि २४३ झेडए अनुसार उपलब्ध अधिकारांचा वापर केला जातो. विशेष म्हणजे, मा. उच्च न्यायालयाने (पंजाब व हरियाना, सिव्हिल पिटीशन क्र.२७०/१९९७) २७ मे १९९७ रोजी दिलेल्या निकालान्वये आचारसंहितेस न्यायिक आधार प्रदान केला आहे.

लोकसभा व विधानसभा निवडणुकांप्रमाणेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका निर्भय, मुक्त व पारदर्शक वातावरणात पार पाडणे आवश्यक असते. त्यासाठीच राज्य निवडणूक आयोगानेदेखील लोकसभा व विधानसभा




*राज्य निवडणूक आयोगाने २९ डिसेंबर २०११ रोजी प्रसिद्ध केलेली आचारसंहितेसंदर्भातील एकत्रित आदेशांची पुस्तिका.*

निवडणुकांसाठी अमलात आणली जाणारी आचारसंहिता स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठीसुद्धा स्वीकारली आहे. राज्य निवडणूक आयोगाने ७ फेब्रुवारी १९९५ रोजी सर्वप्रथम आदर्श आचारसंहितेसंदर्भात आदेश निर्गमित केले होते. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची आचारसंहिता अधिक परिणामकारक होण्याच्या दृष्टीने २४ डिसेंबर २००७ रोजी एकत्रित आदेश निर्गमित करण्यात आले. मागील सर्व आदेश रद्द करून २९ डिसेंबर २०११ रोजी सुधारित एकत्रित आदेश जारी करण्यात आले. कालांतराने निवडणूक प्रक्रियेत होणारे बदल लक्षात घेऊन, आचारसंहिता अधिक व्यापक करण्यात आली. त्यासाठी २९ डिसेंबर २०११चे आदेश रद्द करून १४ ऑक्टोबर २०१६ रोजी नव्याने आदेश निर्गमित करण्यात आले आहेत.

भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ के व २४३ झेडए, मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ चे कलम १८ ए (४), महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ चे कलम १४ (४), महाराष्ट्र नगरपालिका आणि नगरपंचायत आणि औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ चे कलम १० ए (४), महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ चे कलम ९ ए (४) आणि मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ चे कलम १० ए (४) अनुसार राज्य निवडणूक आयोगास प्राप्त अधिकारांचा वापर करून आचारसंहितेसंदर्भातील हे आदेश निर्गमित करण्यात येतात.

निवडणूक हा लोकशाहीचा एक महत्त्वाचा घटक आहे. निवडणुकांचे महत्त्व जपणे आयोगाबरोबरच निवडणूक अधिकारी/कर्मचारी, राजकीय पक्ष आणि उमेदवारांचीही जबाबदारी आहे. ही जबाबदारी पार पाडताना कुणी कुचराई केल्यास किंवा आचारसंहितेचा भंग केल्यास त्याविरुद्ध कारवाई करणे आवश्यक ठरते. आचारसंहिताभंग केल्याबद्दल कुणाविरुद्धही कारवाई करताना नैसर्गिक न्यायानुसार संबंधिताची बाजू ऐकून घेणे आवश्यक असते. घडलेल्या संपूर्ण प्रकाराची किंवा प्रकरणाची शहानिशा केल्यानंतर प्रचलित कायद्यानुसार कारवाई केली जाते.

सर्वोच्च न्यायालयाने एका निर्णयात स्पष्ट केले आहे, की निवडणूक आयोग कर्तव्यपूर्ती करताना असहायता दाखवू शकत नाही किंवा तशी भूमिका घेऊ शकत नाही. निवडणूक आयोगाच्या वतीने जे शासकीय अधिकारी किंवा कर्मचारी काम करतात, त्यांनाही असहयाता व्यक्त करता येणार नाही. त्यामुळे कोणती परिस्थिती कशी हाताळायची, याची स्पष्ट माहिती त्यांना असते. कुणाचीही बाजू न घेता निष्पक्षपणे या प्रक्रियेतील सगळ्यांनी काम करणे आवश्यक असते. राज्य निवडणूक आयोग स्वतंत्र आहे. तो स्वतंत्रपणे निर्णय घेऊ शकतो. शासनाकडे याचना करण्याची गरज नाही. घटनेने आणि कायद्याने आयोगाला अधिकार दिले आहेत. त्या अधिकारांचा वापर आयोगाने करणे बंधनकारक असते. निवडणूक काळात आयोगाच्या मदतीला जी शासकीय यंत्रणा असते, त्या यंत्रणेवर आयोगाचे आदेश मानण्याचे बंधन असते. या यंत्रणेने राजकीय दबावापुढे न झुकता निष्पक्ष काम करणे गरजेचे असते.

सर्वोच्च न्यायालयाने आणखी एका बाबतीत स्पष्ट निर्देश दिले आहेत, की निवडणूक काळात उद्‌भवलेली

परिस्थिती हाताळण्यासाठी कायदा/नियम उपलब्ध नसेल, तर त्या परिस्थितीत उचित आदेश देण्याचे अधिकार आयोगाला किंवा संबंधित निवडणूक यंत्रणेला आहेत. समान संधी, निर्भय वातावरण व पारदर्शकता या बाबी डोळ्यांपुढे ठेवून निर्णय घ्यावे लागतात. तसे केले नाही तर घटनेच्या तत्वांचे पालन न केल्यासारखे होईल. गेल्या काही वर्षांच्या काळात राज्य निवडणूक आयोगाने या सर्व बाबींचा विचार करून पावले उचलली आहेत. आचारसंहितेची काटेकोर अंमलबजावणी करण्यासाठी आयोगाला ज्या ठिकाणी शासनाची किंवा शासकीय यंत्रणेची मदत लागेल, आवश्यक निधी लागेल तो उपलब्ध करून देण्याची जबाबदारी राज्य शासनाची असते.




राज्य निवडणूक आयोगाने निवडणूक कार्यक्रम जाहीर केल्यापासून शेवटचा निकाल जाहीर होईपर्यंत आचारसंहिता लागू असते. निवडणूक जिथे होत आहे, त्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या क्षेत्रात किंवा पोटनिवडणूक होत असलेल्या प्रभागात, निवडणूक विभाग अथवा निर्वाचक गणात आचारसंहिता अमलात आणली जाते. आचारसंहितेचे प्रामुख्याने शांततापूर्ण आणि नियमबद्ध आचरण, सर्वांना समान संधी, नागरिकांचा शांततेचा अधिकार अबाधित ठेवणे, प्रचार करताना सभ्यता राखणे, निवडणुकांमध्ये भ्रष्ट आचरण आणि गुन्ह्यांना प्रतिबंध करणे, शासकीय यंत्रणा आणि पदाच्या दुरुपयोगास प्रतिबंध करणे आदी मूलभूत तत्त्वे आहेत. आचारसंहितेच्या प्रभावी अंमलबजावणीची जबाबदारी नगरपरिषद, नगरपंचायत, जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि ग्रामपंचायतीसाठी संबंधित जिल्हाधिकाऱ्यांवर; तर महानगरपालिकांसाठी संबंधित महापालिका आयुक्तांवर असते. निवडणुकांशी निगडित सर्व अधिकारी/ कर्मचाऱ्यांनी कोणताही पक्ष व उमेदवाराची बाजू न घेता निष्पक्षपणे काम करणे बंधनकारक असते. त्याचबरोबर मतदारांवर विपरीत प्रभाव टाकणाऱ्या किंवा प्रलोभनासारख्या कृत्यांवर लक्ष ठेवून, अंकुश ठेवण्याचीदेखील जबाबदारी संबंधित अधिकारी/ कर्मचाऱ्यांचीच असते.

*राज्य निवडणूक आयोगाने १४ ऑक्टोबर २०१६ रोजी प्रसिद्ध केलेले आचारसंहितेसंदर्भातील सुधारित एकत्रित आदेशाची पुस्तिका.*

निवडणूक ही कालबद्ध प्रक्रिया आहे. निवडणूक काळात विविध प्रकारच्या घडामोडी घडतात. त्यात आदर्श आचारसंहितेचे उल्लंघन झाल्यास तातडीने कार्यवाही आणि प्रसंगी कारवाई करणे आवश्यक असते. आचारसंहितेच्या उल्लंघनासंदर्भात अस्तित्वात असलेल्या विविध कायद्यांतर्गत गुन्हे दाखल केले जातात. उदा.– भारतीय दंडसंहिता, सार्वजनिक मालमत्ता नुकसान प्रतिबंध अधिनियम १९८४, खासगी व सरकारी मालमत्ता विद्रूपन अधिनियम, १९९६, प्राण्यांचा छळ प्रतिबंध अधिनियम १९६६ इत्यादी.

आचारसंहितेमध्ये राजकीय पक्ष आणि उमेदवारांसाठीच्या विविध स्वरूपाच्या मार्गदर्शक तत्त्वांचा समावेश आहे. मंत्र्यांकडून निवडणूक काळात शासकीय आणि राजकीय कामांची सरमिसळ होता कामा नये. वेगवेगळ्या प्रकारची अनुदाने, नवीन योजना आणि प्रकल्पांची घोषणा या काळात करू नये. याबाबत आचारसंहितेत निर्देश देण्यात आले आहेत; परंतु आचारसंहिता म्हणजे विकास प्रक्रियेतील अडथळा नाही. नव्या घोषणा टाळून विकास प्रक्रिया निरंतर सुरू ठेवता येते. पूर, दुष्काळ, घातक रोगांची साथ किंवा इतर नैसर्गिक आपत्तींमुळे प्रभावित झालेल्या क्षेत्रातील जनतेसाठी आचारसंहितेच्या काळातही पीडा निवारण आणि पुनर्वसन कार्य सुरू करता येते किंवा पुढे चालू ठेवता येऊ शकते.

## गैरप्रकार रोखण्यासाठी प्रयत्न

राज्य निवडणूक आयोगाने गेल्या साडेचार वर्षांच्या कालावधीत आचारसंहितेचे काटेकोर पालन करण्यासाठी यापूर्वी कधीही ज्या विभागांची मदत घेतली नव्हती अशा शासकीय विभागांची मदत घेतली. वन विभाग, प्राप्तिकर विभाग, विक्रीकर विभाग, सीमा सुरक्षा बल, समुद्र तटरक्षक दल यांच्या मदतीने निवडणूक काळात होणारे गैरप्रकार रोखण्यासाठी प्रयत्न केले.

निवडणूक काळात आर्थिक व्यवहार अचानक वाढतात. 'अमुक एक उमेदवार किंवा त्यांचे कार्यकर्ते रात्रीतून दारूवाटप, पैसेवाटप करतात' अशा आशयाच्या तक्रारी निवडणूक काळात सतत होत असतात. अशा प्रकारांवर नजर ठेवणे केवळ निवडणूक आयोग किंवा उपलब्ध शासकीय यंत्रणेस शक्य नसते. त्यासाठी अन्य विभागांचे सहकार्य लागते. म्हणूनच प्राप्तिकर विभाग, विक्रीकर, सीमाशुल्क विभागाची यासाठी मदत घेण्यात आली. संशयास्पद व्यवहारांवर नजर ठेवण्याची विनंती बँकांसह या विभागांना करण्यात येते. जंगल, समुद्रमार्ग आणि राज्यांच्या सीमांवरून पैसे किंवा मद्याचा अवैध पुरवठा निवडणूक काळात होण्याचे प्रकार घडतात. संबंधित विभागांना सूचना देऊन आयोगाने अशा अवैध प्रकारांना आळा घालण्याचा प्रयत्न केला. राज्य निवडणूक आयोगाने 'कॉप' हे ॲप 'असोसिएशन फॉर डेमोक्रॅटिक रिफॉर्म्स' (एडीआर) या संस्थेच्या मदतीने विकसित केले आहे. त्या 'ॲप'च्या माध्यमातून सर्वसामान्य नागरिक छायाचित्रे किंवा व्हिडीओ पाठवून तक्रारी करू शकतात. तक्रारी करणाऱ्याचे नाव गुप्त ठेवले जाते.

राज्य निवडणूक आयोगाच्या १४ ऑक्टोबर २०१६ रोजीचे आदर्श आचारसंहितेसंदर्भातील आदेश व्यापक आणि तपशीलवार स्वरूपात आहेत. 'काय करावे?' आणि 'काय करू नये' या संदर्भात त्यामध्ये स्पष्ट माहिती दिलेली आहे.

## आचारसंहितेच्या वेळेत बदल

राज्य निवडणूक आयोगाने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केल्यापासून लगेचच संबंधित ठिकाणी आचारसंहिता लागू होते; परंतु अचानक आचारसंहिता लागू झाल्याने पूर्वनियोजित कार्यक्रमावर परिणाम होतो. आयोजकांची धावपळ होते. त्यामुळे निवडणूक कार्यक्रम घोषित केल्यापासून आचारसंहिता लागू करण्याऐवजी कार्यक्रम घोषित केल्यानंतरच्या मध्यरात्रीपासून आचारसंहिता लागू करण्यात यावी, अशी मागणी झाली होती. त्यामुळे सन २०१२मध्ये तसा बदल करण्यात आला होता; परंतु त्यात पुन्हा बदल करून आता निवडणूक कार्यक्रम जाहीर केल्यापासूनच आचारसंहिता लागू होते.

आदर्श आचारसंहितेच्या अंमलबजावणीसाठी राज्य निवडणूक आयोगाच्या वतीने वेळोवेळी किंवा निवडणूक काळात विविध बाबींसंदर्भात सूचना जारी केल्या जातात. काही सूचना उमेदवारांसाठी तसेच राजकीय पक्षांसाठी थेट असतात. सर्वसाधारण वर्तणुकीसाठी दिल्या जाणाऱ्या या सूचना विविध समाजघटकांनाही लागू होतात. सर्वसाधारण वर्तणुकीसंदर्भातील सूचनांचा गोषवारा पुढीलप्रमाणे आहे.

## सर्वसाधारण वर्तणुकीबाबत

- कोणताही पक्ष अथवा उमेदवाराला वेगवेगळ्या जाती आणि धार्मिक किंवा सामाजिक गट यांच्यामध्ये मतभेद होणारी किंवा त्यांच्यामध्ये ज्यामुळे परस्परांमध्ये द्वेष किंवा तणाव निर्माण होईल, अशी कृती करणार नाही. अन्य राजकीय पक्षांवरील टीका पक्षांची धोरणे किंवा कार्यक्रम, त्यांचे पूर्वीचे कार्य यांच्यापुरती मर्यादित असेल. नेत्यांच्या किंवा कार्यकर्त्यांच्या सार्वजनिक कामांशी संबंधित नसलेल्या, खासगी आयुष्याच्या कोणत्याही पैलूवर टीका करण्यापासून पक्ष आणि उमेदवारांनी दूर राहावे.
- बिनबुडाचे आरोप आणि विपर्यस्त माहितीच्या आधारावर पक्ष आणि त्यांचे कार्यकर्ते यांवर टीका केली जाणार नाही. राजकीय पक्ष आणि उमेदवारांना एखाद्या व्यक्तीची राजकीय मते वा कामे कितीही नापसंत असली, तरी शांत आणि स्वस्थ जीवन जगण्याच्या प्रत्येक माणसाच्या अधिकारांचा आदर केला जावा. लोकांच्या मतांचा किंवा त्यांच्या कामांचा निषेध करण्यासाठी त्यांच्या घरासमोर निदर्शने करणे किंवा धरणे देणे या उपायांचा कोणत्याही परिस्थितीत अवलंब केला जाणार नाही.
- मते मिळविण्यासाठी धर्म, जातीवरून आवाहन केले जाणार नाही. कोणत्याही धर्माच्या प्रार्थनास्थळांचा निवडणूक प्रचाराचे व्यासपीठ म्हणून वापर तसेच निवडणूक कामात वापर करता येणार नाही. विशिष्ट जाती व धर्माच्या सभा घेण्यासही मज्जाव आहे. मतदारांना प्रलोभन किंवा धाक दाखविणे, लाच देणे, वस्तूंचे वाटप करणे, मतदारांची तोतयेगिरी, मतदान केंद्राजवळच्या २०० मीटर क्षेत्रामध्ये प्रचार करणे आदी बाबी कारवाईस पात्र आहेत. मतदानापूर्वी जाहीर प्रचार करण्यासंदर्भात तरतुदींचे पालन केले जावे. प्रचार कालावधी संपल्यावर सार्वजनिक सभा घेणे आणि मतदारांना मतदान केंद्रावर ने–आण करण्यासाठी वाहतुकीची व वाहनांची व्यवस्था

करणे भ्रष्टाचाराच्या आणि निवडणूक कायद्यांतर्गत गुन्हा आहे. मुद्रित माध्यमे (प्रिंट मीडिया), सोशल मीडिया, इलेक्ट्रॉनिक माध्यमे यांचा वापर करून प्रलोभन किंवा लाच देता येणार नाही. संपूर्ण आचारसंहितेच्या काळात उमेदवारांनी किंवा त्यांच्या प्रतिनिधींनी मद्याचे वाटप करू नये.

## सत्तारूढ पक्षासाठी आचारसंहिता

निवडणूक आचारसंहितेची अंमलबजावणी करताना सत्तारूढ पक्षासंदर्भात तक्रारींचे प्रमाण तुलनेत अधिक असते. त्या संदर्भातदेखील राज्य निवडणूक आयोगाने वेळोवेळी सूचना जारी केलेल्या आहेत. त्याचा गोषवारा पुढीलप्रमाणे.

- राज्य निवडणूक आयोगाने निवडणुका घोषित केल्यापासून मंत्री अथवा इतर प्राधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची वित्तीय अनुदाने देण्याची किंवा ती देण्याबाबतची अभिवचने घोषित करता कामा नयेत. कोणत्याही प्रकारचे प्रकल्प किंवा योजनांच्या कोनशिला बसवता कामा नयेत. रस्त्यांचे बांधकाम करण्याची किंवा पिण्याच्या पाण्याची सुविधा इत्यादींसाठी तरतूद करण्याबाबत कोणतेही अभिवचन देता कामा नये. शासन, सार्वजनिक उपक्रम तथा स्थानिक स्वराज्य संस्था इत्यादींमध्ये कोणताही नवीन अधिकारी, कर्मचारी यांची नियुक्ती करता कामा नये. तसे केल्यास सत्तारूढ पक्षाच्या बाजूने मतदारांवर प्रभाव पाडल्यासारखे होईल.
- वित्तीय अनुदान किंवा इतर कल्याणकारी योजनांच्या घोषणेसाठीचे मनाई आदेश निवडणुका जाहीर झाल्यानंतर लगेचच लागू होतील. केंद्रातील, राज्यातील आणि स्थानिक स्वराज्य संस्थांमधील सत्तारूढ पक्षांनी निरनिराळ्या प्रकारच्या कल्याणकारी योजना सार्वजनिक पैशांमधून मुद्रित होणाऱ्या किंवा इलेक्ट्रॉनिक माध्यमांद्वारे ठळकपणे निदर्शनास आणून देणे व त्याचा आपल्या पक्षाचा प्रचार करण्यासाठी अधिकारांचा वापर करण्यावर बंदी राहील. जाहीर प्रचाराचा कालावधी संपल्यानंतर इलेक्ट्रॉनिक व प्रिंट मीडियाद्वारे कोणत्याही प्रचारविषयक जाहिराती देता येणार नाहीत. मतदानाच्या आदल्या दिवशी व मतदानाच्या दिवशी वृत्तपत्रांमधून; तसेच अन्य प्रसारमाध्यमांद्वारे प्रचारविषयक कोणत्याही जाहिराती देण्यात येणार नाहीत, ही खबरदारी सर्व उमेदवार व राजकीय पक्षांनी घ्यावी.
- आचारसंहितेच्या कालावधीत धर्म, जात किंवा भाषेच्या आधारे अधिवेशने घेता येणार नाहीत.

## भित्तिपत्रके व फलकांबाबत

निवडणूक प्रचारमोहिमांच्या वेळी राजकीय पक्षांचे व उमेदवारांचे कार्यकर्ते खासगी व सार्वजनिक इमारतींवर निवडणुकीची भित्तिपत्रके चिकटविण्यासाठी किंवा चिन्हे रंगविण्यासाठी भिंतीचा उपयोग करतात. त्यासाठी संबंधित इमारतमालकांची परवानगी घेतली जात नाही. वास्तविक, असे करण्याचे कुठलेही अधिकार राजकीय पक्ष, उमेदवार व त्यांच्या कार्यकर्त्यांना नाहीत. याबाबत सध्या अस्तित्वात असलेल्या सार्वजनिक मालमत्ता नुकसान प्रतिबंध कायदा, १९८४ व खासगी वा सरकारी मालमत्ता विद्रूपन कायदा

१९९६ खाली असलेल्या तरतुदी पुरेशा परिणामकारक आहेत. वरील प्रकारची अनिष्ट कृत्ये करणाऱ्या पक्षांविरुद्ध/व्यक्तींविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात येतात.

पोस्टर, बॅनर इत्यादींबाबत जाहीर प्रचाराचा कालावधी संपेपर्यंतच्या कालावधीसाठी परवानगी देण्यात येते. जाहीर प्रचाराचा कालावधी संपल्यानंतर सदर साहित्य संबंधित उमेदवार किंवा पक्षांनी तत्काळ काढून टाकणे आवश्यक राहील. असे न केल्यास मालमत्ता विद्रूपीकरण कायद्यानुसार गुन्हा दाखल करावा. अशा प्रकारचे प्रचारसाहित्य त्या स्थानिक स्वराज्य संस्थेने काढून टाकावे आणि त्यासाठी येणारा खर्च संबंधित उमेदवाराच्या खर्चातून करावा. राजकीय पक्ष/उमेदवारांनी संबंधितांची लेखी परवानगी न घेता खासगी मालमत्तेवर लावलेली भित्तिपत्रके, घोषणा, निवडणूक चिन्हे, पोस्टर, बॅनर काढून टाकण्याच्या सूचना संबंधितांना द्याव्यात. त्याचे पालन न केल्यास गुन्हे दाखल करण्यात यावे. परवानगीप्राप्त भित्तिपत्रके, पोस्टर, बॅनर आदींचे संरक्षण संबंधित उमेदवार/पक्षाने स्वतः करायचे आहे.

- राज्य निवडणूक आयोगाच्या २३ डिसेंबर २०१२ रोजीच्या आदेशानुसार निवडणूक प्रचारात प्राण्यांचा वापर करण्यास बंदी आहे. प्रचाराच्या मिरवणुका तसेच प्रचाराशी संबंधित कार्यक्रमांमध्ये १४ वर्षांखालील मुलांचा समावेश नसावा.
- मंत्री, राज्यमंत्री, उपमंत्री इत्यादींनी त्यांची नावे ज्या मतदान केंद्रात आहेत, अशा ठिकाणी फक्त मतदानासाठी प्रवेश करावा. अन्य कोणत्याही मतदान केंद्रात त्यांना प्रवेश देऊ नये. अशा केंद्रात भेट देण्याचाही त्यांचा अधिकार नाही.
- राज्य निवडणूक आयोगाच्या २८ ऑगस्ट १९९५च्या आदेशानुसार प्रचारात छापण्यात येणाऱ्या साहित्यावर प्रतींची संख्या, प्रत क्रमांक, मुद्रणालयाचे व प्रकाशकाचे नाव आणि पत्ता असणे आवश्यक आहे. आदेशाचे पालन न झाल्यास प्रेस ॲक्टनुसार कारवाई करता येते.
- प्रचारफेऱ्या किंवा मिरवणुकांमध्ये किती वाहने वापरावीत, याबाबत राज्य निवडणूक आयोगाने १९ ऑक्टोबर २००६ अन्वये आदेश दिले आहेत. त्यानुसार महानगरपालिका, नगरपरिषद, नगरपंचायत, जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीसाठी जास्तीत जास्त तीन वाहने वापरता येतील. ग्रामपंचायत निवडणुकांसाठी जास्तीत जास्त एक वाहन वापरता येईल. या मर्यादेपेक्षा अधिक वाहने आढळल्यास प्रचारफेरी किंवा मिरवणुकीची परवानगी तत्काळ रद्द करावी.
- आयोगाने उमेदवाराच्या निवडणूक खर्चाची मर्यादा निश्चित केली आहे. उमेदवाराने उघडलेल्या सर्व प्रचार कार्यालयांचा खर्च त्याच्या निवडणूक खर्चात समाविष्ट होतो. प्रचार कार्यालयांना परवानगी देताना सर्व उमेदवारांना समान तत्त्वानुसार परवानगी द्यावी. महानगरपालिका आयुक्त अथवा जिल्हाधिकारी आणि पोलीस यंत्रणा यांनी सुरक्षेचा मुद्दा ध्यानात घेऊन नागरिकांची गैरसोय होणार नाही, याची खबरदारी घेऊन प्रचार कार्यालयांना परवानगी देणे आवश्यक आहे.
- उमेदवारी अर्ज दाखल करताना निवडणूक निर्णय

अधिकारी यांच्या कार्यालयाच्या आवारात फक्त चार व्यक्तींना परवानगी द्यावी. उमेदवार मिरवणुकीने येत असल्यास निवडणूक निर्णय अधिकाऱ्याच्या कार्यालयापासून १०० मीटर आधी मिरवणूक थांबवावी.

## सभेसाठी परवानगी आवश्यक

सभेच्या परवानगीबाबत पोलिसांना वाहतुकीचे नियंत्रण करणे व शांतता आणि सुव्यवस्था राखणे शक्य व्हावे, यासाठी पक्ष किंवा उमेदवारास, कोणत्याही प्रस्तावित सभेची जागा आणि वेळ त्यांना ४८ तास अगोदर कळविणे बंधनकारक आहे. सभेसाठी प्रस्तावित केलेल्या जागेत कोणतेही निर्बंधक किंवा प्रतिबंधक आदेश जारी केलेले आहेत किंवा कसे, याबद्दल पक्ष किंवा उमेदवारांनी खात्री करून घ्यायची आहे. अशा आदेशांमधून काही सूट हवी असल्यास, त्यासाठी अर्ज करावा लागतो. सभेची परवानगी देताना सर्वांना समान संधी मिळावी आणि प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य (FIRST COME FIRST SERVED) या तत्त्वाचा अवलंब करावा.

ध्वनिक्षेपकाचा वापर करण्यासाठी किंवा प्रस्तावित सभेच्या संदर्भात इतर कोणत्याही सुविधेसाठी परवानगी किंवा लायसन्स मिळवायचे असल्यास पक्ष किंवा संबंधित प्राधिकाऱ्याकडे ४८ तास अगोदर अर्ज करून परवानगी किंवा लायसन्स प्राप्त करावे लागते. या बाबतीत ध्वनिप्रदूषण प्रतिबंधक नियम २०००ची अंमलबजावणी बंधनकारक राहील.

- आपले समर्थक, इतर पक्षांनी आयोजित केलेल्या सभा किंवा मिरवणुका यामध्ये अडथळा निर्माण करीत नाहीत किंवा त्या उधळून लावीत नाहीत, याची राजकीय पक्षांनी आणि उमेदवारांनी दक्षता घ्यावी. एका राजकीय पक्षाचे कार्यकर्ते आणि समर्थक, दुसऱ्या पक्षाने आयोजित केलेल्या सार्वजनिक सभांमध्ये तोंडी किंवा लेखी प्रश्न विचारून किंवा स्वतःच्या पक्षाची पत्रके वाटून अडथळा निर्माण करणार नाहीत. एक पक्ष सभा घेत असेल अशा ठिकाणी दुसरा पक्ष मिरवणूक घेऊन जाणार नाही. एका पक्षाने लावलेली भित्तिपत्रके दुसऱ्या पक्षाचे कार्यकर्ते काढणार नाहीत. सभेत अडथळा उत्पन्न करणाऱ्या किंवा इतर मार्गांनी गोंधळ माजविणाऱ्या व्यक्तींचा बंदोबस्त करण्याकरिता सभेचे आयोजक स्वतः अशा व्यक्तींविरुद्ध कारवाई करणार नाहीत; तथापि कर्तव्यार्थ असलेल्या पोलिसांची मदत घेऊ शकतात.

## मिरवणुकीबाबत नियमन

- पक्ष किंवा उमेदवार, मिरवणूक सुरू होईल ती वेळ किंवा आणि ती जेथून जाईल तो मार्ग आणि मिरवणूक संपेल ती वेळ व जागा अगोदर निश्चित करील. कार्यक्रमांमध्ये सहसा बदल चालत नाहीत. कार्यक्रमाच्या वेळी स्थानिक पोलिस प्राधिकाऱ्यांनी आवश्यक ती व्यवस्था करावी, यासाठी आयोजक त्यांना कार्यक्रमासंबंधी सर्व माहिती आगाऊ पुरवतील. मिरवणूक जेथून जाणार आहे, त्या भागात काही निर्बंधक आदेश जारी असतील तर आयोजक त्याबद्दल खातरजमा करून घेतील आणि सक्षम प्राधिकाऱ्यांनी त्यामधून मुद्दाम सूट दिली नसल्यास त्या निर्बंधांचे अनुपालन करतील.

वाहतुकीच्या विनियमांचे आणि निर्बंधांचेही काळजीपूर्वक पालन केले जाईल.

- वाहतुकीची कोंडी होऊ नये किंवा तिला अडथळा होऊ नये अशा रीतीने मिरवणूक नेण्याची व्यवस्था करण्यासाठी आयोजक आगाऊ उपाययोजना करतील. मिरवणूक जर खूप लांब असेल तर तिचे सोयीस्कर आकाराच्या तुकड्यांमध्ये विभाजन केले जाईल. त्यामुळे वाहतुकीची कोंडी टाळता येईल. मिरवणुकीदरम्यान पोलिसांचे निर्देश पाळणे बंधनकारक आहे.
- दोन किंवा त्यापेक्षा अधिक राजकीय पक्ष एकाच मार्गावरून किंवा त्याच्या भागांवरून साधारणपणे एकाच वेळी मिरवणूक नेणार असतील तर या मिरवणुका एकमेकांसमोर येणार नाहीत, याची दक्षता घेतली पाहिजे. यासाठी पोलिसांची मदत घेता येईल.
- मिरवणुकीत धारदार वस्तू, शस्त्रे किंवा विस्फोटक साहित्य जवळ बाळगता येणार नाहीत. बाळगलेले आढळल्यास ते जप्त करण्यात येईल व कायद्यानुसार कारवाई करण्यात येईल.
- इतर राजकीय पक्षांचे, सदस्यांचे किंवा त्यांच्या नेतृत्वाचे प्रतिनिधित्व करीत असल्याचे समजल्या जाणाऱ्या त्यांच्या प्रतिकृती घेऊन जाणे, त्यांचे जाहीरपणे दहन करणे हे आणि तत्सम निदर्शनांचे प्रकार कोणत्याही पक्षाकडून किंवा उमेदवारांकडून चालवून घेतले जाणार नाहीत.
- प्रचारफेरी किंवा प्रचार मिरवणुकीत महानगरपालिका, नगरपरिषदा, नगरपंचायती, जिल्हा परिषदा व पंचायत समित्या यांच्या क्षेत्रामध्ये जास्तीत जास्त ३ वाहनांचा समावेश करण्यात येईल. ही प्रचार फेरी अथवा मिरवणूक जर एकाच उमेदवाराची असेल, तर त्या उमेदवाराने त्या प्रचारफेरीचा खर्च आपल्या खर्चात समाविष्ट केला पाहिजे. जर प्रचारफेरी पक्षातर्फे अथवा आघाडीतर्फे काढण्यात आली असेल, तर ती प्रचारफेरी अथवा मिरवणूक ज्या प्रभागांमधून जाईल त्या सर्व प्रभागांमधील त्या पक्षाच्या किंवा आघाडीच्या उमेदवारांमध्ये तो खर्च विभागून दाखविण्यात येईल.

## मतदानाचा दिवस

- उमेदवारांनी मतदारांना पुरविलेल्या ओळखचिठ्ठ्या स्वच्छ पांढऱ्या कागदाच्या असल्या पाहिजेत व त्यावर कोणतेही चिन्ह, उमेदवाराचे नाव किंवा पक्षाचे नाव नाही, याची खातरजमा करावी.
- चिठ्ठीवाटपासाठीचे टेबल मतदान केंद्रापासून २०० मीटर लांब असावे. या टेबलाजवळ विनाकारण गर्दी नसावी. या टेबलाजवळ कोणतेही भित्तिपत्रक, ध्वज, चिन्हे किंवा इतर प्रचार साहित्य लावलेले नसावे. तेथे कोणत्याही खाद्यवस्तूंचे वाटप केले जाणार नाही किंवा गर्दी होईल अशी कोणतीही कृती केली जाणार नाही.
- मतदानाच्या दिवशी वाहनांच्या वापराबाबत राज्य निवडणूक आयोगाने ६ जानेवारी १९९८ रोजी दिलेल्या आदेशान्वये दिलेल्या निर्बंधांचे अनुपालन करावे. सर्व पक्षांचे उमेदवार व कार्यकर्ते संबंधित निवडणूक प्राधिकाऱ्यांना सहकार्य करतील आणि वाहने चालविताना त्यासाठी आवश्यक परवाने मिळवून ते त्या वाहनांच्या दर्शनी भागावर ठळकपणे लावले

जातील. मतदानाच्या दिवशी प्रत्येक उमेदवारास स्वतःच्या किंवा निवडणूक प्रतिनिधीच्या वापरासाठी दोन वाहने वापरण्याचा अधिकार असेल. ही वाहने त्याच्या मतदारसंघातच वापरता येतील.

- निवडणूक चिन्ह, पक्षाचे/उमेदवाराचे नाव असलेले कोणतेही प्रचारसाहित्य उदा. चिन्ह छपाई केलेले टी-शर्ट, टोप्या, उपरणे तसेच छापील चिठ्ठ्या इ. मतदानाच्या दिवशी मतदान केंद्रांमध्ये आणता येणार नाही.
- उमेदवार किंवा त्याच्या निवडणूक प्रतिनिधीला मतदान निरीक्षणासाठी मतदान केंद्राच्या आत तीन मतदारांचे मतदान होईपर्यंतच थांबता येईल. त्यानंतर उमेदवाराने मतदान केंद्राच्या बाहेर पडणे अपेक्षित असेल. या सूचनांचा भंग करणाऱ्या उमेदवारास/उमेदवाराच्या प्रतिनिधीस पोलिसांमार्फत त्या परिसरातून किंवा क्षेत्राच्या बाहेर काढण्यात यावे. उमेदवारास अथवा उमेदवाराच्या निवडणूक प्रतिनिधीस एका केंद्रामध्ये संपूर्ण मतदानाच्या कालावधीत जास्तीत जास्त तीन वेळा जाता येईल.

## वाहनांचा वापर

- कोणत्याही उमेदवारास अथवा पक्षाला मतदारांची ने-आण करण्यासाठी वाहनाचा वापर करता येणार नाही. असे वाहन आढळल्यास पोलिसांनी ते तत्काळ ताब्यात घ्यावे व नियमानुसार योग्य ती कारवाई करावी. सर्व प्रकारच्या वाहनांच्या रहदारीवर बंदी घालून जनतेला गैरसोय होईल, असा निवडणूक आयोगाचा हेतू नाही.

अ) खासगी वाहनांच्या मालकांना त्यांच्या स्वतःच्या खासगी वापरासाठी वापरण्यात येणारी खासगी वाहने, परंतु निवडणुकीच्या कामाशी त्यांचा कोणताही संबंध नसावा.

ब) खासगी वाहनांच्या मालकांना त्यांच्या स्वतःसाठी किंवा त्यांच्या स्वतःच्या कुटुंबातील व्यक्तीसाठी मतदानाचा हक्क बजावता येण्याकरिता मतदान केंद्रावर जाण्यासाठी खासगी वाहने वापरता येतील. परंतु मतदान केंद्रापासून २०० मीटर त्रिज्येच्या आत अशी वाहने नेता येणार नाहीत.

क) रुग्णालयातील वाहने, रुग्णवाहिका, दूधगाड्या, वॉटर टँकर, तातडीच्या वीजपुरवठ्याची वाहने, कामावर असलेल्या पोलिसांची वाहने, निवडणुकीच्या कामावर असलेल्या अधिकाऱ्यांची वाहने यासारख्या अत्यावश्यक सेवांसाठी वापरण्यात येणारी वाहने.

ड) ठरावीक थांब्यावरून व ठरावीक मार्गांनी चालविण्यात येणाऱ्या सार्वजनिक परिवहन सेवेच्या बसगाड्या.

ई) विमानतळ, रेल्वे स्टेशन, आंतरराज्यीय बस स्थानक, इस्पितळ येथे येण्या-जाण्यासाठीचा जो प्रवास अनिवार्य ठरत असेल त्यासाठी टॅक्सी, तीन चाकी स्कूटर, रिक्षा इत्यादींचा वापर.

फ) आजारी किंवा विकलांग व्यक्ती यांनी स्वतःच्या उपयोगासाठी केलेला खासगी वाहनांचा वापर.

## वाहनांच्या गैरवापराबाबत

अनिष्ट/अवैध कृत्यांना पायबंद घालण्यासाठी निवडणूक लढविणारे उमेदवार व त्यांचे इतर पक्ष यांच्यासोबतच्या व्यक्तीकडून वापरण्यात येणाऱ्या वाहनांनी बेकायदेशीर दारूगोळा व शस्त्रास्त्रे वाहून नेणे यासारख्या गुन्हेगारी कृत्यांसह कोणत्याही संभाव्य अपकृत्यांवर जिल्हा प्रशासनाने बारीक लक्ष ठेवले पाहिजे. जर या वाहनांपैकी एकतर पक्षाची किंवा खासगी मालकीची वाहने, अशा कोणत्याही कृत्यामध्ये किंवा मतदारांच्या मनात धाकदपटशा दाखविण्यासाठी किंवा दहशत निर्माण करण्याच्या हेतूने समाजविघातक व्यक्तीची ने-आण करण्यासाठी वापरत असल्याचे दिसून आल्यास अशी वाहने अटकावून ठेवणे आणि निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत त्यांना मुक्त न करणे, हे स्थानिक प्रशासनाचे कर्तव्य असेल. याशिवाय, जे अशा अवैध कृत्यांमध्ये गुंतलेले आहेत असे वाहनांचे मालक, वहिवाटदार आणि उमेदवार/राजकीय पक्ष यांच्या विरुद्धदेखील कायद्यानुसार फौजदारी कारवाई करण्यात येईल.

## सणांच्या काळातील आचरण

आचारसंहितेच्या कालावधीत काही सण व उत्सव येतात. या सण-उत्सवांच्या कालावधीत बरेच सार्वजनिक कार्यक्रम आयोजित करण्यात येतात. महाराष्ट्रात बहुतेक सण/उत्सव सर्वच गावांमधून सार्वजनिकरीत्या आयोजित करण्यात येतात. या वेळी भोजनावळी घातल्या जातात. अशा स्वरूपाच्या कार्यक्रमांमुळे आचारसंहितेला बाधा येऊ शकते काय, अशी विचारणा वेगवेगळ्या स्थानिक स्वराज्य संस्थांकडून करण्यात येते. सर्व बाबींचा विचार करून व सामाजिक सलोखा लक्षात ठेवून विशेष बाब म्हणून राज्य निवडणूक आयोगाने या कार्यक्रमांबद्दल पुढीलप्रमाणे मार्गदर्शक तत्त्वे ठरवून दिली आहेत.

१) राजकीय पक्षाचे नेते, उमेदवार, कार्यकर्ते या सण/उत्सवाच्या कार्यक्रमामध्ये व्यक्तिगतरीत्या सहभागी होऊ शकतात.

२) सण/उत्सवाच्या एखाद्या मंडळाचे विश्वस्त किंवा पदाधिकारी, उमेदवार म्हणून एखादी राजकीय व्यक्ती असल्यास तिचे नाव कार्यक्रम पत्रिकेवर असू शकते; परंतु तेथे ते कुठल्या पक्षाशी संबंधित आहेत किंवा कुठल्या प्रभागातील उमेदवार आहेत, याचा उल्लेख नसावा.

३) या सणांमध्ये कोणत्याही राजकीय नेत्याचा/उमेदवाराचा सत्कार आयोजित करण्यात येऊ नये.

४) या सण/उत्सवाच्या निमित्ताने कोणत्याही राजकीय नेत्याने अथवा उमेदवाराने कोणत्याही वस्तूंचे वाटप करू नये अथवा त्यासाठी कुठल्याही सार्वजनिक मंडळाचा आधार घेऊ नये. ज्या स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये सार्वत्रिक निवडणुका आहेत, तेथे संपूर्ण स्थानिक स्वराज्य संस्थेच्या क्षेत्रासाठी या सूचना लागू राहतील.

५) सण/उत्सवानिमित्त लावण्यात आलेल्या पोस्टर, बॅनरवर उमेदवारांचा फोटो असू शकेल; तथापि त्या

बॅनर– पोस्टरवर प्रचाराचा उल्लेख असू नये.

६) निवडणूक आचारसंहिता कालावधीमध्ये भोजनावळ/ जेवणाच्या कार्यक्रमाचे आयोजन करू नये.

## खर्चाचा हिशेब सादर करण्याबाबत

नामनिर्देशपत्र भरल्यापासून ते मतमोजणीपर्यंतच्या कालावधीत प्रत्येक उमेदवाराने निवडणुकीवर किती खर्च करावा, यासाठी आयोगाने मर्यादा घालून दिलेली आहे. उमेदवारांनी निवडणूक खर्च करण्याकरिता स्वतंत्र बँक खाते उघडून निवडणुकीचा खर्च त्या बँक खात्यामार्फत करणे आवश्यक आहे. तसेच, दररोजच्या खर्चाचा हिशेब निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे दुसऱ्या दिवशी दुपारी दोन वाजेपर्यंत उमेदवाराने देणे आवश्यक आहे. तसेच, निवडणुका पार पडल्यानंतर विहित कालावधीत सदर हिशेब व त्याबाबतचे शपथपत्र संबंधित अधिकाऱ्यांकडे सादर करणे आवश्यक आहे. या संदर्भात नियमांचे पालन न करणाऱ्या उमेदवारांवर भारतीय दंड संहितेच्या कलम १७१ आय नुसार कार्यवाही करण्यात यावी. तसेच, जे उमेदवार राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्र. एसईसी/१०९५/१०१/डेस्क–३, दिनांक ७ फेब्रुवारी १९९५ व नंतरच्या आदेशानुसार विहित केलेल्या रीतीने खर्चाचा हिशेब सादर करणार नाहीत अथवा राज्य निवडणूक आयोगाने वेळोवेळी विहित केलेल्या मर्यादेत खर्च करणार नाहीत, असे उमेदवार अधिनियमातील तरतुदीनुसार अनर्हतेस पात्र आहेत. त्यामुळे या संदर्भातील सूचनांचे पालन काटेकोरपणे होणे आवश्यक आहे.

राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्र. रानिआ/मनपा/२००६/प्र.क्र.१७/का.५, दिनांक २८ डिसेंबर २००६च्या आदेशानुसार पक्षाने निवडणुकांकरिता केलेला खर्च त्या पक्षाच्या उमेदवारांमध्ये विभागून दाखवायचा आहे. तसेच, या आदेशान्वये विहित करण्यात आल्याप्रमाणे पक्षाने आचारसंहिता सुरू झाल्यापासून ठरावीक कालावधीत हा खर्च संबंधित निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांना सादर करायचा आहे. राज्य निवडणूक आयोगाच्या दि. ०८.११.२०११च्या आदेशानुसार स्टार प्रचारकांच्या प्रवास खर्चाला उमेदवाराच्या खर्चात समाविष्ट करण्यापासून सूट आहे. मात्र, त्यांनी घेतलेल्या सभेतील इतर खर्चाचा समावेश उमेदवाराच्या निवडणूक खर्चात करणे आवश्यक राहील.

## स्वेच्छा निधीचा वापर

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कार्यक्षेत्रात निवडणुकीच्या तोंडावर स्वेच्छा निधीतून (Discretionary Fund) खर्च न करण्यासंदर्भात राज्य निवडणूक आयोगाने ०५ ऑक्टोबर २०१६ रोजी आदेश निर्गमित केला आहे. या आदेशान्वये स्थानिक स्वराज्य संस्थेची मुदत संपण्याच्या तीन महिने आधीपासून किंवा निवडणूक कार्यक्रम जाहीर झाल्यापासून, यापैकी जे आधी घडेल त्या दिनांकापासून संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेच्या क्षेत्रात लोकप्रतिनिधींना आपल्या स्वेच्छा निधीतून खर्च करता येत नाही.

भारत सरकारच्या दि. २८ ऑगस्ट १९६९च्या मार्गदर्शक सूचना आणि त्यावरील उच्च न्यायालयाचे आदेश लक्षात घेऊन हे निर्बंध घालण्यात आले आहेत. स्वेच्छा

निधीचा निवडणुकीच्या पूर्वसंध्येस वापर करून मतदारांवर प्रभाव टाकण्याच्या प्रकारांना आळा घालण्यासाठी ही उपाययोजना केली आहे. संबंधित ठिकाणी स्वेच्छा निधी खर्च करण्याचे निर्बंध लागू होणाऱ्या दिनांकाबाबतचे आदेश संबंधित जिल्हाधिकारी आणि महानगरपालिका आयुक्तांनी निर्गमित करावे, असे आदेशात नमूद केले आहे. निर्बंध लागू झाल्यानंतर कोणत्याही लोकप्रतिनिधींना स्वेच्छा निधीतून करायच्या कामाचे प्रस्ताव संबंधित अधिकाऱ्यांकडे सादर करता येत नाहीत. निर्बंधाच्या दिनांकापूर्वी प्रस्ताव मंजूर असला आणि प्रत्यक्ष कामास सुरुवात झाली नसल्यास कार्यारंभ आदेश देता येणार नाही किंवा कामास सुरुवात करता येत नाही. निर्बंधाच्या दिनांकापूर्वी कामास सुरुवात झाली असल्यास ते काम पुढे सुरू ठेवता येते. निर्बंध न पाळल्यास कामास स्थगिती देणे व संबंधित अधिकाऱ्यावर कार्यवाही करणे अशा स्वरूपाच्या तरतुदी या आदेशात केल्या आहेत.

## शासनासंबंधी

- आचारसंहितेच्या कालावधीत कोणतेही धोरणात्मक निर्णय घेता येणार नाहीत. या संदर्भातील कोणत्याही स्वरूपाचा प्रस्ताव राज्य निवडणूक आयोगाकडे पाठविण्यात येऊ नये. निवडणुका जाहीर करतेवेळी जी कामे प्रत्यक्ष सुरू असतील, ती तशीच पुढे चालू ठेवता येतील.
- दुष्काळ, पाणीटंचाई, इतर नैसर्गिक आपत्ती, गंभीररीत्या आजारी (मरणासन्न) असलेल्यांना मदत करणे व सुरू असलेल्या योजना पुढे चालू ठेवता येतील. आचारसंहिता असल्याने एखाद्या ठिकाणी दुष्काळ असेल अथवा पाणीटंचाई असेल तर ती दूर करण्याबाबत कार्यवाही करू नये, असा आचारसंहितेचा अर्थ होत नाही. त्यामुळे दुष्काळ, पाणीटंचाई व नैसर्गिक आपत्ती निवारणासाठी कामे करण्यास बंदी असणार नाही.
- स्थानिक स्वराज्य संस्थांमधील पोटनिवडणुकांच्या वेळी ज्या कामांसाठी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या अर्थसंकल्पामध्ये तरतूद असेल व जे काम एखाद्या विशिष्ट भागाशी संबंधित नसेल, असे कोणतेही काम हाती घेण्यास बंदी राहणार नाही.
- आचारसंहितेच्या काळात निवडणुकांशी संबंधित अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या बदल्या करता येणार नाहीत. जर अशा बदल्या करणे आवश्यक असल्यास त्याला राज्य निवडणूक आयोगाची पूर्वपरवानगी आवश्यक असेल. या संदर्भात राज्य निवडणूक आयोगाचा ५ मार्च १९९५ रोजीचा आदेश लागू राहील. निवडणुकांशी संबंधित अधिकारी/कर्मचारी यांमध्ये संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांमधील अधिकारी/कर्मचारी, महानगरपालिका आयुक्त, मुख्याधिकारी, नगरपरिषद/नगरपंचायत, पोलिस आयुक्त, पोलिस अधीक्षक व इतर पोलिस अधिकारी वा निवडणुकीशी संबंधित इतर अधिकारी जसे जिल्हाधिकारी, उपजिल्हाधिकारी, तहसीलदार इत्यादी यांचाही समावेश होतो.
- आचारसंहितेच्या कालावधीमध्ये शासन सेवेत तसेच निमसरकारी संस्था, शासकीय मंडळे/महामंडळे सार्वजनिक उपक्रम इ. संस्थांमध्ये भरती करण्याच्या दृष्टीने जाहिरात देणे, मुलाखत घेणे इ. करण्यात येऊ

नये. आचारसंहिता लागू होण्यापूर्वीच पत्र पाठविले असल्यास लेखी परीक्षा घेण्यास हरकत नाही. तथापि, त्याचा निकाल जाहीर करता येणार नाही. तसेच मुलाखती व प्रत्यक्ष नेमणुका याबाबतची कार्यवाही आचारसंहिता कालावधीत करता येणार नाही. महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत करण्यात येणाऱ्या सेवा भरतीसाठी ही अट लागू असणार नाही.

- स्थानिक स्वराज्य संस्थेमधील सर्वसाधारण सभा, विविध समित्यांच्या कायद्यानुसार घेणे बंधनकारक आहेत, अशा बैठका घेता येतील. परंतु नेमणुका, अनुदान, कर्ज अथवा आर्थिक साहाय्य मंजूर किंवा अदा करण्यात येणार नाही. कोणत्याही नवीन कामास मंजुरी देता येणार नाही. तसेच, मतदारांवर कोणत्याही प्रकारे प्रभाव पडेल असे कोणतेही धोरणात्मक निर्णय घेता येणार नाहीत.
- आचारसंहिता लागू असलेल्या क्षेत्रामध्ये नियोजन समितीची व अन्य समित्यांची बैठक घेता येत नाही. तसेच, त्या क्षेत्राकरिता कोणतीही नवीन योजना जाहीर करता येत नाही. मात्र दुष्काळ, पाणीटंचाई अथवा नैसर्गिक आपत्ती दूर करण्यासंदर्भात आवश्यक कार्यवाही करता येते. या संदर्भात राज्य निवडणूक आयोगाने २१ ऑगस्ट २०१२ रोजी सविस्तर आदेश जारी केलेले आहेत. अशा नियोजन समिती व अन्य समित्या, ज्यांचे अध्यक्ष/पदाधिकारी लाभाचे पद धारण करणारे असतील त्यांनादेखील हे आदेश लागू राहतील. ज्या समित्यांचे अध्यक्षपद जिल्हाधिकारी अथवा अन्य शासकीय अधिकाऱ्याकडे असेल त्यांना हे आदेश लागू राहणार नाहीत. मात्र, अशा समित्यांच्या बैठकांकरिता लाभाचे पद धारण करणाऱ्या पदाधिकाऱ्यांना बोलावता येणार नाही.
- आचारसंहितेच्या कालावधीत लोकशाही दिन साजरा करण्याबाबत : स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणूक आचारसंहितेच्या कालावधीत लोकशाही दिन साजरा करावयाचा झाल्यास त्यामध्ये लोकांकडून नेमणुका, अनुदान, आर्थिक कर्ज किंवा आर्थिक साहाय्य याबाबत प्रस्ताव स्वीकारता येत नाहीत. तसेच, मतदारांवर प्रभाव पडेल असे कोणतेही निर्णय घेता येत नाहीत. लाभाचे पद धारण करणाऱ्यांनी आचारसंहितेच्या कालावधीमध्ये लोकशाही दिन साजरा करू नये.
- निवडणुका जाहीर झाल्यानंतर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या क्षेत्रामध्ये स्थानिक स्वराज्य संस्था अथवा राज्य शासनाच्या/केंद्र शासनाच्या खर्चाने पूर्ण झालेल्या कामांचे भूमिपूजन व उद्‌घाटन, समारंभ इत्यादी आयोजित करता येणार नाही. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या किंवा केंद्र शासनाच्या किंवा केंद्र शासन व राज्य शासन यांच्या अधिपत्याखालील महामंडळाच्या अथवा स्वायत्त संस्थेच्या खर्चातून पूर्ण झालेल्या कामांचा उपयोग जनतेसाठी तत्काळ व्हावा, या दृष्टीने समारंभ आयोजित न करतादेखील पूर्ण झालेली कामे सक्षम अधिकाऱ्यांचे पूर्णता प्रमाणपत्र घेऊन जनतेच्या उपयोगासाठी खुली/सुरू करता येतील. यामध्ये राजकीय व्यक्ती, उमेदवार यांना सहभागी करून घेता येणार नाही. आचारसंहिता एका विशिष्ट क्षेत्रापुरती (जिल्ह्यापुरती किंवा नगरपरिषद क्षेत्रापुरती) मर्यादित

असली, तरी आजूबाजूच्या क्षेत्रात अथवा संपूर्ण राज्यामध्ये आचारसंहितेच्या कालावधीत मतदारांवर प्रभाव पडू शकेल असे कार्यक्रम आयोजित करता येणार नाहीत.

- केंद्रीय मंत्री, राज्याचे मंत्री, लाभाचे पद धारण करणारे अन्य पदाधिकारी, आचारसंहिता कालावधीत जर आचारसंहिता लागू असलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या क्षेत्रात शासकीय दौऱ्यावर येणार असतील तर त्यांच्या खासगी सचिवाने असा दौरा का आवश्यक आहे, या स्पष्टीकरणासह महानगरपालिका निवडणुकांच्या बाबतीत महानगरपालिका आयुक्तांना व इतर सर्व निवडणुकांच्या बाबतीत संबंधित जिल्हाधिकाऱ्यांना किमान दोन दिवस आधी कळविले पाहिजे. अशा दौऱ्याला जोडून कोणताही खासगी किंवा प्रचाराचा कार्यक्रम ठेवता येणार नाही. आचारसंहितेच्या कालावधीमध्ये विश्रामगृहाचे वाटप करण्याचे अधिकार संबंधित जिल्हाधिकारी यांच्याकडे राहतील. विश्राम भवन कसे द्यावे, या संदर्भात पुढीलप्रमाणे कार्यपद्धती अवलंबिण्यात यावी.

**अ)** आचारसंहितेच्या कालावधीमध्ये शासकीय विश्रामगृह, निवडणूक कर्तव्यार्थ असलेले राज्य निवडणूक आयोगातील अधिकारी/कर्मचारी तसेच निवडणुकीशी संबंधित अधिकारी व कर्मचारी यांना सर्वोच्च प्राधान्याने उपलब्ध करून देणे आवश्यक आहे.

**ब**) केंद्राच्या तसेच राज्य शासनाच्या मंत्र्यांना विश्राम भवन देण्यास हरकत नाही. तथापि, मंत्र्यांना आपल्या शासकीय कामकाजासाठी काढलेल्या दौऱ्याची निवडणुकीच्या कामकाजाशी सांगड घालू नये आणि निवडणुकीच्या कामाच्या वेळी सरकारी यंत्रणा व कर्मचारी वर्ग यांचा वापर करू नये. विश्राम भवनाचा वापर फक्त सत्ताधारी पक्ष किंवा त्यांच्या उमेदवारांसाठी असू नये. अशा निवासी व्यवस्थेचा वापर इतर पक्षांना किंवा उमेदवारांनाही न्याय्य पद्धतीने उपलब्ध करून देण्यात यावा. मात्र, कोणत्याही पक्षाला किंवा उमेदवाराला विश्राम भवन, विश्रामगृहे अथवा अन्य कोणत्याही शासकीय/निमशासकीय संस्थांच्या इमारतीचा अथवा आवाराचा निवडणुकीच्या मोहिमेसाठी, उमेदवारांच्या मुलाखतीसाठी, बैठकीसाठी अथवा प्रचारासाठी किंवा निवडणुकीशी संबंधित पत्रकार परिषदेसाठी वापर करता येणार नाही. तसा वापर झाल्याचे निदर्शनास आल्यास अथवा कोणी निदर्शनास आणून दिल्यास महानगरपालिका आयुक्त अथवा जिल्हाधिकारी यांनी तत्काळ कार्यवाही करावी व असे प्रकार तत्काळ थांबविण्यात यावेत.

**क)** आचारसंहितेच्या कालावधीत राज्य निवडणूक आयोगाचे अधिकारी/कर्मचारी यांनी निवडणुकीच्या कामासाठी जर विश्रामगृहात आरक्षण केले असेल, तर कुठल्याही परिस्थितीत ते रद्द करता येणार नाही. निवडणुकीच्या प्रचाराचा कालावधी संपल्यानंतर ते निकाल लागेपर्यंत कोणत्याही राजकीय व्यक्तीस/नेत्यास

विश्रामगृहाचा वापर करता येणार नाही. राजकीय नेत्यांमध्ये मंत्री, राज्यमंत्री तसेच लाभाचे पद धारण करणारे पदाधिकारी यांचाही समावेश होतो.

- स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूक आचारसंहितेच्या कालावधीत महानगरपालिका आयुक्त, जिल्हाधिकारी व इतर शासकीय अधिकारी अथवा इतर स्थानिक स्वराज्य संस्थेचे अधिकारी यांच्याकडून दौऱ्यावर असलेले मंत्री, लाभाचे पद धारण करणारे इतर पदाधिकारी यांना डी.व्ही. कार देता येणार नाही. निवडणुकीच्या काळात प्रचार मोहीम, निवडणूक कार्य किंवा निवडणुकीशी संबंधित प्रचार करण्यासाठी शासकीय वाहनांचा वापर होणार नाही, याची दक्षता घ्यायची आहे. शासकीय वाहनांमध्ये केंद्र शासन, राज्य शासन, केंद्र व राज्य शासनाचे सार्वजनिक उपक्रम, केंद्र व राज्य शासनाचे संयुक्त क्षेत्र उपक्रम, स्थानिक संस्था, महानगरपालिका, नगरपरिषदा, नगरपंचायती, पणन मंडळे, सहकारी संस्था, जिल्हा परिषदा, अथवा पंचायत समित्या, महामंडळे, स्वायत्त संस्था ज्यामध्ये जनतेच्या पैशांची गुंतवणूक आहे, अशा अन्य कोणत्याही संस्था यांच्या वाहनांचा वापर करता येणार नाही.
- ज्या पदाधिकाऱ्यांना वाहनांच्या वापराची परवानगी असते अशा पदाधिकाऱ्यांना आचारसंहितेच्या काळात फक्त शासकीय कामासाठी निवासस्थान ते शासकीय कार्यालयांपर्यंत, एवढ्याच वापराची परवानगी असेल. पदाधिकाऱ्यांकडून शासकीय वाहन इतर कोणत्याही कामासाठी वापर करणार नाही, याची लेखी हमी घेण्यात यावी. मात्र, याचा अर्थ असा नाही, की सदर पदाधिकाऱ्यांची वाहने निवडणुकांच्या कामाकरिता महानगरपालिका आयुक्त अथवा संबंधित जिल्हाधिकारी यांना अधिग्रहित करता येणार नाहीत. आचारसंहितेची सुरुवात झाल्यापासून सहकारी संस्था, पणन मंडळे, शैक्षणिक संस्था, महामंडळे, स्वायत्त संस्था इत्यादींचीही वाहने वापरावर बंदी असेल. अशा बंदीचे उल्लंघन होताना आढळल्यास ते वाहन ताब्यात घेण्याचा अधिकार संबंधित जिल्हाधिकारी/महानगरपालिका आयुक्त यांना असेल.
- शासकीय वाहनांचा निवडणूक प्रचाराकामी गैरवापर झाल्याचे आढळून आल्यास वाहन ज्या शासकीय विभागप्रमुखांच्या अखत्यारीत आहे ते व्यक्तिशः जबाबदार राहतील व त्यांच्याविरुद्ध कायदेशीर कारवाई करावी.
- आचारसंहितेच्या कालावधीत केंद्र शासनाची, राज्य शासनाची वा इतर सार्वजनिक उपक्रमाची विमान किंवा हेलिकॉप्टर प्रचार दौऱ्याकरिता राजकीय नेत्यांनी वापरण्यावर पूर्णपणे बंदी असेल. राजकीय नेते यामध्ये मंत्र्यांचाही समावेश होतो. भारताचे पंतप्रधान मात्र शासकीय विमानाने अथवा हेलिकॉप्टरने प्रवास करू शकतील. सरकारी ब्लू पुस्तकामध्ये ज्या सुरक्षा आवश्यकता पंतप्रधानांसाठी निश्चित केलेल्या आहेत त्या त्यांना लागू राहतील. तसेच, ज्या व्यक्तींना 'झेड प्लस' सुविधा पुरविण्यात आली आहे अशा व्यक्तींच्या बाबतीत भारत निवडणूक आयोगाच्या सूचना लागू राहतील.
- प्रचाराकरिता खासगी विमाने अथवा हेलिकॉप्टर यांचा

वापर करता येईल. मात्र, त्याचा खर्च पक्षाने करायच्या खर्चामध्ये समाविष्ट करण्यात यावा. राज्य निवडणूक आयोगाने ८ नोव्हेंबर २०११ रोजी काढलेल्या आदेशानुसार महत्त्वाचे राजकीय नेते/प्रचारक (स्टार प्रचारक) यांची नावे कळविण्याची तरतूद आहे. त्यानुसार उमेदवाराच्या खर्चामध्ये केवळ ज्यांची नावे महत्त्वाचे राजकीय प्रचारक (स्टार प्रचारक) म्हणून कळविण्यात आली आहेत, त्यांच्या प्रवासाचा खर्च समाविष्ट होणार नाही.

- राज्य निवडणूक आयोगाच्या दि. २ मार्च १९९५च्या आदेशानुसार महानगरपालिका आयुक्त अथवा जिल्हाधिकारी हे निवडणुकीच्या कामाकरिता वाहने, कर्मचारी व मालमत्ता अधिग्रहित करण्याकरिता सक्षम असून सदर आदेशांचे उल्लंघन करणारी व्यक्ती आदेशात नमूद शिक्षेस पात्र राहील.
- महानगरपालिकांमध्ये महापौरांनी, जिल्हा परिषदांमध्ये जिल्हा परिषद अध्यक्ष, नगरपरिषद/नगरपंचायतीमध्ये त्यांच्या अध्यक्षांनी, पंचायत समितीच्या सभापतींनी व ग्रामपंचायतीमध्ये सरपंचांनी प्रजासत्ताक दिनी अथवा स्वातंत्र्यदिनी ध्वजवंदन करण्यास हरकत नाही. तथापि, अशा कार्यक्रमांच्या नेहमीच्या स्थळामध्ये बदल करण्यात येऊ नये. तसेच या संदर्भात करायची भाषणे स्वातंत्र्य मिळविण्यासाठी बलिदान केलेल्या हुतात्म्यांच्या तसेच देशाचा गौरव यापुरतीच मर्यादित ठेवण्यात यावीत. कोणत्याही परिस्थितीत या समारंभात निवडणूक प्रचाराविषयी भाषणे करता येणार नाहीत.
- मतदान केंद्रातील प्रत्यक्ष मतदानाचे, मतदान कक्षाचे तसेच ज्यामुळे मतदानाची गुप्तता भंग होऊ शकते अशा कुठल्याही बाबीचे व मतदान केंद्राच्या आतील भागाचे चित्रीकरण करता येणार नाही.
- काही उमेदवार, राजकीय पक्ष निवडणुकांदरम्यान बातम्यांच्या स्वरूपात वर्तमानपत्रांमध्ये, इलेक्ट्रॉनिक मीडियामध्ये आपल्या जाहिराती करतात. या जाहिरातींचे दृश्य स्वरूप बातमीसारखे असले तरी प्रत्यक्षात अशा बातम्या किंमत देऊन छापून आणल्या/प्रसिद्ध केल्या जातात. राज्य निवडणूक आयोगाच्या दिनांक १६ जानेवारी २०१२च्या आदेशानुसार महानगरपालिका, नगरपरिषद/नगरपंचायत तसेच जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांच्या वेळी पेड न्यूजबाबत आलेल्या तक्रारींवर चौकशी करण्यासाठी समिती नेमणे आवश्यक आहे. या समितीने एखादी बातमी पेड न्यूज असल्याचे मत दिल्यास त्या न्यूजवर झालेला खर्च संबंधित उमेदवाराच्या निवडणूक खर्चामध्ये समाविष्ट करणे आवश्यक आहे.
- पक्ष/उमेदवारांच्या सभेच्या जागा निश्चित करण्यासाठी संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेने सभेची जागा निश्चित व वाटप करण्यासाठी नियम/धोरण निश्चित करून सर्व संबंधितांना त्याची माहिती दिली पाहिजे.

## पोलिस विभागाशी संबंधित

**१) शस्त्रबंदी** : निवडणुका जाहीर झाल्यापासून शस्त्रास्त्रे बाळगण्यास निर्बंध घालणे आवश्यक आहे. सदर आदेश जिल्हाधिकारी अथवा अन्य संबंधित पोलिस अधिकारी यांच्याकडून वेळीच काढले जातील, याची संबंधित

जिल्हाधिकारी व महानगरपालिका आयुक्त यांनी दक्षता घ्यावी.

२) **दारूबंदी** : कोणताही उमेदवार किंवा त्याचा प्रतिनिधी संपूर्ण आचारसंहितेच्या कालावधीत दारूचे वाटप करू शकणार नाही. तसेच मतदानाच्या आदल्या दिवशी, मतदानाच्या दिवशी व मतमोजणीच्या दिवशी मद्यविक्रीवर बंदी राहील. या संदर्भात राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्र. एसईसी/१०९५/सी.आर.१/९५/डेक्स३, दिनांक ७ मार्च १९९५ लागू राहतील.

३) **ध्वनिक्षेपकाच्या वापराबाबत** : ध्वनिक्षेपकाच्या वापराबाबत पूर्वपरवानगी घेणे आवश्यक असेल. तसेच रात्री १० ते सकाळी ६ पर्यंत ध्वनिक्षेपकाच्या वापरावर बंदी राहील. या संदर्भात राज्य निवडणूक आयोगाचे पत्र क्र. एसईसी/१०९५/सी.आर.१/९५/डेक्स३, दिनांक १८ मार्च १९९५ अन्वये ध्वनिक्षेपकाच्या वापराबाबत दिलेल्या सूचना लागू राहतील. तसेच याबाबत असलेले The Noise Pollution (Regulation and Control) Rules, २०००ची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी.

४) **प्रचार संपल्यानंतर प्रचारासाठी आलेल्या व्यक्तींनी हद्दीमध्ये वास्तव्य न करण्याबाबत** : राज्य निवडणूक आयोगाचे क्र. रानिआ//मनपा-२००९/प्र.क्र.४/का.५, दिनांक ९ एप्रिल २०११ अन्वये प्रचाराचा कालावधी संपल्यानंतर प्रचारार्थ आलेल्या व्यक्तींना किंवा ज्यांच्याबाबत पोलिसांना संशय असेल अशा व्यक्तिंना स्थानिक स्वराज्य संस्थांच्या हद्दीमध्ये वास्तव्य न करण्याचे आदेश दिले आहेत. सदर आदेशाचे उल्लंघन करणाऱ्यांना पोलीस हद्दीबाहेर हलविण्याबाबतची कार्यवाही करू शकतील.

उपरोक्त बाबीव्यतिरिक्त आदर्श आचारसंहितेतील इतर मुद्द्यांमध्ये जेथे जेथे पोलीस विभागाशी संबंधित असेल तेथे तसेच, कायद्याचा/आचारसंहितेचा भंग होत असल्याचे आढळल्यास त्यामध्येसुद्धा पोलिस विभागाने कारवाई करायची आहे.

## काय करावे?

- सुरू असलेले शासकीय कार्यक्रम, योजना पुढे सुरू ठेवता येतील.
- पूर, अवर्षण, साथीचे रोग किंवा अन्य नैसर्गिक आपत्तींमुळे बाधित झालेल्या क्षेत्रातील जनतेसाठी साह्यकारी व पुनर्वसनाच्या उपाययोजना सुरू करता येतील व त्यापुढे सुरू ठेवता येतील.
- मरणासन्न किंवा गंभीर आजारी असलेल्या व्यक्तींना रोख रक्कम किंवा वैद्यकीय सवलती देणे समुचित मान्यतेने पुढे सुरू ठेवता येईल.
- मैदानासारख्या सार्वजनिक जागा सर्व पक्षांना व उमेदवारांना निवडणूक सभा घेण्यासाठी निष्पक्षपातीपणे उपलब्ध करून दिल्या पाहिजेत. सर्व पक्षांना किंवा उमेदवारांना हेलिपॅडचा वापर निष्पक्षपणे उपलब्ध करून दिला पाहिजे.
- विश्रामगृहे, डाकबंगले व इतर शासकीय निवासस्थाने वगैरे बाबतीत निवडणूक आयोगाने व त्याअनुषंगाने शासनाने काढलेल्या आदेशांना संपूर्णतः अधीन राहून सर्व राजकीय पक्षांना व निवडणुकीस उभे असलेल्या

सर्व उमेदवारांना समानतेच्या तत्त्वावर अनुज्ञेय असल्याप्रमाणे उपलब्ध करून देण्यात यावीत.

- इतर राजकीय पक्ष किंवा उमेदवार यांच्यावर करण्यात येणारी टीकाही त्यांची धोरणे, कार्यक्रम, पूर्वीची कामगिरी, पार पडलेली कामे या बाबींशीच संबंधित असावी.
- शांततामय व उपद्रवरहित गृहस्थजीवन जगण्याच्या प्रत्येक व्यक्तीच्या अधिकाराचे पूर्णपणे जतन करण्यात यावे.
- इतर पक्षांनी आयोजित केलेल्या सभा व मिरवणुकांमध्ये कोणतेही अडथळे निर्माण करण्यात येऊन नयेत.
- प्रस्तावित सभेची जागा व वेळ याविषयी स्थानिक पोलिसांना पूर्ण माहिती देण्यात यावी आणि त्यासाठी आवश्यक त्या सर्व परवानग्या घेणे बंधनकारक आहे.
- प्रस्तावित सभेच्या जागी प्रतिबंधात्मक आदेश जारी केलेले असल्यास त्यांचे पूर्णपणे पालन करण्यात यावे.
- प्रस्तावित सभेसाठी ध्वनिवर्धक (Loudspeaker) किंवा इतर कोणत्याही अशा सवलतीचा वापर करण्यासाठी परवानगी आवश्यक आहे.
- सभेमध्ये अडथळे आणणाऱ्या किंवा अव्यवस्था निर्माण करणाऱ्या व्यक्तींबरोबर व्यवहार करण्यासाठी पोलिसांचे साहाय्य घ्यावे.
- कोणत्याही प्रचारफेरीच्या प्रारंभीची वेळ व जागा; तसेच मार्ग, फेरीची अखेरची वेळ व स्थान आगाऊ स्वरूपात निश्चितपणे ठरविण्यात यावे व पोलिसांकडून त्यासाठी आगाऊ परवानगी घ्यावी.
- प्रचारफेरी / मोर्चामुळे वाहतुकीस कोणताही अडथळा निर्माण होऊ देऊ नये.
- हत्यारे म्हणून गैरवापर होऊ शकेल अशा कोणत्याही वस्तू प्रचारफेरीत / मोर्चात सहभागी असलेल्या व्यक्तींनी बाळगू नयेत.
- बिल्ले व ओळखपत्रे, निवडणुकीचे काम करणाऱ्या व्यक्तींनी ठळकपणे लावली पाहिजेत.
- मतदारांना देण्यात येणाऱ्या ओळख चिठ्ठ्या साध्या (पांढऱ्या) कागदावर द्याव्यात. त्यावर उमेदवाराचे किंवा पक्षाचे चिन्ह नसावे.
- वैध प्राधिकारपत्र असल्याखेरीज कोणत्याही व्यक्तीस मतदान कक्षात प्रवेश करता येणार नाही. मुख्यमंत्री, मंत्री, राज्यमंत्री, संसद सदस्य, विधानसभा सदस्य आदी उच्च पदांवरील व्यक्तींनादेखील यातून सूट नाही.
- कोणतीही तक्रार किंवा समस्या, निवडणूक निर्णय अधिकारी, प्रभाग दंडाधिकारी यांच्या किंवा राज्य निवडणूक आयोगाने नियुक्त केलेल्या निरीक्षकांच्या निदर्शनास आणून द्यावी.

## काय करू नये?

- शासकीय वाहने किंवा कर्मचारी वर्ग अथवा शासकीय यंत्रणेचा निवडणूक प्रचारविषयक कामासाठी वापर करण्यात येऊ नये.
- सत्तेवरील पक्ष अथवा शासनाने साध्य केलेल्या उद्दिष्टांबाबत सरकारी कोषागाराच्या खर्चाने कोणतीही जाहिरात करू नये.
- कोणत्याही वित्तीय अनुदानाची घोषणा करू नये. कोनशिला बसविणे किंवा नवीन रस्त्यांच्या बांधकामाचे

वचन देऊ नये.

- शासन किंवा सार्वजनिक उपक्रमांच्या सेवेत कोणत्याही तदर्थ (Adhoc) नियुक्त्या करू नयेत.
- मतदारास आर्थिक किंवा अन्य प्रकारचे कोणतेही प्रलोभन दाखवू नये.
- मतदाराच्या जातीय व धार्मिक भावनांना आवाहन करू नये.
- विभिन्न जाती, जमाती किंवा धार्मिक, भाषिक गटांत मतभेद निर्माण होतील किंवा परस्परांत वैमनस्य वाढेल अथवा त्यांच्यात तणाव निर्माण होईल, अशी कोणतीही कृती करण्याचा प्रयत्न करू नये.
- उमेदवाराच्या सार्वजनिक कार्याशी संबंधित नसलेल्या व खासगी जीवनातील कोणत्याही पैलूवर टीका करण्याची परवानगी नाही.
- निवडणूक प्रचार, भाषणे, फलक किंवा संगीत आदींसाठी कोणत्याही प्रार्थनास्थळांचा वापर करू नये.
- लाच देणे, अवाजवी प्रभाव टाकणे, मतदारांना धाकदपटशा दाखविणे, खोट्या नावाने मतदान करणे, मतदारांना मतदान कक्षापर्यंत पोहोचविणे व तेथून परत नेणे यासारख्या प्रकारांना प्रतिबंध आहे.
- व्यक्तींची मते किंवा कृत्ये याविरुद्ध निषेध व्यक्त करण्यासाठी त्यांच्या घरासमोर निदर्शने किंवा धरणे धरण्यात येऊ नयेत.
- संबंधितांच्या परवानगीशिवाय कुठलीही जमीन, इमारत किंवा आवार अथवा भिंतीचा वापर ध्वजदंड उभारणे, कापडी फलक लावणे, नोटीस चिकटविणे किंवा घोषणा लिहिण्यासाठी करता येणार नाही.
- इतर राजकीय पक्षांच्या किंवा उमेदवारांच्या सार्वजनिक सभांमध्ये कोणत्याही प्रकारचा अडथळा निर्माण करू नये.
- एका पक्षाची सभा सुरू असलेल्या जागेवर दुसऱ्या पक्षाने मोर्चा काढू नये.
- दुसऱ्या पक्षांची किंवा उमेदवारांची प्रचारपत्रके काढू नयेत.
- मतदानाच्या दिवशी ओळखचिठ्ठ्या वितरित करण्याच्या जागी किंवा मतदान कक्षाजवळ प्रचारपत्रके, पक्षांचे ध्वज, चिन्हे किंवा इतर प्रचार साहित्यांचे प्रदर्शन करू नये.
- ध्वनिवर्धकांचा सकाळी सहा वाजण्यापूर्वी किंवा रात्री दहा वाजल्यानंतर आणि वापर करू नये. दिवसा वापरासाठी संबंधित प्राधिकाऱ्यांची पूर्व लेखी परवानगी घेतल्याशिवाय वापर करू नये.
- संबंधित प्राधिकाऱ्यांची लेखी परवानगी असल्याखेरीज सार्वजनिक सभेच्या जागी किंवा मोर्चात ध्वनिवर्धकाचा वापर करू नये.
- निवडणुकीच्या काळात कोणत्याही प्रकारच्या मद्याचे वाटप करण्यात येऊ नये.
- प्राण्यांचा निवडणूक प्रचारात क्रूरपणे वापर करू नये.

# निवडणूक सुधारणा आणि उपक्रम

राज्य निवडणूक आयोगाने वेळोवेळी विविध उपक्रम हाती घेतले. गेल्या साडेचार वर्षांत नावीन्यपूर्ण उपक्रम आणि निवडणूक सुधारणांना अधिक गती आली आहे. उमेदवारांच्या शपथपत्रातील गोषवाऱ्याला व्यापक प्रसिद्धी, उत्पन्नाचा स्रोत जाहीर करणे बंधनकारक, 'नोटा' जिंकल्यास फेरनिवडणूक, राष्ट्रकुल स्थानिक स्वराज्य संस्था मंच (सीएलजीएफ) सोबत सामंजस्य करार, 'सुशासनासाठी लोकशाही आणि निवडणूक संस्थे'ची स्थापना ही त्याची काही ठळक उदाहरणे आहेत.

निवडणुकांसदर्भात सातत्याने नवनवीन आव्हाने समोर येत असतात. त्यावर मात करण्यासाठी उपाययोजना करणे आवश्यक असते. त्यामुळे निर्भय, मुक्त व पारदर्शक निवडणुकांच्या दृष्टीने निवडणूक सुधारणा ही निरंतर चालणारी प्रक्रिया आहे. गेल्या काही वर्षांपासून निवडणूक सुधारणांना अधिक गती आली आहे.

## उमेदवारांकडून शपथपत्र

राज्य निवडणूक आयोगाने प्रथमतः १९९७मध्ये उमेदवारांकडून त्यांची मालमत्ता, गुन्हेगारी पार्श्वभूमी व शैक्षणिक अर्हता याबाबत शपथपत्र घेण्यास सुरुवात केली. त्या संदर्भात राज्य निवडणूक आयोगाने २१ ऑक्टोबर १९९७ रोजी आदेश निर्गमित केले. सुरुवातीला उमेदवाने दाखल केलेल्या शपथपत्राची निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी सारांशाने छाननी करणे अपेक्षित होते. मात्र, अल्पावधीत अशी छाननी करून निर्णय घेणे शक्य नसल्याने सन २००३मध्ये या संदर्भात न्यायालयाने सुधारित आदेश दिले. या आदेशानुसार, उमेदवाराने सादर केलेले शपथपत्र निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी सूचना फलकावर लावून त्याचा प्रसार करावा. हे शपथपत्र चुकीचे




*त्र्यंबक नगरपरिषदेच्या निवडणूक प्रसंगी मतदान केंद्राबाहेर उमेदवारांच्या शपथपत्रातील माहितीच्या गोषवाऱ्याचा फलक वाचताना मतदार. राज्य निवडणूक आयोगाने १३ डिसेंबर २०१६ पासूनच्या नगरपरिषद निवडणुकांपासून हा उपक्रम अंमलात आणला आहे.*




*सांगली-मिरज-कुपवाड आणि जळगाव महानगरपालिकेच्या १ ऑगस्ट २०१८ रोजी झालेल्या निवडणुकीच्या वेळी उमेदवारांच्या शपथपत्रातील माहितीच्या गोषवाऱ्याचे फलक मतदान केंद्रांबरोबरच शहराच्या मुख्य चौकाचौकांमध्ये प्रथमच लावण्यात आले होते.*

असल्याचे निदर्शनास आणून द्यायचे असल्यास संबंधित किंवा प्रतिस्पर्धी उमेदवाराला तशा आशयाचे शपथपत्र निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडे दाखल करता येते. तेही सूचना फलकावर लावावे लागते. राज्य निवडणूक आयोगाने प्रथमच सन २०१२पासून उमेदवारांनी दाखल केलेली शपथपत्रे संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यास सुरुवात केली होती.

## शपथपत्रांतील माहितीचे फलक

मा. सर्वोच्च न्यायालयाच्या २ मे २००२च्या आदेशानुसार निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची माहिती मतदारांना उपलब्ध होणे आवश्यक आहे. त्यामुळे केवळ सूचना फलकावर किंवा संकेतस्थळावर शपथपत्रे प्रसिद्ध करून उपयोग नाही. राज्य निवडणूक आयोगाने ही बाब विचारात घेऊन उमेदवाराच्या शपथपत्रातील माहितीच्या गोषवाऱ्याचा

नमुना तयार केला. त्यानुसार स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लढविणाऱ्या उमेदवारांची माहिती मतदान केंद्रावर मोठ्या फलकाच्या स्वरूपात प्रसिद्ध करण्यास सुरुवात झाली. त्या संदर्भात राज्य निवडणूक आयोगाने १३ डिसेंबर २०१६ रोजी पहिल्यांदा नगर परिषदांच्या निवडणुकांसाठी आदेश निर्गमित केले. त्यानंतरच्या सर्व निवडणुकांमध्ये हा उपक्रम राबविण्यात आला.

गोषवाऱ्यात उमेदवारांच्या स्थावर व जंगम मालमत्तेची, शैक्षणिक; तसेच गुन्हेगारी पार्श्वभूमीसंदर्भातील माहितीचा समावेश असतो. या उपक्रमाचे झालेले स्वागत लक्षात घेऊन आता ग्रामपंचायत वगळता सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत हा उपक्रम राबविण्यात आला. त्याचबरोबर शपथपत्रातील गोषवाऱ्याची माहिती असलेल्या जाहिराती वर्तमानपत्रात प्रसिद्ध करण्यात येतात. जळगाव आणि सांगली-मिरज-कुपवाड महानगरपालिकेसाठी १ ऑगस्ट २०१८ रोजी झालेल्या मतदानाच्या दिवशी हे फलक प्रथमच चौकाचौकांतही लावण्यात आले होते.

## उत्पन्नाचा स्रोत बंधकारक

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी उमेदवारी अर्जासोबत सादर करावयाच्या शपथपत्रात आता उमेदवारांना स्वत:च्या व त्याच्यावर अवलंबित असलेल्यांच्या उत्पन्नाचा स्रोत, उत्पन्नाचे व विविध करारांचे तपशील व यापूर्वी निवडणूक लढविली असल्यास त्याबाबतची माहिती नमूद करणे बंधनकारक केले आहे. या संदर्भात आयोगाने १३ डिसेंबर २०१८ रोजी शपथपत्राचा एकत्रित नमुना निश्चित केला.

महानगरपालिका, नगरपरिषदा, नगरपंचायती, जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्यांच्या निवडणुकांच्या नामनिर्देशनपत्रासोबत उमेदवारांना शपथपत्र सादर करावे लागते. या शपथपत्रात प्रामुख्याने मत्ता व दायित्व, शैक्षणिक पात्रता आणि गुन्हेगारी पार्श्वभूमीविषयक माहिती नमूद करावी लागते; परंतु सर्वोच्च न्यायालयाने १६ फेब्रुवारी २०१८ रोजी दिलेल्या निर्देशानुसार शपथपत्रात आता नवे बदल करण्यात आले आहेत. उमेदवाराच्या स्वत:च्या व त्यांच्यावर अवलंबून असलेल्यांच्या उत्पनाचा स्रोत आणि त्याबाबतचे मागील तीन वर्षांचे तपशील सादर करावे लागतात. त्यात शेती, नोकरी, व्यापार/ व्यवसाय, भांडवली नफा, बक्षिसे/ देणग्या व इतर उत्पन्नाचा तपशील द्यावा लागतो.

## करारांचा तपशील आवश्यक

उत्पन्नाच्या स्रोताप्रमाणेच उमेदवार आणि त्याच्यावरील अवलंबितांचे शासकीय, निमशासकीय, स्थानिक स्वराज्य संस्था, सहकारी संस्था इत्यादींसोबतच्या करारांचीदेखील माहिती द्यावी लागते. त्यात कराराचा विषय, कराराचा कालावधी, कराराची रक्कम, कराराची शपथपत्र दाखल करतानाची सद्य:स्थिती, कराराबाबत विवाद झाला असल्यास त्याबाबतची माहिती देणे आवश्यक असते.

## संपत्तीच्या माहितीचा गोषवारा

उमेदवाराने यापूर्वी निवडणूक लढविली असल्यास, त्या निवडणुकीच्या वेळी शपथपत्राद्वारे सादर केलेल्या संपत्तीच्या माहितीचा गोषवारादेखील शपथपत्रात नमूद करणे आवश्यक आहे. त्यात यापूर्वी लढविलेल्या निवडणुकीचे

### उमेदवारांसंदर्भातील माहितीच्या गोषवाऱ्याचा मतदान केंद्राबाहेर लावावयाच्या फलकाचा नमुना

| प्रभाग क्रमांक व नाव (असल्यास) | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | शैक्षणिक अर्हता (कमाल) | मालमत्ता जंगम मालमत्ता (रु. लाखात) (स्वत: उमेदवार, पती/पत्नी आणि अवलंबितांची मिळून) | मालमत्ता स्थावर मालमत्ता (रु.लाखात) (स्वत: उमेदवार, पती/पत्नी आणि अवलंबितांची मिळून) | दायित्व/ थकीत रकमा (रु. लाखात) | गुन्हेगारी पार्श्वभूमी | |
| | | | | | | दोन वर्षे किंवा त्यापेक्षा जास्त कालावधीची शिक्षा होऊ शकेल अशा प्रलंबित प्रकरणांची संख्या | ज्या अपराधासाठी दोषी ठरविण्यात आले आहे आणि एक वर्ष व त्यापेक्षा अधिक कालावधीच्या कारावासाची शिक्षा देण्यात आली आहे. अशा प्रकरणांची संख्या |
| १ | | | | | | | |
| २ | | | | | | | |
| ३ | | | | | | | |
| ४ | | | | | | | |

नाव, निवडणुकीचे वर्ष, त्या वेळी जाहीर केलेल्या स्थावर व जंगम मालमत्तेचे मूल्य, दायित्वे/ थकीत रकमांचा गोषवारा इत्यादींचा समावेश करण्यात आला आहे.

## विकासाबाबत ‘व्हिजन’

निवडून आल्यावर संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेच्या क्षेत्राच्या विकासासाठी करणार असलेल्या उपाययोजनांचीही माहिती जास्तीत जास्त पाचशे शब्दांत नमूद करण्याची तरतूद राज्य निवडणूक आयोगाने केली आहे. मतदारांसाठी ही माहिती उपयुक्त ठरू शकते. यामुळे आपल्या प्रभागासाठी (वॉर्ड) उमेदवार काय करणार आहे, याची कल्पना मतदारांना येईल.

## मतदारांसाठी ‘नोटा’ची सुविधा

मा. सर्वोच्च न्यायालयाने एका रिट पिटिशनसंदर्भात (क्र.१६१/२०४) २७ सप्टेंबर २०१३ रोजी दिलेल्या निकालात नोटाची (None Of The Above) सुविध उपलब्ध करून देण्याबाबत आदेश दिले होते. त्यानुसार राज्य निवडणूक आयोगाने आपल्या १२ नोव्हेंबर २०१३च्या आदेशान्वये सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या

निवडणुकांकरिता इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रावर नोटा बटनाची सुविधा उपलब्ध करून दिली; परंतु 'नोटा' पर्यायासमोर नोंदविलेल्या मतांची संख्या सर्वाधिक मते मिळालेल्या उमेदवारांच्या मतापेक्षा जास्त असली तरी त्या उमेदवाराला विजयी घोषित करण्यात येते.

## नोटा जिंकल्यास फेरनिवडणूक

मतदारांसाठी 'नोटा'ची सुविधा उपलब्ध करून दिली असली, तरी मा. सर्वोच्च न्यायलयाच्या आदेशातील तत्त्वांची पूर्णपणे पूर्तता होत नाही, असे विविध मान्यवर, राजकीय पक्ष आणि संशोधकांनी राज्य निवडणूक आयोगाच्या लक्षात आणून दिले. निवडणूक प्रक्रियेत मतदारांचा सहभाग वाढला पाहिजे, चांगले उमेदवार देण्यासंदर्भात राजकीय पक्षांवर दबाव आला पाहिजे, निवडणूक निकालांवर नकारात्मक मतांचेही प्रतिबिंब उमटले पाहिजे आदी स्वरूपाची तत्त्वे मा. सर्वोच्च न्यायलयाच्या आदेशात जाणवतात. यासह न्यायालयाचे विविध आदेश आणि संबंधित कायद्यांतील तरतुदींचा अभ्यास केल्यानंतर राज्य निवडणूक आयोगाने 'नोटा'च्या आपल्या आदेशात दुरुस्ती करण्याचा निर्णय घेतला. राज्य निवडणूक आयोगाने 'नोटा'संदर्भातील सुधारित आदेश ६ नोव्हेंबर २०१८ रोजी निर्गमित केले.

त्यानुसार 'नोटा'ला 'फिक्शनल इलेक्टोरल कॅंडिटेट' समजण्यात येते. वैयक्तिकरीत्या सर्वच उमेदवारांना नोटापेक्षा कमी मते मिळल्यास कुठल्याही उमेदवाराला विजयी घोषित केले जाणार नाही. एखाद्या उमेदवाराला आणि नोटाला समान मते मिळाल्यास संबंधित उमेदवाराला विजयी घोषित करण्यात येते. नोटाला सर्वाधिक मते मिळाल्यास फेरनिवडणूक घेण्यात येईल. त्यासाठी नव्याने नामनिर्देशनपत्र दाखल करावी लागतील. फेरनिवडणुकीत पुन्हा 'नोटा'ला सर्वाधिक मते मिळाल्यास पुन्हा फेरनिवडणूक घेण्यात येणार नाही. 'नोटा'व्यतिरिक्त सर्वाधिक मते मिळालेल्या उमेदवारास विजयी घोषित करण्यात येईल.

'नोटा'ला सर्वाधिक मते मिळाल्याचे लक्षात आल्यानंतर संबंधित निवडणूक निर्णय अधिकाऱ्याने निकाल जाहीर न करता त्या संदर्भातील अहवाल राज्य निवडणूक आयोगास सादर करावा. अहवाल प्राप्त झाल्यानंतर राज्य निवडणूक आयोग अहवालाचा उचित अभ्यास करून फेरनिवडणुकीचा कार्यक्रम जाहीर करेल. नोटासंदर्भातील ही सुधारणा केवळ शहरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये अमलात आणली आहे. ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांत ही सुधारणा लागू नाही.

## 'सीएलजीएफ'सोबत सामंजस्य करार

लोकसभा व विधानसभा निवडणुकांच्या तुलनेने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसंदर्भात संशोधन, विश्लेषण आणि सुधारणांसंदर्भात फारच अत्यल्प प्रमाणात राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर हालचाल असते. ही बाब लक्षात घेऊन राज्य निवडणूक आयोगाने राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय संस्थांसोबत समन्वय साधून विचार आणि संकल्पनांचे आदानप्रदान करण्याचा प्रयत्न सुरू केला आहे. त्याचाच एक भाग म्हणून प्रथमच राज्य निवडणूक आयोगाने राष्ट्रकुल स्थानिक स्वराज्य संस्था मंच (सीएलजीएफ) सोबत २६ सप्टेंबर २०१८ रोजी पुढील



*मुंबई येथे २६ सप्टेंबर २०१८ रोजी राज्य निवडणूक आयोग आणि राष्ट्रकुल स्थानिक स्वराज्य संस्था मंच (सीएलजीएफ) यांच्यातील सामंजस्य कराराप्रसंगी उपस्थित उजवीकडून 'सीएलजीएफ'च्या श्रीमती अनुया कुंवर, 'सीएलजीएफ'चे महासचिव डॉ. ग्रेग मुनरो, राज्य निवडणूक आयुक्त श्री. ज. स. सहारिया आणि ग्रामविकास विभागाचे प्रधान सचिव श्री. असीम गुप्ता.*

दोन वर्षांसाठी सामंजस्य करार केला.

सामंजस्य करारावर राज्य निवडणूक आयुक्त ज. स. सहारिया आणि सीएलजीएफचे महासचिव डॉ. ग्रेग मुनरो यांनी विविध वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत सह्या केल्या. राज्याच्या ग्रामविकास विभागाचे प्रधान सचिव श्री. असीम गुप्ता, आयोगाचे तत्कालीन सचिव श्री. शेखर चन्ने या वेळी उपस्थित होते. सीएलजीएफचे मुख्यालय लंडन येथे असून ही संस्था राष्ट्रकुल देशांतील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या बळकटीकरणासाठी विविध उपक्रम राबवीत असते. सुदृढ लोकशाहीसाठी निकोप निवडणुका हे तत्त्व नजरेसमोर ठेवून आंतरराष्ट्रीय स्तरावर आदानप्रदान व्हावे, या उद्देशाने हा करार करण्यात आला आहे.

## करारातील ठळक बाबी

- नावीन्यपूर्ण कल्पना, माहिती, ज्ञान आणि उल्लेखनीय कार्याचे आदानप्रदान.
- नवनवीन आव्हानांना सामोरे जाण्यासाठी उपाययोजनांची आखणी करणे.
- स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसंदर्भात आंतरराष्ट्रीय व्यासपीठ तयार करणे.

- निवडणूक अधिकारी / कर्मचाऱ्यांसाठी प्रशिक्षणाची यंत्रणा निर्माण करणे.
- निवडणूक निरीक्षकांसंदर्भात व्यवस्था विकसित करणे.
- समन्वयातून नवीन प्रयोग, संशोधनाला चालना देणे.

## 'ईडेग'ची (IDEGG) स्थापना

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका आणि राज्य निवडणूक आयोगाला विविध घटकांकडून मिळणारे कमी महत्त्व, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसंदर्भातील पुरेशा माहितीचा अभाव, मोठ्या संख्येने असलेल्या निवडणूक अधिकाऱ्यांचे प्रशिक्षण, आचारसंहितेची अंमलबजावणी आदी मुद्द्यांवर निरंतर चिंतनाची आणि कार्यवाहीची आवश्यकता आहे. त्यासाठी लोकसभा आणि विधानसभा निवडणुकांच्या दृष्टीने 'भारतीय आंतरराष्ट्रीय लोकशाही आणि निवडणूक व्यवस्थापन संस्था' (IIIDEM) कार्यरत आहे. भारत निवडणूक आयोगाने या संस्थेची स्थापना केली आहे. त्याच धर्तीवर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसंदर्भातील संशोधन, ज्ञानसंवर्धन, प्रशिक्षण आणि क्षमतावृद्धी आदींसाठी संस्था असावी, अशी कल्पना २०१६ मध्ये पुढे आली आणि या अनौपचारिक संस्थेच्या माध्यमातून विविध उपक्रम हाती घेण्यात आले.

संस्थेची संकल्पना प्रत्यक्षात साकारण्यापूर्वी राज्य निवडणूक आयोगाने विविध उपक्रम हाती घेतले. मुंबई विद्यापीठ, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे येथील गोखले राज्यशास्त्र व अर्थशास्त्र संस्था आदींच्या माध्यमातून २० पेक्षा जास्त संशोधन प्रकल्प हाती घेण्यात आले. ७३ व ७४ व्या घटनादुरुस्तीला २५ वर्षे पूर्ण होत असल्याचे औचित्य साधून नोव्हेंबर २०१७मध्ये राष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले. २०१८च्या प्रारंभी विभागीय परिषदा घेण्यात आल्या. २६ जानेवारी ते ९ फेब्रुवारी या कालावधीत २०१८पासून लोकशाही पंधरवडा साजरा करणे सुरू झाले. राजकीय पक्षांसाठी राज्यस्तरीय आणि विभागीय परिषदा घेण्यात आल्या. या उपक्रमांची उपयुक्तता लक्षात घेऊन राज्य निवडणूक आयोगाने 'सुशासनासाठी लोकशाही आणि निवडणूक संस्थे'ची (Institute of Democracy and Election for Good governance) ६ नोव्हेंबर २०१८ रोजी स्थापना केली.

## संस्थेची वैशिष्ट्ये आणि कार्ये

- सुदृढ लोकशाहीसाठी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका अधिकाधिक निकोप करण्याच्या दृष्टीने ज्ञानवर्धन करणे आणि ते अधिकाधिक लोकांपर्यंत पोचविण्यासाठी प्रयत्न करणे.
- विचार, संकल्पना आणि उल्लेखनीय कामांचे आदानप्रदान करणे, निवडणूक यंत्रणेसाठी प्रशिक्षणाची व्यवस्था, आव्हानांवर मात करण्यासाठी उपाययोजना करणे.
- विविध आंतरराष्ट्रीय संस्थांसोबत सहकार्य वाढून माहितीचे व संकल्पनांचे आदानप्रदान करणे.
- शैक्षणिक क्षेत्रातील तज्ज्ञ, वरिष्ठ अधिकारी आणि स्वयंसेवी संस्थेच्या प्रतिनिधींचा समावेश असलेली सल्लागार समिती नियुक्त करणे.
- कमीत कमी पायाभूत सुविधा आणि मनुष्यबळाच्या आधारे विविध व्यक्ती आणि संस्थांच्या मदतीने वाटचाल करणे.

# इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रे (ईव्हीएम)

मतपत्रिकांसाठी मतदान केंद्र ताब्यात घेणे, अवैध मतांचे मोठे प्रमाण, मतमोजणीची वेळखाऊ प्रक्रिया, मोजणीसंदर्भातील वादावादी, निकाल जाहीर होण्यास होणारा विलंब, मतपत्रिका पर्यावरणपूरक नसणे आदी प्रकारांना तोंड द्यावे लागत असे. याबाबत वेगवेगळ्या स्तरांवर विचारविनिमय सुरू होता. या विचारमंथनातून इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राची (‘ईव्हीएम’) संकल्पना समोर आली. भारत निवडणूक आयोगाने ‘ईव्हीएम’चा वापर सुरू केल्यावर पाठोपाठ राज्य निवडणूक आयोगाने सन २००४पासून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांत मतदान यंत्रांचा वापर सुरू केला.

देशातील निवडणूक प्रक्रियेत काळाच्या ओघात विविध बदल होत गेले. लोकसभेच्या पहिल्या दोन म्हणजे सन १९५२ आणि सन १९५७ च्या सार्वत्रिक निवडणुकांत प्रत्येक उमेदवारासाठी मतदान केंद्रावर स्वतंत्र मतपत्रिका असलेली मतपेटी असायची. उमेदवाराच्या नावाने किंवा त्याच्या निवडणूक चिन्हाची मतपत्रिका छापली जात नसे. त्या पेटीवर उमेदवाराचे निवडणूक चिन्ह चिकटवले जाई. मतदाराला आपल्या पसंतीच्या उमेदवाराच्या मतपेटीत मतपत्रिका टाकावी लागत असे. या पद्धतीत काही उणिवा होत्या व त्या संदर्भात अनेक प्रश्न उपस्थित झाले होते. सन १९६०–६१ मध्ये केरळ आणि ओरिसा विधानसभांच्या मध्यावधी निवडणुकांच्या वेळी ही पद्धत बदलण्यात आली. तेथून पुढे उमेदवाराचे नाव आणि निवडणूक चिन्ह असलेल्या मतपत्रिकेचा वापर सुरू झाला. तो सन १९९९च्या लोकसभा निवडणुकीपर्यंत कायम होता.

मतपत्रिकांसाठी मतदान केंद्र ताब्यात घेणे, अवैध मतांचे मोठे प्रमाण, मतमोजणीची वेळखाऊ प्रक्रिया, मोजणीसंदर्भातील वादावादी, निकाल जाहीर होण्यास



*निवडणूक सज्जतेसाठी मतदान यंत्रांची एफएलसी (फर्स्ट लेव्हल चेकिंग) करताना निवडणूक कर्मचारी.*

होणारा विलंब, मतपत्रिका पर्यावरणपूरक नसणे आदी प्रकारांना तोंड द्यावे लागत असे. याबाबत वेगवेगळ्या स्तरांवर विचारविनिमय सुरू होता. या विचारमंथनातून इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राची (‘ईव्हीएम’) संकल्पना समोर आली. भारत निवडणूक आयोगाने ‘ईव्हीएम’चा वापर सुरू केल्यावर पाठोपाठ राज्य निवडणूक आयोगाने सन २००४पासून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांत मतदान यंत्रांचा वापर सुरू केला.

## ‘ईव्हीएम’ची पार्श्वभूमी

मतदान प्रक्रियेसाठी इलेक्ट्रॉनिक उपकरण विकसित करण्यासंदर्भात भारत निवडणूक आयोगाचे तत्कालीन मुख्य निवडणूक आयुक्त श्री. एस. एल. शकधर १९७७मध्ये हैदराबाद दौऱ्यावर होते. तेथे त्यांनी इलेक्ट्रॉनिक कॉर्पोरेशन ऑफ इंडियाला (ईसीआयएल) मतदानासाठी यंत्र विकसित करण्याची विनंती केली. ‘ईसीआयएल’ ही अणुऊर्जा मंत्रालयांतर्गत असलेली सार्वजनिक कंपनी आहे. या कंपनीने मतदान प्रक्रियेसाठी उपकरण विकसित करण्याचे आव्हान स्वीकारले. सन १९७९मध्ये या कंपनीने प्राथमिक पातळीवरील नमुन्यादाखल इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र (ईव्हीएम) विकसित केले. सर्व राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींना या यंत्राचे ६ ऑगस्ट १९८० रोजी प्रात्यक्षिक दाखविण्यात आले.

‘ईसीआयएल’ने मतदान यंत्राबाबत हा प्रयोग केल्यानंतर जानेवारी १९८१मध्ये भारत हेवी इलेक्ट्रिकल्स लिमिटेड (भेल) ही सार्वजनिक क्षेत्रातील कंपनीदेखील ‘ईव्हीएम’ तयार करण्यासाठी पुढे आली. भारत निवडणूक




*इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र.*

आयोगाने २९ जुलै १९८१ रोजी ‘ईसीआयएल’, ‘भेल’, कायदा मंत्रालय आणि निवडक राज्यांच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांची ‘ईव्हीएम’च्या वापरासंदर्भात बैठक घेतली. तीत सखोल चर्चा करण्यात आली. भारत निवडणूक आयोगाने १९ मे १९८२ रोजी भारतीय राज्यघटनेच्या अनुच्छेद ३२४ अंतर्गत ‘ईव्हीएम’ वापरण्यासंदर्भात आदेश निर्गमित केले.

## केरळमध्ये पहिल्यांदा वापर

भारत निवडणूक आयोगाने केरळमधील परावूर विधानसभा मतदारसंघातील ८४ पैकी ५० मतदार केंद्रांमध्ये सर्वप्रथम इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रांचा चाचणीच्या स्वरूपात

१९ मे १९८२ रोजी वापर करण्याचा निर्णय घेतला. मतदानाच्या एक दिवस आधी एका उमेदवाराने मतदान यंत्राच्या वापराबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित करून केरळ उच्च न्यायालयात याचिका दाखल केली. न्यायालयाने मतदान यंत्राचे प्रात्यक्षिक बघितले आणि 'ईव्हीएम'च्या वापराबाबत हस्तक्षेप करण्यास नकार दिला. निकालानंतर दुसऱ्या एका उमेदवाराने लोकप्रतिनिधित्व अधिनियम १९५१ आणि निवडणूक नियम १९६१ मधील तरतुदीनुसार मतदान यंत्रांचा वापर करता येत नसल्याचा दावा करून नवी याचिका दाखल केली; परंतु न्यायालयाने पुन्हा निवडणूक आयोगाच्या बाजूने निर्णय दिला. सर्वोच्च न्यायालयाने ५ मार्च १९८४ रोजी उच्च न्यायालयाचा निर्णय रद्दबातल ठरवून संबंधित ५० मतदान केंद्रांवर पारंपरिक पद्धतीने मतपत्रिकेद्वारे मतदान घेण्याचे आदेश दिले. 'ईव्हीएम'च्या वापरासंदर्भात संबंधित कायद्यात सुधारणा केल्याशिवाय 'ईव्हीएम'चा वापर करता येणार नाही, असेही न्यायालयाने नमूद केले.

न्यायालयीन प्रकरणानंतर भारत निवडणूक आयोगाने मतदान यंत्रांच्या वापराबाबत सबुरीचे धोरण स्वीकारले. भारत सरकारने जानेवारी १९९०मध्ये श्री. दिनेश गोस्वामी यांच्या अध्यक्षतेखाली निवडणूक सुधारणा समितीची स्थापना केली. 'ईव्हीएम'चे तांत्रिक तज्ज्ञांकडून



*मतदान केंद्रावर जाण्यापूर्वी इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राची तपासणी करताना कर्मचारी.*




*इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राच्या बॅलेट युनिटला जोडलेले व्हीव्हीपॅट.*

परीक्षण आणि तपासणी करून घ्यावी, अशी शिफारस केली. त्यासाठी संरक्षण, संशोधन आणि विकास संस्थेच्या (डीआरडीओ) भरती आणि मूल्यांकन केंद्राचे अध्यक्ष श्री. एस. संपत यांच्या अध्यक्षतेखाली तांत्रिक तज्ज्ञ समितीची स्थापना करण्यात आली. प्रख्यात शास्त्रज्ञ डॉ. पी. व्ही. इंडीरसन (आयआयटी, दिल्ली) आणि डॉ. राव सी.

कासारबाडा (ईआर अँड डीसी, त्रिवेंद्रम) यांचाही समितीत समावेश होता. 'वेळ न दवडता निवडणुकीत 'ईव्हीएम'चा वापर करण्यास हरकत नाही. कारण ते पूर्णतः वापरण्यास योग्य सुरक्षित आणि पारदर्शक आहे,' अशी शिफारस या समितीने एप्रिल १९९०मध्ये केली.

## लोकप्रतिनिधित्व अधिनियमात दुरुस्ती

लोकप्रतिनिधित्व अधिनियमात '६१ ए' या तरतुदीचा डिसेंबर १९८८मध्ये समावेश करण्यात आला. ती १५ मार्च १९८९पासून अमलात आली. त्यामुळे इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रांच्या वापरास कायदेशीर अधिष्ठान मिळाले. केंद्र सरकारने 'कंडक्ट ऑफ इलेक्शन्स रुल्स १९६१'मध्येदेखील २४ मार्च १९९२ रोजी आवश्यक ते बदल केले. भारतीय निवडणुकांमध्ये 'ईव्हीएम' वापरासंदर्भात सन १९९८मध्ये एकमत झाले.

'ईव्हीएम'च्या वापराबाबत एकमत झाल्यावर भारत निवडणूक आयोगाने सन १९९८मध्ये झालेल्या मध्य प्रदेश, राजस्थान आणि दिल्ली विधानसभा निवडणुकीत १६ मतदारसंघांमध्ये प्रायोगिक तत्त्वावर निवडणूक मतदान यंत्रांचा वापर केला. त्यात मध्य प्रदेश आणि राजस्थानमध्ये प्रत्येकी पाच; तर दिल्लीतील सहा विधानसभा मतदारसंघांचा समावेश होता. सन १९९९मध्ये लोकसभेच्या ४६ मतदारसंघांमध्ये; तर फेब्रुवारी २०००मध्ये हरियाना विधानसभेच्या ४५ मतदारसंघांमध्ये 'ईव्हीएम'चा वापर करण्यात आला. तमिळनाडू, केरळ, पुद्दुचेरी आणि पश्चिम बंगाल विधानसभांच्या निवडणुका सन २००१मध्ये संपूर्णपणे 'ईव्हीएम'द्वारे घेण्यात आल्या. सन २००४मधील लोकसभेच्या सर्व ५४३ मतदारसंघांत 'ईव्हीएम'द्वारे यशस्वीरीत्या मतदान घेण्यात आले. तेव्हापासून देशातील सर्व लोकसभा व विधानसभा निवडणुकांमध्ये मतदान यंत्रांचा वापर केला जात आहे.

## स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी ईव्हीएम

लोकसभा व विधानसभा निवडणुकांमध्ये इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रांचा यशस्वीरीत्या सुरू झालेला वापर लक्षात घेऊन राज्य निवडणूक आयोगानेही स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांत या यंत्रांचा वापर करण्याचा निर्णय घेतला. राज्यात सर्वप्रथम २८ नोव्हेंबर २००४ रोजी झालेल्या वर्धा, चंद्रपूर व कामठी नगरपरिषदेच्या रिक्त जागांच्या पोटनिवडणुकीत इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रांचा प्रायोगिक तत्त्वावर वापर करण्यात आला. त्यासाठी इलेक्ट्रॉनिक कॉर्पोरेशन ऑफ इंडियाकडून ५० यंत्रे घेण्यात आली होती. त्या वेळी एका यंत्राची किंमत ८ हजार ६७० रुपये इतकी होती.

औरंगाबाद आणि नवी मुंबई महानगरपालिका; तसेच अंबरनाथ, बदलापूर, नवघर-माणिकपूर व नालासोपारा या नगरपरिषदांच्या सार्वत्रिक निवडणुकांत (१० एप्रिल २००५) प्रथमच पूर्णपणे मतदान यंत्राचा वापर करण्यात आला. त्याच दिवशी ४ विविध महानगरपालिका आणि १३ नगरपरिषदांच्या पोटनिवडणुकादेखील मतदान यंत्राद्वारे घेण्यात आल्या. यासाठी एकूण २ हजार ५०० मतदान यंत्रे वापरण्यात आली होती. या यंत्रांकरिता एकूण १ कोटी ६५ लाख ३५ हजार २१६ रुपये खर्च आला होता. त्यात २ हजार ७०० बॅटरी व २ हजार ४५० मेमरीचाही समावेश होता.

## कायद्यात दुरुस्ती

इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राचा वापर करण्यापूर्वी संबंधित कायद्यांत दुरुस्ती करण्यात आली होती. या दुरुस्तीनुसार 'स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राद्वारे मतदान घेण्यात येईल,' अशी तरतूद करण्यात आली आहे. औरंगाबाद आणि नवी मुंबई महानगरपालिका निवडणुकीनंतर सर्वच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सार्वत्रिक आणि पोटनिवडणुका मतदान यंत्राद्वारेच घेण्यात येऊ लागल्या.

## सुरक्षित, सुलभ आणि पारदर्शक

मतपत्रिकेच्या तुलनेत इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र अधिक शाश्वत आणि पर्यावरण पूरक आहे. 'ईव्हीएम' मतदारांच्या दृष्टीनेदेखील सुलभ आहे. मतदाराला केवळ सहजतेने आपल्या पसंतीच्या उमेदवाराच्या नवासमोरील बटन दाबावे लागते. 'ईव्हीएम'मुळे अवैध मते नोंदविली जात नाहीत. मतपत्रिकेमुळे कधी-कधी विजयी उमेदवाराच्या मताधिक्याएवढी मते अवैध ठरत असत. 'ईव्हीएम' हे पारदर्शक, बिनचूक, सुरक्षित आणि मानवी चुका टाळण्यासाठी उपयुक्त ठरले आहे. त्यातून निकाल झटकन जाहीर करता येतो. भारतासारख्या मोठ्या देशाची ती गरज आहे. मतदान यंत्रामुळे वेळेची व ऊर्जेची बचत होते आणि पैशांचा अपव्यय टळतो. कागदाचा वापर टळल्याने पर्यावरणाचा ऱ्हास थांबण्यास हातभार लाभतो.

'ईव्हीएम' स्वतंत्र (स्टँड अलोन) उपकरण आहे. ते कुठल्याही नेटवर्कशी अथवा संगणकाशी जोडलेले नसते. त्यात वाय-फाय किंवा ब्लू-टूथसारखे तंत्रज्ञान नाही. 'ईव्हीएम'मध्ये कुठल्याही प्रकारची रेडिओ फ्रिक्वेन्सी एनकोडर किंवा डी-कोडर नसतो. 'ईव्हीएम' 'वन टाइम प्रोग्राम' यंत्र आहे. त्याच्या प्रोग्राममध्ये कधीच बदल किंवा फेरफार करता येत नाही. 'ईव्हीएम'ची आज्ञावली (सॉफ्टवेअर) 'ईसीआयएल' किंवा 'भेल' या ठिकाणी अंतर्गत विकसित केली जाते. या सॉफ्टवेअरची पडताळणी किंवा चाचणी स्वतंत्र गटाकडून केली जाते. 'ईव्हीएम' कधीही बाहेरील सिग्नल स्वीकारू शकत नाही.

## 'व्हीव्हीपॅट'

'व्हीव्हीपॅट' हे स्वतंत्र यंत्र आहे. 'ईव्हीएम', अर्थात इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राला 'व्होटर व्हेरिफाएबल पेपर ऑडिट ट्रेल' नावाचे स्वतंत्र यंत्र जोडले जाते. याच यंत्राला 'व्हीव्हीपॅट' असे म्हणतात. 'व्हीव्हीपॅट' म्हणजे प्रामुख्याने एक पेटी असते. मतदान केल्यानंतर या पेटीला असलेल्या पारदर्शक काचेतून आपण कोणाला मतदान केले त्याची खात्री दर्शविणारी चिठ्ठी दिसते. काही सेकंदांत ही चिठ्ठी कापली जाऊन त्या पेटीत खाली पडते. पेटीत अशा सर्व चिठ्ठ्या जमा होतात. गरज भासल्यास त्या चिठ्ठ्यांद्वारे मतमोजणी करून मतदानाची पडताळणी केली जाते.

भारत निवडणूक आयोगाने ४ ऑक्टोबर २०१० रोजी राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींची एक बैठक आयोजित केली होती. सर्व राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींनी 'ईव्हीएम'बाबत या बैठकीत समाधान व्यक्त केले होते; परंतु मतदान प्रक्रियेत आणखी पारदर्शकता आणण्यासाठी 'व्हीव्हीपॅट'चा वापर करावा, अशी विनंती राजकीय पक्षांनी त्या वेळी केली. आयोगाने हा विषय 'ईव्हीएम'संदर्भातील तांत्रिक



*नांदेड– वाघाळा महानगरपालिकेच्या ११ ऑक्टोबर २०१७ रोजी झालेल्या निवडणुकीत 'व्हीव्हीपॅट'चा प्रायोगिक तत्त्वावर वापर करण्यात आला. तत्पूर्वी त्याची माहिती देण्यासाठी २१ मार्च २०१७ रोजी राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींची बैठक आयोजित करण्यात आली होती.*

तज्ज्ञ समितीकडे अभ्यास आणि आवश्यक त्या शिफारशी मागविण्यासाठी सोपविला. तांत्रिक तज्ज्ञ समितीने 'भेल', 'ईसीआयएल', राजकीय पक्ष आणि विविध संस्थांशी वारंवार चर्चा करून नमुनादाखल 'व्हीव्हीपॅट' विकसित केले. भारत निवडणूक आयोगाने 'व्हीव्हीपॅट'ची जुलै २०११मध्ये लडाख (जम्मू–काश्मीर), तिरुअनंतपुरम (केरळ), चेरापुंजी (मेघालय), पूर्व दिल्ली आणि जैसलमेर (राजस्थान) येथे क्षेत्रीय परीक्षण चाचणी घेतली. या चाचणीत विविध राजकीय पक्षांचे वरिष्ठ नेते, सिव्हिल सोसायटीचे सदस्य आणि संबंधित अभ्यासक सहभागी झाले होते. या परीक्षण चाचणीनंतर 'व्हीव्हीपॅट'चे दुसरे व्हर्जन (आवृत्ती) विकसित करण्यात आले. त्याची पुन्हा जुलै–ऑगस्ट २०१२मध्ये

क्षेत्रीय परीक्षण चाचणी घेण्यात आली. त्यानंतर तांत्रिक तज्ज्ञ समितीची १९ फेब्रुवारी २०१३ रोजी बैठक झाली. या बैठकीत 'व्हीव्हीपॅट'ला मान्यता देण्यात आली, त्याचा वापर करण्याची शिफारस करण्यात आली. भारत निवडणूक आयोगाने १० मे २०१३ रोजी सर्व राजकीय पक्षांची बैठक आयोजित केली. या बैठकीत 'व्हीव्हीपॅट'चे प्रात्यक्षिक दाखविण्यात आले. त्यानुसार केंद्र सरकारने १४ ऑगस्ट २०१३ मध्ये 'कंडक्ट ऑफ इलेक्शन्स रुल्स १९६१'मध्ये आवश्यक त्या सुधारणा केल्या. त्यामुळे 'व्हीव्हीपॅट'च्या वापराचा मार्ग मोकळा झाला. तांत्रिक आणि कायदेशीर प्रक्रिया पार पाडल्यानंतर नागालँडमधील नोकसेन विधानसभा मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीत ४ सप्टेंबर २०१३ रोजी 'व्हीव्हीपॅट'चा सर्वप्रथम वापर केला गेला. 'ईव्हीएम'संदर्भात सर्वोच्च न्यायालयात विविध याचिका दाखल झाल्या होत्या. त्यातील एका प्रकरणात 'भारत निवडणूक आयोगाने लोकसभा व विधानसभा निवडणुकांसाठी टप्प्याटप्प्याने 'व्हीव्हीपॅट'चा (व्होटर व्हेरिफाएबल पेपर ऑडिट ट्रेल) वापर करण्यास सुरुवात करावी,' असे आदेश सर्वोच्च न्यायालयाने ८ ऑक्टोबर २०१३ रोजी दिले.

मा. सर्वोच्च न्यायालयाचे आदेश आणि नोकसेन मतदारसंघातील यशस्वी वापरानंतर आयोगाने विविध निवडणुकांमध्ये 'व्हीव्हीपॅट'चा वापर करण्यास सुरुवात केली. २०१३पासून विविध विधानसभा निवडणुकांत निवडक मतदारसंघांत 'व्हीव्हीपॅट'चा वापर करण्यात आला. गोवा विधानसभेच्या २०१७मधील निवडणुकीत सर्व ४० मतदारसंघांत 'व्हीव्हीपॅट'चा वापर करण्यात आला.



*व्हीव्हीपॅट बॉक्समध्ये जमा होणाऱ्या मतदानाच्या चिठ्ठ्या.*

## नांदेडमध्ये यशस्वी चाचणी

देशातील विविध विधानसभा आणि महाराष्ट्रातील फेब्रुवारी २०१७मध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांनंतर 'व्हीव्हीपॅट'चा वापर करण्याची मागणी होऊ लागली. त्याची दखल घेऊन लोकसभा आणि विधानसभा निवडणुकांच्या धर्तीवर नांदेड-वाघाळा महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीत इलेक्ट्रॉनिक्स कॉर्पोरेशन ऑफ इंडिया (ईसीआयएल) या कंपनीला एका प्रभागात हे 'व्हीव्हीपॅट' प्रायोगिक तत्त्वावर वापरण्यास राज्य निवडणूक आयोगाने परवानगी देण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार 'ईसीआयएल'ने ७० 'व्हीव्हीपॅट' २० सप्टेंबर २०१७ रोजी नांदेड महानगरपालिकेकडे पाठविले. 'व्हीव्हीपॅट'च्या वापरासंदर्भात महानगरपालिका

आयुक्तांनी मान्यताप्राप्त राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींची व इतर मान्यवरांची बैठक २१ सप्टेंबर २०१७ रोजी घेतली. या बैठकीत सर्वांच्या उपस्थितीत सोडतीद्वारे प्रभाग क्रमांक २ची 'व्हीव्हीपॅट'चा प्रायोगिक तत्त्वावर वापर करण्यासाठी निवड केली. 'व्हीव्हीपॅट'चा वापर केलेल्या प्रभाग क्रमांक २ची मतमोजणी करण्यासाठी आवश्यक ती सर्व खबरदारी घेण्यात आली होती. त्यासाठी जिल्हाधिकारी, जिल्हा पोलिस अधीक्षक आणि महानगरपालिका आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित केली होती. समिती सदस्यांच्या उपस्थितीत 'व्हीव्हीपॅट'द्वारे प्राप्त चिठ्ठ्या व कंट्रोल युनिट या दोन्ही प्रकारे मतमोजणी करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. मात्र, कंट्रोल युनिटद्वारे केल्या गेलेल्या मतमोजणीचा निकाल अंतिम असेल, असे आयोगाकडून स्पष्ट करण्यात आले होते.

मतमोजणी प्रक्रियेचे निरीक्षण करण्यासाठी राज्य निवडणूक आयोगाचे सचिव शेखर चन्ने १२ ऑक्टोबर २०१७ रोजी नांदेड येथे स्वतः उपस्थित होते. त्याचबरोबर राज्य निवडणूक आयोगाच्या वतीने जनसंपर्क अधिकारी जगदीश मोरे, कक्ष अधिकारी अतुल जाधव, संजय सावंत व नायब तहसीलदार प्रदीप सुर्वे उपस्थित होते. प्रभाग क्र. २मध्ये प्रत्यक्ष झालेले मतदान, 'व्हीव्हीपॅट'च्या चिठ्ठ्यांची संख्या आणि कंट्रोल युनिटमधील मतांच्या संख्येत कुठलीही



*नांदेड–वाघाळा : महानगरपालिकेच्या निवडणुकीत (११ ऑक्टोबर २०१७) मतदान यंत्रासोबत जोडण्यासाठी सज्ज केलेल्या 'व्हीव्हीपॅट'च्या पेट्या.*

तफावत आढळून आली नाही. कुठल्याही मतदाराची किंवा राजकीय पक्ष अथवा उमेदवाराची काहीही तक्रार नव्हती. आपले मतदान इच्छित उमेदवारालाच जात असल्याची खात्री पटल्याने अनेक मतदारांनी समाधान व्यक्त केले. यातून इलेक्ट्रानिक मतदान यंत्र परिपूर्ण आणि बिनचूक असल्याचे सिद्ध झाले.

'व्हीव्हीपॅट' हे इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राला ('ईव्हीएम') जोडायचे अतिरिक्त यंत्र आहे. त्यामुळे अधिक खर्चासोबतच जास्तीची जागा (स्टोरेज), वाहतूक, निकाल जाहीर करण्यासाठीची वेळखाऊ प्रक्रिया, अधिकाधिक मनुष्यबळाची आवश्यकता इ. मुद्देदेखील उपस्थित झाले आहेत. मुळातच 'ईव्हीएम'मध्ये कुठल्याही प्रकारे छेडछाड किंवा फेरफार करता येत नसल्याचे वारंवार सिद्ध झाले आहे. शिवाय, 'व्हीव्हीपॅट'बाबतही 'ईव्हीएम'सारखेच आरोप होऊ शकतात. ही पार्श्वभूमी लक्षात घेता, 'व्हीव्हीपॅट'चीच मुळात आवश्यकता नाही, अशा प्रकारच्या प्रतिक्रिया अनेकांनी व्यक्त केल्या आहेत. अशा प्रकारच्या प्रतिक्रिया नांदेड-वाघाळा महापालिका निवडणुकीच्या वेळी अनेकांनी व्यक्त केल्या.

# तंत्रज्ञानाचा वापर

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांशी संबंधित सर्व मतदार, उमेदवार, राजकीय पक्ष आदींच्या सोयीसाठी निवडणूक प्रक्रियेचे संगणकीकरण आणि अत्याधुनिकीकरणाच्या कामाने आता वेग घेतला आहे. राज्य निवडणूक आयुक्त ज. स. सहारिया यांच्या कारकिर्दीत ही प्रक्रिया अधिक गतिमान झाली. संगणक प्रणालीद्वारे प्रभागरचना, संगणक प्रणालीद्वारे मतदारयाद्या तयार करणे हे उपाय यशस्वी ठरले. नामनिर्देशनपत्रे दाखल करण्यासाठी संकेतस्थळ, 'ट्रू व्होटर', 'कॉप' आणि 'एफएक्यू' ही मोबाईल ॲप आयोगाने विकसित केली. वारंवार विचारले जाणारे प्रश्न व त्यांची उत्तरे देणारी पुस्तके व ॲप विकसित करणारे महाराष्ट्र देशातील पहिले राज्य ठरले आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांशी संबंधित सर्व मतदार, उमेदवार, राजकीय पक्ष आदींच्या सोयीसाठी निवडणूक प्रक्रियेचे संगणकीकरण आणि अत्याधुनिकीकरणाच्या कामाने आता वेग घेतला आहे.

## संकेतस्थळाची सुविधा

आयोगाच्या प्रारंभीच्या टप्प्यात जिल्हा मुख्यालये इंटरनेटच्या माध्यमातून राज्य निवडणूक आयोगाशी जोडण्यात आली. तत्पूर्वी आयोगाअंतर्गत संगणकीय जाळे निर्माण केले गेले. आयोगाचे संकेतस्थळ विकसित करण्यात आल्यामुळे निवडणुकीशी संबंधित सर्व यंत्रणा, उमेदवार, राजकीय पक्ष आणि मतदारांशी संवाद साधणे अधिक सुलभ झाले.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या २०१२मध्ये झालेल्या निवडणुकांच्या दृष्टीने हे संकेतस्थळ अतिशय महत्त्वाचे ठरले होते. या संकेतस्थळावर प्रत्येक स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणूकविषयक संकेतस्थळाची लिंक देण्यात आली होती. त्यात मतदारयादीतील नाव शोधणे, मतदान केंद्र शोधणे, उमेदवाराच्या प्रतिज्ञापत्राची माहिती बघणे, आपल्या प्रभागाची माहिती जाणून घेणे इत्यादी स्वरूपाच्या सुविधा त्यात उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या.

संगणकीकरण आणि आधुनिक तंत्राच्या वापराने वेळेची, पैशांची आणि कागदांची बचत होऊ शकते. शिवाय पारदर्शकताही येते. याच भूमिकेतून नावीन्यपूर्ण पावले टाकण्याचा प्रयत्नांना राज्य निवडणूक आयुक्त ज. स. सहारिया यांच्या कारकिर्दीत अधिक वेग आला.

## संगणक प्रणालीद्वारे प्रभागरचना

राज्य निवडणूक आयोगाने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी प्रभागरचना करण्याकरिता संगणक प्रणालीचा वापर करण्यास फेब्रुवारी २०१५पासून सुरवात केली. नवी मुंबई, औरंगाबाद, वसई-विरार, कल्याण-डोंबिवली आणि कोल्हापूर महानगरपालिका निवडणुकांसाठी संगणक प्रणालीच्या माध्यमातूनच प्रभागरचना यशस्वीरीत्या करण्यात आली. ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांकरिता प्रभागरचना करताना पारंपरिक पद्धतीऐवजी उपग्रह छायाचित्रांचा यशस्वीरीत्या वापर करण्यात आला. त्यासाठी 'महाराष्ट्र रिमोट सेन्सिंग ॲप्लिकेशन सेंटर (एमआरएसएसी)' या संस्थेची मदत घेण्यात आली. प्रभागरचनेचे नकाशे साधारणतः हाताने तयार केले जातात. आधुनिक तंत्रज्ञानामुळे उपग्रह छायाचित्रांचा वापर करणे शक्य झाल्यामुळे ग्रामपंचायतींच्या प्रभागरचनेचे नकाशे अत्यंत सुस्पष्टरीत्या तयार करणे शक्य झाले. ऑक्टोबर २०१७ ते फेब्रुवारी २०१८ या कालावधीत मुदत संपणाऱ्या सुमारे ८ हजार ४०० ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी या तंत्रज्ञानाचा प्रथमच वापर करण्यात आला. त्यामुळे पारदर्शक पद्धतीने प्रभागरचना करण्यात आली. परिणामी, त्यावरील हरकती व आक्षेपांचे प्रमाण लक्षणीयरीत्या कमी झाले.

## संगणक प्रणालीद्वारे मतदारयादी

प्रभागरचनेबरोबरच प्रभागनिहाय मतदारयाद्या तयार करण्यासाठीदेखील आयोगाने संगणक प्रणाली विकसित केली आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या




*राज्य निवडणूक आयोगाचे अद्ययावत संकेतस्थळ.*

निवडणुकांसाठी स्वतंत्ररीत्या मतदारयादी तयार केली जात नाही. विधानसभा मतदारसंघाच्या मतदारयाद्या या निवडणुकांसाठी वापरल्या जातात. त्यासाठी त्या संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेच्या प्रभागांनुसार विभागल्या जातात. पूर्वी ही प्रक्रिया पारंपरिक पद्धतीने केली जात होती. आता या मतदारयाद्या संगणकीय प्रणालीद्वारे तयार केल्या जातात. त्यामुळे मतदारयाद्या अधिक बिनचूक होण्यास मदत होते.

## नामनिर्देशनपत्रांसाठी संकेतस्थळ

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी उमेदवारी अर्ज भरण्याकरिता राज्य निवडणूक आयोगाने महाऑनलाईनच्या मदतीने संकेतस्थळाची सुविधा उपलब्ध करून दिली आहे. त्यासाठी https://panchayatelection.

maharashtra.gov.in हे स्वतंत्र संकेतस्थळ विकसित केले आहे. नामनिर्देशनपत्रे ऑनलाइन भरण्याची सुरुवात २३ डिसेंबर २०१४ रोजी झालेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांपासून करण्यात आली.

इच्छुक उमेदवारांना या संकेतस्थळावरील Create candidate registration वर माहिती भरून लॉग-इन आयडी व पासवर्ड मिळवावा लागतो. लॉग-इन आयडी व पासवर्ड वापरून नामनिर्देशनपत्रात माहिती भरल्यानंतर नामनिर्देशनपत्राची छापील प्रत (प्रिंटआउट) घ्यावी लागते. त्या प्रिंटआउटवर स्वाक्षरी करून ते निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडे विहित मुदतीत व वेळेत सादर करावे लागते. शेवटच्या तारखेपर्यंत व त्या दिवशीच्या विशिष्ट मुदतीपूर्वी संकेतस्थळावर २४ तास नामनिर्देशनपत्रे भरण्याची सुविधा उपलब्ध असते. संकेतस्थळावर नामनिर्देशनपत्र भरल्यावर प्रिंटआउट घेऊन ती निवडणूक अधिकाऱ्याकडे जमा करेपर्यंत संकेतस्थळावरील नामनिर्देशनपत्रात अनेक वेळा दुरुस्त्या करण्याचीही सुविधा उपलब्ध आहे. नामनिर्देशनपत्रासोबतच विविध घोषणापत्रे/प्रतिज्ञापत्रेदेखील संकेतस्थळावर भरण्याची सुविधा आहे.




*स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत नामनिर्देशनपत्रातील माहिती भरण्यासाठी उपलब्ध करून देण्यात आलेले संकेतस्थळ.*

भंडारा आणि गोंदिया जिल्हा परिषद व त्याअंतर्गतच्या पंचायत समित्यांच्या निवडणुकांमध्येदेखील नामनिर्देशनपत्रे (उमेदवारी अर्ज) संकेतस्थळावर भरण्याची सुविधा होती. प्रथमच एवढ्या मोठ्या प्रमाणावर या सुविधेचा वापर करण्यात आला. दुर्गम भाग असूनही या जिल्ह्यांत संकेतस्थळाद्वारे नामनिर्देशनपत्रे भरण्यास उत्तम प्रतिसाद लाभला. गोंदिया जिल्हा परिषदेच्या ५३ जागांसाठी एकूण ४५७ नामनिर्देशनपत्रे प्राप्त झाली. त्यातली ३३० नामनिर्देशनपत्रे संकेतस्थळावर भरण्यात आली. जिल्ह्यात ८ पंचायत समित्यांच्या एकूण १०६ जागांसाठी एकूण ६५३ नामनिर्देशनपत्रे प्राप्त झाली. त्यातील ४४५ संकेतस्थळावर भरण्यात आली. भंडारा जिल्हा परिषदेच्या एकूण ५२ जागांसाठी एकूण ५३५ नामनिर्देशनपत्रे प्राप्त झाली. त्यातील ५३४ संकेतस्थळावर भरण्यात आली. जिल्ह्यातील ७ पंचायत समितीच्या एकूण १०४ जागा आहेत. त्यासाठी एकूण ७६६ नामनिर्देशनपत्रे प्राप्त झाली. त्यातील ७५६ संकेतस्थळावर भरण्यात आली.

## संकेतस्थळाद्वारे १०० टक्के नामनिर्देशनपत्रे

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या अलीकडच्या सर्वच निवडणुकांमध्ये १०० टक्के उमेदवारांनी संकेतस्थळाद्वारेच नामनिर्देशनपत्रे व शपथपत्रे दाखल केली आहेत. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचा दर पाच वर्षांनी एक मोठा टप्पा येत असतो. फेब्रुवारी २०१७मध्ये हा मोठा टप्पा पार पडला. त्यात १० महानगरपालिका, २५ जिल्हा परिषदा व २८३ पंचायत समित्या; तसेच तत्पूर्वी ऑक्टोबर २०१६ ते जानेवारी २०१७ या कालावधीत झालेल्या २१० नगरपरिषदा/ नगरपंचायतींच्या एकूण १० हजार ४७५ जागांसाठी मतदान झाले. त्यासाठी सर्व १ लाख ८७ हजार १३५ नामनिर्देशनपत्रे संगणक प्रणालीद्वारे दाखल झाली होती. निवडणूक प्रक्रियेसाठी आधुनिक तंत्रज्ञानाच्या दिशेने टाकलेले हे नावीन्यपूर्ण पाऊल ठरले. राजकीय पक्ष आणि उमेदवारांच्या सहकार्यामुळेच ते शक्य झाले.

निवडणुकांची संख्या जास्त असल्याने फेब्रुवारी २०१७मध्ये एकाच वेळी प्रचंड संख्येने संकेतस्थळाद्वारे नामनिर्देशनपत्रे दाखल केली जात होती. नामनिर्देशनपत्रे दाखल करण्याची विशिष्ट मुदत असली, तरी त्या कालावधीत २४ तास ही सुविधा उपलब्ध होती. त्यामुळे घरी किंवा अन्य कोणत्याही ठिकाणी अथवा कोणत्याही वेळी नामनिर्देशनपत्रातील माहिती भरता येत होती. त्यात प्रसंगी काही अडचणीदेखील आल्या होत्या; परंतु त्याबाबत आयोगाकडून सतर्कता म्हणून विविध उपाययोजना करण्यात आल्याने हा उपक्रम सर्वांच्या सहकार्याने यशस्वी होऊ शकला. संबंधित निवडणूक निर्णय अधिकाऱ्याच्या कार्यालयात संकेतस्थळाद्वारे नामनिर्देशनपत्र भरण्यासाठी मदत कक्षांचीदेखील सेवा उपलब्ध करून देण्यात आली होती.

ग्रामपंचायतींसह सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांत नामनिर्देशनपत्रे संकेतस्थळावर भरण्यास सुरवात झाली. त्यामुळे सर्व उमेदवारांची एकत्रित माहिती उपलब्ध होऊ शकली. त्यातून डेटा बँक विकसित होऊ शकते. संदर्भ आणि संशोधकांसाठी ही बँक महत्त्वाची ठरू शकेल.

## सर्वांसाठी मोबाइल 'ॲप'

राज्य निवडणूक आयोगाने 'ट्रू व्होटर', 'कॉप' आणि 'एफएक्यू' ही तीन मोबाईल ॲप विकसित केली आहेत. यामुळे निवडणूक प्रक्रिया अधिकाधिक सुलभ होण्यास मदत झाली आहे.

## ट्रू व्होटर

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसंदर्भातील सुविधा, माहिती व साहाय्य तातडीने उपलब्ध व्हावे, या दृष्टीने आयोगाने 'ट्रू व्होटर' ॲप विकसित केले आहे. या ॲपच्या माध्यमातून मतदारांना मतदारयादीतील आपले नाव व मतदान केंद्र शोधता येते. मतदान केंद्रावर जाण्यासाठी गुगल मॅपद्वारे मार्गक्रमण करता येते. उमेदवाराने शपथपत्रांमध्ये भरलेली माहिती मतदारांना पाहता येते. उमेदवारांनी दाखल केलेला निवडणूक खर्च पाहता येतो. निवडणुकीचा निकालही मिळू शकतो. उमेदवारांना आपले प्रोफाईल तयार करता येते. उमेदवारांना सुटसुटीतपणे दैनंदिन खर्च नोंदविता येतो. ॲपमधून नमुना– १, २ व ३ पीडीएफ स्वरूपात प्राप्त करून ते निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांना सादर करणेदेखील शक्य होते. निवडणुकीशी संबंधित अधिकारी, कर्मचाऱ्यांसाठी मतदारयादी बनविणे, मतदान केंद्रांचा नकाशा तयार करणे, महत्त्वाचे अहवाल सादर करणे, मतदानाची आकडेवारी देणे, तातडीच्या परिस्थितीमध्ये अलार्म पाठविणे इ. सुविधाही या ॲपमध्ये देण्यात आल्या आहेत. या 'ॲप'द्वारे फेब्रुवारी २०१७मध्ये झालेल्या निवडणुकीच्या वेळी ६७ लाख लोकांनी मतदारयादीतील आपले नाव शोधले. २३ लाख लोकांनी आपल्या उमेदवारांबद्दलची माहिती जाणून घेतली. १३ लाख लोकांनी मतदान केंद्र शोधण्यासाठी या 'ॲप'चा वापर केला. ३० लाख लोकांनी मतदान केंद्रनिहाय याद्या डाऊनलोड केल्या.

## कॉप

राज्य निवडणूक आयोगाने 'कॉप' (Citizens On Patrol) या 'ॲप'चादेखील 'असोशिएशन फॉर डेमोक्रॅटिक रिफॉर्म्स' (ADR) या संस्थेच्या सहकार्याने विकसित केले आहे. या ॲपच्या नावातच 'सिटीझन्स ऑन पॅट्रोल' म्हणजे जनतेची नजर किंवा गस्त, असा आशय सामावलेला आहे. या ॲपच्या माध्यमातून सर्वसामान्य मतदारही निवडणूक प्रक्रियेवर नजर ठेवू शकतो. आचारसंहिताभंगाच्या तक्रारी अत्यंत सोप्या पद्धतीने करता येऊ शकतात. प्रचाराच्या कालावधीत काही गैरप्रकार आढळल्यास छायाचित्रासह तो 'ॲप'द्वारे तत्काळ निवडणूक यंत्रणेच्या निदर्शनास आणून देता येतात. त्यानंतर निवडणूक संनियंत्रण समिती त्याआधारे कार्यवाही करते. या ॲपच्या माध्यमातून तक्रार करणाऱ्याचे नाव आणि मोबाईल क्रमांक गोपनीय ठेवला

जातो. आयोगाने हे ॲप सर्वप्रथम ८ जानेवारी २०१७ रोजी नागपूर व गोंदिया या जिल्ह्यांतील ११ नगरपरिषदांच्या निवडणुकांसाठी उपलब्ध करून दिले होते.

## 'एफएक्यू'




मतदारांसह निवडणुकीशी संबंधित सर्वांना निवडणूक प्रक्रियेची सहजतेने माहिती मिळावी आणि पारदर्शकता वाढीस मदत व्हावी, या उद्देशाने आयोगाने वारंवार विचारले जाणारे प्रश्न व त्यांची उत्तरे, हा प्रकल्प हाती घेतला होता. महाराष्ट्रात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका (ग्रामपंचायती, जिल्हा परिषदा/पंचायत समित्या, नगरपरिषदा/नगरपंचायती व महानगरपालिका) ५ वेगवेगळ्या कायद्यांनुसार घेण्यात येतात आणि त्यातल्या निवडणूकविषयक तरतुदींमध्येही बरीच भिन्नता आहे. त्यामुळे या निवडणुकांशी निगडित अधिकारी/कर्मचारी, राजकीय पक्ष, उमेदवार, मतदार इत्यादींच्या मनात सातत्याने वेगवेगळे प्रश्न (Frequently Asked Questions) उपस्थित होतात व ते वारंवार विचारले जातात. या प्रश्नांची उत्तरे सहज व सोप्या भाषेत मिळावीत, या उद्देशाने स्थानिक स्वराज्य संस्थानिहाय चार स्वतंत्र पुस्तके तयार केली आहेत. असा उपक्रम राबविणारे महाराष्ट्र हे देशातील बहुधा पहिलेच राज्य आहे. एफएक्यू ॲपच्या नावाने ही सर्व माहिती मोबाईलवरसुद्धा उपलब्ध करून देण्यात आली होती.




## महाव्होटर 'चॅटबॉट'

मोबाईलच्या एका क्लिकवर आता विविध सेवा सहज उपलब्ध होऊ लागल्या आहेत. त्याला निवडणूक प्रक्रियेचा अपवाद करून चालणार नाही. याच उद्देशाने राज्य निवडणूक आयोगाने 'बॉट' या अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून लाखो मतदारांपर्यंत पोचण्याचा यशस्वी प्रयत्न केला आहे. तरुण मतदारांचा त्याला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. आयोगाने फेसबुकच्या मदतीने या तंत्रज्ञानाचा वापर केला. 'चॅटबॉट'द्वारे फेसबुकच्या मेसेंजरच्या माध्यमातून निवडणूक प्रक्रियेशी संबंधित हवी ती माहिती आपल्या मोबाईलवर मिळविता येत होती. बॉट तंत्रज्ञान आर्टिफिशियल इंटेलिजन्सवर आधारित आहे. निवडणुकीसंबंधी आपल्या मनातील हव्या त्या शंकेचे निरसन करण्याचा प्रयत्न याद्वारे करण्यात आला आहे.

# मतदार जागृती

राज्य निवडणूक आयोगाने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका मुक्त, निर्भय व पारदर्शक वातावरणात पार पाडण्याबरोबरच मतदार जागृतीसाठी विविध नावीन्यपूर्ण उपक्रम राबविले. राजकीय पक्ष, उमेदवार आणि मतदारांकडूनही त्याला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. मतदारांचा सक्रिय सहभाग वाढविण्यासाठीचे प्रयत्न गौरवास्पद आहेत. सन २०१७च्या निवडणुकांमध्ये वाढलेले मतदानाचे प्रमाण ही या प्रयत्नांचीच फलश्रुती ठरली.

लोकशाही प्रक्रियेत मतदार हा केंद्रबिंदू असतो. मतदाराच्या सक्रिय सहभागाशिवाय सुदृढ आणि सशक्त लोकशाही अशक्य आहे. मतदानाच्या माध्यमातून मतदारांच्या आशाआकांक्षांचे प्रतिबिंब उमटत असते. आत्तापर्यंतचा अनुभव लक्षात घेता, सर्वांत छोट्या क्षेत्रासाठी असलेल्या निवडणुकीत मतदानाचे प्रमाण अधिक असते. क्षेत्र मोठे होत गेल्यास मतदानाचे प्रमाण तुलनेने कमी-कमी होत जाते. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या बाबतीत ग्रामपंचायत सर्वांत लहान क्षेत्र असते. तेथे मतदानाचे प्रमाण सर्वाधिक असते. महानगरपालिका सर्वांत मोठे क्षेत्र असते. तेथे मतदानाचे प्रमाण तुलनेत कमी असते. लोकसभेच्या निवडणुकांमध्ये तर सर्वांत कमी मतदानाचे प्रमाण असते. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांतील मतदानाचे प्रमाण लक्षात घेऊन राज्य निवडणूक आयोगाने मतदार जागृतीवर वेळोवेळी भर दिला आहे.

मतदार जागृतीच्या दृष्टीने सन २०१६ आणि २०१७ ही वर्षे अतिशय वेगळी आणि महत्त्वपूर्ण ठरली. त्यातही २०१७चे पहिले सहा महिने निवडणुकीच्या धामधुमीचे होते. या सहामाहीत १६ महानगरपालिका, १ नगर परिषद, ३ नगरपंचायती, २५ जिल्हा परिषदा, २८४ पंचायत समित्या आणि ८० ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुका पार पडल्या. राज्य निवडणूक आयोगाने या निवडणुका मुक्त, निर्भय व पारदर्शक वातावरणात पार पाडण्याबरोबरच मतदार जागृतीसाठी विविध नावीन्यपूर्ण उपक्रम राबविले. राजकीय पक्ष, उमेदवार आणि मतदारांकडूनही त्याला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

## मतदारांच्या सहभागासाठी

लोकशाहीच्या बळकटीकरणासाठी आपल्या सर्वांच्या योगदानाची आवश्यकता आहे आणि ती आपली जबाबदारीदेखील आहे. लोकशाहीत निवडणूक हा एक अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. लोकशाहीच्या बळकटीकरणाकरिता निवडणुकांमध्ये मतदानाच्या माध्यमातून मतदारांचा अधिकाधिक सहभाग वाढविणे आवश्यक आहे. १८ वर्षांवरील प्रत्येक नागरिकाने मतदार म्हणून मतदार यादीत नोंदणी करणे, मतदार यादीत नाव असलेल्या अधिकाधिक मतदारांनी मतदान करणे, निर्भय, मुक्त व पारदर्शक निवडणुकांसाठी सगळ्यांनी सजगता बाळगणे यातून मतदारांचा सहभाग वाढविता येणे शक्य आहे. राज्य निवडणूक आयोगाने वरील तीन मुद्द्यांचा विचार करून काही नावीन्यपूर्ण उपाययोजना केल्या. त्यासाठी एक आराखडा तयार केला होता.

भारत निवडणूक आयोगाकडून तयार करण्यात येणारी विधानसभा मतदारसंघांची यादी जशीच्या तशी स्थानिक स्वराज्य स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी वापरली जाते; परंतु त्याची नागरिकांना माहिती व्हावी आणि कुणीही या निवडणुकीत मतदानापासून वंचित राहू नये म्हणून मतदार नोंदणीसाठीदेखील आयोगाने व्यापक मोहीम हाती घेतली होती. त्याचबरोबर मतदानाचे प्रमाण वाढविणे आणि नैतिकतापूर्ण मतदानासाठीदेखील वेळोवेळी मतदार जागृती केली.

स्थानिक स्वराज्य संस्था लोकशाहीचा पाया आहे. त्याच्या मजबुतीसाठी मतदार जागृती अभियानाला लोकचळवळीचे स्वरूप प्राप्त करून देण्याचा प्रयत्न

## मतदार जागृती मोहिमांचा तपशील

| स्थानिक स्वराज्य संस्था | मतदार नोंदणी | मतदानाचे प्रमाण वाढविणे |
|---|---|---|
| नगरपरिषदा व नगरपंचायती | ८ ऑक्टोबर ते ८ नोव्हेंबर २०१५<br>१ जुलै ते ३१ ऑगस्ट २०१६ | नोव्हेंबर २०१६ ते जानेवारी २०१७ |
| महानगरपालिका (१०) | ८ ऑक्टोबर ते ८ नोव्हेंबर २०१५<br>१६ सप्टेंबर ते १४ ऑक्टोबर २०१६ | जानेवारी व फेब्रुवारी २०१७ |
| जिल्हा परिषदा व पंचायत समित्या | ८ ऑक्टोबर ते ८ नोव्हेंबर २०१५<br>१६ सप्टेंबर ते १४ ऑक्टोबर २०१६ | जानेवारी व फेब्रुवारी २०१७ |
| महानगरपालिका (६) | ८ ऑक्टोबर ते ८ नोव्हेंबर २०१५<br>१६ सप्टेंबर ते १४ ऑक्टोबर २०१६ | साधारणतः एप्रिल २०१७ |

राज्य निवडणूक आयोगाने केला. या प्रयत्नांना विविध संस्था, संघटना आणि व्यक्तींनी साथ दिली. महाराष्ट्र राज्य पर्यटन विकास महामंडळासारख्या शासकीय– निमशासकीय संस्थांसह हॉटेल्स संघटना, रिक्षा– टॅक्सी चालक/मालक संघटना, केशकर्तनालये इत्यादींनी मतदानासाठी प्रोत्साहनाकरिता सवलतींचा वर्षाव केला. शाळा, महाविद्यालये व विद्यापीठांनीदेखील सक्रिय सहभाग घेतला. जनजागृती फेऱ्या, वक्तृत्व, चित्रकला स्पर्धा व इतर विविध उपक्रमांचे आयोजन करून तरुण मतदारांमध्ये चैतन्यदायी वातावरण निर्माण करण्यास हातभार लावला.

हिंदी– मराठी चित्रपटसृष्टीतील अनेक नामवंत कलाकार मतदार जागृतीसाठी पुढे आले. मराठी वृत्तवाहिन्यांनीही विविध उपक्रम आणि कार्यक्रमांद्वारे मतदारांना साद घातली. अन्य वाहिन्यांनीही मनोरंजनातून निवडणुकांच्या दृष्टीने प्रबोधनात्मक कार्यक्रम सादर केले. गृहनिर्माण संस्थांनीही मोलाचा वाटा उचलला.

मतदार जागृतीसाठी सोशल मीडियाबरोबरच 'मिस्ड कॉल' सुविधा आणि 'चॅटबॉट' तंत्रज्ञानाचादेखील वापर करण्यात आला. राजकीय पक्ष, उमेदवार व मतदारांनी मोबाईल ॲप्लिकेशन्सना दिलेला प्रतिसादही कौतुकास्पद आहे. सर्वच मतदान केंद्रांच्या बाहेर उमेदवारांच्या शपथपत्रांतील गोषवाऱ्याचे फलक लक्षवेधी ठरले. ठाणे महानगरपालिकेसाठीच्या मतदान केंद्रावर मतदारांसाठी 'सेल्फी पॉइंट' होता. पिंपरी–चिंचवडमध्ये मतदारांसाठी लाल गालिचा (रेड कार्पेट) टाकला होता. वेरुळ येथील मतदान केंद्रावर सर्व महिला अधिकारी/ कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली होती. बारामती तालुक्यातील सुपा येथे पोपटी; तर काटेवाडी येथे गुलाबी मतदान केंद्र होते.




*मुंबई येथे १९ जानेवारी २०१७ रोजी मतदार जागृती मोहिमेसंदर्भातील 'व्होटरमित्रा' या बोधचिन्हाच्या अनावरणाप्रसंगी बोधचिन्ह न्याहाळताना राज्यपाल श्री. सी. विद्यासागर राव.*

## 'व्होटरमित्रा'

'व्होटरमित्रा' या बोधचिन्हाचे (Mascot) अनावरण, 'कॉप' मोबाईल ॲप व 'मिस्ड कॉल' सुविधेची सुरुवात मा. राज्यपाल श्री. विद्यासागर राव यांच्या हस्ते १९ जानेवारी २०१७ रोजी झाली. मुंबई येथील सह्याद्री अतिथिगृहात हा कार्यक्रम पार पडला. राज्य निवडणूक आयुक्त श्री. ज. स. सहारिया, राज्यपालांचे सचिव बी. वेणुगोपाल रेड्डी, उपसचिव परिमल सिंह, आयोगाचे तत्कालीन सचिव शेखर चन्ने या वेळी उपस्थित होते. मतदार जागृतीकरिता 'व्होटरमित्रा' हे बोधचिन्ह तयार करण्यात आले आहे. मतदारांना प्रोत्साहित करण्यासाठी त्याचा सोशल मीडियावर ॲनिमेशनच्या स्वरूपातही वापर करण्यात आला.

## देशभरातील निवडणुकांसाठी मार्गदर्शक

''स्थानिक स्वराज्य संस्थांची निवडणूक प्रक्रिया लोकाभिमुख करण्याचा राज्य निवडणूक आयोगाचा प्रयत्न कौतुकास्पद आहे. मतदारांचा सक्रिय सहभाग वाढविण्यासाठीचे प्रयत्न गौरवास्पद आहेत. या निवडणुका अधिकाधिक मुक्त, निर्भय व पारदर्शक वातावरणात पार पाडण्यासाठी राज्य निवडणूक आयोगाने महत्त्वपूर्ण पावले उचलली आहेत. ती देशभरातील निवडणुकांसाठी मार्गदर्शक ठरतील,'' असे गौरवोद्‌गार राज्यपाल सी. विद्यासागर राव यांनी व्होटरमित्राच्या अनावरणाप्रसंगी काढले.

## मिस्ड कॉल आणि सोशल मीडिया

मतदान करण्याची प्रतिज्ञा करण्यासाठी ९०२९९०१९०१ या क्रमांकावर मिस्ड कॉल सुविधा उपलब्ध करून देण्यात आली होती. मिस्ड कॉल केल्यानंतर मतदाराला लघुसंदेश (एसएमएस) येत असे. त्यात एक लिंक असायची. लिंकवर क्लिक केल्यावर 'महाव्होटर' नावाने 'चॅटबॉट' सुविधा सुरू होत असे. त्यासाठी फेसबुक मेसेंजरचा आधार घेण्यात आला होता. या माध्यमातून मतदारांना निवडणुकीसंदर्भातील आपले प्रश्न व शंका सहज विचारता येत होत्या. त्यांचे निरसन होत असे. मतदारयादीतील नाव, मतदान केंद्र, मतदानाचा

दिनांक, उमेदवारांचा तपशील इ. माहिती मिळवता येत होती. चॅटबॉट हे तंत्रज्ञान आर्टिफिशिअल इंटेलिजन्सद्वारे काम करते. निवडणुकांसाठी पहिल्यांदाच त्यांचा वापर केला गेला.

बॉट तंत्रज्ञान विकसित करणारी जगप्रसिद्ध ‘गपशप’ कंपनी, निवडणुकांसंदर्भात कार्यरत असलेली ‘ऑपरेशन ब्लॅक डॉट’ ही स्वयंसेवी संस्था, विविध विद्यापीठे व महानगरपालिकादेखील या उपक्रमात सहभागी झाल्या होत्या. तरुण आणि महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये हा उपक्रम अधिक लोकप्रिय झाला. चॅटबॉटच्या माध्यमातून मतदारांशी दुतर्फा सुसंवाद साधला जात होता. निवडणूक प्रक्रियेमध्ये आपण सक्रिय सहभागी असून मतदान करणे आवश्यक आहे, याची जाणीव याद्वारे मतदारांमध्ये निर्माण करण्यास हातभार लाभला. या उपक्रमाचे आयोगाने ‘महाव्होटर चॅटबॉट’ असे नामकरण केले होते. हा उपक्रम अतिशय नावीन्यपूर्ण ठरला.




*ठाणे महानगरपालिकेच्या निवडणुकीच्या वेळी २१ फेब्रुवारी २०१७ रोजी एका मतदान केंद्राबाहेर मतदारांना मतदानासाठी प्रोत्साहित करण्यासाठी तयार करण्यात आलेला सेल्फी पॉइंट. तेथे मतदारांचे स्वागत करताना महापालिका आयुक्त संजीव जयस्वाल.*



*महानगरपालिकेच्या २०१७ मध्ये झालेल्या निवडणुकीच्या वेळी काही मतदान केंद्रांवर मतदारांसाठी 'रेड कार्पेट' अंथरण्यात आले होते.*

## नामवंतांची मतदारांना साद

महाव्होटर चॅटबॉटबरोबरच फेसबुक, ट्विटर, इन्स्टाग्राम, यू ट्यूब, ब्लॉग इ. सोशल मीडियाच्या प्लॅटफॉर्मचा मतदार जागृतीसाठी प्रभावी वापर करण्यात आला. उद्योग जगतातील मान्यवर व्यक्तींसोबतच हिंदी आणि मराठी चित्रपटसृष्टीतील नामांकित कलावंताद्वारे मतदारांना मतदानासाठी साद घालण्यात आली. जिंगल्स, मायक्रोफिल्म याद्वारेदेखील जनजागृती करण्यात आली. याशिवाय सिनेमा थिएटर आणि नाट्यगृहांमध्येदेखील मतदारांना मतदानासाठी आवाहन केले जात होते.

## 'एसएमएस' ब्लास्टिंग

स्मार्ट फोनमुळे सोशल मीडियाचे विविध प्लॅटफार्म उपलब्ध झाले असले तरी एसएमएस हेसुद्धा एक संवादाचे प्रभावी साधन आहे. त्यासाठी राज्य निवडणूक आयोगाने विविध मोबाईल सेवा पुरवठादार कंपन्यांना सामाजिक जबाबदारीतून मतदार म्हणून नोंदणी करणे आणि मतदान करणे यासाठी जनजागृतीसाठी मोफत 'एसएमएस' पाठविण्याचे आवाहन केले होते. त्याला अनेक कंपन्यांनी चांगला प्रतिसाद दिला. त्याचबरोबर प्रत्यक्ष मतदानाच्या वेळी मतदारांपर्यंत पोचण्यासाठी अत्यल्प दरात ही सुविधा



*बारामती तालुक्यातील सुपा येथे पोपटी; तर काटेवाडी येथे गुलाबी मतदान केंद्र होते. गुलाबाचे फुल देऊन तेथे मतदारांचे स्वागत करण्यात येत होते.*

बहुतांश कंपन्यांनी उपलब्ध करून दिली होती.

## लोकचळवळीमुळे सवलतींचा वर्षाव

राज्य निवडणूक आयोगाने समाजातील विविध घटकांना मतदार जागृती मोहिमेत सक्रिय सहभागी होण्याचे आवाहन केले होते. त्यास विविध घटकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. विविध हॉटेल, संस्था, संघटनांनी मतदान करून येणाऱ्यांसाठी सवलती जाहीर केल्या होत्या. मुंबई पंचतारांकित हॉटेलमध्येही प्रचार फलक व स्टँडी लावण्यात आल्या होत्या. माथेरान हॉटेल असोसिएशनने २० टक्के सवलत दिली होती; परंतु मतदान करून न येणाऱ्या ग्राहकांबाबत नाराजी व्यक्त करण्याचाही निर्णय घेण्यात आला होता. या सवलती साधारणतः: २१ ते २८ फेब्रुवारी २०१७ या कालावधीत होत्या.



### मतदारांसाठी सवलती

- महाराष्ट्र राज्य पर्यटन विकास महामंडळ : निवासासाठी २५ टक्के
- माथेरान हॉटेल असोसिएशन : २० टक्के
- लोणावळा-खंडाळा हॉटेल असोसिएशन : निवास २० टक्के, खानपान १५ टक्के
- महाबळेश्वर हॉटेल असोसिएशन : निवास २० टक्के, खानपान १५ टक्के
- आहार, मुंबई : १० ते २० टक्के

## उद्योग जगताचा उत्स्फूर्त प्रतिसाद

स्थानिक स्वराज्य संस्थांमधील विशेषतः फेब्रुवारी २०१७मध्ये झालेल्या महानगरपालिका निवडणुकीतील मतदानाचे प्रमाण वाढविण्यासाठी राबविण्यात आलेली मतदार जागृती मोहीम पुढे नेण्यासाठी उद्योग जगताचाही हातभार लाभला. राज्य निवडणूक आयोगाच्या आवाहनाला मान्यवर उद्योगपतींनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. श्री. रतन टाटा, श्री. आनंद महिंद्रा व श्री. हर्ष गोयंका यांनी वेगवेगळ्या वेळी स्वत: आयोगाच्या कार्यालयाला भेट देऊन या संदर्भात श्री. सहारिया यांच्याशी प्रत्यक्ष चर्चा केली. त्यानंतर त्यांनी आपापल्या उद्योगसमूहातील कर्मचाऱ्यांना वेळेच्या सवलतीबरोबरच मतदानासाठीही प्रोत्साहन दिले. आपल्या उद्योगसमूहांच्या कार्यालयांत व कारखान्यांमध्ये मतदार जागृतीबाबत फलक लावले.

## 'मुंबई राईज, मुंबई व्होट'

बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई विद्यापीठ व भारतीय औद्योगिक महासंघ (Confederation of Indian Industry) यांच्या वतीने २५ जानेवारी २०१७ रोजी मतदार दिनानिमित्त 'मुंबई राईज, मुंबई वोट'




*वेरूळ (जि. औरंगाबाद) येथील मतदान केंद्रावर सर्व महिला अधिकारी–कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली होती.*



१



२




*१) मतदार जागृती मोहिमेत सहभाग घेण्यासंदर्भात चर्चा करण्याकरिता राज्य निवडणूक आयोगाच्या कार्यालयास उद्योगपती श्री. रतन टाटा यांची १ फेब्रुवारी २०१७ रोजी भेट. २) ३१ जानेवारी २०१७ रोजी आनंद महिंद्रा तर ३) श्री. हर्ष गोयंका यांनी २९ जानेवारी २०१७ रोजी भेट दिली.*

या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. मुंबई विद्यापीठात हा कार्यक्रम झाला. राज्य निवडणूक आयुक्त श्री. ज. स. सहारिया, आयोगाचे सचिव श्री. शेखर चन्ने, बृहन्मुंबई महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त संजय देशमुख, 'सीआयआय'चे प्रदेशाध्यक्ष सुनील खन्ना, उपाध्यक्ष निनाद कर्पे, विद्यापीठ विकास मंडळाचे संचालक डॉ. अनिल पाटील, टाटा सन्सच्या उपमहाव्यवस्थापक धारणा धमिजा, असोसिएशन फॉर डेमोक्रॅटिक रिफॉर्म्सचे संस्थापक-विश्वस्थ डॉ. अजित रानडे, टाटा कॅपिटल फायनान्सच्या बिझनेस डेव्हलपमेंट हेड कश्मिरा मेवावाला आदी चर्चासत्राला उपस्थित होते.

## बँकांचाही सहभाग

मतदार जागृतीच्या कार्यात अधिकाधिक घटकांना सामावून घेताना बँकांनादेखील आवाहन करण्यात आले होते. राज्यस्तरीय बँकर्स समितीच्या माध्यमातून सर्व

बँकांना याबाबत कळविण्यात आले होते. आयोगाच्या कार्यालयात वेळोवेळी बैठकाही घेण्यात आल्या होत्या. त्यानुसार बँकांनी आपापल्या कार्यालयात अधिकारी/कर्मचाऱ्यांना मतदानासाठी प्रोत्साहन दिले, बॅनर्स लावले, एसएमएस पाठविले.

## गृहनिर्माण संस्थांचा सहभाग

शहरांमध्ये गृहनिर्माण संस्थांत लाखो मतदार राहतात. काही उच्चभ्रू गृहनिर्माण संस्थांमध्ये राहणाऱ्या मतदारांमध्ये मतदानाबाबत उदासीनता दिसून येते. तेथील मतदारांनी अधिकाधिक संख्येने मतदान करावे,




*बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई विद्यापीठ व भारतीय औद्योगिक महासंघ (Confederation of Indian Industry) यांच्या वतीने २५ जानेवारी २०१७ रोजी मतदार दिनानिमित्त 'मुंबई राईज, मुंबई व्होट' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. राज्य निवडणूक आयुक्त श्री. ज. स. सहारिया, आयोगाचे तत्कालीन सचिव श्री. शेखर चन्ने, बृहन्मुंबई महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त संजय देशमुख, 'सीआयआय'चे प्रदेशाध्यक्ष सुनील खन्ना, उपाध्यक्ष निनाद कर्पे, विद्यापीठ विकास मंडळाचे संचालक डॉ. अनिल पाटील, टाटा सन्सच्या उपमहाव्यवस्थापक धारणा धमिजा, असोसिएशन फॉर डेमोक्रॅटिक रिफॉर्मसचे संस्थापक विश्वस्त डॉ. अजित रानडे, टाटा कॅपिटल फायनान्सच्या बिझनेस डेव्हलपमेंट हेड कश्मिरा मेवावाला आणि पुणे येथील गोखले इन्स्टिट्यूट ऑफ पॉलिटिक्स ॲण्ड इकॉनॉमिक्स या संस्थेच्या प्रा. मानसी फडके चर्चासत्राला उपस्थित होत्या.*

यासाठी त्यांना प्रोत्साहित करण्याची आवश्यकता असते. त्यासाठी राज्य निवडणूक आयोगाने गृहनिर्माण संस्थेचे अध्यक्ष, सचिव, गृहनिर्माण संस्था महासंघाचे पदाधिकारी यांच्याशी वेळोवेळी संपर्क साधला. राज्य निवडणूक आयुक्त श्री. ज. स. सहारिया यांनी स्वत: त्यांच्याशी संवाददेखील साधला आणि त्यांना मतदान करण्यासाठी प्रोत्साहित केले. त्याचबरोबर सहकार विभागांच्या सचिवांशीदेखील राज्य निवडणूक आयोगाने समन्वय साधला. त्यानंतर गृहनिर्माण संस्थांचे सहकार्य आयोगाला मिळू लागले. सहकार विभागाने निर्गमित केलेल्या २२ ऑगस्ट २०१२च्या शासन निर्णयानुसार गृहनिर्माण संस्थांना निवडणूकविषयक कार्यक्रमास संपूर्ण सहकार्य करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. त्यानुसार मुंबई, ठाणे, पुणे, नागपूरमधील सहकारी गृहनिर्माण संस्थांची मोठी संख्या लक्षात घेऊन त्यांनाही मतदार जागृतीत सहभागी करून घेण्यात आले. गृहनिर्माण संस्थांच्या पदाधिकाऱ्यांना 'मतदान केंद्रस्तरीय स्वयंसेवक' (BLO) घोषित करण्यात आले आहे. या संदर्भात सहकार विभागाने १३ ऑगस्ट २०१६ रोजीदेखील परिपत्रक निर्गमित केले आहे.

गृहनिर्माण संस्थांवर मतदार जागृतीची जबाबदारी लादण्यापेक्षा त्यांना लोकचळवळीच्या भावनेतून या कामात सहभागी करून घेण्याचा प्रयत्न आयोगाने केला. त्याला गृहनिर्माण संस्थांनीही सकारात्मक प्रतिसाद दिला. सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या महासंघांनीही या कामात पुढाकार घेतला होता. गृहनिर्माण संस्थांमध्ये दर्शनी भागावर मतदार जागृतीचे पोस्टर लावण्यात आले होते. विशेष सर्वसाधारण सभा घेऊन सर्व सदस्यांना मतदानासाठी प्रोत्साहित केले.

## टोलनाक्यांवरील लक्षवेधी फलक

विविध टोलनाक्यांवरून जाणाऱ्या–येणाऱ्या वाहनातील प्रवाशांचे मतदानाच्या दिनांकाकडे लक्ष वेधून घेण्यासाठी फलक लावण्यात आले होते. त्यात त्यांना मतदान करण्याचे आवाहन करण्यात आले होते. विशेष म्हणजे, निवडणुकीच्या दिवशी सुट्टीचे निमित्त साधून काहीजण बाहेरगावी जातात. मतदार असलेल्या प्रवाशांना मतदान न करता बाहेर जाण्यापासून कायदेशीरदृष्ट्या रोखता येत नाही; परंतु 'आपण लोकशाहीचे महत्त्वाचे घटक असूनही मतदान न करता बाहेरगावी जात आहात. हे बरोबर नाही,' अशा आशयाचे फलकसुद्धा टोलनाक्यांवर लावले होते.

## विद्यापीठे, महाविद्यालयांचा सहभाग

विद्यापीठे आणि महाविद्यालयांमध्ये नव आणि तरुण मतदारांची संख्या लक्षणीय असते. या घटकाचा निवडणुकीत सक्रिय सहभाग अत्यंत महत्त्वाचा ठरतो. त्या दृष्टीने आयोगातर्फे राज्यातील जवळपास सर्वच विद्यापीठांच्या कुलगुरूंच्या वेळोवेळी बैठका घेण्यात आल्या होत्या. प्रसंगी व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारेदेखील त्यांच्याशी संपर्क साधला गेला. नंतर विद्यापीठांनी आणि महाविद्यालयांनी स्वत:हून विविध उपक्रम राबविले. अनेक विद्यापीठांत समन्वयकांची नियुक्ती करण्यात आली होती. राज्य शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाने महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जबाबदारीची जाणीव निर्माण करण्यासाठी




*स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत मतदार जागृती मोहिमेत कम्युनिटी रेडिओ केंद्रांना सहभागी करून घेण्यासाठी ५ डिसेंबर २०१६ रोजी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात आयोजित बैठकीत बोलताना राज्य निवडणूक आयुक्त ज. स. सहारिया. शेजारी आयोगाचे तत्कालीन सचिव श्री. शेखर चन्ने.*

मतदार जागृती अभियानासंदर्भात २३ डिसबर २०१६ रोजी सविस्तर परिपत्रक निर्गमित केले.

विविध विद्यापीठे आणि महाविद्यालयांच्या वार्षिक स्नेहसंमेलने किंवा इतर उत्सवांची मध्यवर्ती संकल्पना 'आम्ही मतदार होणार, मतदान करणार!' अशी होती. अनेक महाविद्यालये व विद्यापीठांमध्ये निवडणुकांसंदर्भात जनजागृती फेऱ्या, वादविवाद, वक्तृत्व, निबंध, चित्रकला आदी स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. मान्यवरांची व्याख्यानेदेखील यानिमित्ताने झाली.

मुंबई विद्यापीठाने सर्वप्रथम मतदार जागृतीबाबत व्यवस्थापन परिषदेत ठराव मंजूर करून घेतला होता. मुंबई आणि सोलापूर विद्यापीठांनी मतदार जागृतीसंदर्भात मायक्रोफिल्म (टीव्ही स्पॉट) स्पर्धांचे आयोजन केले होते. या विद्यापीठांमधील अनेक विद्यार्थ्यांनी 'स्थानिक स्वराज्य संस्था आणि निवडणुका' या विषयावर लघुशोध प्रबंधदेखील सादर केले.

## कम्युनिटी रेडिओ

समाजातील वंचित व ग्रामीण जनतेच्या आर्थिक सामाजिक आणि सांस्कृतिक विकासाला चालना देण्याच्या



*स्थानिक स्वराज्य संस्थांच्या फेब्रुवारी २०१७ मध्ये झालेल्या निवडणुकांमध्ये तरुणांनी अधिकाधिक संख्येने मतदान करावे, यासाठी विविध विद्यापीठांमध्ये व्हर्च्युअल क्लासरूमच्या माध्यमातून एकाचवेळी हजारो विद्यार्थ्यांशी राज्य निवडणूक आयुक्त ज. स. सहारिया यांनी संवाद साधला.*

उद्देशाने आणि शैक्षणिक समूहांच्या उन्नतीसाठी 'ना नफा, ना तोटा' तत्त्वावर कम्युनिटी रेडिओंचे (सामुदायिक रेडिओ) जाळे विस्तारले जात आहे. महाराष्ट्रात आत्तापर्यंत जवळपास १७ सामुदायिक रेडिओ केंद्रे कार्यरत झाली आहेत. यातील काही रेडिओ विद्यापीठे व शैक्षणिक संस्थांच्या कार्यक्षेत्रातील आहेत.

सुमारे १५ किलोमीटर त्रिज्येच्या परिसरात या रेडिओंचे कार्यक्रम ऐकता येतात. या केंद्रांच्या माध्यमातून अधिकाधिक मतदारांपर्यंत पोचण्यासाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात सर्व सामुदायिक रेडिओ केंद्र संचालकांची ५ डिसेंबर २०१५ रोजी राज्य निवडणूक आयुक्त. ज. स. सहारिया यांनी बैठक घेतली. या बैठकीत सर्व केंद्र संचालकांनी व्यापक प्रमाणात मतदार जागृती मोहीम राबविण्याबाबत आश्वस्त केले. त्यातून पहिल्यांदाच मतदार जागृतीसाठी व्यापक प्रमाणात कम्युनिटी रेडिओ केंद्रांचा वापर केला गेला.

## व्हर्च्युअल क्लासरूम

राज्यातल्या बहुतांश विद्यापीठांमध्ये व्हर्च्युअल क्लासरूमची (आभासी वर्ग) सुविधा आहे. या क्लासरूमद्वारे




*भारतीय राज्यघटनेतील ७३ व ७४ व्या घटनादुरुस्तीच्या रौप्यमहोत्सवानिमित्त व मतदार जागृतीसाठी राज्य निवडणूक आयोगाने २६ जानेवारी २०१७ रोजी मुंबई येथे प्रजासत्ताक दिनाच्या संचलनात सादर केलेला चित्ररथ.*

एकाच वेळी विविध महाविद्यालयांतील हजारो विद्यार्थ्यांशी संवाद साधता येतो. मतदार म्हणून विद्यार्थी हा अत्यंत महत्त्वाचा घटक असतो. या घटकाला मतदानासाठी प्रेरित करण्याकरिता राज्य निवडणूक आयुक्त श्री. ज. स. सहारिया यांनी स्वत: पुणे, सोलापूर, अमरावती, नागपूर येथून व्हर्च्युअल क्लासरूमद्वारे हजारो विद्यार्थ्यांशी संवाद साधला. श्री. सहारिया आणि आयोगाचे तत्कालीन सचिव शेखर चन्ने यांनी विद्यार्थ्यांच्या विविध शंकांचे निरसनही केले.

## चित्ररथास पारितोषिक

मुंबई येथील शिवाजी पार्कवर २६ जानेवारी २०१७ रोजी प्रजासत्ताक दिनानिमित्त झालेल्या संचलनात प्रथमच राज्य निवडणूक आयोगाच्या चित्ररथाचा समावेश करण्यात आला होता. या संचलनात राज्य शासनाच्या इतर विविध विभागांच्या चित्ररथांचाही समावेश असतो. यात आयोगाच्या



*राज्य निवडणूक आयोगाने २६ जानेवारी २०१७ रोजी मुंबई येथे प्रजासत्ताक दिनाच्या संचलनात सादर केलेल्या चित्ररथासमोर कलाविष्कार सादर करताना विद्यार्थी.*

चित्ररथाला द्वितीय पारितोषिक प्राप्त झाले आहे. हा चित्ररथ मुंबई येथील सर जे. जे. कला महाविद्यालयाने तयार केला होता.

हा चित्ररथ भारतीय राज्यघटनेतील ७३ व ७४ व्या घटनादुरुस्तीस २५ वर्षे पूर्ण होत असल्याच्या पार्श्वभूमीवर आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या दृष्टीने मतदार जागृतीसाठी तयार करण्यात आला होता. प्रजासत्ताक दिनातील संचलनानंतर हा चित्ररथ बँड स्टँड (वांद्रे पश्चिम), संजय गांधी राष्ट्रीय उद्यान (बोरिवली), जुहू चौपाटी (सांताक्रूझ), सागर कुटीर (वर्सोवा चौपाटी), डायमंड गार्डन (चेंबूर) व मुलुंड अशा विविध भागांत फिरविण्यात आला. ठाणे महानगरपालिका क्षेत्रातही काही दिवस हा चित्ररथ नेण्यात आला होता. चित्ररथासोबत मतदार जागृतीबाबत पथनाट्ये सादर केली जात होती. या चित्ररथाची प्रसारमाध्यमांनीही मोठी दखल घेतली. त्यामुळे बृहन्मुंबई व ठाणे या महानगरपालिकांसाठी २१ फेब्रुवारी

२०१७ रोजी झालेल्या मतदानाच्या दृष्टीने मतदार जागृती अभियानास मोठा हातभार लागला.

## मोबाईल 'ॲप'मुळे वातावरणनिर्मिती

राज्य निवडणूक आयोगाने विकसित केलेल्या 'ट्रू–व्होटर', 'कॉप' आणि 'एफएक्यू' मोबाईल ॲपमुळे मतदारांमध्ये उत्साह आणि निवडणुकीचे वातावरण तयार करण्यास मदत झाली. 'ट्रू व्होटर' ॲप विकसित केले आहे. या 'ॲप'च्या माध्यमातून मतदारांना मतदारयादीतील आपले नाव व मतदान केंद्र शोधता येते. मतदान केंद्रावर जाण्यासाठी गुगल मॅपद्वारे मार्गक्रमण करता येते. उमेदवाराने शपथपत्रामध्ये भरलेली माहिती मतदारांना पाहता येते. उमेदवारांनी दाखल केलेला निवडणूक खर्च पाहता येतो. 'कॉप' (Citizens on Patrol) 'ॲप'च्या माध्यमातून सर्वसामान्य मतदारही निवडणूक प्रक्रियेवर नजर ठेवू शकत होते. त्यामुळे सहभागी लोकशाही प्रक्रियेच्या दृष्टीने ते महत्त्वाचे पाऊल ठरले. 'एफएक्यू ॲप'मुळे निवडणुकीसंदर्भातील कुठल्याही प्रश्नाचे किंवा शंकेचे त्वरित निरसन करता येत होते. एकूणच, या ॲपमुळे मतदारांमध्ये मतदानाविषयी उत्सुकता निर्माण होण्यास हातभार लागला.

## मतदार जागृतीसाठी राबविलेले उपक्रम

- होर्डिंग, बॅनर, स्टँडीज, भित्तिपत्रके
- रेडिओ, टीव्ही, वृत्तपत्रांमध्ये जाहिराती
- मतदार जागृतीसाठी मोबाईल कंपन्यांकडून जनहितार्थ एसएमएस
- विद्यापीठे व महाविद्यालयांचा मतदार जागृतीत सहभाग
- विद्यापीठे व महाविद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांसाठी मतदार नोंदणीची व्यवस्था
- महाविद्यालयीन विद्यार्थ्यांकडून गृहनिर्माण संस्थांना भेटी व दत्तक घेणे
- सहकारी गृहनिर्माण संस्थांना मतदार नोंदणीसाठी आवाहन
- सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या विशेष सर्वसाधारण सभा
- विद्यापीठे व महाविद्यालयीन उत्सव, कार्यक्रमात मतदार जागृती उपक्रम
- मान्यवर व्यक्तींच्या माध्यमातून मतदानासाठी आवाहन
- बँकांच्या माध्यमातून मतदार जागृतीत सहभाग
- उद्योग जगताचा सक्रिय सहभाग (टाटा, गोयंका, महिंद्रा इ.)
- 'सीआयआय'च्या माध्यमातून मतदार जागृती परिषद (मुंबई, पुणे व नाशिक)
- हॉटेल्स असोसिएशनचा मतदार जागृतीसाठी सकारात्मक प्रतिसाद
- कम्युनिटी रेडिओ केंद्रांच्या माध्यमातून व्यापक मतदार जागृती
- सोशल मीडियाचा मतदार जागृतीसाठी प्रभावी वापर
- विद्यार्थ्यांसाठी निबंध, पोस्टर व शॉर्ट फिल्म स्पर्धेचे आयोजन
- नाटकाच्या मध्यंतरात थिएटरमध्ये मतदार जागृतीची उद्घोषणा
- शासकीय नियतकालिकांद्वारे मतदार जागृती
- डबेवाल्यांकडून जनजागृती
- मुंबई मॅरेथॉनच्या निमित्ताने मतदार जागृती

- चित्ररथ : २६ जानेवारी २०१७
- टोलनाक्यांवर दोन प्रकारची होर्डिंग

## मतदार जागृतीची फलश्रुती

मतदार जागृतीच्या व्यापक प्रयत्नांची फलश्रुती म्हणजे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सन २०१६ व २०१७ मध्ये झालेल्या निवडणुकांमध्ये मतदानाच्या प्रमाणात झालेली वाढ होय. महानगरपालिका निवडणुकांमध्ये २०१२ मध्ये ४८.५९ टक्के मतदान झाले होते. २०१७ मध्ये ५६.४० टक्के मतदान झाले. नगरपालिका निवडणुकीत २०१२ मध्ये ६५.१६ टक्के मतदान झाले होते. २०१६-१७ मध्ये ७० टक्के मतदान झाले. जिल्हा परिषद व पंचायत समित्यांच्या निवडणुकांत २०१२ मध्ये ६७.८१ टक्के मतदान झाले होते. २०१७ मध्ये ६९.०२ टक्के मतदान झाले.

## महाविद्यालयातच मतदार नोंदणी

भारत निवडणूक आयोगाच्या वतीने विधानसभा मतदारसंघनिहाय मतदार यादी तयार केली जाते. तीच यादी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठीदेखील वापरली जाते. या मतदार यादीत वयाची १८ वर्षे पूर्ण केलेल्या नागरिकाला मतदार म्हणून नाव नोंदविता येते; परंतु वयाची १८ वर्षे पूर्ण झालेल्या तरुण- तरुणींचे नाव नोंदविण्यास विलंब होतो. ही बाब विचारात घेऊन राज्य निवडणूक आयोगाने भारत निवडणूक आयोग आणि राज्य शासन यांच्यात समन्वय घडून आणला.

राज्य निवडणूक आयोगाच्या पुढाकारानंतर कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्य विकास विभागाच्या ०५ मे २०१७; तर उच्च तंत्र शिक्षण विभागाच्या १५ मे २०१७ च्या शासन निर्णयानुसार आता सर्व विद्यापीठे महाविद्यालये, तंत्र शिक्षण संस्था इत्यादींमध्ये प्रथम वर्षाला प्रवेश घेताना १८ वर्षे पूर्ण झालेल्या विद्यार्थ्यांकडून मतदार म्हणून नाव नोंदणीचे अर्ज भरून घेतले जाणार आहेत. या कामासाठी प्रत्येक महाविद्यालयामध्ये एका प्राध्यापकाची नोडल अधिकारी म्हणून नियुक्ती केली जाणार आहे. नोडल अधिकाऱ्यास वर्षातून कमीत कमी दोन वेळा मतदार नोंदणीचे अर्ज संबंधित जिल्हाधिकारी किंवा त्यांनी नामनिर्देशित केलेल्या अधिकाऱ्याकडे पाठवावे लागतील. यासाठी जिल्हाधिकाऱ्यांशी समन्वय साधावा लागेल.

## प्रथम वर्षासाठी अभ्यासक्रम

स्थानिक स्वराज्य संस्थांचे महत्त्व, कार्ये, जबाबदाऱ्या आणि निवडणुका; तसेच राज्य निवडणूक आयोगाचे महत्त्व

### प्रमाणपत्र/ हमीपत्र

महाविद्यालयात पहिल्या वर्षाला प्रवेश घेताना, मी दिनांक १ जानेवारी रोजी १८ वर्षांचा/वर्षांची झालो/ झाले आहे किंवा होणार आहे. १८ वर्षे पूर्ण झाल्याबरोबर मी माझे नाव मतदार यादीत नोंदवून घेणार आहे, अशी मी प्रतिज्ञा करतो/ करते. यासाठी सोबत जोडलेला नमुना '६', '७', '८', व '८अ' व्यवस्थित भरला आहे.

व कार्ये या संदर्भात देशाच्या तरुणांना आवश्यक ती माहिती व्हावी यासाठी राज्य निवडणूक आयोगाने पुढाकार घेतला आहे. त्यासाठी विद्यापीठे व महाविद्यालयांत प्रथम वर्षाला प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी 'लोकशाही निवडणुका व सुशासन' या विषयावरील अभ्यासक्रम तयार करण्यात आला आहे. त्या माध्यमातून अधिकाधिक जनजागृती करण्याचा प्रयत्न आहे.

## स्थानिक स्वराज्य संस्थांना विद्यार्थ्यांच्या भेटी

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कार्यांची महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना माहिती व्हावी, यासाठी राज्य निवडणूक आयोगाच्या सूचनेनुसार राज्य शासनाने २७ जुलै २०१८ रोजी प्रथम वर्षास प्रवेश घेणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांना स्थानिक स्वराज्य संस्थांना भेटी देण्याबाबत शासन निर्णय निर्गमित केला आहे. या माध्यमातून विद्यार्थ्यांना स्थानिक स्वराज्य संस्थांना भेटी देणे सुलभ होईल. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कामकाजाची त्यांना माहिती करून घेता येईल.

## 'निवडणूक वार्ता'चे प्रकाशन

राज्य निवडणूक आयोगाने तयार केलेल्या 'निवडणूक वार्ता'च्या पहिल्या अंकाचे मा. राज्यपाल सी. विद्यासागर राव हस्ते २५ एप्रिल २०१६ रोजी प्रकाशन झाले. मुंबई येथील राजभवनात अत्यंत आटोपशीर आणि उत्साहपूर्ण वातावरणात प्रकाशन समारंभ पार पडला.



*मुंबई येथील राजभवनात राज्य निवडणूक आयोगाच्या 'निवडणूक वार्ता'च्या पहिल्या अंकाचे मा. राज्यपाल सी. विद्यासागर राव यांच्या हस्ते २५ एप्रिल २०१६ रोजी प्रकाशन झाले. या वेळी उपस्थित राज्य निवडणूक आयुक्त ज. स. सहारिया व इतर अधिकारी.*

## महानगरपालिका निवडणूक मतदानाची टक्केवारी (मतदानाचा दिनांक २१ फेब्रुवारी २०१७)



राज्य निवडणूक आयुक्त ज. स. सहारिया, आयोगाचे तत्कालीन सचिव डॉ. प्रदीप व्यास, राज्यपालांचे सचिव बी. वेणुगोपाल रेड्डी, उपसचिव परिमल सिंह आदी या वेळी उपस्थित होते.

राज्य निवडणूक आयोगाचा निवडणूक वार्ताच्या स्वरूपात न्यूज लेटर प्रकाशित करण्याचा उपक्रम पारदर्शकतेसाठी उपयुक्त ठरणारा आहे. तो एक चांगला दस्तऐवज ठरू शकतो. देशात स्वातंत्र्यानंतर लोकशाही रुजली आणि ७३ व ७४ व्या घटनादुरुस्तीनंतर लोकशाहीला आणखी बळकटी प्राप्त झाली असली तरी आपल्या लोकशाही मूल्यांना फार मोठी परंपरा आहे. ही परंपरा जपण्याकरिता अधिकाधिक लोकांनी मतदान करणे आवश्यक आहे. त्याकरिता मतदारांना प्रोत्साहित करण्यासाठी युवा वर्गाला अठराव्या वाढदिवसानंतर ओळखपत्र भेट स्वरूपात द्यायला हवे, हा उपक्रम अत्यंत स्तुत्य ठरू शकतो, असे प्रतिपादन मा. राज्यपाल

## मतदानाचा दिनांक २१ एप्रिल २०१७




## मतदानाचा दिनांक २६ मे २०१७



महोदयांनी या प्रसंगी केले.

मतदार यादी तयार करण्याचे काम भारत निवडणूक आयोगाच्या वतीने केले जाते. तीच यादी राज्य निवडणूक आयोगाच्या वतीने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी प्रभागनिहाय तयार केली जाते; परंतु मतदार नोंदणी वाढविण्यासाठी राज्य निवडणूक आयोगातर्फे संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांच्या पातळीवर व्यापक प्रमाणावर जनजागृती मोहीम राबविली जात आहे. त्या दृष्टीने मा. राज्यपाल महोदयांची सूचना निश्चितच मार्गदर्शक ठरणारी आहे.




*स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आगामी निवडणुकांसाठी ८ ऑक्टोबर ते ७ नोव्हेंबर २०१५ या कालावधीत राबविण्यात आलेल्या मतदार नोंदणीसाठी मतदार जागृती अभियानाची ही काही प्रातिनिधिक छायाचित्रे.*










*स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आगामी निवडणुकांसाठी ८ ऑक्टोबर ते ७ नोव्हेंबर २०१५ या कालावधीत राबविण्यात आलेल्या मतदार नोंदणीसाठी मतदार जागृती अभियानाची ही काही प्रातिनिधिक छायाचित्रे.*













*स्थानिक स्वराज्य संस्थांच्या २०१७च्या निवडणुकीत मतदार जागृतीसाठी राज्य निवडणूक आयोगाने राबविलेल्या विविध उपक्रमांची क्षणचित्रे.* *(पृष्ठ क्र. १२७–१३१)*













Signature for Voter Registration
Who wins we decide...
I am 18...
and I have Registered in Voting List...
Have you?
October 2016





मतदान
मंगळवार दिनांक
आपले मत
मतदार राजा जागा हो
JET AIRWAYS


शहादा नगर परिषद,शहादा
मतदार नोंदणी अभियान
दि.३१ ऑगस्ट २०१६ पर्यंत
शहादा नगर परिषद,शहादा
मतदान यादी मध्ये नांव नोंदवा, मतदान कार्ड सगळे बनवा.
मतदान यादी मध्ये फोटो असणे आवश्यक आहे.मतदान यादी मध्ये फोटो असल्याची खात्री करुन घ्या.




पिंपरी चिंचवड महानगरपालिका
सार्वत्रिक निवडणूक २०१७
मी मतदार यादीमध्ये नाव नोंदविले आहे. आपण ?
मतदार नोंदणी मोहीम


वोटकरे इमानदारी से, चयनकरे समझदारी से।




2181B
बृहन्मुंबई
महानगरपालिका
सार्वत्रिक निवडणूक
२०१७
बृहन्मुंबई
महानगरपालिका
सार्वत्रिक निवडणूक
२०१७





# राजकीय पक्षांची नोंदणी

निवडणूक प्रक्रिया आणि त्या संदर्भातील सुविधांचा लाभ घेण्यासाठी राजकीय पक्षांना लोकसभा व विधानसभा निवडणुकांसाठी भारत निवडणूक आयोगाकडे; तर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी राज्य निवडणूक आयोगाकडे नोंदणी करणे आवश्यक असते. भारत निवडणूक आयोगाने १९५० पासून, तर राज्य निवडणूक आयोगाने सन २००४ पासून राजकीय पक्षांची नोंदणी सुरू केली. राज्य निवडणूक आयोगाकडे सध्या २५६ राजकीय पक्षांची नोंदणी झालेली आहे. त्यात ६ राष्ट्रीय, २ राज्यस्तरीय, ८ इतर राज्यांतील राज्यस्तरीय असे १६ मान्यताप्राप्त व उर्वरित २४० केवळ नोंदणीकृत पक्ष आहेत. कागदपत्रांची पूर्तता न करणाऱ्या २२० पक्षांची नोंदणी राज्य निवडणूक आयोगाने रद्द केली आहे.

निवडणूक प्रक्रिया निर्भय, मुक्त व पारदर्शक वातावरणात पार पाडण्यात राजकीय पक्षांची भूमिका अत्यंत मोलाची असते. राजकीय पक्ष म्हणजे सत्ता मिळविण्यासाठी आणि टिकविण्यासाठी खुल्या स्पर्धेद्वारे प्रयत्न करणारे गट, अशी व्याख्या साधारणतः केली जाते. महाराष्ट्रात लोकसभा आणि विधानसभा निवडणुकांबरोबरच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकादेखील राजकीय पक्षांच्या माध्यमातून लढविल्या जातात. केवळ ग्रामपंचायतींच्या निवडणुकांचा याला अपवाद आहे. निवडणूक प्रक्रिया आणि त्या संदर्भातील सुविधांचा लाभ घेण्यासाठी राजकीय पक्षांना लोकसभा व विधानसभा निवडणुकांसाठी भारत निवडणूक आयोगाकडे; तर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी राज्य निवडणूक आयोगाकडे नोंदणी करणे आवश्यक असते.

लोकांना संघटित करून आपल्या बाजूला वळवणे, हा राजकीय पक्षांच्या उद्देशांचा मूळ गाभा असतो. लोकांना आपल्याकडे वळविण्यासाठी कार्यक्रम, धोरणे, विचारप्रणाली, घोषणा, प्रतीके, भावनिक आव्हाने, नेतृत्व, लोकसेवा इत्यादींची राजकीय पक्षांना गरज असते. लोकशाहीच्या खुल्या स्पर्धेत आणि निवडणुकांमध्ये राजकीय पक्ष मध्यवर्ती असतात. स्वातंत्र्यपूर्व काळात विविध चळवळी, सुधारणा, वाटाघाटी, मर्यादित निवडणुका इत्यादींमधून राजकीय पक्षांची निर्मिती झाली. स्वातंत्र्यानंतर संविधानाने प्रदान केलेल्या संघटना स्वातंत्र्याच्या बळावर व मताधिकारावर आधारित खुल्या निवडणूक पद्धतींमुळे राजकीय पक्षांना मोठा वाव मिळाला आहे.

भारत निवडणूक आयोगाने सुरुवातीपासूनच म्हणजे १९५०पासून राजकीय पक्षांच्या नोंदणीस सुरुवात केली. भारत निवडणूक आयोगाकडे लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५१च्या भाग-२९ अ अन्वये राजकीय पक्षांची नोंदणी केली जाते. निवडणूक चिन्ह (आरक्षण व वाटप) आदेश, १९६८ अंतर्गत राजकीय पक्षांना मान्यतादेखील दिली जाते. भारत निवडणूक आयोगाकडे सध्या ६ राष्ट्रीय आणि ५८ राज्यस्तरीय मान्यता असलेले पक्ष आहेत. नोंदणीकृत पक्षांची संख्या सुमारे २ हजारांपर्यंत आहे. देशभरात लोकसभा आणि विधानसभेच्या एकूण जागांपैकी विशिष्ट प्रमाणात जागा जिंकणाऱ्या पक्षांना राष्ट्रीय अथवा राज्यस्तरीय पक्ष म्हणून आयोगाकडून मान्यता देण्यात येते. मान्यताप्राप्त पक्षांसाठी विशिष्ट निवडणूक चिन्ह आरक्षित केले जाते.

राज्य निवडणूक आयोगाकडे सन २००४ पासून राजकीय पक्षांची नोंदणी सुरू करण्यात आली. त्या संदर्भात सध्या 'राजकीय पक्ष नोंदणी आदेश, २००९', 'महाराष्ट्र निवडणूक चिन्ह (आरक्षण व वाटप) आदेश, २००९', 'राजकीय पक्षांची नोंदणी आदेश, २००९ (सुधारित २०१६)', 'महाराष्ट्र निवडणूक चिन्ह (आरक्षण व वाटप) (सुधारित) आदेश, २०१७' आणि 'राजकीय पक्ष सुधारित आदेश, २०१८' हे आदेश अस्तित्वात आहेत. त्यानुसार राजकीय पक्षांसंदर्भात राज्य निवडणूक आयोगाची कार्यवाही होते. राज्य निवडणूक आयोगाकडे सध्या २५६ राजकीय पक्षांची नोंदणी झालेली आहे. त्यात ६ राष्ट्रीय, २ राज्यस्तरीय, ८ इतर राज्यांतील राज्यस्तरीय अशा एकूण १६ मान्यताप्राप्त राजकीय पक्षांचा समावेश आहे. उर्वरित सर्व २४० केवळ नोंदणीकृत पक्ष आहेत.



*स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसंदर्भात राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींशी संवाद साधण्याकरिता वेळोवेळी बैठकांचे आयोजन करण्यात येते. अशाच एका बैठकीत बोलताना राज्य निवडणूक आयुक्त श्री. ज. स. सहारिया व उपस्थित प्रतिनिधी.*

राज्य निवडणूक आयोगाकडे सर्वप्रथम १५ मार्च २००५ रोजी राष्ट्रवादी जनता पार्टी या पक्षाची नोंदणी झाली होती. मान्यताप्राप्त पक्षांपैकी राज्य निवडणूक आयोगाकडे नोंदणी झालेला भारतीय कम्युनिस्ट पक्ष पहिला ठरला. त्याची राज्य निवडणूक आयोगाकडे २८ मार्च २००५ रोजी नोंदणी झाली होती.

## पक्षनोंदणीची कार्यवाही

राज्य निवडणूक आयोगाकडे राजकीय पक्षाच्या नोंदणीसाठी करायच्या अर्जावर राजकीय पक्षांचे सचिव/ सभापती/ अध्यक्ष अथवा मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याची स्वाक्षरी असावी लागते. आयोगाच्या सचिवांकडे अर्ज सादर करावा लागतो. अर्जासोबत पक्षाचे नाव, पत्ता याबरोबरच

पदाधिकाऱ्यांच्या निवडीबाबतच्या ठरावाची प्रत, सदस्यांचे संख्याबळ (कमीत कमी १५०), त्यांच्या मतदारयादीतील नावनोंदणीबाबतचा अद्ययावत प्रमाणित तपशील सादर करणे आवश्यक असते. भारत निवडणूक आयोगाकडे यापूर्वीच राजकीय पक्ष म्हणून नोंदणी झाली असल्यास त्याचा तपशील द्यावा लागतो. त्यात राष्ट्रीय, राज्यस्तरीय पक्ष म्हणून मान्यता आहे, हे स्पष्ट नमूद करावे लागते. भारत निवडणूक आयोगाद्वारे मान्यता मिळालेल्या म्हणजेच मान्यताप्राप्त राजकीय पक्षांना त्यांच्या राज्यस्तरीय कार्यालयाचा पत्ता देणे आवश्यक असते.

अर्जासोबत संघ, संस्था किंवा पक्षाचे अध्यक्ष, सचिव व इतर तीन संस्थापक सदस्यांची स्वाक्षरी असलेल्या निवेदनाची किंवा नियमांची प्रत द्यावी लागते. नियम तयार करताना भारतीय संविधानावर दृढ विश्वास व निष्ठा असल्याची तरतूद करावी लागते. त्याचबरोबर त्यात समाजवाद, धर्मनिरपेक्षता, लोकशाही, एकात्मता मान्य असल्याच्या तत्त्वांची विशेष नोंद करावी लागते. पक्षाचे अध्यक्ष, सचिव, कोषाध्यक्ष व इतर पदाधिकाऱ्यांची निवड लोकशाही पद्धतीने करण्याचा आणि निवडीच्या कालावधीचा स्पष्ट उल्लेख नियमात असावा लागतो. भारत निवडणूक आयोगाकडे यापूर्वीच राजकीय पक्षांची नोंद झाली असल्यास अर्जासोबत नोंदणीचा पुरावा, चिन्हांचा तपशील व पक्षाच्या घटनेची प्रमाणित प्रत द्यावी लागते. महाराष्ट्र राजकीय पक्षांची नोंदणी आदेश– २००९ चे वाचन केले असून ते समजले आहे. नोंदणी करणारा राजकीय पक्ष या आदेशातील तरतुदींचे पालन करेल, असे घोषणापत्रही द्यावे लागते. अर्जासोबत १० हजार रुपयांचा धनाकर्ष (डिमांड ड्राफ्ट) देणे आवश्यक असते.

## जिल्हाधिकाऱ्यांकडे अर्जाची सुविधा

राजकीय पक्षनोंदणीसाठीचा अर्ज आता थेट राज्य निवडणूक आयोगाकडे पाठविण्याची आवश्यकता नाही. राजकीय पक्षाचे मुख्य कार्यालय असलेल्या जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्यांकडे २५ जुलै २०१८च्या सुधारित आदेशानुसार अर्ज सादर करावा लागतो. या अर्जाची संपूर्ण तपासणी करून व अटींची पूर्तता झाल्यावर संबंधित जिल्हाधिकारी तो अर्ज स्वयंस्पष्ट प्रस्तावासह राज्य निवडणूक आयोगाकडे दोन महिन्यांच्या आत पाठवतील, अशी तरतूद सुधारित आदेशात केली आहे. पुढील सर्व प्रक्रिया राज्य निवडणूक आयोगाकडून पार पाडली जाते. भारत निवडणूक आयोगाकडील मान्यताप्राप्त नोंदणीकृत पक्षास (राष्ट्रीय अथवा राज्यस्तरीय) राज्य निवडणूक आयोगाकडे नोंदणीसाठी थेट 'सचिव, राज्य निवडणूक आयोग' यांच्याकडे अर्ज सादर करता येईल.

## चिन्हांचे आरक्षण

नोंदणी झालेल्या राजकीय पक्षांना चिन्हवाटपाच्या वेळी प्राधान्य दिले जाते. मान्यताप्राप्त पक्षांसाठी भारत निवडणूक आयोगाने लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीसाठी आरक्षित केलेले चिन्ह स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठीदेखील आरक्षित केले जाते; परंतु त्यासाठी मान्यताप्राप्त पक्षांनासुद्धा राज्य निवडणूक आयोगाकडे नोंदणी करणे अनिवार्य असते. या पक्षांनी तसे न केल्यास त्यांना राखीव चिन्हाचा लाभ मिळत नाही. मान्यताप्राप्त राजकीय

पक्षांना सार्वजनिक क्षेत्रातील इलेक्ट्रॉनिक मीडियाकडून (उदा. आकाशवाणी आणि दूरदर्शन) निवडणुकीच्या वेळी प्रचारासाठी विनामूल्य वेळ दिला जातो. नोंदणी झालेल्या पक्षांना देणग्या स्वीकारता येतात.

## एकसमान चिन्ह

राज्य निवडणूक आयोगाकडील नोंदणीकृत पक्षांना (भारत निवडणूक आयोगाची मान्यता नसलेले) मुक्त चिन्हांमधून एक चिन्ह निवडण्यासाठी प्राधान्य दिले जाते; परंतु एकापेक्षा जास्त नोंदणीकृत पक्षांनी एका जागेसाठी एकाच समान चिन्हाची मागणी केल्यास लॉटरीच्या माध्यमातून चिन्हांचे वाटप केले जाते. त्यामुळे एकाच स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत एकाच पक्षाच्या उमेदवारांना वेगवेगळ्या चिन्हांवर निवडणूक लढवावी लागते. यात दुरुस्ती करण्याची मागणी विविध राजकीय पक्षांनी केली होती.

महाराष्ट्र निवडणूक चिन्ह (आरक्षण व वाटप) आदेश २००९मध्ये २१ जानेवारी २०१७ रोजी बदल करण्यात आला आहे. नोंदणीकृत राजकीय पक्षाने एखाद्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या लगतच्या मागील निवडणुकीत एकूण जागांपैकी किमान पाच टक्के जागा जिंकल्या असल्यास त्या पक्षाच्या सर्व उमेदवारांना संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत मुक्त चिन्हांपैकी तात्पुरत्या स्वरूपात एकसमान चिन्ह देण्याची तरतूद करण्यात आली आहे. संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेच्या एकूण सदस्यसंख्येच्या पाच टक्के जागा या एकापेक्षा कमी येत असल्यास किमान एक जागा तरी जिंकलेली असणे आवश्यक आहे. त्याचबरोबर एखादा सदस्य संबंधित पक्षाचा केवळ आज रोजी सदस्य आहे म्हणून त्याचा निवडून आलेल्या पाच टक्के सदस्यांत समावेश होत नाही. कारण लगतच्या मागील निवडणुकीत पाच टक्के सदस्य संबंधित पक्षाकडून निवडून आलेले असणे आवश्यक आहे. अशा पक्षांना एकसमान चिन्हासाठी सक्षम प्राधिकाऱ्याकडे नामनिर्देशनपत्रे दाखल करण्याच्या दिनांकापूर्वी किमान तीन दिवस आधी अर्ज करणे आवश्यक राहील. अर्जासोबत मागील निवडणुकीत विजयी झालेल्या सदस्यांची यादी आणि संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेच्या सचिवाचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक असते.

महानगरपालिका निवडणुकांसाठी महानगरपालिकेचे आयुक्त; तर जिल्हा परिषदा, पंचायत समित्या, नगरपरिषदा व नगरपंचायतींच्या निवडणुकांसाठी जिल्हाधिकारी सक्षम प्राधिकारी असतील. सक्षम प्राधिकारी नामनिर्देशनपत्रे दाखल करण्याच्या दिनांकापूर्वी किमान एक दिवस आधी निर्णय घेईल व तो सर्व संबंधित निवडणूक अधिकारी आणि राजकीय पक्षांना कळवितो. संबंधित राजकीय पक्षाला प्रत्येक स्थानिक स्वराज्य संस्थेसाठी स्वतंत्र अर्ज करावा लागेल. एकापेक्षा जास्त नोंदणीकृत राजकीय पक्षांनी एकसमान चिन्हाची मागणी केल्यास प्रथम अर्ज प्राप्त झालेल्या पक्षाला ते चिन्ह देण्यात येते. अन्य पक्ष किंवा पक्षांना उर्वरित मुक्त चिन्हांमधून एका चिन्हाची मागणी करण्याची संधी देण्यात येते.

## नोंदणी केव्हा रद्द होईल?

'राजकीय पक्ष नोंदणी आदेश २००९' हा मूळ आदेश

आहे. या आदेशात विविध सुधारणा करण्यासंदर्भात अनेक राजकीय पक्ष, स्वयंसेवी संस्था, विचारवंतांनी केलेल्या सूचनांच्या अनुषंगाने आता त्यात सुधारणा करण्यात आल्या आहेत.

१. **किमान एका जागेवर निवडणूक लढवावी** : राज्य निवडणूक आयोगाकडे नोंदणी केलेल्या राजकीय पक्षाने आयोगाच्या २५ जुलै २०१८च्या सुधारित आदेशानुसार पुढील पाच वर्षांच्या काळात किमान एका स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत कमीत कमी एका जागेवर निवडणूक लढविणे आवश्यक असेल. अन्यथा, संबंधित पक्षाची नोंदणी रद्द करण्यात येईल. संबंधित राजकीय पक्ष, उमेदवाराने निवडणुकीसाठी केवळ अर्ज दाखल करणे पुरेसे नसून भरलेला अर्ज मागे न घेता प्रत्यक्ष निवडणूक लढविणे बंधनकारक आहे. खालील बाबींची पूर्तता न करणाऱ्या राजकीय पक्षांची नोंदणी रद्द होऊ शकते:

२. **आश्वासन पूर्तता अहवाल आवश्यक** : राजकीय पक्षांना संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीच्या वेळी प्रसिद्ध केलेल्या जाहीरनाम्याची एक अधिकृत प्रत संबंधित महानगरपालिका आयुक्त किंवा जिल्हाधिकाऱ्यांकडे सादर करणे आवश्यक आहे. महानगरपालिकेच्या बाबतीत संबंधित महानगरपालिका आयुक्त यांच्याकडे; तर नगरपरिषद, नगरपंचायत, जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीबाबत संबंधित जिल्हाधिकाऱ्यांकडे ही प्रत द्यावी लागते. स्थानिक स्वराज्य संस्थेत सत्ता स्थापन करणाऱ्या किंवा सत्तेत सहभागी असलेल्या पक्षाला जाहीरनाम्यातील आश्वासनांच्या पूर्ततेचा वार्षिक अहवाल मतदारांच्या माहितीसाठी जाहिरातीद्वारे अथवा संकेतस्थळाद्वारे प्रसिद्ध करणे आवश्यक आहे. त्याची प्रत संबंधित महानगरपालिका आयुक्त किंवा जिल्हाधिकाऱ्याकडे देणेदेखील बंधनकारक केले आहे. सलग दोन वर्षे आश्वासनपूर्ततेचा वार्षिक अहवाल सादर न करणाऱ्या राजकीय पक्षाची नोंदणी रद्द करण्याची तरतूद सुधारित आदेशात केली आहे.

३. **निवडणूक खर्च सादर करणे** : सुदृढ लोकशाहीसाठी निवडणुकांमध्ये अवैध मार्गाने होणाऱ्या खर्चाला आळा घालण्याकरिता सातत्याने उपाययोजना करण्यात येत असतात. याचाच एक भाग म्हणून राज्य निवडणूक आयोगाने १५ ऑक्टोबर २०१६ रोजी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या निवडणूक खर्चाचा हिशेब देण्याबाबत आदेश काढले आहेत. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लढवू इच्छिणाऱ्या सर्व राजकीय पक्षांनी शेड्यूल्ड बँकेमध्ये खाते उघडणे आवश्यक आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी याच खात्यातून राजकीय पक्षांनी व्यवहार करणे आवश्यक आहे.

   निकाल लागल्यानंतर राजकीय पक्षांना २० दिवसांच्या आत विशिष्ट उमेदवारांवर केलेला थेट खर्च आणि उमेदवारांमध्ये विभाजित करता येणारा खर्च संबंधित जिल्हाधिकारी व महानगरपालिका आयुक्तांमार्फत राज्य निवडणूक आयोगाला सादर करणे आवश्यक असते. निवडणूक खर्चासाठी स्वीकारलेला निधी आणि स्थानिक स्वराज्य संस्थांनिहाय एकूण



*राज्य निवडणूक आयोगातर्फे २२ मार्च २०१७ रोजी पत्रकारांसाठी आयोजित व्हीव्हीपॅटचे प्रात्यक्षिक.*

खर्चाचा तपशील निकाल लागल्यानंतर ६० दिवसांच्या आत सादर करणे आवश्यक आहे. प्रत्येक महानगरपालिकेकरिता एक; तसेच इतर स्थानिक स्वराज्य संस्थांकरिता प्रत्येक जिल्ह्यासाठी एक याप्रमाणे राष्ट्रीयीकृत/ शेड्यूल्ड बँकेमध्ये स्वतंत्र खाते उघडणे व त्याबाबतचा तपशील निवडणुकीपूर्वी संबंधित जिल्हाधिकारी/ महानगरपालिका आयुक्त यांना सादर करावा लागतो. बँकेच्या वरील खात्यामधूनच व धनादेशाद्वारे निवडणुकीसाठी सर्व आर्थिक व्यवहार केले पाहिजेत (उदा.- देणग्या स्वीकारणे, भेटी स्वीकारणे, कर्ज स्वीकारणे, उमेदवारांना पक्ष निधी मदत देणे, निवडणूक खर्च करणे, देयके अदा करणे इत्यादी). पक्षाने केलेल्या सर्व खर्चाची खरी, अचूक, योग्य पद्धतीने हिशेबाची नोंद अभिलेख्यात नोंदविणे व त्या खर्चाला दुजोरा देणारी पुराव्याची कागदपत्रे जसे- पावती, बिल, व्हाउचर, इत्यादी दिनांक व अनुक्रमांकानुसार फायलिंग करून जतन करणे व आयोगाच्या वतीने मागणी करण्यात आल्यास सदर कागदपत्रे सादर करणे.

**सादर करायचे अहवाल/ विवरणपत्रे**

- नामनिर्देशनपत्र दाखल करणाऱ्या उमेदवाराचा तपशील- नमुना-५



- पक्षाने स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीसाठी केलेल्या खर्चाचा तपशील– नमुना–६
- पक्षाने त्यांच्या उमेदवारांवर केलेल्या खर्चाचा तपशील– नमुना–७
- पक्षाने सादर करायचे शपथपत्र– नमुना–८
- पक्षाने निवडणुकीकरिता स्वीकारलेल्या निधीचा तपशील– नमुना–९

४. **रिटर्न्स आणि ऑडिट रिपोर्टची प्रत** : प्रत्येक राजकीय पक्षाला राजकीय पक्ष नोंदणी आदेश, २००९/२०१४ अन्वये दर वर्षी विवरणपत्र (आयटी रिटर्न) आणि लेखापरीक्षित लेख्याची (ऑडिट रिपोर्ट) प्रत सादर करणे आवश्यक आहे. आयोगाने निश्चित केलेल्या वेळ व रीतीप्रमाणे खर्च सादर न केल्यास संबंधित पक्षांची नोंदणी निलंबित किंवा रद्द करणे, विलंबाकरिता प्रतिदिवस आर्थिक दंड करणे किंवा राजकीय पक्ष नोंदणी आदेश, २००९ व २०१६ मधील तरतुदींनुसार कारवाई करण्यात येईल, असे १५ ऑक्टोबर २०१६च्या आदेशात नमूद केले आहे.

५. **निर्धारित वेळ व रीत न पाळणे** : निर्धारित केलेली वेळ व रीत न पाळल्यास विलंबाकरिता प्रतिदिन आयोग ठरवेल तो आर्थिक दंड भरावा लागेल. प्रसंगी फौजदारी गुन्ह्यासह कायदेशीर कारवाईस सामोरे जावे लागेल. राज्य निवडणूक आयोगाच्या आदेशातील तरतुदींची पूर्तता होत नसल्यास, आदर्श आचारसंहितेचे पालन झाले नसल्यास निवडणुका मुक्त, निष्पक्षपातीपणे व शांततेने पार पाडण्यासाठी आयोगाकडून वेळोवेळी देण्यात आलेल्या निर्देशांचे व सूचनांचे पालन होत नसल्यास किंवा राजकीय पक्षाने स्वत:हून त्या पक्षाची नोंदणी रद्द करण्याबाबत आयोगाकडे अर्ज दाखल केल्यास राजकीय पक्षाची नोंदणी रद्द होऊ शकते.

## ... आणि २२० पक्षांची नोंदणी रद्द

राज्य निवडणूक आयोगाकडे नोंदणीकृत अमान्यताप्राप्त राजकीय पक्षांना नियमितपणे प्राप्तिकर विवरणपत्र भरल्याची (रिटर्न) आणि लेखापरीक्षित लेख्याची (ऑडिट) प्रत राज्य निवडणूक आयोगाकडे सादर करणे आवश्यक असते. त्याची पूर्तता न करणाऱ्या राजकीय पक्षांची नोंदणी रद्द करण्याची मोहीम विविध टप्प्यांत जून २०१५ पासून हाती घेण्यात आली. कागदपत्रांची पूर्तता न करणाऱ्या व २००५मध्ये नोंदणी झालेल्या १९ राजकीय पक्षांना पहिल्या टप्प्यात ४ जून २०१५ रोजी नोटिसा बजावण्यात आल्या होत्या.

नोटीस बजावण्यात आलेल्यांपैकी केवळ तीन पक्षांनी कागदपत्रांची पूर्तता केली. सहा पक्षांच्या पत्त्यांवर नोटीसचा बटवडा झाला नाही. सहा पक्षांनी कुठलाही प्रतिसाद दिला नाही; तर चार पक्षांनी दोन महिन्यांची मुदतवाढ मागितली होती. या चार पक्षांनी मुदतवाढ देऊनही कागदपत्रांची पूर्तता केली नाही. त्यामुळे त्यांच्यासह एकूण १६ पक्षांची १५ सप्टेंबर २०१५ रोजी नोंदणी रद्द करण्यात आली आहे. मात्र, संबंधित चार पक्षांनी पुन्हा मुदतवाढ मागितली. त्यामुळे त्यांना एक लाख रुपये दंड आकारून ३० डिसेंबर २०१५ पर्यंत कागदपत्रे सादर करण्यासाठी मुदतवाढ दिली होती. त्यांनी दंड भरून कागदपत्रांची पूर्तता केल्यामुळे त्यांची नोंदणी पूर्ववत करण्यात आली.

पहिल्या टप्प्यातील अनुभव लक्षात घेऊन दुसऱ्या टप्प्यांत १७ नोव्हेंबर २०१५ रोजी २८० राजकीय पक्षांना नोटिसा बजावल्या होत्या. त्यांना ३० डिसेंबर २०१५ पर्यंत संबंधित कागदपत्रांची पूर्तता करण्यास सांगण्यात आले होते. तिसऱ्या टप्प्यात १५ जानेवारी २०१६ रोजी पुन्हा ३० पक्षांना नोटिसा देण्यात आल्या होत्या.

दुसऱ्या व तिसऱ्या टप्प्यात बजावलेल्या नोटिसा परत आलेल्या व कागदपत्रांची पूर्तता न करणाऱ्या १८६ राजकीय पक्षांची नोंदणी २० एप्रिल २०१६ आणि १० मे २०१६ रोजी रद्द करण्यात आली; परंतु अपूर्ण कागदपत्रे दिलेल्या किंवा मुदतवाढ मागितलेल्या पक्षांना पुन्हा एकदा संधी देण्यात आली होती. त्यासाठी त्यांना ३१ डिसेंबर २०१६ पर्यंत १ लाख रुपये दंड भरून कागदपत्रांची पूर्तता करण्याबाबत कळविण्यात आले होते.

कागदपत्रांची पूर्तता न करणाऱ्या १७ मान्यताप्राप्त राजकीय पक्षांनादेखील अखेरच्या टप्प्यात २६ ऑगस्ट २०१६ रोजी नोटिसा बजावण्यात आल्या. त्यापैकी कागदपत्रांची पूर्तता न केल्याने जनता दल (सेक्युलर), इंडियन मुस्लीम लीग, राष्ट्रीय जनता दल आणि ऑल इंडिया फॉरवर्ड ब्लॉक या ४ पक्षांची नोंदणी रद्द करण्यात आली. जनता दल (सेक्युलर) आणि इंडियन मुस्लीम लीग या २ पक्षांनी वाढीव मुदतीत १ लाख रुपये दंड भरून कागदपत्रांची पूर्तता केल्याने त्यांची नोंदणी पूर्ववत केली.

थोडक्यात, विविध चार टप्प्यांत एकूण ३४६ पक्षांना नोटिसा बजावण्यात आल्या होत्या. त्यांपैकी कागदपत्रांची पूर्तता न करणाऱ्या २५६ पक्षांची नोंदणी रद्द करण्यात आली. या पक्षांना कागदपत्रांच्या पूर्ततेसाठी संधी देण्याचाही प्रयत्न झाला. वाढीव मुदतीची संधी देताना मात्र एक लाख रुपये दंड आकारण्यात आला होता. नोंदणी रद्द केल्यानंतर या वाढीव मुदतीत ३८ पक्षांनी एक लाख रुपये दंड भरला. त्यांपैकी ३६ पक्षांनी कागदपत्रांचीही पूर्तता केली. त्यामुळे एकूण ३६ पक्षांची नोंदणी पूर्ववत करण्यात आली. अंतिमतः एकूण २२० पक्षांची नोंदणी कायमस्वरूपी रद्द करण्यात आली. नोंदणी रद्द करण्याची प्रक्रिया राबविताना निवडणूक लढविण्यापासून कोणाला वंचित करणे, हा आयोगाचा अजिबात उद्देश नव्हता; परंतु निवडणुकीचे गांभीर्य आणि शिस्त कायम ठेवण्यासाठी ही कारवाई करण्यात आली.

# संशोधन आणि विश्लेषण

राज्य निवडणूक आयोगाने गेल्या दोन-तीन वर्षांच्या काळात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसंदर्भातील विविध आयाम आणि पैलूंच्या संशोधनाला चालना देण्याचा निर्णय घेतला. त्या माध्यमातून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका अधिकाधिक मुक्त, निर्भय व पारदर्शक वातावरणात पार पाडण्याच्या दृष्टीने उपाययोजना आखण्यात आल्या. विविध बाबींचा शास्त्रीय पद्धतीने मागोवा घेणे आणि प्रश्न किंवा समस्यांची उकल करणे, हा त्यामागचा मुख्य उद्देश होता.






देशभरातील विविध विद्यापीठे आणि नामांकित शैक्षणिक संस्थांच्या माध्यमातून निवडणुकांसंदर्भात व्यापक प्रमाणात संशोधन केले जाते; परंतु या संशोधनात स्थानिक स्वराज्य संस्थांचा फार थोड्या प्रमाणात समावेश असल्याचे दिसून येते. आपल्या देशात जे काही संशोधन झाले आहे, त्या संदर्भात पुस्तके किंवा अन्य स्वरूपात अत्यंत कमी माहिती उपलब्ध आहे. काही संशोधनांचे डॉक्युमेंटेशन व्यवस्थित झालेले नाही. बहुतांश संशोधन लोकसभा किंवा विधानसभा निवडणुकांशी संबंधित असते. ही बाब विचारात घेऊन राज्य निवडणूक आयोगाने गेल्या दोन–तीन वर्षांच्या काळात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसंदर्भातील विविध बाजूंच्या संशोधनाला चालना देण्याचा निर्णय घेतला.




*पुणे येथील गोखले राज्यशास्त्र व अर्थशास्त्र संस्थेने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसंदर्भात तयार केलेल्या संशोधन अहवालाचे मुंबई येथे १९ जानेवारी २०१७ रोजी सह्याद्री अतिथिगृह येथे राज्यपाल श्री. सी. विद्यासागर राव यांच्या हस्ते प्रकाशन झाले. या वेळी उपस्थित राज्य निवडणूक आयुक्त ज. स. सहारिया, राज्यपालांचे सचिव वेणुगोपाल रेड्डी, डॉ. राजस परचुरे, प्रा. मानसी फडके आदी.*




या संदर्भात विचारविनिमय करण्यासाठी राज्यातील सर्व विद्यापीठांचे कुलगुरू आणि विविध नामांकित शैक्षणिक संस्थांच्या प्रमुखांची राज्य निवडणूक आयोगाच्या कार्यालयात १५ ऑक्टोबर २०१६ रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीमध्ये संशोधनाबाबत तपशीलवार चर्चा झाली. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसंदर्भात करायच्या संशोधनाच्या संभाव्य विषयांबाबत मान्यवर कुलगुरू आणि उपस्थित मान्यवरांनी मते मांडली. त्याअनुषंगाने संशोधनासाठी पुढाकार घेण्याचे आवाहनही करण्यात आले.

## संशोधनासंदर्भातील समिती

विविध विद्यापीठांचे कुलगुरू आणि शैक्षणिक क्षेत्रातील तज्ज्ञांशी झालेल्या चर्चेनंतर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसंदर्भात व्यापक संशोधनाच्या दृष्टीने आयोगाच्या पातळीवर पुढीलप्रमाणे संशोधन समिती गठित करण्यात आली होती.

१. **डॉ. संजय रानडे,** संज्ञापन व पत्रकारिता विभाग, मुंबई विद्यापीठ, मुंबई.

२. **डॉ. चित्रा रेडकर,** राज्यशास्त्र विभागप्रमुख, एस.एन.डी.टी., महिला विद्यापीठ, मुंबई.






३. **श्रीमती मानसी फडके,** गोखले इन्स्टिट्यूट ऑफ पॉलिटिक्स अँड इकॉनॉमिक्स, पुणे.

४. **श्री. संजय पाटील,** राज्यशास्त्र विभाग, मुंबई विद्यापीठ, मुंबई.

५. **श्री. के. सूर्यकृष्णमूर्ती,** सहायक आयुक्त, राज्य निवडणूक आयोग, मुंबई. (समन्वयक)

६. **श्री. जगदीश मोरे,** जनसंपर्क अधिकारी, राज्य निवडणूक आयोग, मुंबई.

'विद्यापीठांनी दर वर्षी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसंबंधी संशोधन प्रकल्प हाती घेतले पाहिजेत. विद्यापीठांमध्ये नियमित उपक्रमांचा भाग म्हणून आयोजित केल्या जाणाऱ्या संशोधन परिषदांसाठी आणि संशोधन निबंधांसाठी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचा विषय घेण्यात यावा. दर वर्षी मोठ्या संख्येने विद्यार्थी पीएच.डी. व एम.फिल.साठी नोंदणी करतात. त्यांना हे विषय सुचविले पाहिजेत' असे राज्य निवडणूक आयुक्त श्री. ज. स. सहारिया यांनी या बैठकीत सुचविले.

या बैठकीनंतर मुंबई विद्यापीठ आणि पुणे येथील गोखले राज्यशास्त्र आणि अर्थशास्त्र संस्थेने पुणे येथील




A study of stakeholders in the

Brihanmumbai Municipal Corporation elections

SEC/PN 30/2017-12/Research19
An initiative of Institute of Democracy and Election
Management a wing of State Election Commission, Maharashtra

Department of Communication and Journalism, University of Mumbai

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र विकास प्रशासन प्रबोधिनीच्या (यशदा) मदतीने 'महाराष्ट्रातील जिल्हा परिषदांची कार्यप्रणाली आणि निवडणुकांबाबतचे विविध आयाम' हा संशोधन प्रकल्प हाती घेतला. संस्थेचे संचालक डॉ. राजस परचुरे यांच्या मार्गदर्शनाखाली श्रीमती मानसी फडके यांनी हा प्रकल्प पूर्णत्वास नेला.

मुंबई विद्यापीठाच्या नागरिक शास्त्र व राज्यशास्त्र विभागातर्फे 'महानगरपालिका निवडणूक : प्रेरणा आणि धोरण' या विषयावर संशोधन करण्यात आले आहे. डॉ. सुरेंद्र जोंधळे व डॉ. मृदुल निळे यांच्या मार्गदर्शनाखाली श्री. संजय पाटील यांनी हे संशोधन केले. मुंबई विद्यापीठातील नागरिक शास्त्र व राज्यशास्त्र विभाग; तसेच संज्ञापन व पत्रकारिता विभागाने 'स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या प्रचाराच्या कालावधीतील २४ तास वृत्तवाहिन्यांचा प्राधान्यक्रम' या विषयावर डॉ. संजय रानडे यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. कविता राणे यांनी संशोधन प्रकल्प हाती घेतला होता. त्यानंतर याच विभागाच्या माध्यमातून प्रा. यतींद्र इंगळे यांनी नांदेड-वाघाळा महानगरपालिकेच्या निवडणुकीतील मतदार जागृतीसंदर्भात संशोधन केले.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका अधिकाधिक मुक्त, निर्भय व पारदर्शक वातावरणात पार पाडण्याच्या दृष्टीने सातत्याने उपाययोजना करणे ही निरंतर चालणारी प्रक्रिया आहे. त्यासाठी विविध बाबींचा शास्त्रीय पद्धतीने मागोवा घेणे आणि प्रश्न किंवा समस्यांची उकल करणे आवश्यक असते. त्याकरिता संशोधन हा घटक महत्त्वाचा ठरू शकतो. त्यादृष्टीनेच विविध विषयांवर संशोधन प्रकल्प हाती घेण्यात आले होते. त्यातील काही ठळक संशोधनाबाबत येथे चर्चा करणे सयुक्तिक ठरेल.

'महाराष्ट्रातील जिल्हा परिषदांची कार्यप्रणाली आणि निवडणुकांबाबतचे विविध आयाम' हा पहिला संशोधन प्रकल्प होता. जिल्हा परिषदेची निवडणूक लढविणाऱ्या अधिकाधिक उमेदवारांचे शिक्षण केवळ दहावी आणि बारावीपर्यंतच झाले आहे. जिल्हा परिषदेच्या ३८ टक्के उमेदवारांचा शेती हाच मुख्य व्यवसाय आहे. पंचायत समितीच्या ४२ टक्के उमेदवारांचा शेती हा मुख्य व्यवसाय असल्याचे निदर्शनास आले.

‘पनवेल महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक–२०१७ मधील निवडणूक प्रचारातील तंत्रज्ञानाचा वापर’ या विषयावर अभ्यास करण्यात आला. माध्यमांचा विचार केल्यास सोशल मीडियाच्या माध्यमातून ४० टक्के प्रचार केला जातो; तर अजूनही वर्तमानपत्रांसारख्या पारंपरिक माध्यमांद्वारे ६० टक्के प्रचार केला जातो. सोशल मीडियात फेसबुकचा सर्वाधिक वापर होत असल्याचा या अभ्यासाचा निष्कर्ष आहे.

आदर्श आचारसंहितेविषयी अभ्यास करण्यात आला. त्यात सामान्य मतदारांचे आचारसंहितेबद्दलचे मत जाणून घेण्याचा प्रयत्न करण्यात आला. शहरी मतदारांना बऱ्यापैकी आचारसंहितेबाबत माहिती आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका सुरळीत पार पाडण्यासाठी आचारसंहितेतील मार्गदर्शक तत्त्वांचे पालन करणे गरजेचे आहे असे ९१ टक्के मतदारांना वाटते, असे या अभ्यासातून दिसून आले.

‘महानगरपालिका निवडणूक : प्रेरणा आणि धोरणे’ या विषयावर संशोधन करण्यात आले. निवडणूक लढविताना उमेदवारांचे काय नियोजन, प्रेरणा, धोरण असते याबाबत जाणून घेण्याचा प्रयत्न करण्यात आला. मतदारांवर प्रभाव पाडण्यासाठी उमेदवार कोणकोणत्या वेगवेगळ्या पद्धतींचा अवलंब करतात, हे पाहण्याचाही प्रयत्न झाला. वैयक्तिक गुण आणि जातीचा घटक निवडणूक लढविताना महत्त्वाचा ठरतो. आर्थिकदृष्ट्या सबळ उमेदवारांना उपलब्ध साधनसामग्रीचा वापर करून सहजतेने आपले अस्तित्व दाखविता येते, असे या अभ्यासात दिसून आले.

मुंबई विद्यापीठाच्या संज्ञापन व पत्रकारिता विभागाने ‘स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या प्रचाराच्या कालावधीतील २४ तास वृत्तवाहिन्यांचा प्राधान्यक्रम’ या विषयावर केलेल्या अभ्यासात काही महत्त्वपूर्ण बाबी समोर आल्या. वृत्तवाहिन्या ठरावीक महानगरपालिकांच्या निवडणुकांचेच अधिकाधिक वृत्तांकन करतात. अन्य स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या वृत्तांकनांकडे मात्र दुर्लक्ष होते. या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या मतदारांपर्यंत पोचण्यासाठी राज्य निवडणूक आयोगाने वेगळा मार्ग शोधला पाहिजे.

निवडणूक प्रक्रियेतील बदलाबाबत (उदा. नगराध्यक्षाची थेट निवडणूक) मतदारांपर्यंत बिनचूक व पुरेपूर माहिती गेली पाहिजे. त्यासाठी दृक्श्राव्य आणि सोशल मीडियाचा प्रभावी वापर झाला पाहिजे. राज्य निवडणूक आयोगाचे संकेतस्थळ संवादात्मक आणि बहुभाषिक असावे. निवडणूक प्रक्रियेची व्यवस्थित माहिती होण्यासाठी पत्रकारांसाठी विविध ठिकाणी कार्यशाळांचे आयोजन केले पाहिजे आदी स्वरूपाचे निष्कर्ष आणि शिफारशी या संशोधनाच्या माध्यमातून करण्यात आल्या.

‘उमेदवार कसा असावा?’ या विषयावरदेखील अभ्यास करण्यात आला आहे. नगरविकासाची दूरदृष्टी असणारे उमेदवार राजकारणाच्या गुन्हेगारीकरणामुळे राजकीय व्यवस्थेपासून लांब असतात, असे दिसून आले. श्रीमंत उमेदवार पैशाच्या जोरावर निवडणुका जिंकतात. खर्चमर्यादेपेक्षा कमीत कमी चौपट जास्तीचा खर्च करतात, असा या अभ्यासाचा निष्कर्ष आहे. ‘उमेदवार माझे प्रश्न सोडण्यासाठी उपलब्ध असावा,’ अशी मतदारांची सर्वसाधारण अपेक्षा असते. उमेदवार सुशिक्षित असावा,

प्रभागस्तरीय मुद्दे स्थानिक स्वराज्य संस्थेच्या बैठकीत उपस्थित करण्यासाठी तो सक्षम असावा; मतदारांच्या अशा काही अपेक्षादेखील या अभ्यासाच्या माध्यमातून ठळकपणे लक्षात आल्या.

'मतदार नियमितपणे मतदान का करत नाहीत?' याबाबतही सर्वेक्षण करण्यात आले. हे सर्वेक्षण प्रामुख्याने बृहन्मुंबई आणि पुणे महानगरपालिका क्षेत्रांत करण्यात आले. यात पुढीलप्रमाणे निष्कर्ष आढळून आले.

- स्थलांतरितांची सर्वाधिक संख्या असलेल्या प्रभागात बहुतांश जण तिथल्या यादीत मतदार म्हणून नाव नोंदविण्यास फारसे उत्सुक नसतात.
- उमेदवारांच्या गुणवत्तेबाबत नकारात्मक दृष्टिकोन असणे; तसेच मतदान केल्यामुळे फारसा काही बदल होत नाही, अशी भावना जाणवते.
- पुण्याच्या बाबतीत असे दिसून आले, की ३० टक्के मतदार मतदान करण्याची शक्यताच नसते. ३० टक्के अधूनमधून मतदान करतात आणि ४० टक्के मतदार नियमितपणे मतदान करतात.
- मुंबईच्या बाबतीत ३० टक्के मतदार मतदान करण्याची शक्यता नसते. ४० टक्के मतदार अधूनमधून मतदान करतात; तर ३० टक्के मतदार नियमितपणे मतदान करतात.
- महिला, तरुण आणि उच्चशिक्षित मतदार नियमितपणे मतदान करण्याची शक्यता कमी असते; तर उच्च उत्पन्न असलेल्यांचा कल मतदान न करण्याकडे असतो.

## 'आर्थिक आणि गुन्हेगारी बाबींसंदर्भातील विश्लेषण'

असोसिएशन फॉर डेमोक्रॅटिक रिफॉर्म्स (ADR) या स्वयंसेवी संस्थेने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांतील उमेदवारांच्या आर्थिक आणि गुन्हेगारी पार्श्वभूमीसंदर्भात पहिल्यांदा विश्लेषण केले. त्याचा महत्त्वाचा सारांश पुढीलप्रमाणे :

- राज्यातील महानगरपालिका निवडणुकीतील साधारणतः ९ टक्के उमेदवारांविरुद्ध गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल आहेत.
- बृहन्मुंबई आणि नाशिक महानगरपालिका निवडणुकीत सर्वाधिक प्रत्येकी २९ टक्के उमेदवार कोट्यधीश आहेत.
- बहुतांश उमेदवार राजकीयदृष्ट्या सक्रिय कुटुंबातील व उमेदवारी देताना गुणवत्तेपेक्षा त्यांच्या राजकीय पार्श्वभूमीच्या निकषाला प्राधान्य दिले जाते.

# ७३ व ७४ व्या घटनादुरुस्तीचा रौप्यमहोत्सव

राज्य निवडणूक आयोगातर्फे विविध उपक्रमांच्या माध्यमातून ७३ व ७४ व्या ऐतिहासिक घटनादुरुस्तीचा रौप्यमहोत्सव साजरा करण्यात आला. या माध्यमातून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका आणि सुशासन याअनुषंगाने व्यापक विचारमंथन झाले. स्थानिक स्वराज्य संस्थांचे प्रशासन विरुद्ध राज्य शासन, स्थानिक स्वराज्य संस्थांचे उल्लेखनीय कार्य, स्थानिक स्वराज्य संस्थांमधील महिलांचा प्रभावी सहभाग आदी विषयांवर सखोल चर्चा झाली. त्यातून अनेक नवीन मुद्देही समोर आले.




## अधिकारांचे विकेंद्रीकरण

राज्य शासनाने विविध अधिकारांचे विकेंद्रीकरण करून पंचायतराज संस्थांचे अधिक सक्षमीकरण करणे आवश्यक आहे. अधिकार, निधी आणि साधनसामग्रीचे विकेंद्रीकरण केल्यास आपण विकसित भारत देशाचे स्वप्न लवकरात लवकर साकार करू. पंचायतराज संस्थांकडे अधिकार हस्तांतरासाठी कालबद्ध कार्यक्रम हाती घेतला पाहिजे.

**–सी. विद्यासागर राव,** राज्यपाल



## प्रत्येक जिल्ह्यात प्रशिक्षण संस्था

घटनेतील ७३ व ७४ व्या दुरुस्तीच्या रौप्यमहोत्सवानिमित्त पहिल्या राष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्याचा उपक्रम अभिमानास्पद आहे. या औचित्याच्या निमित्ताने राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या लोकप्रतिनिधींसाठी प्रत्येक जिल्ह्यात प्रशिक्षण संस्था स्थापन करण्यात येईल. प्रशिक्षण आणि क्षमता बांधणीतून निर्णयप्रक्रियेतील विकेंद्रीकरण यशस्वी होईल.

**–श्री. देवेंद्र फडणवीस,** मुख्यमंत्री

त्रिस्तरीय लोकशाही व्यवस्थेतील स्थानिक स्वराज्य संस्थांचे स्थान मजबूत करण्यासाठी सन १९९२मध्ये ७३ व ७४ वी घटनादुरुस्ती करण्यात आली. स्थानिक स्वराज्य संस्थांना 'स्वतंत्र स्थानिक स्वयंशासन' म्हणून संविधानिक मान्यता मिळाली. त्याचबरोबर त्यांच्या निवडणुका निर्भय, मुक्त व पारदर्शक वातावरणात घेण्यासाठी प्रत्येक राज्यात स्वतंत्र राज्य निवडणूक आयोगाची स्थापना करण्यात आली. राज्य निवडणूक आयोगातर्फे विविध उपक्रमांच्या माध्यमातून या ऐतिहासिक घटनेचा रौप्यमहोत्सव साजरा करण्यात आला. या माध्यमातून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका आणि सुशासन याअनुषंगाने व्यापक विचारमंथन झाले.

## राष्ट्रीय परिषद

मुंबई विद्यापीठातील फिरोजशहा मेहता भवनात राज्य निवडणूक आयोगाच्या पुढाकाराने २ व ३ नोव्हेंबर



*'नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांचे प्रश्न व राज्य शासन विरुद्ध स्थानिक स्वराज्य संस्था' या चर्चासत्रात बोलतना नवी दिल्ली येथील प्रा. ओ. पी. माथूर, उपस्थित आमदार श्री. अनिल सोले, माजी सनदी अधिकारी रमानाथ झा.*

२०१७ रोजी राष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. '७३ व ७४ व्या घटनादुरुस्तीची २५ वर्षे : प्रगती आणि भावी वाटचाल' हा परिषदेचा मुख्य विषय होता. मुंबई विद्यापीठ आणि पुणे येथील गोखले राज्यशास्त्र व अर्थशास्त्र संस्था परिषदेचे आयोजक होते. यासाठी राज्य शासनाचेही सहकार्य लाभले. या परिषदेची मूळ संकल्पना आणि प्रेरणा राज्य निवडणूक आयुक्त ज. स. सहारिया यांची होती.

मा. राज्यपाल सी. विद्यासागर राव यांच्या हस्ते २ नोव्हेंबर २०१७ रोजी सकाळी १० वाजता परिषदेचे उद्घाटन झाले. ग्रामविकासमंत्री पंकजा मुंडे प्रमुख पाहुण्या होत्या. राज्य निवडणूक आयुक्त ज. स. सहारिया यांनी प्रास्ताविक केले. बेंगळुरू येथील अकाउंटीबिलीटी इनिशिएटीव्हचे सल्लागार टी. आर. रघुनंदन यांचे या वेळी बीजभाषण झाले. मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी उपस्थितांचे स्वागत केले.

मा. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत ३ नोव्हेंबर २०१७ रोजी दुपारी ३.४५ वाजता परिषदेचा समारोप समारंभ पार पडला. श्री. सहारिया यांनी दोन दिवसांत झालेल्या विचारमंथनाबाबत मनोगत व्यक्त केले. नवी दिल्ली येथील इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेसचे संचालक डॉ. जॉर्ज मॅथ्यू यांचे समारोपाचे भाषण झाले. पुणे येथील गोखले राज्यशास्त्र व अर्थशास्त्र संस्थेचे संचालक डॉ. राजस परचुरे यांनी उपस्थितांचे स्वागत केले.

## विविध विषयांवर विचारमंथन

परिषदेत उद्‌घाटन आणि समारोपाशिवाय सहा वेगवेगळ्या विषयांवर चर्चासत्र झाले. त्यात निवडणूक सुधारणा, स्थानिक स्वराज्य संस्थांचे प्रशासन विरुद्ध राज्य शासन, स्थानिक स्वराज्य संस्थांचे उल्लेखनीय कार्य, स्थानिक स्वराज्य संस्थांमधील महिलांचा प्रभावी सहभाग, स्थानिक स्वराज्य संस्थांची कार्यप्रणाली, निधी व अधिकार आदी विषयांचा समावेश होता. देशभरातील नामवंत विचारवंतांनी परिषदेत आपले विचार मांडले. या परिषदेत स्थानिक स्वराज्य संस्थांचे आजी-माजी पदाधिकारी, स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी, अभ्यासक, विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

## परिषदेच्या आयोजनासाठी समित्या

राष्ट्रीय परिषदेचे यशस्वीरीत्या आयोजन करण्यासाठी शिखर समिती आणि कार्यकारी समिती गठित करण्यात आली होती. शिखर समितीत ग्रामविकास व नगरविकास विभागाचे प्रधान सचिव, मुंबई विद्यापीठाचे कुलसचिव आणि पुणे येथील गोखले राज्यशास्त्र व अर्थशास्त्र संस्थेचे संचालक यांचा समावेश होता. राज्य निवडणूक आयोगाचे




*राष्ट्रीय परिषदेत 'ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांचे प्रश्न व स्थानिक स्वराज्य संस्था विरुद्ध राज्य शासन' या चर्चासत्रात बोलताना मुंबई विद्यापीठाचे डॉ. चंद्रकांत पुरी. शेजारी आरएससीडीचे श्री. दत्ता गुरव, ग्रामविकास विभागाचे माजी सचिव श्री. सुधीर ठाकरे, ग्रामविकास व वित्त विभागाचे माजी प्रधान सचिव व्ही. गिरिराज, केंद्रीय पर्यावरण मंत्रालयाच्या उच्चस्तरीय समितीचे सदस्य श्री. चैत्राम पवार आणि कोलकता येथील डॉ. प्रभात दत्ता.*




*राष्ट्रीय परिषदेत विविध संशोधकांनी शोधनिबंध सादर केले. विद्यापीठाच्या उपयोजित मानसशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. प्रा. गौतम गवळी या सत्राचे अध्यक्ष होते. शोधनिबंध सादर करताना डॉ. अनिरुद्ध प्रसाद सिंह. अन्य संशोधक डॉ. ए. स्टिफन, श्री. असीम मिश्रा, श्रीमती अरुणा साने.*

सचिव या समितीचे समन्वयक होते.

आयोगाचे सचिव शेखर चन्ने यांच्या अध्यक्षतेखाली कार्यकारी समितीदेखील गठित करण्यात आली होती. ग्रामविकास विभागाचे उपसचिव संजय बनकर, नगरविकास विभागाचे विशेष कार्याधिकारी ज. ना. पाटील, मुंबई विद्यापीठाच्या राज्यशास्त्र विभागाचे सहयोगी प्राध्यापक डॉ. मृदुल निळे, गोखले राज्यशास्त्र व अर्थशास्त्र संस्थेच्या प्रा. मानसी फडके, आरएससीडीचे संचालक भीम रासकर, आयोगाचे जनसंपर्क अधिकारी जगदीश मोरे आणि ठाणे जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी या समितीचे सदस्य होते. आयोगाच्या अवर सचिव रीना फणसेकर समितीच्या समन्वयक होत्या. मुंबई विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. दिनेश कांबळे, एडीआरचे संस्थापक–विश्वस्थ डॉ. अजित रानडे आणि सीएलजीएफच्या अनुया कुवर, राज्यशास्त्र विभागाचे श्री. संजय पाटील यांचाही परिषदेच्या आयोजनात मोलाचा हातभार लागला.

## आकर्षक प्रदर्शन आणि पुस्तकांचे प्रकाशन

राष्ट्रीय परिषदेच्या निमित्ताने फिरोजशहा मेहता भवनात अत्यंत लक्षवेधी प्रदर्शनाचेही आयोजन करण्यात आले होते. ७३ आणि ७४ व्या घटनादुरुस्तीची वैशिष्ट्ये, पंचायतराज संस्थांची वाटचाल, राज्य निवडणूक आयोगाचे

विविध टप्पे अशा वेगवेगळ्या विषयांवर आधारित हे प्रदर्शन होते. यासोबतच राज्य निवडणूक आयोग, यशदा, एडीआर आदींनी आपापल्या पुस्तकांची दालने सजवली होती. परिषदेचे उद्घाटन आणि समारोप समारंभात मान्यवरांच्या हस्ते विविध पुस्तकांचे प्रकाशनही करण्यात आले.




*'स्थानिक स्वराज्य संस्थांमधील महिलांचा प्रभावी सहभाग' या विषयावर ज्येष्ठ पत्रकार श्रीमती प्रगती बाणखेले यांच्या अध्यक्षतेखाली चर्चासत्र झाले. उपस्थिती महिला राजसत्ता आंदोलनाच्या राज्य समन्वयक श्रीमती मालती सांगने, हिमाचल प्रदेशातील सामाजिक कार्यकर्ते श्री. सुभाष मेंढापूरकर, कोलकता येथील सामाजिक शास्त्र अभ्यास केंद्राच्या डॉ. दयाबती रॉय आणि गुजरातमधील कला महिला विकास संघटनेच्या श्रीमती लता सचदे.*



*'ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्था : अधिकार, निधी आणि सामग्रीचे विकेंद्रीकरण' या विषयावर डॉ. सुरेंद्र जोंधळे यांच्या अध्यक्षतेखाली चर्चासत्र झाले. या वेळी प्रा. प्रभाकर जाधव व प्रा. शिवाजी जाधव यांच्या 'नांदेड - वाघाळा-२०१७' या पुस्तकाचेही प्रकाशन झाले. उपस्थित आमदार श्री. शिवाजीराव नाईक, पश्चिम बंगालचे डॉ. बी. पी. शाम रॉय, श्रमिक मुक्ती संघटनेच्या श्रीमती इंदवी तुळपुळे, डॉ. एम. गोपीनाथ रेड्डी.*



*'नागरी स्थानिक स्वराज्य संस्था : अधिकार, निधी आणि सामग्रीचे विकेंद्रीकरण' या चर्चासत्रात बोलताना मुंबई महानगरपालिकेचे माजी आयुक्त व नगरविकास विभागाचे माजी प्रधान सचिव श्री. जयराज फाटक. शेजारी धुळे महानगरपालिकेच्या स्थायी समितीचे माजी अध्यक्ष श्री. अनिल मुंदडा. सामाजिक कार्यकर्ते डॉ. जयेंद्र परुळेकर आणि संशोधक श्रीमती वर्षा विद्याविलास.*




*'देशविदेशातील स्थानिक स्वराज्य संस्थांमधील उल्लेखनीय कार्य 'या चर्चासत्रात बोलताना आरएससीडीचे संचालक श्री. भीम रासकर. शेजारी लखनौ येथील डॉ. पंचऋषीदेव शर्मा, मेजर जनरल (निवृत्त) श्री. अनिल वर्मा, सीएलजीएफच्या प्रकल्प अधिकारी श्रीमती अनुया कुवर, फुलंब्री (जि. औरंगाबाद) येथील माजी सरपंच श्री. सुहास शिरसाठ आणि डॉ. टी. ब्रह्मानंदम त्रिगिरीपल्ली.*



*परिषदेच्या उद्‌घाटन समारंभास उपस्थित मान्यवर.*




*'निवडणूक सुधारणा' या चर्चासत्रात बोलताना सामाजिक कार्यकर्ते डॉ. विश्वंभर चौधरी. शेजारी. एडीआरचे प्रा. जगदीप चोकर आणि डॉ. अजित रानडे.*



*परिषदेसाठी स्वयंसेवक म्हणून कार्यरत असलेले मुंबई विद्यापीठाच्या नागरिकशास्त्र व राज्यशास्त्र विभागाचे विद्यार्थी.*



*परिषदेतील प्रदर्शनाची पाहणी करताना मा. मुख्यमंत्री यांच्यासह राज्य निवडणूक आयुक्त ज. स. सहारिया, कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, ग्रामविकास विभागाचे सचिव असीमकुमार गुप्ता आदी.*




*प्रदर्शनाची पाहणी करताना मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस. शेजारी श्री. ज. स. सहारिया., डॉ. देवानंद शिंदे.*



*ग्रामपंचायत सदस्यांच्या प्रशिक्षणासाठी ‘आरएससीडी’ने तयार केलेल्या सापशिडीच्या खेळाची माहिती घेताना ग्रामविकास मंत्री पंकजा मुंडे, श्री. सहारिया, श्री. सुमीत पाटील, डॉ. मृदुल निळे.*

## विभागीय परिषदांतील विचारमंथन

मुंबई विद्यापीठात आयोजित राष्ट्रीय परिषदेप्रमाणे विभागीय पातळीवरदेखील परिषदांचे आयोजन केले पाहिजे, अशी आग्रही सूचना राष्ट्रीय परिषदेत सहभागी झालेले विविध लोकप्रतिनिधी, पदाधिकारी, अधिकारी व शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवरांनी केली होती. ती लक्षात घेऊन राज्य निवडणूक आयोगाच्या पुढाकाराने नाशिक, पुणे, औरंगाबाद, नांदेड, अमरावती व नागपूर येथे जानेवारी २०१८मध्ये विभागीय परिषदांचे आयोजन करण्यात आले होते. या परिषदांमध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांचे पदाधिकारी, लोकप्रतिनिधी, अधिकारी, सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवर सहभागी झाले होते. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या गेल्या २५ वर्षांच्या वाटचालीचा आढावा घेतानाच भावी वाटचालीचा वेधही घेण्यात आला. त्यातून काही चांगल्या सूचनाही समोर आल्या.

| अ.क्र. | विभागीय परिषदेचे ठिकाण | दिनांक |
|---|---|---|
| १. | नाशिक | ५ जानेवारी २०१८ |
| २. | नांदेड | १७ जानेवारी २०१८ |
| ३. | पुणे (ग्रामीण) | १७ जानेवारी २०१८ |
| ४. | नागपूर | १८ जानेवारी २०१८ |
| ५. | पुणे (शहर) | २० जानेवारी २०१८ |
| ६. | अमरावती | २० जानेवारी २०१८ |
| ७. | औरंगाबाद | २२ जानेवारी २०१८ |



*नाशिक येथील यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठात ५ जानेवारी २०१८ रोजी विभागीय परिषद झाली. ग्रामविकास राज्यमंत्री दादाजी भुसे, नाशिक जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा शीतल सांगळे, अहमदनगर जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा शालिनीताई विखे-पाटील, महापौर रंजना भानसी, कुलगुरू डॉ. ई. वायुनंदन, विभागीय आयुक्त महेश झगडे, महानगरपालिका आयुक्त डॉ. अभिषेक कृष्णा, जिल्हाधिकारी राधाकृष्णन, मुख्य कार्यकारी अधिकारी दीपककुमार मीना, डी. गंगाधरन, पोलीस अधीक्षक संजय दराडे, विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. दिनेश बोंडे आदी उपस्थित होते.*



*नांदेड येथील स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठात १७ जानेवारी २०१८ रोजी विभागीय परिषद झाली. जिल्हा परिषद अध्यक्षा शांताबाई पवार, महापौर शीलाताई भवरे, कुलगुरू डॉ. पंडित विद्यासागर, जिल्हाधिकारी अरुण डोंगरे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अशोक शिनगारे, परभणीचे महानगरपालिका आयुक्त राहुल रेखावार, अपर जिल्हाधिकारी संतोष पाटील, महानगरपालिका आयुक्त गणेश देशमुख, उपजिल्हाधिकारी अनुराधा ढालकरी आदी उपस्थित होते.*

*पुणे येथील यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनीत (यशदा) २० जानेवारी २०१८ रोजी शहरी स्थानिक स्वराज्य संस्थांसंदर्भात विभागीय परिषद झाली. पालकमंत्री गिरीश बापट, पुण्याच्या महापौर मुक्ता टिळक, उपमहापौर सिद्धार्थ धेंडे, विभागीय आयुक्त चंद्रकांत दळवी, एडीआरचे संस्थापक विश्वस्त डॉ. अजित रानडे, निवृत्त सनदी अधिकारी रमानाथ झा, विचारवंत डॉ. सुहास पळशीकर, मलकापूरचे उपनगराध्यक्ष मनोहर शिंदे आदी उपस्थित होते.*





*पुणे येथील यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनीत (यशदा) १७ जानेवारी २०१८ रोजी ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांसंदर्भात विभागीय परिषद झाली. पुणे जि.प.चे अध्यक्ष विश्वासराव देवकाते, सांगली जि.प.चे अध्यक्ष संग्रामसिंह देशमुख, कोल्हापूर जि.प.च्या अध्यक्षा शमिका महाडिक, विभागीय आयुक्त चंद्रकांत दळवी, पुणे जि.प.चे मुख्य कार्यकारी अधिकारी सूरज मांढरे, ग्रामीण विकास विभागाचे माजी सचिव सुधीर ठाकरे, उपायुक्त संजयसिंह चव्हाण आदी उपस्थित होते.*

*नागपूर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृहात १८ जानेवारी २०१८ रोजी विभागीय परिषद झाली. महापौर श्रीमती नंदा जिचकार, जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा श्रीमती निशा सावरकर, आमदार प्रा. अनिल सोले, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सिद्धार्थ विनायक काणे, विभागीय आयुक्त अनूप कुमार, राज्य निवडणूक आयोगाचे तत्कालीन सचिव शेखर चन्ने, महानगरपालिका आयुक्त आश्विन मुदगल आदी उपस्थित होते.*






*अमरावती येथील संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठात २० जानेवारी २०१८ रोजी विभागीय परिषद झाली. पालकमंत्री प्रवीण पोटे, विभागीय आयुक्त पीयुष सिंह, राज्य निवडणूक आयोगाचे तत्कालीन सचिव शेखर चन्ने, माजी महापौर मिलिंद चिमोटे, राजकीय अभ्यासक डॉ. जयप्रकाश पवार, फिरदोस मिर्झा आदी उपस्थित होते.*

*औरंगाबाद येथे मराठवाडा महसूल प्रशिक्षण प्रबोधिनीत २२ जानेवारी २०१८ रोजी विभागीय परिषद झाली. राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर, जिल्हा परिषद अध्यक्षा देवयानी डोणगावकर, महापौर नंदकुमार घोडेले, विभागीय आयुक्त डॉ. पुरुषोत्तम भापकर, जिल्हाधिकारी नवल किशोर राम, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. बी. ए. चोपडे, महानगरपालिका आयुक्त डॉ. एम. मुगळीकर, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकरी अधिकारी मधुकरराजे अर्दड आदी उपस्थित होते.*






*मुंबई येथे ७ मे २०१८ रोजी एसएनडीटी महिला विद्यापीठाच्या पाटकर सभागृहात राजकीय पक्षांच्या कार्यशाळेस उपस्थित (डावीकडून) राज्य निवडणूक आयोगाचे सचिव शेखर चन्ने, ज्येष्ठ विचारवंत डॉ. सुहास पळशीकर, राज्य निवडणूक आयुक्त ज. स. सहारिया आणि सामाजिक कार्यकर्ते डॉ. विश्वंभर चौधरी.*

## राजकीय पक्षांची कार्यशाळा

मुंबई येथील एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठात ७ मे २०१८ रोजी राजकीय पक्षांची कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. 'राजकीय पक्षांद्वारे सशक्त लोकशाही' हा कार्यशाळेचा मुख्य विषय होता. मा. राज्य निवडणूक आयुक्त श्री. ज. स. सहारिया यांच्या प्रमुख उपस्थितीत दोन सत्रांत ही कार्यशाळा पार पडली.

राज्य निवडणूक आयोगाकडील सर्व २५१ राजकीय पक्षांना या कार्यशाळेसाठी निमंत्रित करण्यात आले होते. राष्ट्रीय समाज पक्षाचे अध्यक्ष व मंत्री महादेव जानकरदेखील या वेळी उपस्थित होते. उद्‌घाटन सत्रात श्री. सहारिया यांच्यासह आयोगाचे तत्कालीन सचिव शेखर चन्ने, ज्येष्ठ विचारवंत डॉ. सुहास पळशीकर, सामाजिक कार्यकर्ते विश्वंभर चौधरी, प्रा. मानसी फडके आदी सहभागी झाले होते.

उद्‌घाटन सत्रानंतर खुले चर्चासत्र झाले. श्री. चन्ने

यांनी खुल्या चर्चासत्रात राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींच्या प्रश्नांचे व शंकांचे निरसन केले. आर.एस.सी.डी.चे संचालक भीम रासकर, राजकीय अभ्यासक डॉ. मृदुल निळे, डॉ. ए. एन. सिद्धेवाड, डॉ. सुनंदा तिडके, सीएलजीएफच्या अनुया कुवर आदींनी खुल्या चर्चासत्रात सहभाग घेतला.

श्री. शेखर चन्ने यांनी उद्‌घाटन सत्रात उपस्थितांचे स्वागत केले व कार्यशाळेच्या आयोजनामागील भूमिका विशद करताना पुढील मुद्दे मांडले :

- निर्भय, मुक्त व पारदर्शक वातावरणात निवडणुका घेण्यात राजकीय पक्षांची भूमिका अत्यंत मोलाची असते. त्यादृष्टीने संवाद साधण्यासाठी या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.
- लोकशाही सुदृढ करण्यासाठी राजकीय पक्षांनी चांगले उमेदवार उभे करणे अपेक्षित आहे.
- निवडणुकांत आर्थिक बळाचा दुरुपयोग टाळणे, गुंड प्रवृत्तींना लांब ठेवणे, मतदारांवर विपरीत प्रभाव टाकणारी कृत्ये टाळणे, आचारसंहितेचे पालन करणे, पक्षांतर्गत लोकशाही असणे आदी मुद्द्यांवर या कार्यशाळेत चर्चा अपेक्षित आहे.

श्री. सहारिया यांनी ७३ व ७४ व्या घटनादुरुस्तीची वैशिष्ट्ये, निवडणुकांसंदर्भातील चिंतेचे मुद्दे, अपेक्षित निवडणूक सुधारणा इत्यादी विषयांचा परामर्श घेतला. याबाबत व्यापक विचारमंथनाची आवश्यकता असल्याचे ते म्हणाले. त्यांच्या सादरीकरणातील ठळक मुद्दे असे :

- राज्य निवडणूक आयोगाचा दर्जा, अधिकार व शक्ती भारत निवडणूक आयोगाप्रमाणेच.
- राज्य निवडणूक आयोगाचे निर्देश पाळणे शासनावर बंधनकारक.
- आर्थिक बळाचा गैरवापर, गुन्हेगारी पार्श्वभूमीचे उमेदवार, मतदारांना प्रलोभने व आमिष दाखविण्याची प्रवृत्ती, पक्षांतर्गत लोकशाहीबाबत प्रश्नचिन्ह आदी मुद्दे चिंतेचे ठरत आहेत.
- मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निकालानुसार शपथपत्रामध्ये उत्पन्नाचा स्रोत नमूद करणे आवश्यक.
- उमेदवारांच्या अर्हतेसंदर्भातील पात्रता, अटी व निकष व्यापक करण्याची आवश्यकता.
- राजकीय पक्षांसाठी खर्चमर्यादा निश्चित करण्याची आवश्यकता.
- राजकीय पक्षांनी स्वच्छ प्रतिमा व सामाजिक बांधिलकी असलेले उमेदवार उभे करणे आवश्यक.
- मतदारांना प्रलोभने व आमिष दाखविणे टाळून आदर्श आचारसंहितेचे कटाक्षाने पालन करणे आवश्यक.

डॉ. विश्वंभर चौधरी यांनी 'राजकीय पक्षांकडून अपेक्षा' या विषयावर भाष्य केले. निवडणूक यंत्रणेकडूनही त्यांनी काही अपेक्षा व्यक्त केल्या. त्यांच्या मांडणीतील ठळक मुद्दे असे :

- राज्य निवडणूक आयोग स्वायत्त आहे; पण स्वतंत्र नाही. निरपेक्ष निवडणुका आणि सरकारी पक्षाचा हस्तक्षेप टाळण्यासाठी स्वायत्ततेबरोबरच निवडणूक आयोग स्वतंत्रदेखील असणे आवश्यक आहे.
- 'भारतीय प्रशासकीय सेवा' व 'भारतीय पोलिस सेवे'च्या धर्तीवर 'इंडियन इलेक्शन सर्व्हिसेस' (IES) असावी. या अधिकाऱ्यांचा शासनाच्या आस्थापनेशी संबंध नसावा.

- निवडणूक जाहीरनाम्यातील आश्वासनांची पूर्ती होत नाही. त्यासाठी ग्राहक संरक्षणाप्रमाणे 'मतदार (मालक) संरक्षण कायद्या'ची गरज आहे.
- नोटाला सर्वाधिक मते मिळाल्यास नव्याने निवडणूक घेण्यात यावी. फेरनिवडणुकीत सर्व जुने उमेदवार अपात्र ठरवावेत.
- निवडणुका निर्भय, मुक्त व पारदर्शक असाव्यात आणि त्या तशा दिसाव्यातही. म्हणून मतदान यंत्रांबाबत शंका असल्यास त्यांचे निश्चितच निरसन केले पाहिजे.
- राजकीय पक्षांना मिळणाऱ्या देणग्यांबाबत पारदर्शकता असावी. देणग्यांमुळे हितसंबंधांचा (कॉन्फ्लिक्ट ऑफ इंटरेस्ट) प्रश्न निर्माण होतो. आयोगाने देणग्यांची किमान यादृच्छिक (रँडम) पद्धतीने तपासणी करावी.
- राजकीय पक्षांनी स्वत:हून माहिती अधिकाराखाली यायला हवे. ध्येयधोरणांचा समावेश नसला तरी किमान त्यांचे आर्थिक व्यवहार माहिती अधिकारात असावेत.
- राजकीय पक्षांनी आपला जमा-खर्च संकेतस्थळावर स्वत:हून टाकावा. यातून पक्षांमध्ये पारदर्शकतेची स्पर्धा निर्माण होऊ शकते.
- निवडणूक काळात आचारसंहिता असतेच; पण एरवीदेखील कायमस्वरूपी किमान आचारसंहिता असावी. फक्त ही आचारसंहिता अभिव्यक्तिस्वातंत्र्याच्या आड येऊ नये.
- पक्षांतर्गत लोकशाही हा केवळ देखावा आहे. पक्षांतर्गत लोकशाहीला असलेला धोका मूळ लोकशाहीवरच घाला घालू शकतो.
- निवृत्तीपूर्वी काही अधिकारी एखाद्या राजकीय पक्षाचे हितसंबंध जोपासतात. निवृत्तीनंतर ते लगेचच संबंधित पक्षात प्रवेश करतात; थेट निवडणुकाही लढवितात. निवृत्तीनंतर यात किमान दोन- तीन वर्षे खंड असावा.

डॉ. सुहास पळशीकर यांनी 'राजकीय पक्ष : प्रतिमा आणि अपेक्षा' या विषयावर अत्यंत अभ्यासपूर्वक व चिंतनशील विवेचन केले. त्यांच्या विवेचनातील ठळक मुद्दे असे :

- राजकीय पक्ष म्हणजे सत्ता मिळविण्यासाठी आणि टिकविण्यासाठी खुल्या स्पर्धेद्वारे प्रयत्न करणारा गट होय.
- देशाचे नियंत्रण राजकीय पक्ष करतात; पण राजकीय पक्षांचे नियंत्रण कोण करते? हा व्यवस्थेतील विरोधाभास आहे.
- साधारणत: पोलिस किंवा अधिकाऱ्यांविषयी अविश्वासाचे प्रमाण जास्त असते; परंतु राजकीय पक्षांवर अविश्वास असणे म्हणजे लोकांचे नेतृत्व करणाऱ्यांवरच लोकांचा विश्वास नसणे, हे गंभीर आहे.
- जागतिक विचार केल्यास तुलनेने भारतात लोकांचा राजकीय पक्षांवर जास्त विश्वास आहे, हे आपल्या राजकीय पक्षांचे श्रेय मानावे लागेल.
- राजकीय पक्ष आवश्यक आहेत; पण पक्षांचा व्यवहार लोकशाही पद्धतीचा असतोच, असे नाही. पक्ष सतत लोकांमध्ये असतात. तरीही पक्षांवर ठरावीक लोकांचेच वर्चस्व असते. तरीही, अनेक समूह प्रतिनिधित्वाविना राहतात.
- लोक राजकीय पक्षांवर विश्वास ठेवत नाहीत; पण आपल्या कामांसाठी पक्षांकडेच जातात. यावरच

आपल्या देशाचे राजकारण चालते.

- राजकीय पक्ष स्थापन करणे अतिशय सोपे आहे; पण टिकविणे कठीण असते. चालविणे त्याहून अवघड आहे.
- कार्यकर्ते, सभासद, निधी आदींचा कोणीही विचार करत नाही; पण पक्ष चालविताना ते लागते. काही पक्ष पदार्पणातच जोरदार यश संपादन करतात; पण नंतर फारसे यशस्वी होताना दिसत नाहीत.
- राजकीय पक्षांची बराच काळ छोटा पक्ष म्हणून राहण्याची तयारी असावी लागते. सत्ता आणि पदांचे उद्दिष्ट नैसर्गिक आहे; परंतु वाट पाहण्यास कोण तयार असते? अधीर नेते आणि कार्यकर्ते ही अडचण आहे.
- छोट्या पक्षांसमोर टिकून राहण्याचे मोठे आव्हान आहे. कार्यकर्ते मिळविणे, टिकविणे आणि त्यांचा उत्साह वाढविणे महत्त्वाचे असते.
- राजकीय पक्षांना वर्गणी, देणग्या, निवडणुका या खर्चिक बाबीही पेलाव्या लागतात. परिणामी, छोट्या पक्षांचा राजकीय यशाचा आलेख कमी असतो.
- पक्षाची संघटनाबांधणी करण्यासाठी स्थानिक स्तरावरील यंत्रणा, संलग्न संघटनांचे जाळे, पक्षांतर्गत लोकशाही आणि सर्व कार्यकर्त्यांच्या अपेक्षांच्या संतुलनासाठी सजग राहावे लागते.
- लोकांचा पाठिंबा मिळविण्यासाठी राजकीय मानसशास्त्रात अनेक क्लृप्त्या असल्या, तरी हे शास्त्र अवघड आणि अदृश्य आहे.
- सर्वांत महत्त्वाचा मार्ग म्हणजे प्रसारमाध्यमांच्या माध्यमातून सतत लोकांच्या डोळ्यासमोर राहावे लागते; परंतु प्रसारमाध्यमांतील जाहिरातींवर किंवा एकाच नेत्याच्या आधारे पक्ष चालविण्याचा प्रयत्न निरंतर यश देत नाही.
- भावनिक आवाहनांद्वारे यश संपादन करण्याचा कल अलीकडे जगभर दिसतो आहे. त्याबाबत अमेरिका, रशिया आणि तुर्कस्तानातील निवडणुकांत ही प्रारूपे विकसित होताना दिसली; पण ही प्रारूपे फार काळ टिकत नाहीत.

## निवडणूक तज्ज्ञांची कार्यशाळा

मुंबई विद्यापीठाच्या सहकार्याने ‘लोकशाही, निवडणुका व सुशासन’ या अनुषंगाने ६ जुलै २०१८ रोजी मुंबई येथे निवडणूक या विषयातील तज्ज्ञांची व अभ्यासकांची एक दिवसीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. निवडणुकांमधील अधिकाधिक लोकसहभाग, आर्थिक बळाच्या दुरुपयोगाला प्रतिबंध करणे, निवडणुकीतील सोशल मीडियाचा वापर, सुप्रशासनासाठी लोकशाही व निवडणूक संस्थेची स्थापना आणि चालना यावर या कार्यशाळेत विचारमंथन झाले.

राज्य निवडणूक आयुक्त श्री. ज. स. सहारिया यांच्या प्रमुख उपस्थितीत ही कार्यशाळा झाली. गोखले राज्यशास्त्र व अर्थशास्त्र संस्थेचे संचालक डॉ. राजस परचुरे, डॉ. टी. आर. रघुनंदन, डॉ. मृदुल निळे, डॉ. अजित रानडे, डॉ. बालसिंग राजपूत, श्री. भीम रासकर, डॉ. जगदीप चोकर आदी मान्यवरांनी या कार्यशाळेत आपले विचार व्यक्त केले.

विभागीय स्तरावरदेखील अशा स्वरूपाच्या कार्यशाळा २०१८ मध्ये घेण्यात आल्या. त्याचबरोबर



*मुंबई विद्यापीठात ६ जुलै २०१८ रोजी आयोजित निवडणूकविषयक तज्ज्ञांच्या कार्यशाळेत बोलताना राज्य निवडणूक आयुक्त ज. स. सहारिया. या कार्यशाळेत आयोगाचे तत्कालीन सचिव शेखर चन्ने, डॉ. राजस परचुरे, डॉ. टी. आर. रघुनंदन, डॉ. मृदुल निळे, डॉ. अजित रानडे, डॉ. बालसिंग राजपूत, श्री. भीम रासकर, डॉ. जगदीप चोकर आदी मान्यवर सहभागी झाले होते.*

'सुदृढ लोकशाहीसंदर्भातील राजकीय पक्षांची भूमिका' या विषयावरदेखील राजकीय पक्षांच्या कार्यशाळा घेण्यात आल्या.

## तज्ज्ञांच्या विभागीय कार्यशाळा

राज्य निवडणूक आयोगाच्या पुढाकाराने जानेवारी– फेब्रुवारी २०१८ मध्ये विविध ठिकाणी विभागीय कार्यशाळादेखील आयोजित करण्यात आल्या होत्या. त्याचप्रमाणे सप्टेंबर– ऑक्टोबर २०१८ मध्ये विविध ठिकाणी निवडणूकविषयक तज्ज्ञांच्या विभागीय कार्यशाळा आयोजित करण्यात आल्या होत्या. मुंबईत ६ जुलै २०१८ रोजी आयोजित तज्ज्ञांच्या कार्यशाळेनंतर विभागीय स्तरावरदेखील अशा कार्यशाळा आयोजित करण्यात याव्यात, अशी संकल्पना पुढे आली होती. त्यामुळे अमरावती, नागपूर, नवी मुंबई, धुळे, पुणे आणि औरंगाबाद येथे अशा प्रकारच्या कार्यशाळा घेण्यात आल्या. या कार्यशाळांमध्ये निवडणुकीसंदर्भातील तज्ज्ञ, अभ्यासक, अधिकारी/ कर्मचारी, स्थानिक स्वराज्य संस्थांचे प्रतिनिधी आदी सहभागी झाले होते. यावेळी झालेल्या चर्चेत सर्वांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

| तज्ज्ञांच्या विभागीय कार्यशाळा | | |
|---|---|---|
| **विभाग** | **ठिकाण** | **दिनांक** |
| अमरावती | अमरावती | १ सप्टेंबर २०१८ |
| नागपूर | नागपूर | १९ सप्टेंबर २०१८ |
| कोकण | नवी मुंबई | २७ सप्टेंबर २०१८ |
| नाशिक | धुळे | २७ सप्टेंबर २०१८ |
| पुणे | पुणे | २९ सप्टेंबर २०१८ |
| औरंगाबाद | औरंगाबाद | ६ ऑक्टोबर २०१८ |

## राजकीय पक्षांच्या विभागीय कार्यशाळा

मुंबई येथे ७ मे २०१८ रोजी राजकीय पक्षांची राज्यस्तरीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. 'स्थानिक स्वराज्य संस्थांच्या मुक्त, निर्भय व पारदर्शक निवडणुका आणि राजकीय पक्ष' या विषयावर या कार्यशाळेत विचारमंथन झाले. त्याच धर्तीवर अमरावती, नाशिक व पुणे येथे विभागीय कार्यशाळा आयोजित करण्यात आल्या होत्या. या विभागीय कार्यशाळेत विविध राजकीय पक्षांचे प्रतिनिधी, निवडणुकीशी संबंधित अधिकारी/ कर्मचारी आणि राज्य निवडणूक आयोगाचे प्रतिनिधी सहभागी झाले होते.

# लोकशाही पंधरवडा

'लोकशाही निवडणुका व सुशासन' या विषयावर सतत शिक्षणाच्या दृष्टीने नवनवीन उपक्रमांचा भाग म्हणून राज्य निवडणूक आयोगातर्फे दरवर्षी २६ जानेवारी ते १० फेब्रुवारी या कालावधीत लोकशाही पंधरवडा साजरा करण्यात येतो. २०१८ पासून हा उपक्रम सुरू करण्यात आला आहे. या कालावधी राज्यभरात जिल्हाधिकारी कार्यालये, महानगरपालिका, नगरपरिषदा, नगरपंचायती आणि जिल्हा परिषदांमार्फत ठिकठिकाणी विविध उपक्रम राबविले जातात. विविध महाविद्यालये आणि विद्यापीठांकडूनही याला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभत आहे.




*मुंबई येथे राज्य निवडणूक आयोगातर्फे आयोजित लोकशाही पंधरवड्याच्या समारोप समारंभास उपस्थित मा. राज्यपाल सी. विद्यासागर राव, मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस, राज्य निवडणूक आयुक्त ज. स. सहारिया, राज्याचे मुख्य सचिव सुमीत मल्लीक आणि पोलीस महासंचालक सतीश माथूर.*

लोकशाही सुदृढ करण्यासाठी सतत शिक्षणाद्वारे जनजागृती करणे आवश्यक आहे, ही बाब मुंबई विद्यापीठात २ व ३ नोव्हेंबर २०१७ रोजी झालेल्या राष्ट्रीय परिषदेत प्रामुख्याने समोर आली होती. त्याअनुषंगाने 'लोकशाही निवडणुका व सुशासन' या विषयावर सतत शिक्षणासाठी नवनवीन उपक्रम राबविण्याची बाब राज्य निवडणूक आयोगाच्या विचाराधीन होती. त्याचाच एक भाग म्हणून आयोगाने ६ जानेवारी २०१८च्या आदेशान्वये २६ जानेवारी ते १० फेब्रुवारी या कालावधीत राज्यभरात लोकशाही पंधरवडा साजरा करण्याचा निर्णय घेतला.

जिल्हा स्तरावर जिल्हाधिकारी, महानगरपालिका स्तरावर महानगरपालिका आयुक्त व विभागीय स्तरावर विभागीय आयुक्त यांनी सर्व विभागांशी समन्वय साधून पंधरवड्याची रूपरेषा आखावी व पंधरवडा यशस्वीरीत्या साजरा करण्याची दक्षता घ्यावी, असे राज्य निवडणूक आयोगाच्या आदेशात नमूद केले होते. जिल्हाधिकारी

कार्यालय, महानगरपालिका, नगरपरिषदा/ नगरपंचायती आणि जिल्हा परिषदांमार्फत ठिकठिकाणी विविध उपक्रमांद्वारे लोकशाही पंधरवडा साजरा करण्यात आला.

## लोकशाही पंधरवड्यातील उपक्रम

- प्रजासत्ताक दिनाच्या कार्यक्रमात मुख्य वक्त्यांच्या भाषणात 'लोकशाही निवडणुका व सुशासन' या विषयावर भाष्य.
- 'लोकशाही निवडणुका व सुशासन' या विषयावर ठिकठिकाणी फलक लावून जनजागृती.
- विद्यापीठे व महाविद्यालयांमध्ये निबंध, वक्तृत्व इत्यादी स्पर्धांचे आयोजन.
- लोकशाहीची त्रिस्तरीय रचना; तसेच नागरिक व लोकप्रतिनिधी यांच्या जबाबदाऱ्यांबाबत जनजागृती.
- लोकशाही पंधरवड्यानिमित्त विविध संस्था, संघटनांच्या मदतीने जनजागृती.
- विविध उद्योगसमूहांच्या सहयोगाने व सहभागाने विशेष कार्यक्रमांचे आयोजन.
- स्थानिक स्वराज्य संस्थांच्या नवनिर्वाचित लोकप्रतिनिधींसमवेत खुल्या चर्चांचे आयोजन.

## गव्हर्नर्स कॉनक्लेव्ह

राज्य निवडणूक आयोगातर्फे २६ जानेवारी ते १० फेब्रुवारी या कालावधीत लोकशाही पंधरवडा साजरा करण्यात आला. 'गव्हर्नर्स कॉनक्लेव्ह'नावाने या पंधरवड्याचा समारोप समारंभ ०९ फेब्रुवारी २०१८ रोजी मा. राज्यपाल सी. विद्यासागर राव आणि मा. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत आयोजित करण्यात आला होता. राज्य निवडणूक आयुक्त ज. स. सहारिया यांनी कार्यक्रमाच्या प्रारंभी लोकशाही पंधरवडा साजरा करण्यामागील भूमिका विशद केली.

राज्याचे मुख्य तत्कालीन सचिव सुमीत मल्लिक, तत्कालीन पोलीस महासंचालक सतीश माथूर, आयोगाचे तत्कालीन सचिव शेखर चन्ने या वेळी उपस्थित होते. या परिषदेस राज्य प्रशासनातील विविध विभागांचे प्रधान सचिव, सचिव, विविध जिल्ह्यांतील पोलीस अधिकारी; तसेच स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

## स्वतंत्र कायदा हवा

श्री. सहारिया यांनी लोकशाही पंधरवडा साजरा करण्यामागचा उद्देश स्पष्ट केला. स्थानिक स्वराज्य संस्थांचे महत्त्व व त्यांच्या सांविधानिक जबाबदारीबद्दल लोकांना सतत शिक्षण देणे आवश्यक असल्याची बाब प्रकर्षाने नोव्हेंबर २०१७मधील परिषदेतून पुढे आली होती. त्या उद्देशाने हा पंधरवडा साजरा करण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले. त्यांच्या भाषणातील काही ठळक मुद्दे असे :

- स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी लोकप्रतिनिधित्व अधिनियमाच्या धर्तीवर स्वतंत्र कायदा करण्याची आवश्यकता आहे. त्याचबरोबर सध्याच्या कायद्यांतील तरतुदीमधील विसंगती दूर करण्याचीही आवश्यकता आहे.
- अधिकाधिक चांगले उमेदवार पुढे यावेत, यासाठी आर्थिक बळाचा दुरुपयोग टाळणे, गुन्हेगारी पार्श्वभूमीच्या

उमेदवारांना थारा नसणे इत्यादींबाबत कायद्यात स्पष्ट तरतुदींची आवश्यकता आहे.

- स्थानिक स्वराज्य संस्थांच्या लोकप्रतिनिधींच्या प्रशिक्षणाची सुविधा असावी.
- स्थानिक स्वराज्य संस्थेच्या स्वरूपात किंवा हद्दीत ऐन निवडणुकीच्या तोंडावर बदल होता कामा नये. निवडणूक खर्च भारित खर्च म्हणून धरण्यात यावा.
- शासनाने निवडणुकीच्या काळात संबंधित अधिकारी/ कर्मचाऱ्यांची बदली करू नये; तसेच आयोगाच्या कार्यालयातील अधिकारी/ कर्मचाऱ्यांच्याही परस्पर बदल्या होता कामा नये.
- राज्य निवडणूक आयोगाच्या आर्थिक स्वायत्ततेबाबत आणि कर्मचारी आकृतिबंधाबाबत तातडीने शासन निर्णय निर्गमित करण्यात यावा.
- विविध विद्यापीठांनी विद्यार्थ्यांच्या मतदार नोंदणीत पुढाकार घ्यावा; तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसंदर्भात संशोधनाला चालना द्यावी.

## स्वतंत्र कायद्यासाठी समिती नेमावी

लोकशाही बळकटीकरणाकरिता राजकीय संस्कृती अधिक प्रगल्भ होणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. त्यांच्या भाषणातील ठळक मुद्दे असे :

- मा. राज्य निवडणूक आयुक्त यांनी आज उपस्थित केलेल्या विविध मुद्द्यांबाबत शासन निश्चितच सकारात्मक भूमिका घेईल आणि सर्व विषय मार्गी लावले जातील.
- स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका अधिकाधिक मुक्त, निर्भय आणि पारदर्शक वातावरणात पार पाडण्यासाठी राज्य निवडणूक आयोगाची स्वायत्तता अबाधित राखण्यासाठी शासन सर्वतोपरी सहकार्य करेल.
- आयोगाच्या मूल्यांकनानुसार निधीची उपलब्धता आणि खर्चासंदर्भातील अधिकार देण्यात येतील. त्याचबरोबर ऐन निवडणुकीच्या तोंडावर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या हद्दीतील बदल, आयोगाच्या कार्यालयातील अधिकारी/ कर्मचाऱ्यांच्या परस्पर होणाऱ्या बदल्या, आकृतिबंध याबाबत तातडीने पावले उचलली जातील.
- राज्यामध्ये ज्या कायद्याद्वारे निवडणुका घेतल्या जातात, त्यात मतदान सक्ती करता येईल का, याबाबत विचार करणे आवश्यक आहे. काही लोक धोरणात्मक बाबींवर नेहमी बोलत असतात; परंतु ते मतदानाला जात नाहीत. यासाठी सक्तीच्या मतदानाची आवश्यकता आहे.
- राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सातत्याने निवडणुका सुरू असतात. त्याऐवजी एकत्रित निवडणुका घेता येतील का, असा विचार केला पाहिजे. एकत्रित निवडणुका घेतल्यास निवडणूक आयोग, प्रशासन व पोलिसांवरील ताण कमी होण्यास मदत होईल.
- संविधानाने राज्याला जे अधिकार दिले आहेत, त्याअंतर्गत निवडणूक प्रक्रियेत अधिक सुधारणा करण्यासाठी; तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी सर्वसमावेशक कायद्याचा मसुदा तयार करण्यासाठी मा. राज्य निवडणूक आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमावी. या समितीचे सदस्य

म्हणून मा. राज्य निवडणूक आयुक्तांना हवे असलेले अधिकारी/ जाणकार उपलब्ध करून दिले जातील.

- सदर समितीने आर्थिक बळाचा दुरुपयोग टाळणे आणि गुन्हेगारी पार्श्वभूमीच्या उमेदवारांना रोखणे; तसेच सर्वसमावेशक नवीन कायदा करणे इत्यादींबाबतचा अभ्यासपूर्ण मसुदा सादर केल्यास त्यावर तातडीने कार्यवाही करून त्याला कायद्याचे स्वरूप दिले जाईल.
- स्थानिक स्वराज्य संस्थांच्या लोकप्रतिनिधींच्या प्रशिक्षणासाठी प्राधान्याने व्यवस्था निर्माण केली जाईल.

## 'नोटा'संदर्भात ठोस तरतुदींची गरज

लोकशाही ही एक जीवनशैली आहे. ती आपल्या देशाची सांस्कृतिक परंपरा आहे. गेली ६९ वर्षे प्रत्येक टप्प्यावर लोकशाही सक्षम होण्यासाठी प्रयत्न केले गेले आहेत, असे मत मा. राज्यपालांनी व्यक्त केले. त्यांच्या भाषणातील ठळक मुद्दे असे :

- लोकशाही बळकट करण्यासाठी लोकसहभाग विशेषत: युवकांचा मोठ्या प्रमाणावर सहभाग वाढविण्याची आवश्यकता आहे. त्यासाठी राज्य निवडणूक आयोगाने समाजमाध्यमांचा प्रभावी वापर करावा.
- विविध सामाजिक संस्था, संघटना, गणेश मंडळे यांच्या मदतीने मतदार नोंदणी आणि मतदान टक्केवारी वाढविण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत.
- गेली ६९ वर्षे प्रत्येक टप्प्यावर लोकशाही सक्षम होण्यासाठी प्रयत्न केले गेले आहेत; परंतु निवडणुकांमध्ये पैशाचा होणारा वापर चिंताजनक असून ते भ्रष्टाचाराचे मूळ आहे.
- निवडणुकीत नोटाला अधिक मते मिळाल्यास करायच्या कार्यवाहीसंदर्भात ठोस तरतुदी केल्या पाहिजेत. शक्य असल्यास याबाबत राज्य निवडणूक आयोगाने आदेश निर्गमित करावेत. अन्यथा, राज्य शासनाने कायदा करण्यासाठी पुढाकार घ्यावा.
- निवडणुकीनंतर गावात शांतता व सौहार्दपूर्ण वातावरण राखण्यासाठी प्रभावी प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे.
- स्थानिक स्वराज्य संस्थांसंदर्भात कर्नाटक व केरळ राज्यांमध्ये अधिक प्रभावीपणे काम सुरू आहे. त्याच्या अभ्यासासाठी राज्यातील विद्यापीठांच्या कुलगुरूंना व अभ्यासकांना या दोन राज्यांमध्ये पाठवायला हवे.
- स्थानिक स्वराज्य संस्थांना अधिक सक्षम करण्यासाठी त्यांच्याकडे हस्तांतरित करायच्या विषयांसंदर्भात कालमर्यादेत परिपूर्ण कार्यवाही झाली पाहिजे.
- निर्भय, मुक्त व पारदर्शक वातावरणात निवडणुका पार पाडण्यासाठी राज्य शासनाने एक उत्कृष्ट कायदा करावा. मात्र, जोपर्यंत असा कायदा होत नाही तोपर्यंत राज्य निवडणूक आयोगाने संविधानाने दिलेल्या अधिकारांचा वापर करून योग्य ते आदेश निर्गमित करावेत.

## सोलापूर विद्यापीठात चर्चासत्र

लोकशाही व्यवस्थेत आपण सर्वांनी सक्रिय सहभाग घेतला पाहिजे. जागृत राहिले पाहिजे. लोकशाहीच्या बळकटीकरणासाठी सतत कटिबद्ध असायला हवे, असा सूर 'लोकशाही, निवडणुका व सुशासन' या विषयावर सोलापूर विद्यापीठात आयोजित चर्चासत्रात उमटला.

सोलापूर विद्यापीठाने लोकशाही पंधरवड्यानिमित्ताने




*सोलापूर विद्यापीठाने लोकशाही पंधरवड्यानिमित्त ७ फेब्रुवारी २०१८ रोजी आयोजित केलेल्या चर्चासत्रास उपस्थित (डावीकडून) सोलापूरचे जिल्हाधिकारी डॉ. राजेंद्र भोसले, तत्कालीन प्रभारी कुलगुरू प्रा. नितीन करमळकर, राज्य निवडणूक आयुक्त ज. स. सहारिया, आयोगाचे तत्कालीन सचिव शेखर चन्ने, कुलसचिव डॉ. जी. आर. मंझा.*

७ फेब्रुवारी २०१८ रोजी या चर्चासत्राचे आयोजन केले होते. राज्य निवडणूक आयुक्त ज. स. सहारिया यांच्या हस्ते चर्चासत्राचे उद्‌घाटन झाले. प्रभारी कुलगुरू प्रा. नितीन करमळकर अध्यक्षस्थानी होते. आयोगाचे तत्कालीन सचिव शेखर चन्ने, सोलापूरचे जिल्हाधिकारी डॉ. राजेंद्र भोसले व सोलापूर महानगरपालिका आयुक्त डॉ. अविनाश ढाकणे प्रमुख पाहुणे होते.

चांगले लोकप्रतिनिधी निवडून देणे ही मतदारांची जबाबदारी आहे. निवडणूक आयोगाने विद्यापीठ व महाविद्यालयांकडून काही अपेक्षा व्यक्त केल्या आहेत. त्या आम्ही निश्चितच पूर्ण करू. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या विविध पैलूंवर संशोधन करण्यास भर देऊ, असे श्री. करमळकर यांनी आश्वासित केले.

मतदार यादीत आपले नाव आहे की नाही, हे प्रत्येकाने दरवर्षी तपासले पाहिजे. निवडणूक आचारसंहितेचे प्रत्येकाने काटेकोर पालन केले पाहिजे. लोकशाहीच्या सुदृढीकरणात युवा पिढीची भूमिका महत्त्वाची असते, असे प्रतिपादन श्री. भोसले यांनी केले.

उद्‌घाटन सत्रानंतर 'स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका आणि प्रसारमाध्यमे' या विषयावर परिसंवाद झाला. सोलापूर महानगरपालिका आयुक्त डॉ. अविनाश ढाकणे या परिसंवादाच्या अध्यक्षस्थानी होते. राज्य

निवडणूक आयोगाचे जनसंपर्क अधिकारी जगदीश मोरे व दै. 'सकाळ'चे सहयोगी संपादक अभय दिवाणजी यांनी चर्चासत्रात विचार मांडले.

प्रसारमाध्यमांकडून निवडणूक यंत्रणेला नेहमीच सहकार्य लाभते. निवडणूक प्रक्रिया असो किंवा प्रशासकीय कार्यवाही असो त्यात उणिवा असल्यास त्याची जाणीव प्रसारमाध्यमे करून देतात. म्हणूनच माध्यमांची भूमिका महत्त्वाची ठरते, असे मत श्री. ढाकणे यांनी व्यक्त केले.

प्रसारमाध्यमांचादेखील आचारसंहितेशी थेट संबंध असतो. निवडणुकीतील प्रसारमाध्यमांची भूमिका आणि जबाबदारीबाबत प्रेस कौन्सिलने मार्गदर्शक तत्त्वे जारी केली आहेत, त्यांचे आपण पालन केले पाहिजे असे आवाहन श्री. मोरे यांनी केले.

सकाळ वृत्तपत्रसमूहाने निवडणूक प्रक्रियेत नेहमीच सकारात्मक सक्रिय सहभाग नोंदविला आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या माध्यमातून नेतृत्व मिळविण्याचे काम केले जाते, याची 'सकाळ'ने वारंवार आपल्या वाचकांना जाणीव करून दिली आहे, अशी माहिती श्री. दिवाणजी यांनी दिली.

समारोपाचे सत्र 'लोकशाही आणि युवा नेतृत्व' या विषयावर झाले. आयोगाचे सचिव शेखर चन्ने अध्यक्षस्थानी होते. प्रा. टी. एस. मोरे प्रमुख वक्ते होते.

लोकशाही व्यवस्थेकडे तरुणांनी सकारात्मकतेने बघितले पाहिजे. एकही उमेदवार योग्य नाही, असे म्हणून 'नोटा'चा पर्याय स्वीकारणे हीसुद्धा नकारात्मकताच असते. म्हणून लोकशाहीच्या बळकटीकरणासाठी युवक पुढे आले पाहिजेत. लोकशाहीच्या बळकटीकरणासाठी युवकांमधील सकारात्मक ऊर्जेचा वापर झाला पाहिजे, असे प्रतिपादन श्री. चन्ने यांनी केले.

युवकांनी नेतृत्व करण्याचे आवाहन स्वीकारले पाहिजे. आपल्या नेतृत्वगुणांचा विकास केला पाहिजे. नेतृत्व करण्यासाठी दूरदृष्टी, आत्मविश्वास, संयम, निर्णायक क्षमता, संवादकौशल्य, चारित्र्य आदी गुणांची कास धरली पाहिजे, असे आवाहन प्रा. मोरे यांनी केले.


25 Years of
73rd and 74th Constitutional Amendements, Act 1992
Meeting of



*राज्य निवडणूक आयोगातर्फे ऑक्टोबर २०१८मध्ये आयोजित आंतरराष्ट्रीय परिषदेपूर्वी १ फेब्रुवारी २०१८ रोजी सह्याद्री अतिथिगृहात मुंबईतील विविध देशांच्या महावाणिज्य दुतांची (कौन्सुलेट जनरल) परिषद आयोजित करण्यात आली होती. या परिषदेस राज्य निवडणूक आयुक्त ज. स. सहारिया, राज्याचे तत्कालीन मुख्य सचिव सुमीत मल्लीक, तत्कालीन मुख्य राजशिष्टाचार अधिकारी राजगोपाल देवरा, आयोगाचे तत्कालीन सचिव शेखर चन्ने यांच्यासह विविध देशांचे प्रतिनिधी उपस्थित होते.*

# आंतरराष्ट्रीय परिषद

भारतीय संविधानातील ७३ आणि ७४व्या दुरुस्तीच्या रौप्यमहोत्सवानिमित्त राज्य निवडणूक आयोगातर्फे ‘सुदृढ लोकशाहीसाठी निकोप निवडणुका’ या विषयावर ऑक्टोबर २०१८मध्ये मुंबईत दोन दिवसीय आंतरराष्ट्रीय परिषद घेण्यात आली. ‘जनतेकडील लोकशाहीचे स्वामित्व’, ‘निवडणुकांतील पैशांचा गैरवापर’, ‘वंचित, उपेक्षित व दुर्बल घटकांचा सहभाग’, ‘खोट्या बातम्या व समाजमाध्यमांचा गैरवापर’ आणि ‘हितधारकांची भूमिका’ या प्रमुख पाच विषयांवर विचारमंथन झाले. त्यात देश-विदेशांतील निवडणूक यंत्रणांचे प्रतिनिधी, अभ्यासक, पत्रकार, संशोधक, सामाजिक कार्यकर्ते आदींनी सहभाग घेतला.

भारतीय संविधानातील ७३ आणि ७४ व्या दुरुस्तीच्या रौप्यमहोत्सवानिमित्त राज्य निवडणूक आयोगातर्फे मुंबई येथे २५ आणि २६ ऑक्टोबर २०१८ रोजी 'सुदृढ लोकशाहीसाठी निकोप निवडणुका' या विषयावर दोन दिवसीय आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. त्यासाठी राष्ट्रकुल स्थानिक स्वराज्य संस्था मंच (सीएलजीएफ, लंडन), इंटरनॅशनल इन्स्टिट्यूट फॉर डेमोक्रसी ॲण्ड इलेक्ट्रोल असिस्टन्स (इंटरनॅशनल आयडिया, स्टॉकहोम), मुंबई विद्यापीठ, पुणे येथील गोखले राज्यशास्त्र व अर्थशास्त्र संस्था, असोसिएशन फॉर डेमोक्रॅटिक रिफॉर्म्स (एडीआर) आणि रिसोर्स ॲण्ड सपोर्ट सेंटर फॉर डेमोक्रसी (आरएससीडी) या संस्थांचे 'नॉलेज पार्टनर' म्हणून सहकार्य लाभले.

राज्यपाल सी. विद्यासागर राव यांच्या हस्ते परिषदेचे उद्घाटन झाले. ग्रामविकासमंत्री पंकजा मुंडे आणि विधानसभेतील विरोधी पक्षनेते राधाकृष्ण विखे पाटील प्रमुख पाहुणे होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत समारोप झाला. वित्त व नियोजन मंत्री सुधीर मुनगंटीवार आणि विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते धनंजय मुंडे प्रमुख पाहुणे होते. विविध देशांतील निवडणूक यंत्रणा आणि इतर विविध आंतरराष्ट्रीय संस्थांचे प्रतिनिधी या परिषदेत सहभागी झाले होते. त्यात इंग्लंड, स्वीडन, बांगला देश, भूतान, इंडोनेशिया, श्रीलंका इत्यादी देशांचा समावेश होता.



*आंतरराष्ट्रीय परिषदेच्या समारोपप्रसंगी विविध पुस्तकांचे प्रकाशन करताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस. या वेळी वित्त व वन मंत्री सुधीर मुनगंटीवार, विधानपरिषदेचे विरोधी पक्षनेते धनंजय मुंडे, राज्य निवडणूक आयुक्त ज. स. सहारिया, आयोगाचे तत्कालीन सचिव शेखर चन्ने आदी.*

राष्ट्र उभारणीच्या कार्यात स्थानिक स्वराज्य संस्थांना योग्य ते स्थान मिळणे अपेक्षित आहे. त्याचबरोबर त्यांच्या सुशासनासाठी स्वायत्त राज्य निवडणूक आयोगाकडून निर्भय, मुक्त व पारदर्शक वातावरणात निवडणुका घेणे क्रमप्राप्त आहे. ७३ व ७४ व्या घटनादुरुस्तीचा हाच गाभा आहे. त्याला २५ वर्षे पूर्ण होत आहेत. या वाटचालीचा आढावा घेतानाच जागतिक स्तरावरील स्थानिक स्वराज्य संस्थांचे स्थान आणि त्यांच्या निवडणुकांसंदर्भातील जागतिक स्थिती जाणून घेण्याच्या दृष्टीने व विचारांचे आदानप्रदान करण्याच्या उद्देशाने ही परिषद आयोजित करण्यात आली होती.

परिषदेत 'जनतेकडील लोकशाहीचे स्वामित्व', 'निवडणुकांतील पैशांचा गैरवापर', 'वंचित, उपेक्षित व दुर्बल घटकांचा सहभाग', 'खोट्या बातम्या व समाजमाध्यमांचा गैरवापर' आणि 'लोकशाहीच्या हितधारकांची भूमिका' या प्रमुख पाच विषयांवर विचारमंथन झाले. त्यात निवडणूक यंत्रणांचे प्रतिनिधी, अभ्यासक, पत्रकार, संशोधक, सामाजिक कार्यकर्ते आदींनी सहभाग घेतला. विविध मान्यवरांनी निवडणुकांसंदर्भातील जागतिक पट मांडताना काही महत्त्वपूर्ण सूचनादेखील केल्या.

''राजकारणाचे गुन्हेगारीकरण थांबविण्यासाठी कुठल्याही राजकीय पक्षाने गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या व्यक्तीला उमेदवारी देऊ नये,'' या मा. राज्यपालांनी केलेल्या आवाहनाचा विचार करणे आवश्यक आहे.



*बायोस्कोपमधील राज्य निवडणूक आयोगाच्या नावीन्यपूर्ण उपक्रमांची छायाचित्रे बघताना मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस.*




*परिषदेत सहभागी झालेल्या विविध देशांतील विविध संस्था आणि निवडणूक आयोगांचे प्रतिनिधी.*



*मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस, श्री. मुनगंटीवार व श्री. मुंडे यांच्यासोबत परिषदेचे मान्यवर वक्ते.*

लोकशाही मूल्यांच्या जपणुकीसाठी आणि मतदार जागृतीसाठी शाळा–महाविद्यालयांमध्ये 'डेमोक्रसी क्लब' स्थापन करणे आणि 'डिजिटल प्लॅटफॉर्म' निर्माण करण्याची त्यांची संकल्पना निश्चितच नावीन्यपूर्ण आहे.

'एक राष्ट्र, एक निवडणूक' उपक्रमात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचादेखील समावेश आवश्यक आहे, असे मत मा. मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केले. त्याचबरोबर, केवळ आंदोलनासंदर्भात गुन्हे असल्यास राजकीय व्यक्तींना सरसकट गुन्हेगार ठरवू नये, मतदार याद्या बिनचूक असाव्यात, सक्तीच्या मतदानाबाबत विचारमंथन झाले पाहिजे आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्रतिनिधींची क्षमता वृद्धिंगत झाली पाहिजे, यावर त्यांनी भर दिला.

निवडणूक काळात उमेदवारांवर खर्चाचे बंधन असते; एरवी मात्र कुठल्याही मर्यादा नसतात, हा विरोधाभास दूर करणे आवश्यक आहे. सुदृढ लोकशाहीसाठी निकोप निवडणुकांबरोबर चांगली निवड महत्त्वाची ठरते, असे विचार श्री. मुनगंटीवार यांनी व्यक्त केले. निवडणुकीत उमेदवार आणि मतदार अशा दोन्ही बाजूंनी पारदर्शकता आवश्यक आहे. निवडणुकीतील समाजमाध्यमांचा गैरवापर टाळण्यासाठी आणि वाढता निवडणूक खर्च रोखण्यासाठी उपाययोजना करणे आवश्यक आहे, असे मत श्रीमती मुंडे

यांनी मांडले.

सुदृढ लोकशाहीसाठी निकोप निवडणुकांबरोबरच राज्य निवडणूक आयोगाचे स्वतंत्र स्थान आणि स्वायत्तता महत्त्वाची आहे, याचे भान राज्य शासनाने कायमस्वरूपी बाळगले पाहिजे, असे आवाहन श्री. धनंजय मुंडे व श्री. विखे पाटील यांनी केले. जातवैधता प्रमाणपत्रासंदर्भात कोणाचीही गैरसोय होता कामा नये. निवडणूक प्रक्रिया सुलभ असावी. त्यासाठी सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांकरिता एकच कायदा असावा, असेही मत श्री. मुंडे यांनी व्यक्त केले. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या लोकप्रतिनिधींच्या प्रशिक्षणाची व्यवस्था असायला हवी, असे श्री. विखे पाटील यांनी नमूद केले.

उद्घाटन आणि समारोप समारंभांव्यतिरिक्त पाच विविध विषयांवर तपशीलवार चर्चा झाली. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसंदर्भात आंतरराष्ट्रीय स्तरावर एक व्यासपीठ निर्माण झाले पाहिजे, त्या माध्यमातून निवडणुकीशी संबंधित घटकांमध्ये जागृती निर्माण करणे, अधिकारी/ कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण, विविध विचार व संकल्पनांचे आदानप्रदान, संशोधन आदींची व्यवस्था झाली पाहिजे, स्थानिक स्वराज्य संस्थांचे व्यावसायिक संघटन उभे राहिले पाहिजे व राज्य निवडणूक आयोगाने 'इन्स्टिट्यूट ऑफ डेमोक्रसी ॲण्ड इलेक्शन्स फॉर गुड गव्हर्नन्स'ला



*परिषदेत सहभागी झालेले देशभरातील विविध राज्यांचे राज्य निवडणूक आयुक्त.*




*आंतरराष्ट्रीय परिषदेचे नॉलेज पार्टनर असलेल्या आंतरराष्ट्रीय संस्थांच्या प्रतिनिधींचा मा. मुख्यमंत्री यांच्याहस्ते गौरव करण्यात आला. अनुक्रमे– श्री. गेरथ वॉल व श्रीमती अनुया कुवर (सीएलजीफ), श्री. एरीक सप्लंड (इंटरनॅशनल आयडिया), डॉ. आजित रानडे (एडीआर), डॉ. मृदुल निळे (मुंबई विद्यापीठ), श्री. भीम रासकर (आरएससीडी) आणि श्री. गायकवाड (गोखले इन्स्टिट्यूट, पुणे).*

प्रोत्साहन दिले पाहिजे या मुद्द्यांवर अनेकांनी भर दिला.

राज्य निवडणूक आयोगाने मुक्त, निर्भय व पारदर्शक निवडणुकांसाठी राज्यघटनेने प्रदान केलेल्या स्वायत्ततेचा आणि अधिकारांचा यथोचित वापर केला पाहिजे. मतदारसंघाच्या/ प्रभागाच्या विकासासंदर्भातील उमेदवाराचा दृष्टिकोन नामनिर्देशनपत्रात नमूद करणे, ही नावीन्यपूर्ण बाब आहे. त्याला मतदारांच्या माहितीसाठी व्यापक प्रसिद्धीदेखील दिली पाहिजे. निवडणुकांमधील गैरप्रकार टाळण्यासाठी 'यलो कार्ड' आणि 'रेड कार्ड' ही संकल्पना अमलात आणावी. गैरवर्तणुकीसंदर्भात प्रारंभी उमेदवाराला दोनदा 'यलो कार्ड' दाखवावे. तिसऱ्यांदा अनुचित प्रकार घडल्यास 'रेड कार्ड' दाखवून थेट कार्यवाही करावी. उमेदवाराची गैरवर्तणूक किंवा आचारसंहिताभंग केल्यासंदर्भातील माहिती मतदारांना व्हावी, यासाठी संकेतस्थळ असायला हवे. इलेक्ट्रॉनिक

मतदान यंत्रासंदर्भातील गैरसमज दूर झाले पाहिजेत. समाजमाध्यमांवरील खोट्या बातम्यांना आळा घालण्याकरिता सर्व घटकांनी सहकार्य करण्याची आवश्यकता आहे, असे विचार विविध मान्यवरांनी व्यक्त केले.

स्थानिक स्वराज्य संस्थांना बळकट करण्यासाठी आणि सुशासनाकरिता राज्य शासनाने निधी, अधिकार आणि मनुष्यबळाचे हस्तांतर केले पाहिजे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या नवनिर्वाचित विशेषतः महिला, वंचित आणि दुर्बल घटकातील लोकप्रतिनिधींकरिता प्रभावी प्रशिक्षणाची व्यवस्था शासनाने केली पाहिजे. गुन्हेगारी पार्श्वभूमीच्या व्यक्तींना रोखण्यासाठी; तसेच आर्थिक बळाचा आणि समाजमाध्यमांचा गैरवापर रोखण्याकरिता प्रभावी कायदा करायला हवा. सर्वांना समान संधीच्या दृष्टीने स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये कोणालाही दोनपेक्षा जास्त वेळ प्रतिनिधित्व मिळता कामा नये. राज्य निवडणूक आयोगाला आवश्यक तेवढा निधी, साधनसामग्री आणि मनुष्यबळ उपलब्ध करून देणे हे शासनाचे कर्तव्य आहे, अशा आशयाची मांडणी अनेक वक्त्यांनी केली.

परिषदेमध्ये झालेल्या व्यापक चर्चेच्या अनुषंगाने राज्य निवडणूक आयोग आपल्या कार्यकक्षेतील बाबींवर निश्चितच कृतिशील पावले उचलेल. अन्य बाबी राज्य शासनाशी संबंधित आहेत. त्याबाबत शासन निश्चितच सकारात्मक विचार करेल, असा विश्वास आहे. एकूणच आशयाचा विचार करता, आंतरराष्ट्रीय परिषद फलदायी ठरली, असे म्हणता येईल. विशेष म्हणजे, त्यामुळे राज्य निवडणूक आयोगाची जबाबदारी आणखी वाढली आहे,




*परिषदेनिमित्त आयोजित प्रदर्शनात राज्य निवडणूक आयोगाच्या नावीन्यपूर्ण उपक्रमाचे फलक.*




(Local Self Government Elections)
An Initiative Of
under







*आंतरराष्ट्रीय परिषदेच्या पहिल्या दिवशीच्या चर्चासत्रानंतर परदेशातील उपस्थित मान्यवरांना महाराष्ट्र आणि भारतीय संस्कृतीची ओळख करून देणाऱ्या सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्यात मुंबई विद्यापीठ व एसएनडीटी महिला विद्यापीठाच्या विविध विद्यार्थी व विद्यार्थिनींनी विविध नृत्याविष्कार सादर केले. त्यातील काही क्षणचित्रे.*

असे म्हणणे अधिक सयुक्तिक ठरेल.

## ‘मुंबई जाहीरनामा’

आंतरराष्ट्रीय परिषदेच्या समारोपापूर्वी ‘मुंबई जाहीरनामा’ घोषित करण्यात आला. या जाहीरनाम्यात शिफारशींचे दोन प्रमुख भाग केले आहेत. पहिल्या भागात विविध लोकशाही देश आणि आंतरराष्ट्रीय संस्थांशी संबंधित शिफारशी आहेत. दुसऱ्या भागात भारतातील विविध घटक, विशेषत: राज्य निवडणूक आयोगासंदर्भातील शिफारशी आहेत. या दोन्हींतील ठळक शिफारशी अशा :

- स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या दृष्टीने विचारविनिमयासाठी आंतरराष्ट्रीय व्यासपीठ निर्माण करावे.
- आंतरराष्ट्रीय व्यासपीठाच्या माध्यमातून विचार, संकल्पना, उल्लेखनीय बाबी आणि निवडणुकीतील तंत्रज्ञानाच्या वापराबाबत आदानप्रदान झाले पाहिजे.
- प्रशिक्षण, व्यावसायिक विकास, विविध घटकांमध्ये जनजागृती आदींच्या माध्यमातून क्षमता वृद्धिंगत केली पाहिजे.
- प्रशिक्षण कार्यक्रमांचे मूल्यमापन आणि स्वतंत्र निवडणूक निरीक्षक नियुक्तीसंदर्भात आपसांत कार्यवाही झाली पाहिजे.
- निवडणूकविषयक महत्त्वाच्या मुद्द्यांवर काम करण्यासाठी राज्य निवडणूक आयोगाच्या ‘सुप्रशासनासाठी लोकशाही व निवडणूक संस्थे’ला प्रोत्साहन द्यायला हवे.
- विशिष्ट कालमर्यादेत स्थानिक स्वराज्य संस्थांकडे निधी कार्ये आणि यंत्रणा यांचे हस्तांतर झाले पाहिजे.
- सर्व लोकप्रतिनिधी, विशेषत: महिला आणि वंचित घटकांतील लोकप्रतिनिधींच्या प्रशिक्षणासाठी यंत्रणा विकसित केली पाहिजे.
- गुन्हेगारी पार्श्वभूमीच्या व्यक्तींना निवडणूक लढविण्यापासून प्रतिबंध करण्यासाठी निवडणुकीत सुधारणा केल्या पाहिजेत.
- एखाद्या लोकप्रतिनिधीला जास्तीत जास्त केवळ दोन वेळाच स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये प्रतिनिधित्व करता यायला हवे.
- आर्थिक बळाचा आणि सोशल मीडियाचा दुरुपयोग टाळण्यासाठी निवडणूक सुधारणांची आवश्यकता आहे.
- राज्य निवडणूक आयोगाने राज्यघटनेने प्रदान केलेल्या शक्तीचा अधिकाधिक वापर करून पूर्णत: आपले स्वतंत्र अस्तित्व कायम राखले पाहिजे.
- निवडणुकांसंदर्भात काही पोकळी असल्यास राज्य निवडणूक आयोगाने त्यांची पूर्तता करावी.
- सर्व उमेदवारांनी आपल्या मतदारसंघाच्या किंवा प्रभागाच्या विकासासंदर्भातील योजनांची माहिती द्यावी आणि तिला प्रसिद्धी द्यावी.
- आचारसंहितेचे उल्लंघन करणाऱ्या उमेदवारांसंदर्भात येलो आणि रेड कार्डची पद्धत अवलंबली गेली पाहिजे.
- महालेखापालांच्या सूचीतील लेखापरीक्षकांकडून राजकीय पक्ष आणि उमेदवारांच्या खर्चाचे लेखापरीक्षण केले पाहिजे.
- अखिल भारतीय राज्य निवडणूक आयुक्तांच्या संघटनेच्या अध्यक्षांनी या विविध बाबींसंदर्भात पुढाकार घेऊन समन्वयकाची भूमिका बजवावी.

# निवडणूक आणि प्रसारमाध्यमे

राज्य निवडणूक आयोगाकडून वेळोवेळी मतदार, उमेदवार आणि राजकीय पक्षांशी प्रसारमाध्यमांद्वारे संवाद साधला जातो. त्यासाठी प्रसारमाध्यमांची भूमिका नेहमीच सहकार्याची राहिली आहे. पेड न्यूजला प्रतिबंध, जाहिरात प्रमाणन संस्थांची स्थापना, सोशल मीडियाचा गैरवापर टाळण्यासाठी उपाययोजना, निवडणूक प्रकियेचे वृत्तांकन, प्रेस कौन्सिलच्या मार्गदर्शक तत्त्वांचा अवलंब करण्यासाठी राज्य निवडणूक आयोगाने सातत्याने प्रयत्न केले.



*राज्य निवडणूक आयोगाच्या कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेचे प्रातिनिधिक छायाचित्र.*

कायदेमंडळ, न्यायपालिका, कार्यपालिका आणि प्रसारमाध्यमे हे लोकशाहीचे चार मुख्य स्तंभ आहेत. त्याचबरोबर निवडणुका हा लोकशाहीचा एक महत्त्वाचा घटक आहे. जनतेच्या आशाआकांक्षांचे प्रतिबिंब निवडणुकीच्या माध्यमातून व्यक्त होत असते. निवडणुकांच्या माध्यमातून होणाऱ्या परिवर्तनात प्रसारमाध्यमांची भूमिका महत्त्वाची ठरते. त्यामुळे लोकशाही, निवडणुका आणि प्रसारमाध्यमांचे आपापसांत अतूट नाते आहे. यातूनच लोकशाही बळकट झाली आहे.

राज्य निवडणूक आयोगाकडून वेळोवेळी मतदार, उमेदवार आणि राजकीय पक्षांशी प्रसारमाध्यमांद्वारे संवाद साधला जातो. त्यासाठी प्रसारमाध्यमांची भूमिका नेहमीच सहकार्याची राहिली आहे. आदर्श आचारसंहिता आणि प्रसारमाध्यमांचा थेट संबंध असतो. कारण निवडणुकीत सर्वांना समान संधी आणि व्यावसायिक नैतिकता या बाबी महत्त्वाच्या असतात. 'पेड न्यूज'मुळे मात्र या तत्त्वांना बाधा पोचू शकते. म्हणूनच निवडणूक काळात 'पेड न्यूज'ला प्रतिबंध करणे, जाहीर प्रचार समाप्तीनंतर

जाहिरातींवर निर्बंध घालणे, सार्वजनिक पैशातून शासनाच्या कामगिरीबाबतच्या जाहिराती प्रसिद्ध करण्यास प्रतिबंध करणे, पहिल्या टप्प्यातील प्रचार समाप्तीनंतर जनमत व मतदानोत्तर चाचण्यांवर निर्बंध आणणे आदी स्वरूपांच्या उपाययोजना कराव्या लागल्या आहेत.

## पेड न्यूज

प्रसारमाध्यमे निवडणुकीच्या काळात बातम्यांच्या स्वरूपात काही उमेदवार किंवा राजकीय पक्षांचा प्रचार करीत असतात. या जाहिरातींचे दृश्य स्वरूप बातम्यांसारखे असले, तरी प्रत्यक्षात त्या पैसे, वस्तू किंवा अन्य स्वरूपांच्या मोबदल्यात प्रसिद्ध केलेल्या जाहिरातीच असतात. त्यालाच 'पेड न्यूज' असे म्हटले जाते. आचारसंहितेनुसार निवडणुकीत सर्वांना समान संधी मिळणे आवश्यक असते. या तत्त्वाचे अशा प्रकारांमुळे उल्लंघन होते.

राजकीय पेड न्यूज ही संकल्पना साधारणतः २००९मध्ये प्रामुख्याने समोर आली होती. त्यावर प्रेस कौन्सिलने लक्ष केंद्रित करावे, असे विविध मान्यवरांनी व पत्रकारांनी सुचविले होते. या संदर्भात प्रेस कौन्सिलने श्री. परंजॉय गुहा ठाकुर्ता व श्री. कानिनेकोलम रेड्डी यांची समितीदेखील नियुक्त केली होती. पेड न्यूजसंदर्भात प्रेस कौन्सिलतर्फे इंदूर व नवी दिल्ली येथे अनुक्रमे ३१ मार्च व २६ एप्रिल २०१० रोजी बैठकाही घेतल्या होत्या. त्यानंतर प्रेस कौन्सिलतर्फे अंतिम अहवालासाठी १२ जणांची समिती गठित केली होती. अंतिमतः पैशांच्या मोबदल्यात किंवा विशेष मेहरबानीच्या मोबदल्यात कोणत्याही प्रसिद्धिमाध्यमांत (मुद्रित व इलेक्ट्रॉनिक) आलेली कोणतीही बातमी किंवा विश्लेषण म्हणजे पेड न्यूज होय, अशी पेड न्यूजची व्याख्या करण्यात आली.

पेड न्यूजला प्रतिबंध करण्यासाठी राज्य निवडणूक आयोगाने १६ जानेवारी २०१२ रोजी महानगरपालिका निवडणुकीसाठी महानगरपालिका आयुक्ताच्या अध्यक्षतेखाली; तर नगरपरिषदा, नगरपंचायती, जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्यांच्या निवडणुकांसाठी जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्याबाबतचे आदेश दिले. महानगरपालिकेचा जनसंपर्क अधिकारी महानगरपालिका स्तरावरील समितीचा सदस्य सचिव असतो. जिल्हा माहिती अधिकारी अन्य स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठीच्या समितीचा सदस्य सचिव असतो. पेड न्यूजबाबत एखाद्या उमेदवाराविषयी तक्रार असल्यास त्याला आणि संबंधित वृत्तपत्राला नोटीस बजावली जाते. त्याचे म्हणणेही ऐकून घेतले जाते. संबंधित बातमी पेड न्यूज असल्याचे सिद्ध झाल्यास समितीच्या अंतिम निर्णयानुसार संबंधित बातमीच्या आकाराप्रमाणे जाहिरातीचा खर्च आकारला जातो. त्याचा उमेदवाराच्या निवडणूक खर्चात समावेश केला जातो. उमेदवाराने मर्यादेपेक्षा जास्त खर्च केल्यास तो अनर्ह ठरू शकतो.

## समितीची रचना व कार्ये

- महानगरपालिका निवडणुकांसाठी आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली समिती.
- महानगरपालिकेचा जनसंपर्क अधिकारी सदस्य सचिव.
- जिल्हा परिषद व पंचायत समिती तसेच नगरपरिषदांसाठी




*राज्य निवडणूक आयोगाच्या प्रसिद्धिपत्रकांसाठी सुरू करण्यात आलेली ब्लॉगची सुविधा.*

जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली समिती.

- जिल्हा माहिती अधिकारी सदस्य सचिव.
- प्रसारमाध्यमातील बातम्यांची छाननी.
- ‘पेड न्यूज’बाबत तक्रारींचे निराकरण.
- ‘पेड न्यूज’बाबत नोटीस बजावणे व संबंधितांची बाजू ऐकून घेणे.
- ‘पेड न्यूज’वरील खर्चाचा निवडणूक खर्चात समावेश करण्याची शिफारस.
- एखाद्या प्रकरणी प्रेस कौन्सिलकडे तक्रार करणे शक्य.
- गंभीर प्रसंगी गुन्हा दाखल करण्याचीही शक्यता नाकारता येत नाही.

## प्रेस कौन्सिलच्या शिफारशी

‘पेड न्यूज’ची घटना शिक्षापात्र निवडणूक कुप्रथा घोषित करावी, ‘पेड न्यूज’च्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी प्रेस कौन्सिल ऑफ इंडियाला संपूर्ण अधिकार असावेत, प्रेस कौन्सिलच्या शिफारशी बंधनकारक करण्यासाठी तिची कार्यकक्षा विस्तारावी, इलेक्ट्रॉनिक व अन्य प्रसारमाध्यमांच्या समावेशासाठी प्रेस कौन्सिलची पुनर्रचना करावी अशा शिफारशी प्रेस कौन्सिलने केल्या आहेत.

## जाहिरात प्रमाणन समित्या

जी जाहिरात देशाच्या कायद्यानुसार अनुरूप नाही आणि जी नीतिमत्ता, सभ्यतेस बाधक आहे व भावना दुखावणारी किंवा किळस, घृणा आणि तिटकारा उत्पन्न करणारी आहे, अशा कोणत्याही जाहिरातीचे प्रक्षेपण केले जाणार नाही. प्रक्षेपणाचे संनियंत्रण भारत निवडणूक आयोग करेल, असे निर्देश मा. सर्वोच्च न्यायालयाने १३ एप्रिल २००४ रोजीच्या एका (एसएलपी क्र. ६६७९/२००४) प्रकरणात दिले होते. त्यानुसार भारत निवडणूक आयोगाने इलेक्ट्रॉनिक माध्यमांसाठी जाहिरात, प्रमाणन समिती स्थापन करण्याचा निर्णय घेतला होता. राज्य निवडणूक आयोगानेही ६ जानेवारी २००९ रोजी जाहिरात प्रमाणन समितीची स्थापना करण्याचा निर्णय घेतला होता. त्यानुसार राज्य निवडणूक आयोगाच्या स्तरावर आयोगाच्या सचिवांचा समावेश असलेली समिती स्थापन करण्यात आली.

माहिती व जनसंपर्क अधिकारी यांच्याकडे या समितीच्या कागदपत्रांची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. राज्य निवडणूक आयोगाच्या २२ डिसेंबर २०११च्या आदेशानुसार महानगरपालिका आयुक्त व जिल्हाधिकाऱ्यांच्या स्तरावरदेखील समित्या स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

## जाहिरात प्रमाणनांची आवश्यकता

- धर्म, वंश, भाषा, जात किंवा समाजात भेद निर्माण करण्यास प्रतिबंध.
- संविधानातील तरतुदींचा भंग करण्यास आळा घालणे.
- शांतताभंग, हिंसा अथवा कायदेभंगाची कृती किंवा चिथावणीस प्रतिबंध.
- अश्लीलतेच्या चिथावणीस प्रतिबंध.
- एखादी व्यक्ती अथवा संस्थेचा अवमान अथवा बदनामीस प्रतिबंध.
- नीतिमत्ता व सभ्यतेस बाधक व भावना दुखावणाऱ्या जाहिराती नकोत.
- घृणा व तिटकारा उत्पन्न करणाऱ्या जाहिरातींना आळा.

## जाहिरात प्रमाणन समितीची रचना

- इलेक्ट्रॉनिक माध्यमातील जाहिरातींसाठी प्रमाणन समिती
- सर्व जाहिरातींचे प्रमाणन आवश्यक
- नगरपरिषद, जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांसाठी समिती. अध्यक्ष – जिल्हाधिकारी.
- महानगरपालिका निवडणुकांसाठी समिती. अध्यक्ष – महानगरपालिका आयुक्त.
- नगरपरिषद, जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांबाबत जिल्हा माहिती अधिकाऱ्याकडे कागदपत्रे.
- महानगरपालिकेबाबत जनसंपर्क अधिकाऱ्याकडे सर्व कागदपत्रे.

## सोशल मीडिया

समाजमाध्यमे (सोशल मीडिया) हा आधुनिक तंत्रज्ञानाचा महत्त्वाचा आविष्कार आहे, असे म्हणता येईल. सोशल मीडियाच्या फायद्याबरोबरच असंख्य आव्हानेदेखील



*स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सन २०१७ मधील निवडणुकांसाठी मतदानाच्या पूर्वसंध्येला आयोगाच्या कार्यालयात झालेली पत्रकार परिषद.*

उभी ठाकली आहेत. निवडणूक प्रक्रियादेखील याला अपवाद नाही. निवडणूक जिंकण्याच्या ईर्षेतून सोशल मीडियाचा दुरुपयोग केला जातो. निवडणुकीत एखाद्या राजकीय उमेदवाराची प्रतिमा मलिन करण्यासाठी किंवा एखाद्याची तळी उचलण्यासाठी माहिती तंत्रज्ञान कंपन्या 'फेसबुक', 'ट्विटर' आणि 'यू ट्यूब'सारख्या सोशल मीडियांचा गैरवापर करत आहेत, असा आरोप एका वेबसाइटने काही वर्षांपूर्वी केला होता. या वेबसाइटने केलेल्या स्टिंग ऑपरेशनमधून ही बाब उघड झाली होती. अनेक कंपन्यांनी राजकीय नेत्यांची चांगली किंवा वाईट प्रतिमा बनविण्याची तसेच खोटे प्रोफाईल, प्रतिस्पर्ध्याविषयी बदनामीकारक मजकूर तयार करून देण्याची तयारी दाखवली होती. मुक्त व निर्भय वातावरणात निवडणुका पार पाडण्यात या नव्या आव्हानामुळे अडचणी उद्‌भवू शकतात. या आव्हानाला सामोरे जाण्यासाठी भारत निवडणूक आयोग विविध पावले उचलत आहे. राज्य निवडणूक आयोगानेदेखील या संदर्भात विचारमंथन सुरू केले आहे आणि ठोस उपाययोजना करण्यासाठी प्रयत्न सुरू केले आहेत.

## सोशल मीडिया वापरणार असल्यास...

- इलेक्ट्रॉनिक मीडियाच्या व्याख्येत सोशल मीडियाचा समावेश.
- सोशल मीडियावरील जाहिरातींनाही प्रमाणन आवश्यक.
- सोशल मीडियावरील प्रचार खर्चाचा निवडणूक खर्चात समावेश.
- जाहिरात तयार करणे, मनुष्यबळ, इंटरनेट इत्यादींचा खर्चात समावेश.
- वैयक्तिक खात्यावरील राजकीय पोस्टला प्रमाणनाची गरज नाही.
- व्यावहारिक मार्गासाठी माहिती तंत्रज्ञान विभागाशी विचारविनिमय.

## निवडणूक प्रकियेचे वृत्तांकन

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या विविध टप्प्यांचे प्रसारमाध्यमांद्वारे वृत्तांकन केले जाते. त्यासाठी आयोगाकडून आवश्यक ते सहकार्य केले जाते. राज्य निवडणूक आयोगाच्या पातळीवर किंवा क्षेत्रीय स्तरावर पत्रकार परिषदा घेऊन प्रसारमाध्यमांच्या प्रतिनिधींना विविध बाबींसंदर्भात माहिती दिली जात असते. याशिवाय, प्रसारमाध्यमांच्या प्रतिनिधींशी वेळोवेळी समन्वयदेखील साधला जातो.

## सुलभ निवडणूक वृत्तांकनासाठी

- आयोगाच्या सूचनांच्या अधीन राहून प्रवेशपत्र देण्याचे अधिकार स्थानिक स्तरावर आहेत.
- प्रवेशपत्रधारक पत्रकारांनाच मतदान केंद्र व मतमोजणीच्या ठिकाणी प्रवेश देण्यात येतो.
- प्रत्यक्ष मतदान कक्षापासून केवळ दूरवरूनच छायाचित्र घेणे बंधनकारक आहे.
- फक्त हातावरची शाईची खूण दाखवितानाचे छायाचित्र काढण्याची मुभा आहे.
- माध्यमांसाठी मतमोजणी केंद्राजवळ स्वतंत्र कक्षाची स्थापना असावी.
- गोपनीयतेचा भंग करणाऱ्या चित्रीकरणास सक्त मनाई.

## प्रेस कौन्सिलची मार्गदर्शक तत्त्वे

- निवडणुका व उमेदवारांबद्दल वस्तुनिष्ठ वृत्तांत देणे, हे कर्तव्य आहे.
- अतिशयोक्तिपूर्ण वार्तांकनात वृत्तपत्रांनी सहभागी होणे अपेक्षित नाही.
- विशिष्ट उमेदवार किंवा पक्षाच्या प्रचारास वाव देणे अपेक्षित नाही.
- शत्रुत्वाची किंवा द्वेष भावना पसरविण्याचा संभव असणारे वृत्त देणे टाळावे.
- उमेदवाराच्या भवितव्याला बाधा पोचविणारे खोटे वृत्त टाळावे.
- शहानिशा न केलेले आरोप प्रसिद्ध करू नयेत.
- प्रसारमाध्यमांनी कोणत्याही तऱ्हेचे प्रलोभन स्वीकारू नये.
- सरकारी राजकोषातील खर्चाने दिलेल्या कोणत्याही जाहिराती स्वीकारू नयेत.

# टीम राज्य निवडणूक आयोग

**श्री. ज. स. सहारिया**.... राज्य निवडणूक आयुक्त

श्री. किरण कुरुंदकर .................................. सचिव

डॉ. मृदुल निळे.......................... विशेष कार्याधिकारी

श्री. राजाराम झेंडे................................. सह सचिव

श्री. अविनाश सणस........................ प्रभारी उपायुक्त

श्रीमती आरती सरवदे..................... सहायक आयुक्त

श्रीमती मनीषा मोहिते ........................... तहसीलदार

श्री. अतुल सावे.................................. तहसीलदार

श्री. जगदीश मोरे........... माहिती व जनसंपर्क अधिकारी

श्री. अतुल जाधव............................. कक्ष अधिकारी

श्री. संजय सावंत ............................ कक्ष अधिकारी

श्रीमती रत्नप्रभा बेले ......................... कक्ष अधिकारी

श्रीमती सुमन आरोलकर..................... कक्ष अधिकारी

श्रीमती प्रणाली घोंगे ....................... सहायक आयुक्त

श्री. वैभव सापळे........... सहायक गटविकास अधिकारी

श्री. गिरीश कुलकर्णी ..................... नायब तहसीलदार

श्री. सुरेश गुरव......................... वरिष्ठ स्वीय सहायक

श्रीमती रश्मी कपिलेश्वर ............ निवडश्रेणी लघुलेखिका

श्री. अनिल परब ....................... उच्चश्रेणी लघुलेखक

श्री. नंदलाल कुचे...................... उच्चश्रेणी लघुलेखक

श्रीमती अनघा भोरावकर............निम्नश्रेणी लघुलेखिका

श्रीमती स्नेहा महाले ................निम्नश्रेणी लघुलेखिका

श्री. विनोद चव्हाण.................... निम्नश्रेणी लघुलेखक

श्री. अजित उतेकर.................... निम्नश्रेणी लघुलेखक

श्री. प्रदीप परब........................................ सहायक

श्री. शैलेंद्र वराडे .............................. रोख लेखापाल

श्रीमती प्रिया सावंत .................................. सहायक

श्री. केशरसिंग सुलाने ................................ सहायक

श्री. समीर राणे........................................ सहायक

श्रीमती सायली सावंत................................ सहायक

श्रीमती ज्योती पंडित ................................. सहायक

श्रीमती सुप्रिया तेंडुलकर.............................. सहायक

श्री. अरुण गिजये ..................................... सहायक

श्री. दि. घ. विसावळे.......................... उप लेखापाल

श्रीमती तृप्ती हणमशेट ................................ ग्रंथपाल

श्रीमती भारती पाटील...................... संगणक चालिका

श्रीमती जान्हवी सावंत ..................... देयक लेखापाल

श्री. पूरणसिंग राठोड
श्रीमती शीतल चव्हाण
श्रीमती ज्योती पाटील
श्री. संदेश वैद्य
श्री. संतोष चव्हाण
श्रीमती गौतमी सावंत
श्री. समीर गंदपवार
श्रीमती शोभा घोरपडे
श्री. सचिन गौड
श्रीमती विद्या कापसे
श्रीमती ज्योती हरसोरा
श्री. सचिन पंचरास
श्री. प्रवीण कारंडे
श्री. जितेंद्र पगारे
श्रीमती स्वाती सावंत
श्री. दीपक ठुबे
श्री. सं. तु. गावडे
श्री. रा. द. गडाख
श्री. बाबूराव गोरे
श्री. अनिल ठोंबरे
श्री. सुनील सावंत
श्री. संदेश जाधव
श्री. अनिल जानकर
श्रीमती सुनंदा शेंगाळ
श्री. संजय जगताप
श्री. रमाकांत गुळेकर
श्री. मोहन फासे
श्रीमती प्रियांका गोसावी
श्री. नाना ढोपे
श्री. अ. दि. मोरे



*राज्य निवडणूक आयोगाच्या कर्मचाऱ्यांसाठी आयोजित प्रशिक्षणाप्रसंगी मार्गदर्शन करताना आयोगाचे तत्कालीन सचिव डॉ. प्रदीप व्यास.*

भारतीय संविधानात ७३ व ७४वी दुरुस्ती १९९२ मध्ये करण्यात आली. त्यानंतर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी प्रत्येक राज्यात स्वतंत्र राज्य निवडणूक आयोगाची स्थापना झाली. महाराष्ट्रामध्ये २६ एप्रिल १९९४ रोजी राज्य निवडणूक आयोग अस्तित्वात आला. त्यास २६ एप्रिल २०१९ रोजी २५ वर्षे पूर्ण झाली. या २५ वर्षांच्या वाटचालीचा एकत्रित आढावा 'राज्य निवडणूक आयोग: रौप्यमहोत्सवी वाटचाल' या ग्रंथात घेण्याचा प्रयत्न केला आहे. आयोगाच्या २५ वर्षांच्या वाटचालीत विविध टप्प्यांवर वेगवेगळ्या निवडणूक सुधारणा झाल्या. विविध उपक्रम राबविले गेले. त्याचा स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका अधिकाधिक निर्भय, मुक्त व पारदर्शक वातावरणात पार पाडण्यासाठी निश्चितच हातभार लाभला. खरे तर निवडणूक सुधारणा ही निरंतर चालणारी प्रक्रिया आहे. बदलत्या काळानुसार निवडणूक यंत्रणेसमोरील आव्हानेही बदलत असतात. नवीन प्रश्न उपस्थित होतात. त्यांची उकल करून पुढे जाणे क्रमप्राप्त ठरते. या सर्वांचा परामर्श या ग्रंथात घेतला आहे.

**– ज. स. सहारिया**

राज्य निवडणूक आयुक्त, महाराष्ट्र